म. ग्रं. सं. ठाणे.
ाय चरित्र
क्र. १२८९

१२८९



REFBK-0005265

३८ ८६०
१नचदल
बा. रा.
१२४९
चरित्र

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.

भारत-गौरव-ग्रंथमाला ३८८९४ महाराष्ट्र कविचरित्र,

पुष्प १२२ वें १२५९ भाग ९ वा

[illegible] १८-९-४५

संतश्रेष्ठ

# तुकाराम

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ५२६५
शाखा स्थलप्रत



न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते

— भगवान् श्रीकृष्ण

लेखक

महाराष्ट्रभाषाभूषण

जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर

REFBK-0005265

कापडी २ रु. ] किंमत [ कागदी १॥। रु.

या पुस्तकाच्या प्रथमावृत्तीचे सर्व
हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन.

मुद्रक व प्रकाशक—मंगेश नारायण कुळकर्णी,
कर्नाटक प्रेस, कर्नाटक हाउस,
चिरा बाजार, मुंबई नं. २

# प्रस्तावना

" Remember that there are only two people whose good opinion you need care about—your Maker and yourself."

— *Dean Inge*

प्रिय वाचक हो, आपला हा महाराष्ट्र देश खरोखरच मोठा भाग्यवान् आहे. धनधान्यादि समृद्धीच्या बाबतींत गुजराथ, माळवा, पंजाब, बंगाल वगैरे प्रांतांच्या मानानें हा देश जरी कदाचित् थोडासा कमी संपन्न असला तरी साधुत्व, शौर्य, बुद्धिमत्ता, कल्पकता, विद्वत्ता, मुसद्देगिरी आणि स्वार्थत्याग या गुणांच्या बाबतींत हिंदुस्थानचा दुसरा कोणताही भाग महाराष्ट्राची बरोबरी करूं शकत नाहीं अशी माझी ठाम समजूत आहे. तीनशें वर्षांपूर्वी अखिल आर्यावर्त पारतंत्र्यतिमिरानें पूर्णपणें व्याप्त होऊन गेलेला असतां ज्या एका अवतारी पुरुषानें आपल्या वयाच्या अठराव्या वर्षी, सर्वथैव प्रतिकूल अशा परिस्थितीशीं निधड्या छातीनें टक्कर देऊन देदीप्यमान् स्वराज्यदीप पाजळला आणि किंकर्तव्यमूढ होऊन बसलेल्या हिंदु लोकांस स्वातंत्र्यमार्ग दाखविला तो पुरुष याच महाराष्ट्रांत जन्म पावला; आणि त्याच कालांत परधर्मदर्शनानें आणि परधर्मीयांकडून होणाऱ्या छलामुळें स्वधर्मपराङ्मुख झालेल्या जनतेंत ज्या शेंकडों साधुसंतांनीं आपल्या तेजस्वी आणि अधिकारयुक्त वाणीनें धर्म-जागृति केली ते साधुसंतही याच पुण्यभूमींत निर्माण झाले होते. स्वराज्य-संस्थापक छत्रपति शिवाजी महाराजांनीं आपल्या अतुल बुद्धिबलानें आणि लोकोत्तर शौर्यानें तत्कालीन यवन राज्यकर्त्यांचे जसे डोळे दिपविले, त्याप्रमाणेंच आमच्या महाराष्ट्रीय संतांनींही आपल्या धार्मिक सामर्थ्यानें त्यांना थक्क करून सोडलें. आणि त्या दोघांचेंही कार्य येथें 'समांतर रेषेंत' एकसमयावच्छेदेंकरून चालू होतें. शिवाजीमहाराजांच्या कालीं महाराष्ट्रांत जसें साधुसंतांचें पीक आलें,

तसें त्यानंतर पुनः कधीं आलें नाहीं; आणि दुसरा शिवाजी निर्माण होईपर्यंत तसें तें कदाचित् येणारही नाहीं.

गेल्या सातशें वर्षांत महाराष्ट्रांत जरी शेकडों साधु होऊन गेले आहेत तरी 'साधु' हा शब्द कानीं पडतांच अगदीं पहिल्या प्रथम जर एखादी मूर्ति आपल्या मनःचक्षूंपुढें उभी रहात असेल तर ती, हातीं टाळवीणा घेऊन आणि तुलसीमाळा गळ्यांत घालून ब्रह्मानंदानें थै थै नाचणारी तुकारामबुवांचीच मूर्ति होय; किंबहुना 'साधु' आणि 'तुकाराम' हे दोन शब्द मराठी भाषेंत समानार्थकच होऊन बसले आहेत असेंही म्हटल्यास चालेल. ज्ञानदेव, नामदेव, रामदास, रंगनाथ, जयराम वगैरे हे सगळे साधूच, परंतु त्यांतही 'तुकाराम' या नांवांतली जादू कांहीं और आहे. साधु या नात्यानें तुकारामबुवांइतकी लोकप्रियता दुसऱ्या कोणत्याही पुरुषास प्राप्त झाली नाहीं असें म्हटल्यास असत्यकथनाचा दोष अंगीं लागेल असें वाटत नाहीं. ब्राह्मणेतर ज्ञातींत जन्म घेऊन या दैवी पुरुषानें आपल्या साधुत्वाच्या जोरावर पट्टीच्या कर्मठ ब्राह्मणांकडूनही मान्यता संपादन केली, आपल्या प्रेमळ अभंगवाणीनें आपल्या देशबांधवांस तर काय पण प्रत्यक्ष पांडुरंगासदेखील वेड लाविलें, आणि वामन, रंगनाथ, श्रीधर, महीपति, मोरोपंत इत्यादि सत्पुरुषांकडूनही आपलें स्तुतिस्तोत्र गावविलें! सामान्य संसारी मनुष्याच्या कोटींतून साधुकोटीस जाऊन पोंचेपर्यंत तुकारामबुवांनीं या भवसागरांत जितक्या गटंगळ्या खाल्ल्या तितक्या इतर संतांस खाव्या लागल्या नाहींत आणि म्हणूनच तुकारामबुवांचें चरित्र सर्व मुमुक्षु जनांस आदर्शवत् होऊन राहिलें आहे. ज्ञानदेव, एकनाथ आणि रामदास यांचीं चरित्रें पाहिलीं असतां असें दिसून येतें कीं ते तिन्ही पुरुष पूर्वजन्मींचे योगभ्रष्ट पुरुष असल्यामुळें त्यांना अल्पवयांतच उपरति होऊन त्यांचें चित्त परमार्थाकडे लागलें व भरतारुण्यांतच त्यांच्या साधुत्वाचा प्रकाश महाराष्ट्रभर फांकला. यामुळें या पुरुषांची गणना अलौकिक पुरुषांच्या कोटींत करावी लागते. परंतु तुकारामबुवांचा प्रकार मात्र अगदीं निराळा आहे. अगदीं आरंभीं तरी निदान त्यांची प्रवृत्ति परमार्थाकडे होती असें वाटत नाहीं. तत्कालीन इतर लोकांप्रमाणेंच आरंभीं ते पूर्ण संसारी होते. पण पुढें दुष्काळ, दारिद्र्य, प्रियजनांचे मृत्यु वगैरे उपाधींमुळें ते अगदीं रंजीस आले आणि "पुरे पुरे हा संसार। कर्म बळिवंत दुस्तर," असें त्यांस वाटून, सर्व

सुखाचें आदिस्थान जो परमेश्वर त्याची आराधना करून चिरकालीन मनःशांति प्राप्त करून घेण्याचें त्यांनीं ठरविलें; आणि परमार्थसोपानाची एकेक पायरी चढतां चढतां आपल्या तीव्र वैराग्यशीलतेच्या जोरावर त्यांनीं जीवन्मुक्तीचें भव्य शिखर गांठलें. म्हणून तुकारामबुवांचें चरित्र सामान्य जनांच्या बुद्धीस जसें सहज आकलन होतें, तसें ज्ञानदेव-एकनाथादि संतांचें चरित्र होत नाहीं. ज्ञानदेवमहाराजांनीं अगदीं अल्पवयांतच रेड्याच्या मुखानें वेद वदवून स्वतःचें अलौकिकत्व पैठण येथील ब्राह्मणांच्या निदर्शनास आणलें; एकनाथ महाराज आपल्या वयाच्या सहाव्या सातव्या वर्षींच विरक्त होऊन सद्गुरूपदेशार्थ पैठणाहून एकटेच देवगिरीस जनार्दनस्वामींकडे गेले; श्रीसमर्थ रामदास हेही वयाच्या ११ व्या वर्षी, लग्नाचे वेळीं 'सावधान' शब्द ऐकून, टाकळीस पळून गेले इत्यादि गोष्टी वाचून या सत्पुरुषांविषयीं जरी मोठी पूज्यबुद्धि उत्पन्न होते तरी त्यांचीं चरित्रें, सामान्य जनांस, त्यांच्या या अलौकिकतेमुळें, अनुकरणीय आहेत, असें वाटत नाहीं. उलट, तुकारामबुवांचें चरित्र सर्वसामान्य संसारी मनुष्याच्या चरित्रासारखेंच असल्यामुळें लोकांस तें अशक्य कोटींतलें वाटत नाहीं. आपण जर प्रयत्न करूं तर तुकारामबुवा होऊं अशी महत्त्वाकांक्षा जर एखाद्यानें धारण केली, तर ती प्रयत्नांतीं पूर्ण होण्याचा संभव आहे; परंतु, आपण याच जन्मांत ज्ञानदेव होऊं अशी महत्त्वाकांक्षा मात्र कोणास धारण करतां येणार नाहीं. कारण पूर्वजन्मीं फार मोठी तपश्चर्या करीत असतां मृत्यु आल्यामुळें ज्यांची ती तपश्चर्या अपूर्ण राहते असे योगभ्रष्ट पुरुषच

> शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते ॥
> अथवा योगिनामेव कुले भवति धीमताम् ।
> एतद्धि दुर्लभतरं लोके जन्म यदीदृशम् ॥
> तत्र तं बुद्धिसंयोगं लभते पौर्वदेहिकम् ।
> यतते च ततो भूयः संसिद्धौ कुरुनंदन ॥
> पूर्वाभ्यासेन तेनैव ह्रियते ह्यवशोऽपि सः ।
> जिज्ञासुरपि योगस्य शब्दब्रह्मातिवर्तते ॥

ह्या गीतावचनाप्रमाणें ज्ञानदेव – नाथादिकांच्या कोटींत जन्म पावतात. आद्य श्रीशंकराचार्य, ज्ञानदेव, एकनाथ, रामदास इत्यादि पुरुष या योगभ्रष्टांच्या

कोटींतले होत. आणि ती कोटी सर्वच मुमुक्षूंस साध्य नसल्यामुळें तुकोबांचेंच साधें भोळें चरित्र लोकांस आदर्शवत् वाटतें. तुकारामबुवांच्या लोकप्रियतेचें बीज मुख्यतः या एकाच गोष्टींत आहे. बुवांचा एक तरी अभंग, निदान त्यांच्या एखाद्या अभंगाचा एकदेखील चरण ज्याला पाठ नाहीं, असा एकही मनुष्य महाराष्ट्रांत सांपडणार नाहीं इतकी त्यांची व त्यांच्या कवितेची छाप महाराष्ट्रावर कायमची बसली आहे. "हेंचि दान दे गा देवा," हा त्यांचा सुंदर अभंग म्हटल्याशिवाय कोणत्याही हरिदासाचें कीर्तन पुरें होणार नाहीं आणि 'सुंदर तें ध्यान उभें विटेवरी' हा गोड अभंग म्हटला गेल्याशिवाय भजन पुरें होणार नाहीं. बहुतेक हरिदास कीर्तनारंभीं तुकारामबुवांचाच एखादा अभंग निरूपणास घेत असतात. तात्पर्य, तुकारामबुवा हेच महाराष्ट्राचे 'राष्ट्रीय' कवि होत असें म्हणण्यास हरकत नाहीं.

तुकाराम महाराज शके १५७१ च्या सुमारास वैकुंठवासी झाले तेव्हांपासून त्यांचीं चरित्रें सारखीं लिहिलीं जात आहेत. बुवांचे सांप्रदायी गोपाळबुवा, संतचरित्रकार महीपतिबावा ताहराबादकर, नामा शिंपी, पांडुरंग वगैरे जुन्या लेखकांनीं व कै. कृ. अ. केळूसकर, ह. भ. प. पांगारकर, कै. बा. कृ. धुरंधर, श्री. के. स. केळकर, कै. बा. अ. भिडे वगैरे अर्वाचीन लेखकांनीं तुकारामबुवांचीं लहानमोठीं चरित्रें लिहिलेलीं आहेत. कै. बाळकृष्ण मल्हार हंस यांचा बुवांच्या कवितेवर एक सुंदर निबंध सुमारें ५० वर्षांपूर्वीच प्रसिद्ध झालेला आहे. पुण्याचे श्री. रा. ग. हर्षे यांचाही एक प्रबंध अलीकडे प्रसिद्ध झाला आहे. कांहीं गोऱ्या मिशनरी लोकांनींही बुवांचीं एकदोन चरित्रें इंग्रजींत लिहिलीं आहेत. कै. वि. ल. भावे यांच्या 'महाराष्ट्र सारस्वत' या ग्रंथांतही तुकोबांचें संक्षिप्त चरित्र देण्यांत आलेलें आहे. याशिवाय, तुकारामबुवांच्या गाथ्याच्या ज्या निरनिराळ्या अनेक आवृत्त्या निरनिराळ्या प्रकाशकांनीं प्रसिद्ध केल्या आहेत, त्या सर्वांच्या आरंभीं बुवांचें संक्षिप्त चरित्र देण्यांत आलेलें आहे. तुकारामाच्या शिष्यवर्गापैकीं बहिणाबाई व निळोबाराय यांच्याही कवितेंत तुकारामबुवांच्या चरित्रांतील कांहीं प्रसंगांचें वर्णन आलें आहे. रामदाससांप्रदायी वाङ्मयांतील 'दासविश्रामधाम' या ग्रंथांत व उद्धवकृत रामदासचरित्र, आत्मारामकृत रामदासचरित्र, हनुमंतस्वामीकृत समर्थांची बखर वगैरे अनेक ग्रथांत तुकोबांचा उल्लेख

पुष्कळ ठिकाणीं आला आहे. याशिवाय, गेल्या ३०।४० वर्षांत कै. प्रो. रा. रा. भागवत, कै. वि. का. राजवाडे, कै. बा. अ. भिडे, कै. डॉ. प्र. रा. भांडारकर, कै. ना. कृ. गद्रे वगैरे विद्वान् लेखकांचे तुकारामासंबंधानें अनेक लेख कांहीं नियतकालिकांत प्रसिद्ध झालेले आहेत.

तुकाराममहाराजांसंबंधानें गेल्या अडीचशें वर्षांत इतकें प्रचंड वाङ्मय तयार झालेलें असतां मी हा नवीन उपद्व्याप करण्यास कां प्रवृत्त झालों, याचा थोडासा खुलासा करणें जरूर आहे. महाराष्ट्रांतील बहुतेक सर्व कवींच्या चरित्रांविषयीं ' महाराष्ट्र कविचरित्र ' या नांवाचा एक मोठा ग्रंथ मी आज सुमारें ३० वर्षे लिहीत असून, सदर ग्रंथाचे २५०० पृष्ठांचे एकंदर आठ भाग आतांपर्यंत प्रसिद्ध झालेले आहेत हें महाराष्ट्रीयांस विदित आहेच. या आठ भागांत सुमारें ११० कवींचीं चरित्रें समाविष्ट झालेलीं आहेत, परंतु तुकारामबुवांचें चरित्र त्यांत आलेलें नाहीं; व तें दिल्याशिवाय ग्रंथ पुरा करणें शक्य नाहीं. कारण सर्वच कवींचीं चरित्रें सदर ग्रंथांत देण्याचा माझा संकल्प होता व आहे. हा संकल्प पुरा करावयाचा तर इतर सर्व कवींप्रमाणें तुकोबांचेंही चरित्र लिहिणें भागच होतें; आणि म्हणून हा प्रयत्न मला करावाच लागला. आणि शिवाय, इतर अनेक लेखकांनीं जरी तुकारामबुवांचीं चरित्रें लिहिलेलीं आहेत तरी आपणही, स्वतःच्या मनाच्या समाधानासाठीं, बुवांचें एक नवीन चरित्र लिहावें अशी इच्छा माझ्या मनांत फार दिवसांपासून होती. ही इच्छा पूर्ण होण्याचा योग, कांहीं ना कांहीं कारणामुळें, १९३२ पर्यंत आला नाहीं. शेवटीं, वरील सालीं थोडीशी स्वस्थता मिळतांच बुवांचें हें संक्षिप्त चरित्र लिहिण्याचा उद्योग हातीं घेतला आणि त्यांच्याच कृपेनें अल्पावधींत तो पुराही झाला. हा उद्योग चालू असतां बुवांचीं सर्व प्राचीन व अर्वाचीन चरित्रें आणि त्यांची सर्व कविता लक्षपूर्वक वाचण्यांत जो आयुष्याचा अल्पकाल व्यतीत झाला तो तेवढा तरी सत्कारणीं लागला या विचारानें मला जर थोडीशी धन्यता वाटत असली तर ती क्षम्य आहे, असाच सर्व प्रेमळ हरिभक्तांचा अभिप्राय पडेल अशी मला खात्री वाटते.

इतर लेखकांचीं तुकारामचरित्रें आपापल्यापरी चांगलींच आहेत, तरी पण प्रस्तुत चरित्रग्रंथांतही वाचकांस थोडें तरी नावीन्य आढळेल अशी आशा

आहे. साहित्य तेंच, मालमसालाही तोच, पण बल्लावाचार्य निराळे, त्यामुळें स्वयंपाकाच्या रुचींत जसें अंतर पडतें त्याप्रमाणेंच, मूळ पुरावा आणि माहिती यांत जरी कांहीं फरक नसला तरी प्रत्येक लेखकाची भाषासरणी, विचारसरणी आणि आवडनिवड भिन्न असल्यामुळें, निरनिराळ्या लेखकांच्या एकाच विषयावरील वाङ्मयांत, रुचीच्या दृष्टीनें वैचित्र्य उत्पन्न झाल्याशिवाय राहत नाहीं. प्रस्तुत ग्रंथाविषयीं मी इतकेंच सांगूं शकतों कीं, तुकारामबुवांसंबंधानें जितकी कांहीं माहिती उपलब्ध आहे त्या सर्व माहितीचा उपयोग करण्यांत मी बिलकुल कसूर केलेली नाहीं. महीपतिकृत भक्तलीलामृतांतील ओंवीबद्ध तुकारामचरित्राच्या आधारानें प्रस्तुत ग्रंथ लिहिला असून इतर ग्रंथांचा व लेखांचाही थोडाबहुत उपयोग केला आहे. माझे जुने प्रेमळ व विद्वान् मित्र, किंबहुना गुरु, ह. भ. प. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए. यांच्या 'तुकारामचरित्रां'तील देहू गांवची माहिती बहुतेक जशाची तशी उतरून घेतली आहे. महीपतींनीं वर्णिलेल्या व परंपरेनें चालत आलेल्या अलौकिक चमत्कारांच्या कथाही या ग्रंथांत समाविष्ट केल्या आहेत, पण त्या वाचकांनीं खऱ्या मानल्याच पाहिजेत असा मात्र माझा आग्रह नाहीं. कारण जुन्या ग्रंथांत वर्णिलेल्या सर्वच अलौकिक चमत्कारांच्या कथा विश्वसनीय असतील अशी माझीही समजूत नाहीं. परंतु, 'बुद्धलीलासंग्रह' या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत विद्वन्मणि कै. डॉ. सर रामकृष्णपंत भांडारकर यांनीं म्हटल्याप्रमाणें "असल्या चमत्कारांच्या कथांत कधीं कधीं तथ्याचा अंश असतो; आणि तो नसला तरी त्या कथांच्या योगें अनुयायीवर्गाच्या मनाची स्थिति, आणि ज्या कालीं त्या कथा प्रवृत्तींत आल्या त्या काळच्या चालीरीति यांचें ज्ञान होण्यास त्या फार उपयोगी असतात. विवेचकबुद्धीनें तथ्यांश काढणें हें वाचणारांवरतीं सोंपविलें पाहिजे. आणि वाचणारांस साह्य व्हावें म्हणून त्या सांग कथा त्यांच्यापुढें ठेविल्या पाहिजेत." संतांचे चमत्कार कसे घडतात याचें थोडेसें विवेचन पूर्वीं मी माझ्या 'महाराष्ट्र कविचरित्रा'च्या पहिल्या व आठव्या भागाच्या प्रस्तावनेंत केलेलें असल्यामुळें त्याची पुनरुक्ति येथें करीत नाहीं. परंतु अगदीं अलीकडे यासंबंधानें एका मोठ्या जगमान्य शास्त्रज्ञानें (Scientist) या बाबतींत जो अभिप्राय व्यक्त केला तो येथें नमूद करून ठेवितों. हे शास्त्रज्ञ सर **ॲम्ब्रोज फ्लेमिंग** हे होत. सन १९३५च्या जानेवारी महिन्यांत त्यांनीं व्हिक्टोरिआ

इन्स्टिटयूट ऑफ फिलॉसॉफिकल सोसायटी ऑफ ग्रेट ब्रिटन या संस्थेंत अध्यक्ष या नात्यानें जें भाषण केलें त्यांत येशू ख्रिस्ताच्या दैवी चमत्कारांविषयीं ते म्हणालेः—

"We can not reasonably dismiss as simple legend and myth the accounts of the power of the historical Jesus Christ to create instantly shoals of fish in a lake where no fish were found just before, or to create bread and fish instantly to feed large multitudes, or to create wine out of water at a word, or raise dead human beings to life, seeing that the evidence is overwhelming that He Himself was raised to life again, as He had predicted, three days after He had most assuredly suffered physical death of the body by crucifixion."

"We have no right to assert that these statements are fictitious unless we have most carefully examined the evidence and found it certainly invalid. Those who have done so are agreed that the bodily resurrection of Christ is one of the most certainly attested facts in human history. But, if so, it certifies all previous Biblical miracles, and it was unquestionably predicted in prophecy which is a continual miracle."

सर ॲम्ब्रोज फ्लेमिंग यांच्यासारख्या जगत्प्रसिद्ध शास्त्रज्ञाच्या या मतापुढें आमच्याकडील ज्ञानलवदुर्विदग्ध बुद्धिप्रामाण्यवादी लोकांच्या टुरटुरीस कितपत महत्त्व द्यावयाचें हें वाचकांनींच ठरवावें. साधु मेलेलीं माणसें जीवंत करूं शकतात असें जर सर ॲम्ब्रोजसारखे शास्त्रज्ञ सांगत आहेत तर तुकारामबुवांच्या

कीर्तनांत मेलेलें मूल जिवंत झाल्याची गोष्ट खोटी कां मानावयाची ? शिवाय आपल्या वह्या पांडुरंगानें इंद्रायणीच्या डोहांत तेरा दिवस कोरड्या ठेवल्या हें जर तुकारामबुवा स्वतःच सांगत आहेत व मंबाजीनें बहिणाबाईच्या गाईला दिलेल्या माराचे वळ तुकोबांच्या पाठीवर उमटले हें जर खुद्द बहिणाबाईच सांगत आहे, तर हे दोन चमत्कार तरी निदान खरे मानावेच लागतील असें मला वाटतें. असो.

तात्पर्य, महाराष्ट्रांतील जो बहुजनसमाज देवधर्म मानतो आणि साधुसंतांविषयीं पूज्यबुद्धि बाळगितो त्या समाजासाठीं हें ग्रंथलेखन आहे; देवधर्म न मानणारा, साधुसंतांची टवाळी करणारा व स्वतःच्या बुद्धीस अगम्य असें सृष्टींत कांहींच नाहीं असें समजून हिरण्यकशिपूप्रमाणें, स्वतःसच प्रतिपरमेश्वर मानणारा जो एक नवीन कंपू दुर्दैवानें महाराष्ट्रांत हल्लीं निर्माण झाला आहे त्याच्यासाठीं हा ग्रंथ नाहीं, इतकें सांगणें जरूर आहे.

हा ग्रंथ इ. स. १९३२ सालीं लिहून पूर्ण झाला, पण अनेक अडचणीं-मुळें त्याचें प्रसिद्धीकरण आजपर्यंत लांबणीवर पडलें होतें. शेवटीं, माझे सहृदय मित्र, येथील प्रसिद्ध 'कर्नाटक' प्रेसचे मालक **श्री. मंगेशराव कुळकर्णी** यांनीं तो सुंदर रीतीनें छापून प्रसिद्ध केला, याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें. त्याचप्रमाणें, माझे हरिभक्तिपरायण विद्वान् मित्र **श्री. नरहरपंत ऊर्फ नानासाहेब पटवर्धन,** बी.ए., एल्‌एल्. बी., बॅरिस्टर, व सेवानिवृत्त डिस्ट्रिक्ट जज्ज, यांच्या शब्दास मान देऊन, **कै. सत्यवंत वासुदेव नवरंगे** यांच्या पतिपरायण पत्नी **श्री. रमाबाई नवरंगे** यांनीं महाराष्ट्रकविचरित्रप्रकाशनार्थ १००० रु० मदत देण्याचें अभिवचन दिलें असून, त्यापैकीं ४५० रु० त्यांनीं आतांपर्यंत रोख दिले आहेत, याबद्दल त्या उभयतांचे आभार कोणत्या शब्दांनीं व्यक्त करावे हेंच मला समजत नाहीं. प्रभु त्यांना पूर्ण मनःशांति देऊन सुखी ठेवो, इतकेंच म्हणून विराम पावतों.

मुंबई, ता. ३० जून १९३५

संतसेवक,
**जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८८९५ वि: ५।२३
क्रमांक १२४९ नोंद दि: १४-९-५५

# अनुक्रमणिका


| प्रकरण | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ लें | कुलवृत्त व जन्म | १ |
| २ रें | तुकारामबुवांचा संसार | ११ |
| ३ रें | तुकोबांचें वैराग्य | २३ |
| ४ थें | तुकोबा आणि जिजाई | ३७ |
| ५ वें | समाजसेवक तुकोबा | ४४ |
| ६ वें | गुरूपदेश आणि कवित्वस्फूर्ति | ५५ |
| ७ वें | मंबाजी आणि तुकाराम | ५९ |
| ८ वें | तुकोबांच्या आयुष्यांतील आणखी कांहीं प्रसंग | ६७ |
| ९ वें | तुकोबा आणि रामेश्वर भट्ट | ८० |
| १० वें | आणखी कांहीं आख्यायिका | ९९ |
| ११ वें | तुकाराम, रामदास आणि शिवाजी महाराज | १२० |
| १२ वें | तुकोबांचें निर्याण | १२७ |
| १३ वें | वारकरीपंथांत तुकोबांचें महत्त्व | १४४ |
| १४ वें | कांहीं आक्षेपांचा अल्प विचार | १५२ |
| १५ वें | तुकोबांचे शिष्य आणि टाळकरी | १६३ |
| १६ वें | तुकारामबुवांची कविता | १९२ |
| १७ वें | तुकोबांचे समकालीन संत | २११ |
| १८ वें | तुकारामबुवांचा जयजयकार | २१९ |
| १९ वें | तीर्थप्रसाद | २२८ |



परलोकवासी सत्यवंत वासुदेव नवरंगे

यांच्या

**पुण्यस्मृतीस**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम

संतश्रेष्ठ

# तुकाराम

## प्रकरण १ [illegible]

### कुलवृत्त व जन्म

अभंग

याती शूद्रवंश केला वेवसाव । आदि तो हा देव कुळपूज्य ॥
नये बोलों परि पाळिलें वचन। केलियाचा प्रश्न तुम्ही संतीं ॥
संवसारें जालों अतिदुःखें दुःखी । मायबाप शेखीं क्रमिलिया ॥
दुष्काळें आटिलें द्रव्य नेला मान । स्त्री एकी अन्न अन्न करितां मेली
लज्जा वाटे जीवा त्रासलों या दुःखें । वेवसायीं देखें तुटी येतां ॥
देवाचें देऊळ होतें तें भंगलें। चित्तासी जें आलें करावेंसें ॥
आरंभीं कीर्तन करीं एकादशी । नव्हतें अभ्यासीं चित्त आधीं ॥
कांहीं पाठ केलीं संतांचीं उत्तरें । विश्वासें आदरेंकरोनियां ॥
गाती पुढें त्यांचें धरावें ध्रुपद । भावें चित्त शुद्ध करोनियां ॥
संतांचें सेविलें तीर्थ पायवणी । लाज नाहीं मनीं येऊं दिली ॥
ठाकला तो कांहीं केला उपकार। केलें हें शरीर कष्टवूनी ॥
वचनें मानिलीं नाहीं सुहृदांचीं । समूळ प्रपंचीं वीट आला ॥
सत्य असत्यासी मन केलें ग्वाही । मानियेलें नाहीं बहुमता ॥
मानियेला स्वप्नीं गुरूचा उपदेश । धरिला विश्वास दृढ नामीं ॥
यावरी या जाली कवित्वाची स्फूर्ति । पाय धरिले चित्तीं विठोबाचे ॥
निषेधाचा कांहीं पडिला आघात । तेणें मध्यें चित्त दुखवलें ॥
बुडविल्या वह्या बैसलों धरणें । केलें नारायणें समाधान ॥

विस्तारीं सांगतां बहुत प्रकार । होईल उशीर आतां पुरे ॥
आतां आहे तैसा दिसतो विचार । पुढील प्रकार देव जाणे ॥
भक्तां नारायण नुपेक्षी सर्वथा । कृपावंत ऐसें कळों आलें ॥
तुका म्हणे माझें सर्व भांडवल । बोलविले बोल पांडुरंगें ॥

वरील अभंगांत तुकारामबुवांनीं आपल्या चरित्रांतील बहुतेक सर्व ठळक गोष्टी नमूद करून ठेवलेल्या असल्यामुळें त्यांच्या चरित्रलेखकाचें कार्य पुष्कळच सुलभ झालेलें आहे. एकदां तुकारामबुवांस कांहीं संतांनीं असा प्रश्न केला कीं, "महाराज, आपणास ही हल्लींची स्थिति कशी प्राप्त झाली हें आपल्या मुखानें ऐकण्याची आमची इच्छा आहे, तरी कृपा करून ही आमची इच्छा आपण पूर्ण करावी." संतांची ही आज्ञा मान्य करून बुवा म्हणाले, "संत हो, स्वतःविषयीं मी कांहीं बोलावें हें योग्य नाहीं, परंतु तुमच्या वचनास मान देऊन तुमच्या प्रश्नाचें मी यथामति उत्तर देतों. माझा जन्म शूद्रवंशांत झाला; आणि वंशपरंपरेनें चालत असलेला व्यवसाय मी केला. पूर्वींपासूनच हा देव आमच्या कुळाला पूज्य आहे. संसारांत मी फार दुःखें भोगलीं. शेवटीं आई आणि बाप हीं मरण पावलीं. पुढें दुष्काळांत, हातांत जो थोडाबहुत पैसा होता तोही संपला व माझी एक बायको तर अन्न अन्न करून मेली. या दैन्यावस्थेमुळें मला मोठी लाज वाटूं लागली. व्यापारांत तर सारखी तूट येत होती. देहू गांवांत असलेलें देवाचें देऊळ भंगलें होतें त्याचा जीर्णोद्धार करावा असें वाटूं लागलें. पूर्वीं माझें अभ्यासाकडे फारसें चित्त नव्हतें. पुढें एकादशीचा उपवास आणि कीर्तन करूं लागलों. विश्वासानें आणि आदरानें संतांची कांहीं कविता मी पाठ केली. कोणी कीर्तनकार कीर्तनांत गाऊं लागला म्हणजे त्याच्यामागें उभा राहून त्याची साथ मी करीत असें. सर्व लाजलज्जा सोडून संतांच्या पायांचें तीर्थ मी घेतलें. शरीर कष्टवून, हातानें जेवढा परोपकार होण्यासारखा होता तेवढा केला. आप्तेष्टांचा शब्द मी मानला नाहीं. या प्रपंचाचा तर मला अगदीं पूर्ण वीट आला. सत्य काय आणि असत्य काय हें ठरविण्याच्या बाबतींत मी माझ्या मनाच्या प्रवृत्तीवरच अवलंबून राहिलों. बहुमताला मी फारशी किंमत दिली नाहीं. गुरूनें स्वप्नांत मला जो उपदेश दिला तो मान्य करून हरिनामस्मरणावर

मी दृढ विश्वास ठेविला. त्यानंतर मला कवित्वाची स्फूर्ति झाली व पांडुरंगाचे पाय मनांत आठवून मी कांहीं काव्यरचना केली. परंतु, मी शूद्र असून संस्कृतांतलें ज्ञान प्राकृतांत सांगतों, म्हणून कांहीं लोकांनीं माझा निषेध केला व त्यामुळें मध्यंतरीं माझा विरस झाला. लोकांनीं माझ्या कवितांच्या वह्या इंद्रायणीच्या डोहांत बुडविल्या तेंव्हां मी डोहाच्या कांठीं धरणें धरून बसलों असतां माझ्या वह्यांचें रक्षण करून पांडुरंगानें माझें समाधान केलें. आणखी पुष्कळ गोष्टी आहेत पण त्या जर मी विस्तारेंकरून सांगूं लागलों तर आतां उशीर होईल. एकंदरींत आजची स्थिति ही अशी आहे, पुढें काय होणार असेल तें देव जाणे! **नारायण आपल्या भक्तांची उपेक्षा करीत नाहीं, तो कृपाळु आहे, याबद्दल माझी खात्री होऊन चुकली आहे.** पांडुरंगानें जे शब्द बोलविले तेंच माझें सगळें भांडवल आहे."

तुकारामबुवांस उपरति कोणत्या कारणांमुळें झाली आणि त्यांची पारमार्थिक प्रगति पायरीपायरीनें कसकशी होत गेली हें या अभंगावरून समजतें, परंतु त्यांचा जन्मकाल किंवा त्यांच्या आयुष्यांतील इतर अनेक महत्त्वाच्या गोष्टी यांची माहिती इतर लेखकांच्या लिखाणाच्या आधारानेंच समजून घेतली पाहिजे.

तुकाराम महाराजांचा जन्म महाराष्ट्राच्या ज्या भागांत झाला तो पुणें शहराच्या आसपासचा भाग महाराष्ट्राच्या इतिहासांत फार महत्त्वाचा आहे. खुद्द पुणें शहर तर महाराष्ट्राचें हृदयस्थानच आहे, परंतु त्याच्या आसमंतात् भागांतील अनेक ठिकाणें महाराष्ट्राच्या धार्मिक व राजकीय इतिहासांत प्रसिद्ध आहेत. आळंदी येथें ज्ञानदेव महाराजांची समाधि आहे. चिंचवड येथें मोरयादेव आणि चिंतामणि देव हे प्रसिद्ध गाणपत्य होऊन गेले व त्यांच्या समाधि तेथें आहेत. शेलारवाडी हें गांव शिवाजीचा उजवा हात जो तानाजी मालुसरे त्याच्या मामाचें वास्तव्यस्थान होय. पुरंदर आणि सिंहगड हे दोन गगनगामी दुर्गराज महाराष्ट्राच्या सद्यःस्थितीकडे पहात अद्याप अश्रू ढाळीत उभे आहेत. सासवड येथें सोपानदेवांची समाधि आहे. वानवडीस महादजी शिंदे यांचें वृंदावन आहे. मोरगांव आणि थेऊर हीं दोन गणरायाचीं पीठें प्रसिद्धच आहेत. शिवनेरीचा किल्ला हें छत्रपति शिवाजी महाराजांचें जन्मस्थान होय. आणि जेजुरी येथील

खंडोबा तर अनेक महाराष्ट्रीयांची कुलदेवताच आहे. शिवाय, मुळा, मुठा, इंद्रायणी, पवना, नीरा आणि ब्रह्मकमंडलु या सरिताही याच प्रदेशांतून आपला मार्ग आक्रमण करीत आहेत. ज्ञानदेव, तुकोबा, शिवाजी, कचेश्वर इत्यादि महापुरुषांच्या पदस्पर्शानें पवित्र झालेली ही पुण्यभूमि आहे. अशा या पुण्यपावन भूमींत, इंद्रायणी नदीच्या कांठीं देहू नामक गांवीं तुकारामबुवांचे पूर्वज वास्तव्य करीत होते. या पूर्वजांपैकीं विश्वंभर या नांवाच्या पुरुषापासून पुढील सर्व पिढ्यांचा वृत्तांत संतचरित्रकार महीपति यांनीं आपल्या 'भक्त-लीलामृत' ग्रंथांत दिला आहे. हा विश्वंभर मोठा हरिभक्त होता. तो वाण्याचा धंदा करीत असे. त्याला एके दिवशीं त्याच्या आईनें सांगितलें कीं "पंढर-पुरास जाऊन पांडुरंगाचें दर्शन घे." त्याप्रमाणें पंढरपुरास जाऊन त्यानें तेथें पांच रात्री मुक्काम केला व प्रभूचें दर्शन, भजनपूजन इत्यादिकांत तो काल घालविला. पुढें देहूस परत आल्यावर आपल्या मातेस त्यानें पंढरीचा क्षेत्रमहिमा सांगितला. पुत्रास पांडुरंगाचें दर्शन झालें याबद्दल मातेस मोठी धन्यता वाटली. विश्वंभरास तर पंढरी आणि पांडुरंग यांचा इतका ध्यास लागून राहिला कीं पुनः पंढरीस जाण्याची संधि कधीं मिळते याची तो वाट पहात बसला. पुढें आषाढ महिना येतांच शुद्ध नवमीच्या दिवशीं तो पुनः पंढरीस जाण्यास निघाला व एकादशीच्या दिवशीं तेथें पोंचून पांडुरंगाचें दर्शन त्यानें मोठ्या प्रेमानें घेतलें. पुढें कार्तिकापासून ज्येष्ठा-पर्यंत दर एकादशीस पंढरीची वारी करण्याचा क्रम त्यानें सुरू केला आणि तेवढ्या वेळांत त्यानें एकंदर सोळा वाऱ्या केल्या. त्याचा हा निर्धार पाहून लोकांस मोठें आश्चर्य वाटलें. परंतु कांहीं लोक त्याची टवाळीही करूं लागले. कोणी म्हणाला, "अहो, याला जर पांडुरंगाचा इतका ध्यास लागून राहिला आहे तर हा पंढरीसच कायमचा कां रहात नाहीं? देहूहून पंढरीस आणि पंढरीहून देहूस विनाकारण येरझारा कां करतो?" दुसरा म्हणाला, "अहो, घराचा लोभ सुटत नाहीं, दुसरें काय?" परंतु लोकांच्या या बडबडीकडे विश्वंभरानें बिलकुल लक्ष दिलें नाहीं. त्याच्या सोळा वाऱ्या पुऱ्या होतांच, त्याचा उत्कट भक्तिभाव पाहून पांडुरंग प्रसन्न झाला आणि त्यानें त्यास स्वप्नांत असा दृष्टांत दिला कीं, "आज आठ महिने तूं माझी जी एकनिष्ठपणें सेवा केलीस तिच्या योगानें मी संतुष्ट झालों असून, यापुढें, पंढरीस येण्याचा त्रास तुला पडूं नये

म्हणून तुझ्या या देहू गांवांतच वास्तव्य करण्याचें मी ठरविलें आहे. " इतकें बोलून पांडुरंगानें, देहू येथील 'आंबियाचे वनांत' जाऊन शयन केल्याचें विश्वंभरानें स्वप्नांत पाहिलें. जागृत झाल्यावर हा स्वप्नवृत्तांत त्यानें ग्रामस्थ जनांस कळविला व त्यांच्यासमवेत तो 'आंबियाच्या वनां'त गेला. तेथें जाऊन पाहतात तों पांडुरंग नाहीं, पण तेथें मोठा सुवास सुटला असून एके ठिकाणीं कांहीं फुलें, तुळसी व बुका पडला आहे असें त्यांच्या दृष्टोत्पत्तीस आलें. मग त्या जागीं खणून पहावें अशी सूचना विश्वंभरानें केल्यावरून लोकांनीं ती जागा उकरण्यास सुरवात केली. थोडेंसें उकरल्यावर बुका व तुळसी निघाल्या व आणखी उकरल्यावर पांडुरंग व रुक्मिणी यांच्या सुंदर मूर्ति सांपडल्या. त्याबरोबर लोकांस मोठा आनंद होऊन त्यांनीं 'पुंडलीक वरदा हरि विठ्ठल !' असा गजर केला. मूर्ति घेऊन सर्व लोक भजन करीत गांवांत आले व इंद्रायणीच्या तीरीं त्यांनीं मूर्तींची स्थापना केली. नंतर वैदिक ब्राह्मण बोलावून मोठ्या समारंभानें प्राणप्रतिष्ठा करण्यांत आली. पुढें विश्वंभरानें आपलें शेष आयुष्य याच मूर्तींच्या भजनपूजनांत घालविलें. विश्वंभराच्या स्त्रीचें नांव अमाबाई. विश्वंभरास, हरि आणि मुकुंद असे दोन मुलगे होते.

विश्वंभराचा काळ झाल्यावर त्याच्या मुलांस देवाची विस्मृति पडली आणि आपण श्रीमंत कसे होऊं याचाच विचार ते करूं लागले. त्यांची आई अमाई ही मात्र पांडुरंगाची उपासना एकनिष्ठपणें करीत असे. हरि आणि मुकुंद यांनीं असा बेत केला कीं राजाची भेट घेऊन त्याजकडे नोकरी मागावी आणि क्षात्रवृत्ति स्वीकारून खूप चैन करावी. मग त्यांनीं आपला हा विचार आपल्या आईस कळविला. तेव्हां ती म्हणाली, "मुलांनों, पांडुरंगाच्या कृपेनें तुम्हांला काय कमी आहे ? तो भक्तवत्सल आपला योगक्षेम चालवीत आहे. तेव्हां त्याचीच सेवाचाकरी करा आणि येथेंच रहा." पण हा आईचा उपदेश त्यांना रुचला नाहीं. ते तिचा निरोप घेऊन निघाले आणि राजाकडे गेले. राजानें त्यांना आपल्या पदरीं ठेवून घेतलें. पुढें लवकरच त्यांनीं आपल्या पराक्रमानें राजास संतुष्ट करून त्याजकडून पुष्कळ द्रव्य मिळविलें व आपल्या आईस आणि कुटुंबांतील इतर माणसांस आणण्यासाठीं देहूस स्वार पाठविला. आपणास घेऊन जाण्यासाठीं आपल्या मुलांनीं स्वार पाठविला हें पाहून

अमाईंस फार वाईट वाटलें. आतां पांडुरंगाचे पाय आपणास कायमचे अंतरणार हा विचार मनांत येतांच ती ढळढळां रडूं लागली. परंतु तिला गेल्याशिवाय गत्यंतर नव्हतें म्हणून घरांतील सर्व चीजवस्त घेऊन आपल्या दोन्ही मुलांसह ती राजधानीच्या गांवीं निघून गेली; व तेथें मुलांपाशीं जाऊन राहिली. पण तिचा देह मात्र तेथें होता, जीव देहूंतील पांडुरंगमूर्तीकडे वेधला होता. पुढें एके दिवशीं पांडुरंगानें स्वप्नांत तिला दर्शन देऊन सांगितलें कीं "तूं पुत्रमोहांत गुंतून माझा त्याग केलास. विश्वंभरास पंढरीची वारी करण्याचे श्रम पडूं नयेत म्हणून त्याला भाक देऊन मी देहूस आलों. पण त्याच्या पश्चात्, मला विसरून तूं या संसारसुखांत मग्न होऊन राहिली आहेस. आतां तरी हा मोह सोडून तूं देहूस ये." अमाई जागृत झाल्यावर दृष्टांताची ही हकीकत तिनें आपल्या मुलांस कळविली आणि ती त्यांस म्हणाली, "तुमच्या वडिलांनीं पांडुरंगास प्रसन्न करून देहूस आणलें व त्याच्या सेवेंत आपलें शेष आयुष्य वेंचून ते निजधामास गेले. त्यानंतर मीही पांडुरंगाची उपासना यथाशक्ति केली. परंतु तुम्ही मला येथें आणून ठेवल्यापासून ही उपासनेची परंपरा बंद पडली आहे व त्यामुळें भगवंताचा मजवर रोष झाला आहे. आणि गेल्या रात्रीं तर 'तूं देहूस निघून ये,' अशी, स्वप्नांत त्यानें मला आज्ञा केली आहे." मुलगे म्हणाले, "आई, स्वप्नांतल्या गोष्टी कोणी खऱ्या मानल्या आहेत? आम्ही राजाची सेवाचाकरी इमानें इतबारें करीत आहोंत, आणि हाच आमचा स्वधर्म. प्रत्येकानें आपापलें कर्तव्य-कर्म प्रामाणिकपणें केलें म्हणजे ईश्वर संतुष्ट होतो. त्यासाठीं आणखी निराळा प्रयत्न करण्याचें कारण नाहीं." मुलांचें हें भाषण ऐकून अमाबाई निरुत्तर झाली. मुलांस सोडून जाण्याचें धैर्य तिला होईना. आणखी चार दिवस गेल्यावर मुलांनीं तिला थट्टेनें विचारलें, "आई, गेल्या रात्रीं स्वप्नांत पांडुरंगानें आणखी कांहीं सांगितलें का?" ती म्हणाली, "पांडुरंगानें मला आणखी दोन वेळां स्वप्नांत दृष्टांत देऊन, देहूस जाण्याची आज्ञा केली आहे." परंतु या गोष्टी-वर मुलांचा विश्वास बसला नाहीं. पुढें आणखी चार दिवस गेल्यावर अमा-बाईस पुनः दृष्टांत झाला. पांडुरंग स्वप्नांत येऊन तिला रागानें म्हणाला, "मी तुला चारपांच वेळ दृष्टांत देऊन 'देहूस निघून ये,' असें परोपरीनें

सांगितलें, पण मुलांचा मोह तुला सुटत नाहीं. तर आतां याचा परिणाम काय होतो तें पहा. ”

ह्याही दृष्टांतांची हकीकत अमाबाईनें हरि आणि मुकुंद यांस सांगितली, पण त्यांना ती खरी वाटली नाहीं. आपल्या आईला आतां म्हातारचळ लागल्यामुळें ती कांहींतरी वडबडते आहे झालें, असें म्हणून ते स्वस्थ राहिले. पण पुढें काय चमत्कार झाला पहा ! ते जेवून विडे खात बसले आहेत तोंच राजाचा दूत त्यांना बोलावण्यास आला. त्याप्रमाणें ते राजवाड्यांत गेले असतां, राजानें त्यांस हुकूम केला कीं, “ राज्यावर परचक्र आलें आहे, तरी तुम्ही दोघेही आतांच्या आतां लढाईवर चला. ” आईची आज्ञा घेऊन हरि आणि मुकुंद लढाईवर गेले आणि पहिल्याच चकमकींत ठार झाले ! मरतांना त्यांनीं पश्चात्ताप-पूर्वक पांडुरंगाचें स्मरण केलें तेव्हां त्यानें त्यांस दर्शन देऊन ‘ तुम्हांस सद्गति मिळेल ’ असें सांगितलें. दोन्ही पुत्र लढाईंत पडले ही बातमी अमाईस कळतांच तिच्या दुःखास पारावार राहिला नाहीं. धाकटा मुलगा मुकुंद याची बायको सती गेली. हरीची बायको गरोदर होती म्हणून ती सती गेली नाहीं. पुढें अमाईपाशीं जें काय थोडेंबहुत द्रव्य होतें तें शत्रूच्या लोकांनीं लुटून नेलें. तेव्हां हताश होऊन ती आपल्या सुनेसह देहूस आली आणि पांडुरंगमूर्तीपुढें उभी राहून शोक करूं लागली. ती देवास म्हणाली, “ पांडुरंगा, तुझ्या कोपामुळें माझे दोन्ही मुलगे लढाईंत पडले. आतां, वृद्धपणीं माझी सेवाचाकरी कोण करील ? ” पांडुरंग म्हणाला, “ अमाई, तूं कांहीं काळजी करूं नकोस. तुझा योगक्षेम मी चालवीन. ”

पुढें अमाईनें आपल्या सुनेस, बाळंतपणासाठीं, माहेरीं पाठविलें. वृद्धपणामुळें आणि शोकानें अमाईस अंधत्व आलें तेव्हां तिची सेवाचाकरी भक्तवत्सल पांडुरंग आणि जगन्माता रुक्मिणी यांनीं केली. सामान्य माणसांप्रमाणें तीं दोघें अमाईच्या घरीं राबत होतीं. शेवटीं अमाईचा मृत्युकाल येऊन ठेपला व ती पंचत्व पावली तेव्हां तिचे पुढील सर्व संस्कार पांडुरंगानेंच केले. इकडे, अमाईची सून बाळंतपणासाठीं ‘ नवलाख्याचें उंबरें ’ या गांवीं–आपल्या माहेरीं–गेली होती ती प्रसूत होऊन तिला मुलगा झाला. हा मुलगा बराच मोठा होई-

पर्यंत ती आपल्या माहेरींच राहिली होती. एके दिवशीं ती दारांत उभी असतां तिला आपल्या सासूच्या मरणाची बातमी समजली. ती ऐकून तिला मोठें दुःख झालें. सासूच्या शेवटच्या दुखण्यांत आपल्या हातून तिची कांहींच सेवाचाकरी घडलीं नाहीं हा विचार मनांत येऊन ती फार खेद करूं लागली. तेव्हां लोक म्हणाले, " अमाईच्या मृत्युकालीं तूं तिच्याजवळ होतीस व पुढचा सर्व विधीही तुम्हीच केला, हें आम्ही प्रत्यक्ष पाहिलें आहे. असें असतां, आपल्या हातून सासूची सेवाचाकरी घडली नाहीं असें तूं म्हणतेस याचा अर्थ काय ? " हें ऐकून अमाईची सून विस्मित झाली. तिचा मुलगा विठोबा यानें तिला विचारलें, " आई, आपण तर हा गांव सोडून कोठेंच गेलों नाहीं, मग हे लोक हें काय सांगतात ? " आईनें उत्तर दिलें, " बाळ, हा सगळा त्या पंढरिनाथाचा खेळ आहे. तुझा आजा विश्वंभर यानें पांडुरंगाची कृपा संपादन करून त्याला देहूस आणिलें. पुढें तुझा बाप आणि चुलता यांनीं देहूस राहून पांडुरंगाची उपासना न करितां ते देहू सोडून फौजेंत गेले. तुझी आई अमाई हिनें त्यांना परोपरीनें उपदेश केला, पण त्यांनीं तिकडे लक्ष दिलें नाहीं. शेवटीं पांडुरंगाचा कोप होऊन ते दोघेही लढाईंत मरण पावले. तुझी चुलती सती गेली. माझी सासू मला घेऊन देहूस आली आणि बाळंतपणासाठीं मला तिनें माहेरीं पाठविलें. ती मी अद्याप येथेंच आहें. दरम्यान तुझा जन्म झाला व तूं आतां बराच मोठा झाला आहेस. येवढ्या वेळांत मी देहूस कधीं गेलें नाहीं किंवा सासूबाईंची वास्तपुस्तही केली नाहीं. पण पांडुरंगावर तिची पूर्ण श्रद्धा असल्यामुळें त्याच भक्तवत्सलानें तिचा योगक्षेम चालविला आणि ती मरण पावल्यावर, हे लोक सांगतात तो खेळही त्यानेंच केला. " आईचें हें भाषण ऐकून विठोबासही फार वाईट वाटलें. पुढें तीं दोघेंही देहूस आल्यावर विठोबानें देवळांत जाऊन पांडुरंगाबरोबर भांडण केलें; व शेवटीं आत्महत्या करण्यासाठीं त्यानें शस्त्र हातीं घेतलें. तेव्हां, त्याचा निर्धार पाहून पांडुरंगानें त्यास दर्शन देऊन त्याचें समाधान केलें. त्यानंतर, विठोबा आणि त्याची आई या दोघांनीं आपलें सर्व आयुष्य पांडुरंगाच्या भजनपूजनांत घालविलें. तीं पंढरीची वारी नियमानें करीत असत. पुढें विठोबाचा पुत्र पदाजी, पदाजीचा पुत्र शंकर, शंकराचा पुत्र कान्होबा व कान्होबाचा पुत्र बोल्होबा यांनींही ही परंपरा अविच्छिन्नपणें चालविली.

हा शेवटचा पुरुष बोल्होबाच, संतशिरोमणि तुकारामबुवांचा बाप होय. वरील माहितीवरून, तुकारामबुवांचे पूर्वजही मोठे हरिभक्त होते व त्यांपैकीं हरि व मुकुंद हे मोठे शूर होते, ही गोष्ट वाचकांच्या लक्षांत येईल. तुकारामाच्या आईचें नांव कनकाई. ही पुण्याजवळील लोहगांवच्या मोझे ह्या आडनांवाच्या घराण्यांतील मुलगी. तुकारामबुवांचें आडनांव आंबिले. कुळीचें नांव मोरे. तुकारामबुवांच्या चरित्रांत या लोहगांवाचा संबंध अनेक वेळां आला आहे. तुकाराम-बुवांचे वडील बोल्होबा यांस तीन मुलगे झाले. मोठ्या मुलाचें नांव सावजी. हा लहानपणापासूनच विरक्त होता. संसाराची यातायात यानें केली नाहीं. मधला भाऊ तुकाराम यानेंच आपल्या लोकोत्तर हरिभक्तीनें आपल्या कुलाचा उद्धार केला. धाकटा भाऊ कान्होबा हा पुढें वेगळा होऊन संसारधंदा करीत असे व तुकारामबुवांच्या कीर्तनांत ध्रुपदही धरीत असे.

तुकारामबुवांचा जन्मकाल कोणता हें ठरविण्यास कांहींच साधन उपलब्ध नाहीं. पूर्वलेखकांनीं अंदाजानें जे काल दिले आहेत त्यांनाही फारसा आधार नाहीं. वयाच्या २१ व्या वर्षी तुकारामबुवांच्या आयुष्याचा पूर्वार्ध संपला असें महीपतीनीं सहज आपल्या ‘ भक्तलीलामृतां ’ त लिहिलें आहे व तुका-रामबुवा शके १५७१ सालीं दिवंगत झाले अशी माहिती कांहीं जुन्या लिखाणांत सांपडते, तेवढ्या आधारावर, एकवीसाच्या दुप्पट बेचाळीस वर्षेंच बुवा हयात होते व १५७१ तून ४२ वजा केल्यावर बाकी १५३० राहते, तेव्हां तोच बुवांचा जन्मशक होय असें कांहीं लेखकांनीं ठरविलें आहे. परंतु खरें विचाराल तर हीं सगळीं अनुमानें आहेत, त्यांना पुरावा असा कांहींच नाहीं. आपणही विनाकारण खोल पाण्यांत न शिरतां तुकारामबुवा शके १५१० आणि १५२० च्या दरम्यान कोणत्या तरी वर्षीं जन्मले असें धरून चालूं. प्रसिद्ध साक्षेपी लेखक कै. वि. ल. भावे यांनींही आपल्या ‘ महाराष्ट्र सारस्वतां ’ तील तुकाराम-विषयक निबंधांत या प्रश्नाची उपेक्षाच केली आहे. या बाबतींत माझें स्वतःचें मत असें आहे कीं, मृत्युसमयीं तुकारामबुवांचें वय ४२ वर्षांचें होतें हें ह. भ. प. पांगारकरांचें मत व बुवा ८१ वर्षांचे होऊन वारले हें कै. राजवाडे व भावे यांचें मत, हीं दोन्ही मतें निराधार असून, मृत्युसमयीं बुवांचें वय ५०–६० वर्षांहून कमी किंवा अधिक नसावें. यासंबंधानें, कै. नारायण कृष्ण गद्रे यांनीं,

‘ विविधज्ञानविस्तार ’ मासिकाच्या १९२० सालच्या सेप्टेंबरच्या अंकांत ‘ साधु-कविश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या चरित्राची कालव्याप्ति ’ या मथळ्याखालीं एक बराच मोठा लेख प्रसिद्ध केलेला असून त्यांत त्यांनीं, तुकारामबुवांच्या एकंदर चरित्राचा सूक्ष्म विचार करून, त्यांचा जन्मकाल शके १५१० हाच किंवा याच्या जवळपास असला पाहिजे असा निर्णय दिला आहे व तोच बरोबर आहे असें मला वाटतें. त्यांनीं शके १५१० माघ शुक्ल पंचमी गुरुवार हा तुकोबांचा जन्मकाल दिला आहे.

तुकारामबुवांचे जन्मकालीं महाराष्ट्राची लोकस्थिति कोणत्या प्रकारची होती यासंबंधानें दोन शब्द लिहून हें प्रकरण पुरें करूं. तुकाराम व रामदास या समकालीन संतांस ज्यांच्या ग्रंथांमुळें स्फूर्ति झाली ते एकनाथ महाराज गोदातीरीं पैठण येथें विद्यमान होते. समर्थ व शिवाजीमहाराज हे अद्याप जन्म पावले नव्हते. आपला महाराष्ट्र देश मुसलमानी राजसत्तेनें व्यापला होता. शिवाजी महाराजांचे वडील शहाजी हे विजापुरकरांचे आश्रित होते; व त्यांना पुणें व सुपें हे परगणे जहागीर होते. या जहागिरीची व्यवस्था, दादाजी कोंडदेव व जिजाबाई हीं पहात असत. या परगण्यांतील न्यायदानाचें कामही दादाजी कोंडदेव यांकजडेच होतें. धार्मिक बाबतींत तत्कालीन मुसलमान राज्यकर्त्यांकडून हिंदु लोकांचा जरी फारसा छळ होत नव्हता तरी एकंदरींत हिंदुधर्मीय लोकांची स्थिति शोचनीयच होती. पुष्कळ हिंदु लोक यवनांच्या नोकऱ्या करीत व त्यांच्या पिरांस भजत. शास्त्री, पंडित वगैरे लोकांची हिंदु समाजावर बरीच छाप होती व सामाजिक आणि धार्मिक अन्यायांबद्दल बहिष्कारादि शिक्षा दिल्या जात असत.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
३६६८ तुकारामबुवांचा संसार
१२८

## प्रकरण २ रें

# तुकारामबुवांचा संसार !

**पुरे पुरे हा संसार । कर्म बळिवंत दुस्तर ।**
**राहों नेदी स्थिर । एके ठायीं निश्चळ ॥**

ज्या देहू गांवांत तुकारामबुवांचा जन्म झाला त्याची सविस्तर माहिती पुढें 'तुकारामबुवांचें निर्याण' या प्रकरणांत दिली आहे. जी. आय्. पी. रेल्वेच्या मुंबई–पुणें शाखेवरील शेलारवाडी स्टेशनापासून, उत्तरेस तीन मैलांवर, इंद्रायणी नदीच्या कांठीं हें गांव आहे. तेथील 'महाजनपणाचा' मान तुकारामबुवांच्या घराण्याकडे प्राचीनकालापासून होता व कांहीं इनाम जमिनीही त्या घराण्याकडे चालत होत्या. शिवाय थोडीशी शेती व व्यापारधंदाही होता. एकंदरींत तुकारामबुवांच्या जन्मकाळीं हें घराणें खाऊनपिऊन चांगलें सुखी होतें.

सावजी, तुकाराम व कान्होबा हे बोल्होबांचे तिन्ही पुत्र हळुहळू मोठे झाले तेव्हां त्या वेळच्या रिवाजाप्रमाणें त्यांना लिहिणें, वाचणें व हिशोब ठेवणें वगैरे शिक्षण देण्यांत आलें. बोल्होबा वृद्ध झाले तेव्हां एके दिवशीं त्यांनीं सावजीस जवळ बोलाविलें आणि सांगितलें कीं, "वार्धक्यामुळें माझ्या हातून आतां फारसा कामधंदा होणार नाहीं. तरी वडील मुलगा या नात्यानें देण्याघेण्याचा व्यवहार यापुढें तूं पहा." सावजी म्हणाला, "बाबा, प्रपंचांत मन घालावें असें मला वाटत नाहीं. मी यापूर्वीच तीर्थाटणास निघून गेलों असतों, परंतु तुम्हांस व आईस जर मी वृद्धपणीं सोडून गेलों, तर लोक नांवें ठेवतील म्हणूनच अद्याप राहिलों आहें." सावजीची ही संसाराविषयींची उदासीनता पाहून "याच्या नशिबीं काय आहे कोण जाणे !" असें म्हणून बोल्होबांनीं तुकारामास हांक मारली व त्यांस संसार सांभाळण्यास सांगितलें. बापाची आज्ञा तुकोबांनीं शिरसामान्य केली व तेव्हांपासून ते आपला व्यापारउदीम मोठ्या दक्षतेनें चालवूं लागले. त्यांची हुशारी आणि व्यवहारदक्षता पाहून, "बोल्होजीचा मुलगा तुक्या पहा कसा हुषार आहे तो. बाप हयात असतांनाच संसाराचा सगळा भार आपल्या शिरावर घेऊन बापाचें ओझें पहा त्यानें कसें हलकें केलें आहे !" असें गांवांतले लोक त्यांजविषयीं बोलूं लागले. उलट, सावजीविषयीं ते म्हणूं लागले

कीं, ' याचें लक्षण कांहीं निराळेंच दिसतें. संसाराकडे याचें मुळींच लक्ष नाहीं. हा पुढें मोठा साधु होणार !"

तुकारामबुवांच्या लहानपणींच त्यांचें पहिलें लग्न झालें होतें, परंतु त्या मुलीस दम्याचा विकार असल्यामुळें, पुणें येथील अप्पाजी गुळवे नामक गृहस्थांच्या मुलीशीं त्यांचें दुसरें लग्न आईबापांनीं करून दिलें. तुकारामाची संसारदक्षता पाहून बोल्होबा व त्यांची पत्नी कनकाई यांस मोठा संतोष वाटे. गांवांतील लोकही तुकोबांस मोठा मान देत असत. पुढें, सृष्टिनियमाप्रमाणें, बुवांचे आईबाप वार्धक्यानें मरण पावले. त्यामुळें त्यांना मोठें दुःख झालें. कांहीं दिवसांनीं वडील बंधु सावजी याची पत्नीही मरण पावली. सावजी अगोदरच उदासीन होता, त्यांत स्त्रीचा पाश होता तोही तुटला त्यामुळें त्याला उपरति होऊन तो तीर्थाटणास निघून गेला. आईबापांचा मृत्यु, भावजईचा मृत्यु व सावजीचा गृहत्याग इत्यादि गोष्टी लागो पाठ घडल्यामुळें, तुकारामबुवांच्या संसारसुखाचा विरस झाला. आईबाप वृद्धच होते, तेव्हां ते केव्हां ना केव्हां तरी जाणारच होते, परंतु वडील बंधु सावजी हा भर तारुण्यांत आपणास सोडून देशांतरास गेला व त्याची पत्नीही मागें नसल्यामुळें तो पुनः कधीं घरीं येईल अशीही फारशी आशा नाहीं, या विचारानें तुकोबांचें मन फार अवस्थ झालें. बापाचे वेळीं बरेंच द्रव्य संग्रहीं होतें तेंही हळुहळू संपुष्टांत येत चाललें. घरीं कुटुंबाचा खर्च मोठा. अतिशय धडपड करूनही खर्च भागविण्यापुरता पैसा हातीं येईना. बुवांनीं नानाप्रकारचे व्यवसाय करून पाहिले, परंतु कोठेंही यश येईना. त्यामुळें उदासीन होऊन ते हरिभजनाकडे वळले. लोकांकडून कर्जाऊ रक्कम घेऊन व बैलांच्या पाठीवर मालाच्या गोण्या लादून ते गांवोगांव फिरत असत, पण त्यांतही नफा होण्याचें लक्षण दिसेना. शेवटीं एके दिवशीं बुवांचें दिवाळें निघालें व त्यांचे सावकार त्यांच्या घरीं येऊन त्यांच्या दारीं धरणें धरून बसले ! बुवांच्या दुःखास पारावार राहिला नाहीं. ते ओक्साबोक्सीं रडूं लागले. शेवटीं त्यांच्या नातेवाईकांनीं त्यांच्या देण्याचा हवाला घेऊन त्यांना सावकारांच्या कचाटींतून सोडविलें. ' तूं नेहमीं पांडुरंगाचें नांव घेतोस, त्याचा हा परिणाम, ' असें म्हणून गांवांतले कांहीं लोक तुकोबांचा उपहास करूं लागले. "जो विष्णुभक्ति करील त्याचें कधीं

कल्याण होणार नाहीं. त्याला भिकेचे डोहाळे लागले म्हणून समजावें. आमचे वाडवडील असें सांगत आले तें काय खोटें ? आतां यापुढें तरी सावध हो आणि ही पांडुरंगाची भक्ति सोडून संसाराकडे लक्ष दे," असा पोक्त-उपदेश बुवांस करून सावकार आपआपल्या घरीं निघून गेले. इकडे बुवांच्या घरीं त्यांच्या बायकाही कुरकुर करूं लागल्या. त्या म्हणूं लागल्या, "आमच्या घरधन्यास जेव्हांपासून विठोबाचें वेड लागलें तेव्हांपासून आम्ही माणसांतून उठलों. पोटभर अन्नदेखील मिळेना !" घरांत बायकांची ही अशी बडबड आणि गांवांतील लोकांकडून आणि आप्तेष्टांकडून होणारा तो तसा उपहास, यामुळें बुवांचें वैराग्य अधिकच वाढलें. परंतु चरितार्थासाठीं कांहीं तरी उद्योग करणें जरूरच होतें म्हणून ते पुनः थोडासा व्यापारउदीम करूं लागले. पुढें, घरीं चार गुरें होतीं त्यांतलीं तीन रोगानें एकाएकीं मेलीं ! भगवंत जणूं काय तुकोबांची कसोटीच पहात होता. आणि त्या कसोटीस तुकोबाही अगदीं पूर्णपणें उतरले. देवाविषयींचें त्यांचें प्रेम वाढत चाललें आणि हरिनामाचा त्यांना सारखा ध्यास लागून राहिला. त्यांनीं रात्रंदिवस हरिनामाचा सारखा गजर चालविला, त्यामुळें, त्यांच्याबरोबर प्रवास करणारे व्यापारी अगदीं कंटाळून गेले. ते म्हणूं लागले, "याला काळवेळ कांहींच कळत नाहीं काय ? उठतो तो आपला मोठमोठ्यानें भजन करीत सुटतो. आमचें तर आतां कपाळ उठलें बुवा ! झोंप कशी ती बिलकुल नाहीं." मग बुवांचा त्रास चुकविण्यासाठीं त्यांना चुकवून ते पुढें झटकले. अरण्यांत बुवा एकटे राहिले. सभोंवतीं पाहतात तों कोणी दिसेना. इतक्यांत, दुर्दैवानें, त्यांच्या बैलाच्या पाठीवरील गोणी खालीं पडली. आतां गोणी उचलून बैलाच्या पाठीवर ठेवावयास कोण मदत करील, ही चिंता त्यांना उत्पन्न झाली. त्यांतच, मोठी मेघगर्जना होऊन मुसळधार पाऊस पडूं लागला व वाराही मोठ्या जोराचा सुटला. हें आकस्मिक संकट पाहून बुवांस फार वाईट वाटलें. ते मनांत म्हणाले, "आग लागो या संसाराला ! यानें माझी अगदीं पाठ पुरवली. आईबाप मरण पावले, भाऊ सोडून गेला आणि व्यापारांत दिवाळें निघालें. आतां माझी किंमत काय राहिली ? जे इष्टमित्र, मी मोठा व्यवहारदक्ष म्हणून माझी स्तुति करीत होते तेच आतां माझा उपहास करीत आहेत.

वडिलार्जित द्रव्य होतें तेंही नाहींसें झालें, आणि हल्लीं तर अशी स्थिति आली आहे कीं घरांत घांसभर अन्न नाहीं! भगवंता! आतां या अटव्य अरण्यांत मी एकटा काय करूं? बैलावर गोणी चढविण्यास मला कोण मदत करील? तुझ्याशिवाय मी आतां कोणाच्या साह्याची अपेक्षा करूं?" डोळ्यांतून अश्रूंच्या धारा चालल्या आहेत आणि कंठ सद्गदित झाला आहे, अशा स्थितींत बुवा त्या अरण्यांत भगवंताचा धांवा करीत उभे असतां भक्तवत्सल पांडुरंग पांथस्थाच्या रूपानें त्या ठिकाणीं प्रगट झाला, आणि बैलाच्या पाठीवर गोणी चढविण्याच्या कामीं बुवांस त्यानें मदत केली; इतकेंच नव्हे तर त्यांना वाट दाखविण्यासाठीं तो त्यांच्याबरोबर चालूं लागला. कांहीं वेळानें ते दोघे इंद्रायणीवर आले. इंद्रायणीस मोठा पूर आला होता. नदीपलीकडे कसें जावें याचा बुवांस मोठा विचार पडला. तेव्हां पांथस्थ त्यांस म्हणाला, "तुम्ही बैलासह मजबरोबर चला." त्याच्या सांगण्यावर विश्वास ठेवून बुवांनीं बैल पाण्यांत घातला व स्वतःही निघाले. पांथस्थरूपी पांडुरंग पुढें चालत होता. थोड्याच वेळांत ते नदीपार गेले. नदी दुथडी भरून चाललेली असतां आपण तर बुडालों नाहींच, पण बैलाच्या पाठीवरील गोणीदेखील भिजली नाहीं याबद्दल तुकोबांस मोठें आश्चर्य वाटलें. हा पांथस्थ देवानेंच आपल्या मदतीस पाठविला अशी त्यांची भावना झाली. इतक्यांत, पुढें चालत असलेला पांथस्थ एकदम अदृश्य होऊन त्याच्या जागीं श्यामसुंदर पीतांबरधारी पांडुरंग उभा असल्याचें बुवांनीं पाहिलें. त्याच्या दिव्य तेजानें त्यांचे डोळे दिपून गेले. त्याच्या पायांवर डोकें ठेवण्यासाठीं बुवा पुढें सरणार तोंच पांडुरंगमूर्ति अंतर्धान पावली व तो पांथस्थच आपल्यापुढें चालत आहे असें बुवांच्या दृष्टीस पडलें. मग ते दोघेही देहू गांवीं आले. तेथें बुवांच्या घरीं गोणी उतरून पांथस्थ अदृश्य झाला व बुवा बैलास चारापाणी घालण्याच्या कामांत गुंतले. तुकोबा घरीं आल्याची बातमी गांवांत पसरतांच त्यांचे इष्टमित्र व सावकार त्यांच्या घरीं जमा झाले व त्यांनीं, राजहंसास जसें कावळ्यांनीं टोंचावें, त्याप्रमाणें नानाप्रकारचे वेडेवांकडे शब्द बोलून तुकोबांचें डोकें उठविलें. त्यांच्या बडबडीचा सारांश एवढाच होता कीं तुकोबांनीं हरिभक्तीचा नाद अजिबात सोडून द्यावा!

पुढें शके १५५१ त देशांत अवर्षण पडल्यामुळें दुष्काळाचीं चिन्हें दिसूं लागलीं. घरांतील माणसांच्या खाण्यापिण्याचे आतां हाल होणार या विचारानें बुवा चिंताक्रांत झाले. शेवटीं, थोडेंसें भांडवल उरलें होतें त्याच्या मिर्च्या घेऊन व त्या बैलांवर लादून बुवा कोंकणांत गेले व तेथें 'लाखाचे बारा हजार' करून परत आले ! येतांना, वाटेंत एका लुच्यानें, सोन्याचा मुलामा दिलेलीं पितळेचीं कडीं त्यांना विकत दिलीं व त्यांच्यापाशीं जे काय थोडेसे पैसे होते तेही लांबविले ! थोड्या पैशांत सोन्याचीं कडीं मिळालीं तीं विकून सावकारांचें देणें आपण देऊन टाकूं, या आनंदाच्या विचारांत बुवा घरीं आले. त्यांच्या आगमनाची वार्ता कळतांच त्यांचे सावकारही त्यांच्या घरीं जमा झाले. तेव्हां बुवांनीं तीं कडीं त्यांस दिलीं आणि सांगितलें कीं हीं कडीं विकून तुमच्या रकमा तुम्ही फेडून घ्या आणि उरतील ते पैसे आम्हांस परत द्या. सावकारांनीं कडीं पाहिलीं आणि तीं सोन्याचा मुलामा दिलेलीं पितळेचीं कडीं आहेत हें ओळखून ते मोठ-मोठ्यानें हांसूं लागले. ते तुकोबांस म्हणाले, "तुला जें देवपिसें लागलें आहे त्याचा हा परिणाम बरें ! जो देवाची भक्ति करील त्याची बुद्धि अशीच भ्रष्ट होणार हें अगदीं ठरलेलें आहे. आणि म्हणूनच आम्ही तुझ्या कानीं-कपाळीं ओरडून तुला सांगत असतों कीं, तुक्या, हें विठोबाचें वेड आतां सोडून दे. पण तूं कांहीं ऐकत नाहींस. तूं आपल्या या मूर्खपणानें स्वतःच्या संसाराचें वाटोळें केलेंस, बायकापोरांस भिकेला लावलेंस आणि आमचेंही नुकसान केलेंस !" अशा रीतीनें, तुकोबांस अनेक कठोर शब्द बोलून तीं गिधाडें तेथून निघून गेलीं. पण इतक्यांत घरांतला तोफखाना सुरू झाला. तुकोबांची वडील पत्नी रखमाई व धाकटी अवलाई ऊर्फ जिजाई ह्या डोकें पिटून रडूं लागल्या. त्यांतल्यात्यांत अवलाई जरा विचारी होती. नवऱ्यास पुनः कांहीं भांडवल मिळवून द्यावें असा विचार करून ती एका सावकाराकडे गेली व स्वतःच्या नांवाचें कर्जखत लिहून देऊन त्याजकडून दोनशें रुपये घेऊन आली. तिचे भाऊ श्रीमंत असल्यामुळें, आपले पैसे कांहीं बुडणार नाहींत, या विचारानें सावकारानें पैसे दिले. घरीं येऊन अवलाई तुकोबांस म्हणाली, "मी माझ्या गळ्यास फांस लावून, हे सावकाराचे

दोनशें रुपये आणले आहेत. यांचें मीठ विकत घ्या, आणि येथले कांहीं वाणी वालेघांटाकडे जाणार आहेत त्यांच्यावरोबर जा." त्याप्रमाणें तुकोबांनीं त्या दोनशें रुपयांचें मीठ विकत घेतलें आणि तें बैलांवर लादून ते आपल्या गांवांतील वाण्यांबरोबर वालेघाटांकडे चालले. बालेघांटास गेल्यावर तेथें तें मीठ त्यांनीं विकलें आणि आलेल्या पैशांचा गूळ खरेदी करून, तो एका शहरांत नेऊन विकला. नंतर, बुवांसह सर्व व्यापारी स्वदेशीं येण्यास निघाले. वाटेंत एका गांवीं त्यांचा मुक्काम पडला असतां लांकडाचा नांगर गळ्यांत अडकविलेला एक ब्राह्मण त्यांजपाशीं याचना करावयास आला. तेव्हां वहुतेक वाण्यांनीं 'तुझ्यासारखे कितीतरी भिकारी रोज येतात त्या सर्वांना पैसा कोठून द्यावा ?' असें म्हणून त्याला वाटेस लावलें. कोणी चवली पावली दिली ती घेऊन तो तुकोबांपाशीं आला. बुवा त्याला म्हणाले, "भटजी, तुमची एकंदर हकीकत काय आहे ती ऐकूं द्या तर खरी." तेव्हां तो ब्राह्मण म्हणाला, "शेटजी, माझें पाटिलकीचें वतन होतें तें माझ्या भाऊबंदांनीं लाटलें आणि सरकारी अधिकाऱ्यांस लांच देऊन मलाच उलट बंदींत टाकलें ! मग पंच मध्यें पडले आणि त्यांनीं मला सोडविलें. राजा अन्यायी; त्यानें मला ३०० रु. दंड केला, त्यांतले ५० रु. मी भरले. २५० रु. अद्याप भरावयाचे आहेत आणि ते जमविण्यासाठीं मी गांवोगांव याचना करीत फिरत आहें. वरोबर राजानें हा शिपाई दिला आहे. हा कांहीं मला चैन पडूं देत नाहीं." ब्राह्मणाची ही हकीकत ऐकून तुकोबांस त्याची दया आली आणि आपल्याकडील २५० रु. त्यास देऊन त्यांनीं त्याला संतुष्ट केलें. बुवांचें हें कृत्य त्यांचे सोबती पहातच होते; त्यांना बुवांचें हें औदार्य पाहून हंसूं कोसळलें. ते आपसांत बोलूं लागले, "काय हो धनशेट, या तुक्याचा हा केवढा मूर्खपणा ! आमच्यासारख्यांनीं असल्या व्यवहार-ज्ञानशून्य माणसाच्या सहवासांत राहूं नये हें चांगलें. यानें त्या भटुरड्यास अडीचशें रुपये दिले ही हकीकत उद्यां त्या जिजाईस समजली म्हणजे ती कांहीं आपला जीव ठेवणार नाहीं !" धनशेट म्हणाले, "यांत काय संशय ? यानें केलेंच आहे तसें. घरीं बायकांपोरांस घांसभर अन्न मिळण्याची मारामार आणि हा बेटा त्या वाटेच्या वाटसरास अडीचशें रुपये काढून देतो ! आहे काय नि

नाहीं काय ? ” इतकें बोलून ते वाणी तुकोबांस तेथेंच सोडून पुढें निघून गेले. इकडे तुकोबांनीं ते अडीचशें रुपये, त्या शिपायाबरोबर सरकारांत पाठविले आणि सरकारच्या देण्यांतून ब्राह्मणाची सुटका केली. मग त्यांनीं न्हाव्याकडून त्या ब्राह्मणाची श्मश्रु करविली व स्वतःचे पदरची सामग्री देऊन त्याच्या पत्नीस स्वयंपाक करण्यास सांगितलें. जेवण तयार झाल्यावर दहा ब्राह्मणांस भोजन देऊन, त्या दांपत्याचा त्यांनीं आशीर्वाद घेतला. आपलें द्रव्य सत्कारणीं लागलें या विचारानें तुकोबांस मोठा आनंद झाला; परंतु घरीं जिजाबाई काय म्हणेल ही कल्पना मनांत येतांच ते पुनः चिंताक्रांत झाले. इकडे पांडुरंगासही तीच चिंता पडली. तुकोबांनीं मुद्दल आणि फायदा, दोन्ही ब्राह्मणांस देऊन टाकलीं हें त्या वाण्यांनीं जिजाईस सांगितलें म्हणजे ती कांहीं तुकोबांचे वाभाडे काढल्याशिवाय रहात नाहीं आणि सावकारही त्यांना चैन पडूं देणार नाहीं, तेव्हां आतां त्यांच्या संरक्षणाची कांहीं तरी तजवीज केली पाहिजे असें ठरवून पंढरीनाथानें तुकारामबुवांचें रूप धारण केलें आणि देहूस त्या सावकाराच्या घरीं जाऊन व्याजासह त्याची रकम चुकती करून जिजाईनें लिहून दिलेलें कर्जखत परत मागितलें. सावकारानें कर्जखत दिलें तें तुकारामरूपधारी पांडुरंगानें पुनः त्याजकडे देऊन व वर आणखी पांच होन देऊन त्याला सांगितलें, “ शेटजी, हें कर्जखत आणि हे होन तुम्हीच कृपा करून जिजाईला नेऊन द्या. मी फार दिवस बाहेर राहिलों आणि रिकाम्या हातांनीं परत आलों म्हणून ती माझ्यावर रागावेल. ” मग तो सावकार त्याप्रमाणें तुकारामबुवांच्या घरीं गेला आणि कर्जखत व होन त्यानें जिजाईला दिले. जिजाईनें विचारलें, “ आमचे घरधनी कोठें गेले ? जवळपासच कोठें तरी भजन करीत बसले असतील ! ” “ मला माहित नाहीं, ” असें म्हणून सावकार आपल्या घरीं निघून गेला.

पुढें तुकारामबुवा कांहीं दिवसांनीं परत देहूस आपल्या घरीं आले तेव्हां त्या वाण्यांनीं त्यांच्या घरीं मुद्दाम जाऊन “ तुकोबानें भांडवलाचे दोनशें आणि नफ्याचे पन्नास, मिळून अडीचशें रुपये देऊन सरकारच्या ऋणांतून एका ब्राह्मणास मुक्त केलें, ” ही हकीकत त्यांच्या दोन्ही बायकांस कळविली. उलट रुक्माबाई व जिजाई यांनीं सावकाराच्या कर्जफेडीची हकीकत त्यांना

सांगितली व जिजाईनें तर कर्जखतही आणून दाखविलें. तो प्रकार ऐकून तुकोबा मोठ्या बुचकळ्यांत पडले. लोकांसही आश्चर्य वाटलें. कोणी म्हणाले, "हें सगळें त्या पांडुरंगाचें विंदान आहे," तर दुसरे कोणी म्हणाले, "कुठला आला आहे पांडुरंग! आपल्या शब्दास खोटेपणा येऊं नये म्हणून जिजाईनेंच कोठून तरी पैसे आणून भरले असतील झालें!"

पुढें कांहीं दिवसांनीं देशावर असा भयंकर दुष्काळ पडला कीं, दोन पायल्यांची धारण झाली. पाऊस बिलकुल पडला नाहीं त्यामुळें चाऱ्याविना बैल मेले! तुकारामबुवांच्या घरीं अगोदरच अठरा विश्वे दारिद्र्य, त्यांत आणखी हा दुष्काळ पडला, मग त्यांची स्थिति काय विचारतां? पोरेंबाळें भुकेनें तडफडूं लागलीं! हें पाहून तुकारामबुवांचें चित्त कळवळलें आणि कोणी थोडेबहुत पैसे उसने देतात कीं काय हें पाहण्यासाठीं ते घरोघर फिरले, पण कोणी एक कवडीही देईना! उलट यांना पाहून गांवांतले लोक व इष्टमित्रदेखील कपाळास आंठ्या घालूं लागले. सावकार तर दारांतही उभे करीनात. ते म्हणूं लागले, "पूर्वीचें कर्ज आधीं आणून दे व मग नवीन कर्ज माग." कांहीं निष्ठुर लोकांनीं तर आपल्या घरांतून त्यांना गचांडी देऊन बाहेर घालविलें! लोकांचीं दुरुत्तरें ऐकून आणि त्यांजकडून झालेला अपमान पाहून बुवांस मोठी लाज वाटली. मग ते एकांतांत जाऊन एकंदर परिस्थितीचा विचार करूं लागले. तों त्यांना घरांत कांहीं गोण्या व थोडींशीं भांडींकुंडीं होतीं त्यांची आठवण झाली. मग तीं विकून त्यांचे जे पैसे आले त्यांचें त्यांनीं धान्य खरेदी केलें. तें आठ शेर आलें. त्यांतलें मूठभर धान्य टाकून पातळ पेज करावी आणि ती थोडथोडी पिऊन कसा तरी जीव जगवावा असा क्रम त्यांनीं चालविला. परंतु अशा रीतीनें कितीही काटकसर केली तरी तें आठ शेर धान्य किती दिवस पुरणार? कांहीं दिवसांनीं तें संपून गेलें आणि कुटुंबांतील माणसांचे डोळे पांढरे होण्याची वेळ आली! दुष्काळ तर वाढतच चालला व आरंभीं दोन पायल्यांची धारण होती ती शेरावर येऊन ठेपली! देशांतील हजारों लोक अन्नाविणें तडफडून मेले. शके १५५१–५२ सालीं महाराष्ट्रांत पडलेला हा भयंकर दुष्काळ होय. अबदूल हमीर लाहोरी नामक एका मुसलमान इतिहासकारानें या दुष्काळाचें वर्णन

केलें आहे तें वाचून अंगावर कांटा उभा राहतो. तो लिहितो, "एका भाकरीच्या तुकड्यासाठीं जनावरें व मुलेंही लोक विकूं लागले. मृतांचीं हाडें कुटून पिठांत लोक घालूं लागले. दुष्काळ शेवटीं इतक्या शिगेला पोंचला कीं माणसें माणसांना खाऊं लागलीं, इतकेंच काय, पण पुत्रप्रेम विसरून लोक आपल्याच मुलांना खाऊं लागले! जिकडे तिकडे प्रेतांच्या राशी पडल्या." श्रीसमर्थ रामदासस्वामी या दुष्काळाविषयीं लिहितातः—

पदार्थ मात्र तितुका गेला । नुस्ता देशचि उरला ।
येणेंकरितां बहुतांला । संकट आलें ॥
लोकें स्थानभ्रष्ट झालीं । कित्येक तेथेंचि मेलीं ।
उरलीं तीं मराया आलीं । गांवावरी ॥
माणसा खावया अन्न नाहीं । आंथरुण पांघरुण तेंही नाहीं ।
घर कराया सामग्री नाहीं । काये करिती ॥
पुढें आला प्रजन्यकाळ । धान्य महर्घ दुष्काळ ।
शाकार नाहीं भळभळ । रिचवे पाणी ॥

जुन्या ऐतिहासिक कागदपत्रांतही या दुष्काळाचा व त्याच वेळीं आलेल्या परचक्राचा उल्लेख सांपडतो." (श्री. पांगारकरकृत तुकारामचरित्र.) तुकारामबुवांच्या घरीं आधींच अठरा विश्वे दारिद्र्य, मग असल्या भयंकर दुष्काळांत त्यांचा निभाव कसचा लागतो! धान्य मिळेना तेव्हां चारदोन दिवसांनीं कसला तरी पाला आणून तो शिजवून खावा असा प्रसंग बुवांच्या कुटुंबावर आला! शेवटीं, या दुष्काळांत बुवांची पहिली बायको रुक्माई ही अन्न अन्न करून मेली! आपल्या बायकोस घांसभर अन्न घालून तिचा जीव आपणास वांचवितां आला नाहीं याबद्दल बुवांस मोठें दुःख झालें. अशा प्रसंगीं त्यांस मदत तर कोणी केली नाहींच, पण उलट लोक त्यांच्या हरिभक्तीचा उपहास करूं लागले. कोणी त्यांना मोठ्या साळसूदपणानें उपदेश केला, "तुक्या, तूं सदा सर्वकाळ विठ्ठलाच्या नांवाचा मोठ्या प्रेमानें जप करतोस, त्यामुळेंच तुझ्या संसाराची ही अशी वाताहात होत आहे. म्हणून अजून तरी हा नाद तूं सोडून दे." पण, अनंत दुःखें सहन करून बुवा आतां

इतके शांत आणि सहनशील झाले होते कीं लोकांकडून होणाऱ्या अवहेलनेबद्दल त्यांस बिलकुल वाईट वाटेना. उलट त्यांचें वैराग्य तीव्रतर होत चाललें. अन्न आच्छादन प्रारब्धाधीन असून, प्रारब्ध जर अनुकूल नसेल, तर मनुष्याचे सर्व प्रयत्न निष्फलच व्हावयाचे; म्हणून प्रभुनामस्मरणानें संचित, क्रियमाण आणि प्रारब्ध यांचा नाश करणें हा एकच उपाय शेवटीं शिल्लक राहतो, असें ठरवून 'निर्वाणीचा सखा' जो पांडुरंग त्याच्याच भजनपूजनांत पुढील आयुष्य व्यतीत करावयाचें असा त्यांनीं निश्चय केला आणि तो शेवटपर्यंत मोठ्या कसोशीनें पाळला. तुकारामबुवांच्या ह्या निश्चयाप्रमाणेंच, त्यांच्या दैवानेंही त्यांची शेवटपर्यंत पाठ पुरविण्याचा निश्चय केला होता, असें दिसतें. कारण, त्यांची एक पत्नी वारल्यावर थोड्याच दिवसांनीं त्यांचा थोरला मुलगा संतोबा हा मरण पावला. ह्या मुलावर बुवांचें फार प्रेम होतें. अशा रीतीनें, अनेक दुःखें भोगण्यांतच बुवांच्या आयुष्याचा पूर्वार्ध संपला. ह्या पूर्वार्धांत ज्या गोष्टी घडल्या त्या महीपतिबुवांनीं आपल्या 'भक्तलीलामृत' ग्रंथांत पुढीलप्रमाणें यथाक्रम दिल्या आहेतः—

तेरावे वर्षीं पितयानें । संसार गळां घातला जाण ।
तेथें दक्षता येतां दिसोन । समाधान वडिलांसी ॥
सतरावे वर्षीं तत्त्वतां । क्रमोनि गेलीं मातापिता ।
वडील बंधूची कांता । तेही अवचितां निमाली ॥
अठरावे वर्षीं जाणा । सावजी गेला तीर्थाटणा ।
त्याच्या वियोगें करूनी जाणा । शोक निज मना वाटत ॥
विसाव्यांत पुत्रकांता स्वयमेव । देखोनि संसारीं धरिली हांव ।
येथूनि मन विटवावें । मग देवाधिदेवें काय केलें ॥
एकविसाव्यांत विपरीत काळ । तुकयासी पातला तत्काळ ।
तेव्हां निघतांचि दिवाळें । सोइरे सकळ हांसती ॥
अज्ञान प्रकृति ते स्त्री निश्चित । तेही निमाली अन्न अन्न करित ।
महामोह पुत्र समस्त । लौकिकीं विपरीत हे वार्ता ॥
पूर्वार्ध संपलें ऐशा रीती । दुःखें देखिलीं नाना रीती ।
संसाराची आस्था होती । तेही भ्रांति निरसली ॥

महीपतींनीं सांगितल्याप्रमाणें, वरील सर्व गोष्टी तेराव्या वर्षापासून एकविसाव्या वर्षापर्यंत—अवघ्या आठ वर्षांत—घडल्या असतील हें मात्र माझ्या मनास पटत नाहीं. ह्या प्रकरणांत वर्णिलेल्या सर्व गोष्टी घडण्यास याहून कांहीं अधिक काल लागला असला पाहिजे, असें मला वाटतें. त्याचप्रमाणें, तुकाराम-बुवांच्या तारुण्यांत त्यांच्या हातून, कांहीं अनुचित गोष्टी घडल्या होत्या व त्याबद्दल मागाहून त्यांना पश्चात्ताप होत असे असेंही त्यांच्या पुढील अभंगां-वरून दिसतें. हा अभंग गाथ्यांत नाहीं, पण तुकारामाचे टाळकरी शिष्य संतुजी तेली जगनाडे यांच्या हातच्या बुवांच्या अभंगांच्या वहींत सांपडतोः—

**कायावाचा मनें अघटित कानें । चमचक्षु हातपायें ॥**
**निंदा द्वेश घात विश्वासीं वीभचार । आणिक सांगों किती काये ॥ १ ॥**
**लक्षीमीमद मातें घडले मांहांदोश । पत्नी दोन भेदाभेद ॥**
**पितृवचनीं घडली अवज्ञा अवीचार । कुटळ कुचरवादी निंदा ॥ २ ॥**
**आणीक किती सांगों ते अवगुण । न वळे जिव्हा कांपे मन ॥**
**भूतदया उपकार नाहीं शब्दा धीर । वीशयी लंपट हीणा ॥ ४ ॥**
**संत मानभाव आईका हीं उत्तरें । अवगुण अविचार वृद्धी पापा ।**
**तुका म्हणे सरतें करा । पांडुरंगीं शरण आलों मायेबापा ॥ ५ ॥**

यासंबंधानें कै. नारायण कृष्ण गद्रे हे आपल्या 'विविधज्ञानविस्तारां' तील लेखांत लिहितात, " या अभंगांत तुकारामबोवांनीं आपले ऐन पंचविशींतील व पुढीलही बहुतेक चाळे, यांचा उल्लेख केलेला आहे. बुवांचे ऐनपंचविशींतील चाळे म्हणून जे शब्द वापरण्यांत आले आहेत त्यांवरून माणुसकीविरुद्ध कांहीं विलक्षण घोर कृत्यें बोवांनीं केलीं असावींत असें दाखविण्याचा यत्किंचित्‌ही उद्देश नाहीं. तरी तारुण्यांत धनधान्यसंपन्नता असल्यावर ज्या तऱ्हेची वर्तणूक सामान्य लोकांच्या हातून घडते त्या तऱ्हेची आडदांडपणाची, अविचारीपणाची वर्तणूक, तुकारामबोवा हे केवळ तरुण तुकशेटी असतांना त्यांच्या हातून निःसंशय घडली होती असें म्हणण्यास मात्र कांहीं एक अडचण नाहीं. वरील अभंगांत " काया वाचा मन म्हणजे पंच कर्मेंद्रियें आणि पंच ज्ञानेंद्रियें, तसेंच अंतःकरण-पंचक, हीं सर्व आपलीं बाह्याचारीं विषयानुरक्तच होतीं; निंदा, द्वेष, विश्वास-

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे ५१५
अनुक्रम श्रीतुकाराम ३८८८ वि.
१२८८ नों. दि. १५-९-६४
क्रमांक

घात, व्यभिचार ( मानसिक तरी ), लक्ष्मीमद इत्यादि सर्व दोषांचें आपण वसतिस्थान होतों इतकेंच नव्हे तर प्रत्यक्ष पितृवचनाची अवज्ञाही आपल्याकडून घडत असे. दोन बायकांत एक नावडती आणि दुसरी आवडती असली भेदबुद्धीही आपल्या ठिकाणीं परिपूर्ण होती," असें बोवाच सांगत आहेत. वरील स्वदोषनिवेदनपर अभंगांतील तिसरा चरण विशेष लक्ष्य आहे. त्यांत बोवा म्हणतात, " मला लक्ष्मीमदानें महादोष घडले. मी अविचारानें कुटिल, कामचुकार, तोंडास तोंड देणारा किंवा तर्कवितर्क करून वाद माजविणारा, किंवा वादविवादांत निंदा करणारा असा झालों. "

बुवांच्या या कबुलीजबाबावरून, बुवा तरुण असतांना त्यांचें घराणें बरेंच धनकनकसंपन्न होतें व त्यामुळेंच बुवांच्या हातून हे तारुण्यसुलभ दोष घडले असें स्पष्ट दिसतें. बुवांचे कनिष्ठ बंधु कान्होबा यांनींही आपल्या एका अभंगांत आपल्या दोषांचा असाच पाढा वाचला आहे. आपण अभक्ष्यभक्षण केलें, परद्वार केलें, दासीगमन केलें, किंबहुना तोंडानें बोलूं नयेत अशीं अनेक पापकर्में तारुण्यांत आपल्या हातून घडलीं अशी कबुली कान्होबांनीं दिली आहे. असो. तात्पर्य येवढेंच कीं, तुकोबांच्या आयुष्याचा पूर्वार्ध जो २१ वर्षांचा मानतात तो बरोबर नसून, तो कमींत कमी ३० वर्षांचा तरी मानावाच लागतो.

---

## प्रकरण ३ रें

# तुकोबांचें वैराग्य

ऐका वचन हें संत । मी तों आगळा पतित ।
काय काजें प्रीत । करितसां आदरें ॥
माझें चित्त मज ग्वाही । सत्य तरलों मी नाहीं ।
एकाचिये वाहीं । एक देखीं मानिती ॥
बहु पीडिलों संसारें । मोडीं पुसें पिटीं ढोरें ।
न पडतां पुरें । या विचारें राहिलों ॥
सहज सरलें होतें कांहीं । द्रव्य थोडें बहु तेंही ।
त्याग केला नाहीं । दिलें द्विजां याचकां ॥
प्रिया पुत्र बंधु । यांचा तोडिला संबंधु ।
सहज जालों मंदु । भाग्यहीन करंटा ॥
तोंड न दाखवे जनां । शिरें सांदी भरें राना ।
एकांत तो जाणा । तयासाठीं लागला ॥
पोटें पिटिलों काहारें । दया नाहीं या विचारें ।
बोलावितां बरें । सहज म्हणे यासाठीं ॥
सहज वडिला होती सेवा । म्हणोनि पूजितों या देवा ।
तुका म्हणे भावा । साटीं झणी घ्या कोणी ॥

स्वतःस वैराग्य उत्पन्न होण्यास कोणत्या गोष्टी मुख्यत्वेंकरून कारणीभूत झाल्या याचा स्पष्ट खुलासा वरील अभंगांत तुकारामबुवांनीं केला आहे. 'संसारानें मी फार पिडलों' असें बुवांनीं अनेक ठिकाणीं म्हटलें आहे. आतां, संसारानें पिडलेले लोक जगांत आजपर्यंत कोट्यवधि होऊन गेले असतील व आजही आहेत, पण तुकारामबुवांप्रमाणें, संसारावर लाथ मारून निव्वळ परमार्थसाधनांतच आपलें शेष आयुष्य खर्च करणारे लोक त्यांत फारच थोडे सांपडतील. अनंत प्रयत्न करूनहि संसारांत सारखें अपयश येत गेलें असतांही, शेवटपर्यंत, आशेच्या नादीं लागून, तोच संसारकर्दम चिवडीत बसणारे आणि त्यांतच आनंद मानतां मानतां एखादे दिवशीं किडीमुंग्यांप्रमाणें

पद्दिशीं मरून जाणारे लोक या जगांत खच्चून भरले आहेत. जन्मल्यापासून मरेपर्यंत सारखी धडपड, जिवाला क्षणभर चैन नाहीं, दुःखाचे डोंगर सारखे कोसळतच आहेत, अशा स्थितींतही, डिकन्सच्या 'डेव्हिड कॉपरफील्ड' कादंबरींतील 'मिकॉबर'प्रमाणें 'Something will turn up' या आशेवर दिवस कंठणारे दुर्दैवी लोक, संसारांतील दुःखामुळें वैतागून परमार्थोन्मुख होणाऱ्या तुकारामबुवांसारख्या थोर पुरुषांचा 'भीरु' 'नामर्द' वगैरे शब्दांनीं जेव्हां उपहास करतात तेव्हां खरोखरच मोठी गंमत वाटते. जणूं काय, द्रव्य, स्त्री, पुत्र इत्यादिकांपासून प्राप्त होणाऱ्या सुखापेक्षां श्रेष्ठतर सुख जगांत दुसरें नाहींच ! आणि त्या श्रेष्ठतर सुखासाठीं, संसाराचा आणि स्त्रीपुत्रादिकांचा मोह ज्यांनीं सोडला ते सगळे मूर्खशिरोमणि ! त्यांचीं डोकीं ठिकाणावर नव्हतीं ! लक्षावधि लोकांस ज्यांनीं वेड लावलें ते स्वतः वेडे होते ! प्रस्तुत कालीं, स्वदेशोद्धारार्थ एखाद्या सामान्य माणसानें जर थोडासा स्वार्थत्याग केला तर तो मोठा देशभक्त ठरून मानसन्मानास पात्र होतो, आणि स्वदेशासुद्धां सर्व विश्वाची उत्पत्ति, स्थिति आणि लय करणाऱ्या परमेश्वराच्या प्राप्तीसाठीं जर एखाद्यानें आपल्या सर्वस्वाचा त्याग केला तर तो वेडापीर ठरतो ! जगाची दृष्टी अशी उलटी आहे, आणि हें लक्षांत घेऊनच तुकारामबुवांनीं म्हटलें आहे कीं "सत्या असत्यासी मन केलें ग्वाही । मानियेलें नाहीं बहुमता ॥" "पांडुरंगाचें भजनपूजन सोडून तूं संसाराकडे लक्ष दे," असा बुवांस उपदेश करणारे लोक त्यांच्या वेळीं कांहीं थोडे थोडके नव्हते, पण संसाराच्या बाबतींत त्यांना मदत करण्यास मात्र एकाचाही हात पुढें झाला नाहीं. आणि 'परोपदेशे पांडित्य' करणाऱ्या या मोठ्या व्यवहारदक्ष लोकांपैकीं एकाचेंही नांव आज कोणास ठाऊक नाहीं, आणि ज्यांना त्यांनीं व्यवहारज्ञानशून्य ठरविलें होतें त्या तुकारामबुवांचा मात्र आज अडीचशें वर्षें सारखा जयजयकार होत आहे ! तेव्हां हें काय गौडबंगाल आहे याचा विचार वाचकांनींच करावा. गौतमबुद्ध, शंकराचार्य, चैतन्य, रामदास, तुकाराम इत्यादि पुरुषांनीं स्वतःच्या संसारावर लाथ मारून विश्वाचा संसार केला; "हें विश्वचि माझें घर । ऐसी मति जयाची स्थिर । किंबहुना चराचर । आपणचि जाला ॥" या वसुधैव कुटुंबक कोटींतले ते होते. खऱ्या सुखाचा शोध त्यांनाच लागला, इतर लोक नुसती

धडपड करीत आहेत. आणि ही गोष्ट जगज्जेता अलेक्झांडर, महाराष्ट्र स्वराज्यसंस्थापक शिवाजी महाराज, शूराग्रणि पहिले बाजीराव साहेब पेशवे वगैरे दिगंतकीर्ति पुरुषांस कळली होती म्हणूनच ते सत्पुरुषांच्या भजनीं लागले. डायोजिनिसचें दर्शन घेण्यास अलेक्झांडर बादशहा मुद्दाम त्याच्या गांवीं गेला आणि " मी जर अलेक्झांडर बादशहा झालों नसतों तर मोठ्या खुषीनें डायोजिनीस झालों असतों," असे त्यानें उद्गार काढले, याचें कारण काय असेल बरें ? स्वराज्यस्थापनेच्या दगदगींत रात्रीचा दिवस करावा लागत असतांही चिदानंद व रामदास यांच्या गांठीभेटी घेण्यांत आणि वेळांत वेळ काढून तुकारामबुवांच्या कीर्तनास हजर राहण्यांत शिवाजी महाराजांचा काय उद्देश असेल बरें ? तर, आपण येवढें राजवैभव मिळविलें असतांही आपल्याला जें समाधान लाभलें नाहीं, तें समाधान द्रव्याचा विटाळ मानणाऱ्या ह्या साधुसंतांस ज्याअर्थी प्राप्त झालेलें आहे, त्याअर्थी आपल्यापेक्षां त्यांचीच योग्यता अधिक आहे ही जाणीवच या गोष्टीच्या मुळाशीं असली पाहिजे. येरवीं, चंद्रमौळी झोंपडींत बसून हवा आणि पाणी यांजवरच बहुतेक निर्वाह चालविणारे संत राजवाड्यांत राजाच्या भेटीस कधीं जात नाहींत आणि राजवाड्यांत राहून सर्व प्रकारचे सुखोपभोग भोगणारे राजे मात्र साधूच्या दर्शनासाठीं आणि त्याचा आशीर्वाद मिळविण्यासाठीं त्याच्या झोंपडींत आपण होऊन जातात, ह्या, सकृद्दर्शनीं विपरीत दिसणाऱ्या गोष्टीचा उलगडा कसा होणार ? सगळ्या राजांच्या राजांपाशीं ज्यांनीं वशिला लावला आहे त्यांजपुढें सामान्य राजांची किंमत नाहीं हेंच खरें. असो.

तुकारामबुवांस वैराग्य उत्पन्न होण्यास ज्या गोष्टी कारणीभूत झाल्या, त्या सगळ्यांचा उल्लेख मागील प्रकरणीं येऊन गेलाच आहे. आईबापांचा मृत्यु, बंधूचा ग्रामत्याग, वडिलार्जित द्रव्याचा नाश, व्यापारांतील अपयश, दुष्काळांतील हाल, पत्नीचा मृत्यु, लोकांकडून होणारी निंदा आणि शेवटीं प्रियपुत्राचा मृत्यु वगैरे प्रसंग सारखे येत गेल्यामुळें आणि नानाप्रकारचे प्रयत्न करूनही संसारांत यश येत नाहीं अशी खात्री झाल्यामुळें बुवा अगदीं वैतागल्यासारखे झाले आणि शेवटीं दैववादी बनले. प्रारब्ध, संचित आणि क्रियमाण यांजपासून सुखदुःखाचा उगम होतो, तेव्हां, हरिनामाग्नीनें त्यांचें भस्म करून टाकलें म्हणजे सहजच आपण सुखदुःखातीत होऊं, असा विचार करून बुवांनीं त्या मार्गाचें

अवलंबन केलें. त्यांची दुसरी बायको भयंकर कर्कशा होती हीही गोष्ट त्यांचें वैराग्य वाढत जाण्यास साहाय्यभूत झाली. बुवा स्वतःच सांगतातः—

“ बरें झालें देवा निघालें दिवाळें । बरी या दुष्काळें पीडा केली ॥
अनुतापें तुझें राहिलें चिंतन । जाला हा वमन संवसार ॥
बरें जालें देवा बाईल कर्कशा । बरी हे दुर्दशा जनांमध्यें ॥
बरें जालें जगीं पावलों अपमान । बरें गेलें धन गुरें ढोरें ॥
बरें जालें नाहीं धरिली लोकलाज । बरा आलों तुज शरण देवा ॥
बरें जालें तुझें केलें देवाईल । लेंकरें बाईल उपेक्षिली ॥
तुका म्हणे बरें व्रत एकादशी । केलें उपवासी जागरण ॥

ज्या गोष्टींमुळें दुसऱ्या एखाद्या मनुष्यास वेड लागलें असतें किंवा त्यानें कदाचित् आत्महत्याही केली असती, त्याच गोष्टी बुवांच्या साधुत्वास साधनीभूत झाल्या. बायकापोरांचा त्याग करण्यांत, त्यांजविषयींच्या आपल्या कर्तव्यास बुवा जागले नाहींत, हा बुवांवर हल्लींच्या कांहीं लोकांचा एक मोठा आक्षेप आहे. तेव्हां त्याचा थोडासा विचार करूं. आधीं एक तर, तुकारामबुवांनीं आपल्या बायकामुलांचा सर्वस्वी त्याग केला होता आणि त्यांच्या योगक्षेमाचे सर्व प्रयत्न त्यांनीं सोडून दिले होते असा ‘ लेंकरें बाईल उपेक्षिली ’ या शब्दांचा नुसता वाच्यार्थच घेऊन चालणार नाहीं. इतकेंच फार तर म्हणतां येईल कीं स्त्रीपुत्रादिकांविषयीं त्यांची वृत्ति उदासीन होती. सर्व गोष्टी दैवाधीन आहेत अशी अनुभवानें त्यांची प्रामाणिक समजूत झालेली असल्यामुळें आपल्या स्त्रीपुत्रांचें सुखदुःखही दैवाधीनच आहे असें जर त्यांनीं मानलें असेल तर त्यांत त्यांनीं कोणती चुकी केली ? ते म्हणतातः—

प्रारब्धेंचि जोडे धन । प्रारब्धेंचि वाढे मान ॥
सोस करितोसी वांयां । भज मना पंढरिराया ॥
प्रारब्धेंचि होय सुख । प्रारब्धेंचि पावे दुःख ॥
प्रारब्धेंचि भरे पोट । तुका करीना बोभाट ॥

प्रारब्धा हातीं जन । सुख सीण पावतसे ॥
करितां धाईंळाचा संग । अंग अंग मारवीवें ॥

आविसा अंगें पीडा वसे । त्यागें असे बहु सुख ॥
तुका म्हणे जीव भ्याला । अवघ्या आला बाहेरी ॥

आणि, स्वतःचा संसार सुखाचा व्हावा एतदर्थ, अगदीं आरंभीं तरी निदान, शक्य तितके सर्व प्रयत्न बुवांनीं मनःपूर्वक केले नाहींत, असें म्हणण्यास कोणता पुरावा आहे ? आरंभीं त्यांच्या प्रयत्नांत त्यांना जेव्हां यश येत होतें तेव्हां 'तुक्या मोठा व्यवहारदक्ष आहे,' अशी गांवांतले लोक त्यांची तारीफ करीत असत. पण पुढें सर्वच गाडें उलटलें आणि हातीं घेतलेल्या प्रत्येक कामांत त्यांना सारखें अपयश येत गेलें. शिवाय कुटुंबांतील प्रेमाच्या माणसांचे मृत्यु तर त्यांना प्रयत्नानेंही टाळतां येण्यासारखे नव्हते; अशा स्थितींत ते लवकरच सावध होऊन चिरंतन सुखाच्या मागें लागले यांत त्यांनीं कांहीं मोठा अपराध केला असें म्हणतां येणार नाहीं. आतां त्यांनीं शेवटपर्यंत सारखे प्रयत्नच करीत रहावयाचें होतें असें कोणी म्हणतील, तर ही ज्याच्या त्याच्या मर्जीची गोष्ट आहे. आपल्या आयुष्यांत प्रयत्नाची मर्यादा कोठें संपली आणि दैवाची हद्द कोठून सुरू झाली हें ज्याचें त्यानेंच ठरवावयाचें आहे. शिवाय, तुकारामबुवा जन्मभर सारखी धडपडच करीत राहते तर पुढें त्यांना खात्रीनें यश आलें असतें अशी हमी घेण्यास तरी कोण तयार होता ? विश्वप्रयत्न करूनही जेव्हां यश येत नाहीं तेव्हां प्रारब्धच बलवत्तर आहे अशी एखाद्याची समजूत होणें अस्वाभाविक नाहीं. म्हणून प्रयत्नवाद सोडून बुवा दैववादी झाले आणि प्रारब्धदोष जेणेंकरून नष्ट होईल अशा मार्गाचें अवलंबन त्यांनीं केलें. हा मार्ग कोणता ? तर तेच सांगतातः—

प्रारब्ध क्रियमाण । भक्तां संचित नाहीं जाण ॥
अवघा देवचि जाला पाहीं । भरोनियां अंतर्बाहीं ॥
सत्त्वरजतमबाधा । नव्हे हरिभक्तांसी कदा ॥
खाय बोले करी । अवघा त्यांच्या अंगें हरी ॥
देवभक्तपण । तुका म्हणे नाहीं भिन्न ॥

दैवाच्या अनुकूलतेमुळें ज्यांना हातीं घेतलेल्या प्रत्येक कामांत सारखें यश येत जातें ते लोक आपल्या प्रयत्नशीलतेची आणि कर्तबगारीची मोठी प्रौढी

मिरवीत असतात आणि अशा लोकांकडे एखादा दैवहीन दरिद्री जर कांहीं याचना करावयास गेला तर स्वतःचें उदाहरण देऊन त्याला प्रयत्न करावयास सांगतात आणि वाटेस लावतात. पण पुढें दैव प्रतिकूल होऊन त्यांची उलटी अंबारी झाली म्हणजे हेच राजश्री देवाच्या आणि दैवाच्या नांवानें कुरकुर करूं लागतात. अशा प्रकारचीं उदाहरणें आपल्या समाजांत किती तरी सांपडतील. तात्पर्य, दैव श्रेष्ठ कीं प्रयत्न श्रेष्ठ हा वाद आज हजारों वर्षें सारखा चालू आहे आणि प्रयत्नामुळें यशस्वी झालेले लोक 'प्रयत्नच श्रेष्ठ आहे,' असें, व प्रयत्न करूनही अयशस्वी झालेले लोक 'दैवच श्रेष्ठ आहे,' असें, जोंपर्यंत म्हणत राहणार तोंपर्यंत, म्हणजे, जगाच्या अंतापर्यंत, या वादाचा समाधानकारक निकाल लागणें शक्य नाहीं. असो.

शिवाय बुवांची आणखी एक अशी प्रामाणिक समजूत होती कीं परमेश्वर-प्राप्तीस ज्या ज्या व्यक्ति व वस्तु आड येतील त्या सर्वांचा मुमुक्षूनें त्यागच केला पाहिजे. ते स्पष्ट सांगतातः—

**जेणें घडे नारायणीं अंतराय । हो कां बाप माय वर्जावीं तीं ॥**
**येर प्रिया पुत्र धना कोण लेखा । करिती तीं दुःखा पात्र शत्रु ॥**
**प्रल्हादें जनक बिभीषणें बंधु । राज्य माता निंद्य भरतें केली ॥**
**तुका म्हणे सर्व धर्म हरिचे पाय । आणीक उपाय दुःखमूळ ॥**

बुवांचे समकालीन दुसरे प्रसिद्ध साधु श्रीसमर्थ रामदास यांचेंही मत असेंच आहे. तेही स्पष्ट सांगतातः—

**देवाच्या सख्यत्वासाठीं । पडाव्या जिवलगांशीं तुटी ।**
**सर्व अर्पावें शेवटीं । प्राण तोही वेंचावा ॥**

द्रव्य आणि स्त्री यांच्याहून खात्रीनें श्रेष्ठ असा जो परमात्मा त्याची कृपा संपादन करण्यासाठीं त्या दोहोंचाही त्याग करण्यास तुकाराम–रामदासांसारख्या संतांनीं सांगितलें असलें तर त्यांत कांहीं आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. परमेश्वराचें अस्तित्वच ज्यांना मान्य नसेल त्यांची गोष्ट निराळी, परंतु ईश्वर आहे आणि तो सर्वांहून श्रेष्ठ आहे हें ज्यांना मान्य असेल, त्यांना

श्रेष्ठाच्या प्राप्तीसाठीं कनिष्ठाचा त्याग करावा हा उपदेश ऐकून बिचकून जाण्याचें कांहीं कारण नाहीं.

तुकारामबुवांनीं एका अभंगांत म्हटलें आहे कीं, "मी माझें मरण स्वतःच्या डोळ्यांनीं पाहिलें!" वस्तुतः हें त्यांचें म्हणणें वेदांतदृष्ट्या खरेंच आहे, परंतु त्यांच्या लहानपणीं असा एक प्रसंग घडला होता कीं, त्यावरून ते पूर्वीं एकदां खरोखरच मेले होते असें दिसतें. हा प्रसंग असा आहे. लहानपणीं बुवांस त्यांच्या आईनें एकदां गुरें चारावयास पाठविलें असतां, रानांत तशींच गुरें सोडून ते कोठें निघून गेले. ही हकीकत इतर मुलांनीं त्यांच्या आईस सांगितली तेव्हां ती त्यांस रागानें म्हणाली, "मेल्या, मर जा." हें ऐकून तुकोबा मुलांपाशीं जाऊन त्यांस विचारतात, "गड्यांनो, मरावयाचें कसें हें तुम्हांस ठाऊक आहे काय रे?" मुलें म्हणालीं, "त्यांत रे काय कठीण? चल, आम्हीं तुला कसें मरावयाचें तें शिकवितों." मग त्या पोरांनीं चार काठ्या आणल्या आणि त्यांची तिरडी करून बुवांस तिजवर निजविलें. नंतर ते इंद्रायणीच्या वाळवंटांत गेले आणि तेथें एक खड्डा खणून तुकोबांस त्यांनीं पुरून टाकलें! तें पाहून कांहीं लोक ओडरले, "अरे पोरांनो, हें काय करतां? काढा त्याला बाहेर." पण इतक्यांत नदीला मोठा पूर आला आणि सर्व पोरें पळून गेलीं. कनकाईनें, "माझा तुक्या कोठें गेला?" म्हणून त्यांस विचारलें. त्यांनीं सांगितलें, "आम्हांला काय ठाऊक? तुझा मुलगा विदेही झाला!" मग त्यांतल्याच एका मुलानें तिला सांगितलें कीं, "तुझ्या मुलाला वाळवंटांत पुरलें असून त्या जागीं पूर आला आहे!" हें ऐकतांच कनकाई धांवतच नदीवर गेली व तुकोबांचें नांव घेऊन आक्रोश करूं लागली. आईचा शब्द ऐकतांच पुरलेल्या जागेवरून तुकोबा 'हुंकार' देऊन म्हणाले, "तूं मला मरावयास सांगितलेंस त्याप्रमाणें मी मेलों आहें." हें ऐकतांच कांहीं मुलांनीं त्या ठिकाणीं जाऊन वाळू उकरली, तेव्हां तुकोबा पाण्यांतून कोरडेच बाहेर पडले!" ह्या आख्यायिकेंत वर्णिल्याप्रमाणें, तुकोबा पुढेंही संसारसागरांत डुंबत असतां शेवटपर्यंत कोरडेच राहिले!

१ 'आपुलें मरण पाहिलें म्या डोळां०'

संसाराचा पूर्ण वीट आल्यावर, योगक्षेमासाठीं मुद्दाम प्रयत्न करण्याच्या भानगडींत अतःपर पडावयाचें नाहीं, यदृच्छेनें जें काय व्हावयाचें असेल तें होईल, असा निर्धार करून तुकोबा आतां सर्वस्वी परमार्थमार्गास लागले. कोणी कीर्तनकार गांवीं आले म्हणजे त्यांच्यामागें उभें राहून ध्रुपद धरावयाचें, जुन्या साधुसंतांची कविता पाठ करावयाची व इतर काल नामस्मरणांत घालवावयाचा असा क्रम त्यांनीं सुरू केला. गीता, भागवत, ज्ञानेश्वरी वगैरे ग्रंथांतलें ज्ञान त्यांनीं संपादन केलें. या व्यासंगामुळें त्यांचा बहुश्रुतपणा वाढत चालला. पुढें, देहूपासून कांहीं अंतरावर भांबनाथ या नांवाचा डोंगर आहे, त्या डोंगरावर जाऊन ते ध्यानस्थ बसूं लागले. अशा रीतीनें त्यांचें वैराग्य आणि मुमुक्षा पराकोटीस जाऊन पोंचलीं. तरीपण, ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं तुकारामबुवांस वैराग्य आलें तरी त्यांचे मनोविकार समूळ नष्ट झाले नव्हते; फक्त त्यांची तीव्रता कमी झाली होती. शेवटपर्यंत, मनोविकारांशीं त्यांचा झगडा कसा चालू होता व अखेरीस त्यांना नामोहरम करून ते कसे निर्विकार झाले हें त्यांच्या अभंगांत त्यासंबंधाचा जो पुनः पुनः उल्लेख आढळतो त्यावरून दिसून येतें. बुवांना स्वतःच्या गुणदोषांची पूर्ण जाणीव होती, किंबहुना आपल्या सर्व दोषांचा पुनः पुनः पाढा वाचणारा व स्वतःची फसवणूक न होऊं देण्यांत त्यांच्याइतकी दक्षता बाळगणारा दुसरा साधु झाला नाहीं असें म्हटल्यास चालेल. वरचेवर आत्मपरीक्षण करून, त्या परीक्षणाच्या कसोटीस आपण उतरत नाहीं असें दिसून येतांच स्वतःवर कठोर शब्दांचे कोरडे ओढून घेण्यास बुवांनीं कमी केलें नाहीं. भांबनाथ पर्वतावर एकांतीं बसून भगवंतास प्रेमानें आळविण्यांत तुकोबांचे बरेच दिवस गेले. या गिरिवासाविषयीं बुवा म्हणतातः—

वृक्षवल्ली आम्हां सोयरीं वनचरें । पक्षीही सुस्वरें आळविती ॥
येणें सुखें रुचे एकांताचा वास । नाहीं गुणदोष अंगा येत ॥
आकाश मंडप पृथिवी आसन । रमे तेथें मन क्रीडा करूं ॥
कंथाकमंडलु देह उपचारा । जाणवितो वारा अवसरू ॥
हरिकथा भोजन परवडी विस्तार । करोनि प्रकार रुचि सेवूं ॥
तुका म्हणे होय मनासि संवाद । आपुलाचि वाद आपणासी ॥

एकांतवास तुकारामबुवांस फार प्रिय होता असें त्यांच्या इतर ठिकाणच्या उद्गारांवरूनही दिसतें. "निर्वाहापुरतें अन्न आच्छादन । आश्रमासी स्थान कोपी गुहा," असें त्यांनीं एका अभंगांत म्हटलें आहे. तुकाराम आणि रामदास या दोन्ही समकालीन संतांच्या चरित्रांतलें हें साम्य लक्षांत ठेवण्यासारखें आहे. तुकोबांनीं लग्नानंतर संसार सोडला, समर्थांनीं लग्नापूर्वींच सोडला. तुकारामबुवांनीं भांबनाथाच्या डोंगरावर बसून तपश्चर्या केली, समर्थांनीं टाकळी येथें राहून पुरश्चरण केलें. तुकोबांस डोंगरावरील एकांतस्थान प्रिय होतें, समर्थांचा बराच काल डोंगरांच्या घळींतच गेला. मुमुक्षूनें, भगवद्भक्ती–आड येणाऱ्या आईबापांचादेखील त्याग करावा असें दोघांनींही सांगितलें आहे. आणि दोघेही हरिनामस्मरणावर भर देणारे असून, दोघांनींही सगुणोपासनेचा पुरस्कार केला आहे! असो. भांबनाथ पर्वतावर तुकोबा ज्या ठिकाणीं बसत असत तेथें त्यांचे धाकटे बंधु कान्होबा यांनीं स्थापन केलेल्या पादुका अद्याप तेथें आहेत. तुकोबा कोठें जाऊन बसतात हें आरंभीं त्यांच्या घरांतील माणसांस ठाऊक नव्हतें. एकदां तुकोबा जे भांबनाथावर गेले ते सात दिवस परत आले नाहींत म्हणून त्यांचे बंधु कान्होबा हे त्यांच्या शोधास निघाले व मोठ्या प्रयासानें त्यांनीं त्यांचा पत्ता लावला. मग ते दोन्ही बंधु इंद्रायणीवर आले व बुवा स्नान करून तेथेंच बसले. सात दिवसांच्या उपोषणाचें पारणें फेडावयाचें होतें, तें फेडण्यापूर्वीं, वडिलांनीं लोकांस कांहीं कर्ज दिलें होतें त्यासंबंधाचीं जीं कर्जखतें घरांत होतीं तीं घेऊन येण्यास बुवांनीं कान्होबांस सांगितलें. ते म्हणाले, "वडिलांचे वेळीं लोकांकडे जें आपलें येणें होतें त्याचीं कर्जखतें आपल्यापाशीं आहेत, त्यामुळें, हें देणें वसूल होईल कीं नाहीं, अशी मनाला विनाकारण विवंचना लागून राहते व त्यामुळें मनाचें स्थैर्य बिघडतें. म्हणून ते सगळे कागदपत्र आज इंद्रायणींत बुडविण्याचें मी ठरविलें आहे." हें ऐकून कान्होबा म्हणाले, "तुम्ही विरक्त झालां आहांत, तुमची गोष्ट निराळी; पण माझ्यामागें संसार लागला आहे. आपण जर घरांतले कर्जरोखे इंद्रायणींत बुडविले तर पुढें मुलांबाळांनीं काय करावें?" कान्होबांचें मनोगत ओळखून तुकोबांनीं कर्जखतांचे दोन सारखे भाग केले व त्यांतला एक भाग कान्होबांस देऊन, आपल्या वांट्याचे कागद

इंद्रायणींत बुडविले! अशा रीतीनें आपल्या मनाची रुखरुख त्यांनीं काढून टाकली! नंतर ते कान्होबांस म्हणाले, "आजपासून संसारास मी तिलांजलि दिला असून, यदृच्छेनें जें काय मिळेल, त्यावरच आमचा निर्वाह आम्ही चालविणार आहोंत. आणि अशा स्थितींत, तुझें आमचें यापुढें जमणार नाहीं. कारण तूं व्यापारउदीम करून राहणार आणि मी कांहींच उद्योग करणार नाहीं. म्हणून आपण आतां विभक्त व्हावें हें बरें." हें तुकोबांचें म्हणणें कान्होबांस पटलें व ते दोघेही बंधु लवकरच विभक्त झाले. त्या दिवसापासून बुवांनीं लौकिकाची भीति पार झुगारून दिली आणि पूर्णपणें निःसंग होऊन आणि सगळी लाजलज्जा गुंडाळून ठेवून ते मुक्तकंठानें भजन करूं लागले. अल्पाहारसेवनानें आपल्या इंद्रियांस त्यांनीं निर्बलत्व आणिलें, त्यामुळें आळस आणि निद्रा कमी झालीं. रोज पहाटे उठून स्नान करावें आणि देवळांत जाऊन पांडुरंगाची पूजा केल्यावर डोंगरावर जाऊन बसावें असा क्रम त्यांनीं सुरू केला. त्यामुळें हळूहळू त्यांची वृत्ति पालटत चालली. जन आणि विजन त्यांना समान दिसूं लागलीं. नामस्मरण हेंच ईशप्राप्तीचें मुख्य साधन त्यांनीं ठरविलें. डोंगरावर बसून आणि पांडुरंगमूर्ति ध्यानीं आणून मुक्तकंठानें देवाची करुणा भाकावी आणि संध्याकाळीं गांवांतल्या देवळांत जाऊन तेथें भजनाचा कल्लोळ करावा हा त्यांचा नित्यक्रमच होऊन बसला. त्यांचें हें वर्तन पाहून गांवांतले लोक म्हणूं लागले, "अहो, ह्या तुक्यास आतां वेड लागलेलें दिसतें." एक लब्धप्रतिष्ठित म्हणाले, "व्यापारांत खोट आली आणि बापाच्या वेळचीं खतेंपत्रें होतीं तींही यानें इंद्रायणींत बुडविलीं, तेव्हां आतां वेड न लागेल तर काय होईल?" तिसरे एक राजश्री म्हणतात, "संसार सोडला आणि हरिभक्ति केली तरी पोट कोणाला सुटलें आहे? भूक लागली म्हणजे घरोघर भीक मागावी लागते." त्यांतल्या त्यांत विचारी असलेला एक गृहस्थ म्हणाला, "तुम्ही आपला कामधंदा सोडून त्याची निंदा कां करतां? तुकोबाप्रमाणें, पुष्कळांच्या संसाराची वाताहात झाली आहे, पण त्यांतले कितीसे हरिभजनास लागले आहेत?" गांवांतील लोकांची या प्रकारची बडबड नेहमींच चालत असे, पण तुकोबांनीं तिकडे बिलकुल लक्ष दिलें नाहीं. ते पूर्ण सहनशील बनले होते, इतकेंच नव्हे तर आपले निंदक

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम ......... वि: .........



आपल्या गुणदोषांची उजळणी करून आपणास जागृत करीत असतात, हे आपल्यावर त्यांचे मोठे उपकार आहेत अशीच त्याची भावना होती. ते म्हणतात,

> निंदी कोणी मारी । वंदी कोणी पूजा करी ॥
> मज हेंही नाहीं तेंही नाहीं । वेगळा दोहींपासुनी ॥
> देहभोग भोगें घडे । जें जें जोडे तें बरें ॥
> अवघें पावे नारायणीं । जनार्दनीं तुकयाचें ॥

याच सुमारास बुवा एकदां तीर्थयात्रेस जाऊन आले असावेत असें त्यांच्या कांहीं अभंगांवरून दिसतें.

बुवा एकदां इंद्रायणीच्या कांठीं एका करंजाच्या झाडाखालीं भजन करीत बसले असतां त्यांच्याच गांवांतला एक शेतकरी त्यांजकडे येऊन त्यांस म्हणाला, "तुकोबा, येथें बसल्या बसल्या तुम्हीं या माझ्या शेताची जर राखण कराल तर मी तुम्हाला अर्धामण दाणे देईन. तुम्ही सगळा कामधंदा सोडून रिकामे घरीं बसलां आहां. अशानें कुटुंबाचा निर्वाह कसा चालेल ? म्हणून, बसल्या बसल्या येवढा तरी उद्योग करा. तुम्हांला काय, कोठें तरी हरि हरि म्हणत बसायचें, ते येथेंच बसत जा म्हणजे झालें." 'ठीक आहे' असें म्हणून बुवा तेथून निघाले आणि त्याच्या शेतांत जाऊन बसले. कोणी कांहीं काम सांगितलें तर नाहीं म्हणावयाचें नाहीं असा त्यांचा निश्चयच होता. त्या शेतकऱ्यानें त्यांच्या हातीं गोफण दिली आणि त्यांस माळ्यावर बसून पांखरें हांकण्यास सांगितलें. जातेवेळीं तो म्हणाला, "तुकोबा, शेत तुमच्या स्वाधीन केलें आहे. कापणीचा वेळ येईपर्यंत याचें रक्षण तुम्ही केलें पाहिजे. कापणी झाल्यावर कराराप्रमाणें अर्धामण धान्य मी तुम्हास देईन." इतकें बोलून तो शेतकरी आपल्या घरीं गेला आणि "शेतराखणीचें काम तुकोबांकडे सोंपविलें आहे," असें घरांतील माणसांस सांगून धान्यखरेदीसाठीं देशांतरास गेला.

इकडे माळ्यावर बसून तुकोबा शेताकडे पाहतात तों हजारों पक्षी शेतांतलें धान्य खात आहेत असें त्यांच्या दृष्टीस पडलें. तेव्हां ते मनांत म्हणाले, "हे सगळे परमेश्वराचे जीव. भुकेनें व्याकुळ झाल्यामुळें ते शेतांतलें धान्य खात आहेत. जो परमात्मा माझ्या ठिकाणीं वास करीत आहे तोच यांच्याही ठिकाणीं

वास करीत आहे. मग यांच्या खाण्यांत आपण व्यत्यय कसा आणावा बरें ?" असा विचार करून ते पक्ष्यांची मौज पहात माळ्यावर एखाद्या चित्राप्रमाणें तटस्थ बसून राहिले. आपण जर थोडीशी हालचाल केली तर पक्षी कदाचित् उडून जातील अशी त्यांना भीति वाटली. दुपार झाल्यावर ते सौम्य शब्दांनीं पक्ष्यांस म्हणाले, "आतां पोट भरलें असेल तर पाणी पिण्यास जा." इतकें बोलून ते स्वस्थ भजन करीत बसले. इकडे, तुकोबा वेळेवर घरीं आले नाहींत म्हणून त्यांची बायको जिजाई काळजी करूं लागली. ती म्हणाली—

**लज्जा अहंकार टाकोनी । उगाचि फिरतो जनीं वनीं ।**
**सोडिलें संसारासि पाणी । काय साजणी करूं आतां ॥**

मग आपली मुलगी काशी हिला हांक मारून बुवांचा शोध करण्यास तिनें सांगितलें. त्याप्रमाणें काशी इंद्रायणीवर जाऊन आली आणि तिनें आईस सांगितलें कीं, "बाबा शेताची राखण करीत बसले आहेत." मग जिजाईनें मुलीबरोबर बुवांचें जेवण पाठवून दिलें व नंतर ती स्वतः भोजनास बसली. ती इतकी कजाग होती, तरी मोठी पतिव्रता होती. नवरा जेवल्याशिवाय स्वतः अन्नग्रहण करावयाचें नाहीं असा तिचा नियम होता. ती श्रीमंताची मुलगी असल्यामुळें, आपल्या घरांतल्या अठरा विश्वे दारिद्र्यानें ती वैतागल्यासारखी झाली होती. तुकारामबुवांच्या मनःस्थितीची कल्पना तिच्यासारख्या ग्राम्य स्त्रीस कोठून होणार ? म्हणून ती जेव्हां तेव्हां चिडून आदळआपट करीत असे आणि तुकारामबुवांच्या शांतवृत्तीमुळें अधिकच वैतागून प्रसंगविशेषीं त्यांची कठोर शब्दांनीं कानउघडणीही करीत असे. परंतु नवऱ्याच्या खाण्यापिण्याची उपेक्षा तिनें कधीं केली नाहीं. उलट, बुवांचेंही जिजाईवर फार प्रेम होतें. असो.

इकडे तुकोबांचें जेवण झाल्यावर त्यांनीं असा विचार केला कीं, शेताची राखण करण्याचें काम आपण पत्करलें आहे, तर आतां रात्रंदिवस येथेंच रहावें. विनाकारण येरझारा कशाला ? असें ठरल्यावर, नित्य पहांटे उठून स्नान करून, पांडुरंगाची पूजा करावी आणि मग शेतावर येऊन भजन करीत बसावें, असा त्यांचा क्रम सुरू झाला. संध्याकाळ झाली कीं, पक्ष्यांस ते म्हणत, "उठा रे आतां; काळोख पडल्यावर तुम्हांस मार्ग दिसणार नाहीं.

उजाडलें म्हणजे परत या. शेत तुमचें आहे." पक्षी, जे काय चार दाणे खावयाचे ते येथेंच खातात, घरीं कांहीं नेत नाहींत याबद्दल बुवांस मोठें आश्चर्य वाटे; व ते देवास म्हणत, "भगवंता, या पक्ष्यांसारखी माझी स्थिति कधीं होईल?" अशा रीतीनें एक महिना गेल्यावर, शेताचा मालक गांवीं गेला होता तो परत आला आणि शेतावर जाऊन पाहतो तों एकाही कणसावर दाणा नाहीं! हें पाहतांच त्याला मोठा राग आला. तो म्हणाला, "तुक्यानें दावा साधला, आतां काय करावें?" मग माळ्यावर तुकोबा बसले होते तिकडे जाण्यास तो निघाला. त्याला पाहून सगळे पक्षी उडून गेले. तुकोबा दृष्टीस पडतांच, शेतकरी क्रोधानें संतप्त होऊन त्यांस म्हणतो, "तुक्या, तूं माझें घर कसें रे बुडविलेंस? तुला अर्धामण धान्य देण्याचें कबूल करून आणि तुजवर विश्वास ठेवून मी परगांवीं गेलों असतां तूं माझें सगळें शेत पक्ष्यांकडून खावविलेंस?" इतकें बोलून बुवांचें मनगट धरून त्यानें त्यांस खालीं ओढिलें आणि गांवचे पाटील कुळकर्णी ज्या ठिकाणीं बसले होते तेथें तो त्यांस घेऊन गेला. चावडीवर जातांच, डोकें पिटून आणि ऊर बडवून त्यानें मोठा कांगावा केला. तेव्हां पाटलानें त्याची सर्व हकीकत ऐकून घेतली, व "यावर तुमचें म्हणणें काय आहे?" असें तुकोबांस विचारिलें. तुकोबा म्हणाले, "यानें मला अर्धामण धान्य देण्याचें कबूल करून शेताची राखण करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें मीं तें काम इमानेंइतबारें करीत आहें. पक्षी शेतांत येऊन बसले तर शेताबरोबर त्यांचीही राखण मी करीत होतों." तुकोबांचें हें बोलणें ऐकून चावडीवर जमलेले सर्व लोक हांसूं लागले. तेव्हां शेतकरी संतापून म्हणाला, "तुम्ही जर हें प्रकरण थट्टेवारी नेणार असाल तर मी गांव सोडून निघून जातों. मग शेतसारा मात्र तुम्हांस भरावा लागेल." हें ऐकतांच पाटील कुळकर्णी काळजींत पडले. कुणबी पळून गेला तर त्याचा शेतसारा आपणास भरावा लागेल हें त्यांच्या लक्षांत आलें. मग त्यांनीं शेतकऱ्यास विचारलें, "तुझ्या शेतांत किती धान्य पिकतें?" शेतकरी म्हणाला, "माझ्या शेतांत दोन खंडी धान्य पिकतें." शेवटीं असें ठरलें कीं, "तुकोबांनीं ज्याअर्थी शेतांतलें धान्य पक्ष्यांकडून खावविलें त्याअर्थी शेतकऱ्याच्या नुकसानीस ते जबाबदार आहेत. शेतकऱ्याचें हें नुकसान भरून देण्यास बुवांपाशीं आज पैसा

नाहीं. तेव्हां आतां त्यांनीं तेवढ्या रकमेचें खत लिहून द्यावें." त्याप्रमाणें बुवांनीं मोठ्या खुषीनें शेतकऱ्यास खत लिहून दिलें. खत हातीं पडतांच शेतकऱ्यास मोठा आनंद झाला. मग शेत पाहण्यासाठीं ती सर्व मंडळी इंद्रायणीवर गेली. शेतावर जाऊन पाहतात तों सर्वत्र घनदाट कणसें लागलीं असून, पक्ष्यांचें तोंड लागल्याचें चिन्ह कोठेंही नाहीं! तें पाहतांच शेतकऱ्याच्या तोंडास पाणी सुटलें. तो म्हणाला, "हें खत मी तुकोबास परत देतों. शेत माझ्या स्वाधीन करा." ग्रामस्थ म्हणाले, "आम्ही जी पंचाईत केली ती कायम, ती आतां फिरणार नाहीं." मग ते तुकोबांस म्हणाले, "तूं आतां शेताची राखण करीत बैस. आणि शेताची कापणी झाल्यावर जी रास होईल तींतून याचें दोन खंडी धान्य देऊन जें बाकी उरेल तें आपल्या घरीं घेऊन जा." पण तुकोबांनीं ही त्यांची सूचना मान्य केली नाहीं. ते म्हणाले, "मी कांहींही घेतलें नसतांना मजवर येवढा आरोप आला, मग सबंध शेताची जबाबदारी घेतल्यावर काय होईल कोण जाणे!" मग गांवकऱ्यांनीं गांवांतल्याच एका मनुष्याकडे मोलानें शेत राखण्याची कामगिरी सोंपविली. शेत पिकून तयार होतांच मजुरांकडून त्याची कापणी करविली, आणि मळणी झाल्यावर धान्य मोजून पाहिलें तें १७ खंडी भरलें! सर्वांस मोठा विस्मय वाटला. असें पीक आजपर्यंत कधींच आलें नाहीं असें जो तो म्हणूं लागला. कोणी म्हणाले, "दुष्काळांत तुकोबांचे फार हाल झाले आणि त्यांच्या कुटुंबांतील माणसांस उपास पडले त्यांचें पारणें फेडण्यासाठीं पांडुरंगानेंच हा चमत्कार केला." एक दुष्ट मनुष्य म्हणाला, "अरे, कुठला आला आहे पांडुरंग! या शेतकऱ्याचें नशीब मोठें म्हणूनच हा प्रकार घडला. येरवीं, या दिवाळखोर तुक्याकडून शेवटपर्यंत याला कवडीदेखील मिळाली नसती!" कांहीं म्हणाले, "पक्ष्यांनीं दाणे खाल्ले त्यामुळें जें पुण्य झालें त्याचा हा प्रताप!" अशा रीतीनें जो तो आपलीच कल्पना बोलूं लागला! मग त्यांतलें दोन खंडी धान्य शेताच्या मालकास देऊन उरलेलें पंधरा खंडी धान्य तुकोबांस देण्यांत आलें. पण तुकोबा तें घेईनात. तेव्हां गांवचे देशपांडे महादजीपंत यांनीं तें आपल्या घरीं नेऊन ठेवलें.

---

प्रकरण ४ थें

# तुकोबा आणि जिजाई

**" बरें जालें देवा बाईल कर्कशा । बरी हे दुर्दशा जनामध्यें ॥ "**

तुकारामबुवांनीं भगवत्प्राप्तीसाठीं जरी पराकाष्ठेचे प्रयत्न चालविले होते तरी त्यांना भगवंताचा साक्षात्कार अद्याप झाला नव्हता व त्यामुळें त्यांच्या मनास सारखी तळमळ लागून राहिली होती. " पांडुरंगा, तूं मला स्वप्नांतही कसा रे दिसत नाहींस ? " अशी एका अभंगांत देवाची विनवणी त्यांनीं केली आहे. भगवंताची आपल्यावर कृपा व्हावी आणि त्याच्या दर्शनास आपण पात्र व्हावें एतदर्थ, वारंवार आत्मपरीक्षण करून, आपल्या अंगांतले दोष काढून टाकण्याचा त्यांचा प्रयत्न सारखा चालू होता. मनुष्यप्राण्यास तर काय पण कीडमुंगीसदेखील आपल्यापासून कांहीं उपसर्ग पोंचूं नये याविषयीं ते अत्यंत दक्षता बाळगीत असत. एकदां त्यांना पाहून कांहीं पक्षी उडून गेले त्याबद्दल त्यांना फार वाईट वाटलें व अद्याप आपलें मन शुद्ध झालें नाहीं या जाणीवेनें त्यांना पश्चात्ताप झाला. ते म्हणतातः—

**अवघीं भूतें साम्या आलीं । देखिलीं म्यां कैं होती ॥**
**विश्वास तो खरा मग । पांडुरंगकृपेचा ॥**
**माझी कोणी न धरो शंका । हो कां लोकां निर्द्वंद्व ॥**
**तुका म्हणे जें जें भेटे । तें तें वाटे मी ऐसें ॥**

" भूतमात्र तितकें भगवंताचें रूप आहे असें जेव्हां मला दिसूं लागेल तेव्हांच, पांडुरंगाची कृपा मजवर झाली आहे असें मी म्हणेन. मजपासून आपणास कांहीं अपाय होईल अशी शंकादेखील कोणाच्या मनांत येतां कामा नये, इतकी निर्द्वंद्व स्थिति मला प्राप्त झाली पाहिजे, आणि जो जो प्राणी माझ्या दृष्टीस पडेल तो तो मीच आहें असें मला वाटलें पाहिजे." अशी वरील अभंगांत आपली उत्कट इच्छा तुकोबांनीं व्यक्त केली आहे. भगवद्गीतेच्या १२ व्या अध्यायांतील " यस्मान्नोद्विजते लोको लोकान्नोद्विजते च यः । हर्षामर्षभयोद्वेगैर्मुक्तो यः स च मे प्रियः ॥ " या श्लोकाचें व्याख्यान करतांना ज्ञानदेव महाराजांनीं म्हटलें आहे—

" तरि सिंधूचेनि माजें । जळचरां भय नुपजे ।
आणि जळचरीं नुबगिजे । समुद्र जैसा ॥
तेविं उन्मत्तें जगें । जयासि खंती न लगे ।
आणि जयाचेनि आंगें । न शिणे लोकु ॥
किंबहुना पांडवा । शरीर जैसें अवयवां ।
तैसा नुबगे जीवां । जीवपणें जो ॥
जगचि देह जाहलें । म्हणोनि प्रियाप्रिय गेलें ।
हर्षामर्ष ठेले । दुजेनविण ॥
ऐसा द्वंद्वनिर्मुक्तु । भयोद्वेगरहितु ।
याहीवरि भक्तु । माझां ठायीं ॥ "

हें वर्णन तुकारामबुवांसारख्या सत्पुरुषांस तंतोतंत लागू पडतें. साम्यवृत्ति झाल्याशिवाय नुसतें हरिभजन व्यर्थ आहे. " याहीवरि भक्तु । माझां ठायीं " हे ज्ञानोबांचे वरील शब्द फार महत्त्वाचे आहेत. मनाची निर्द्वंद्वता ही मुख्य असून भक्ति ही गौण आहे असें सूचित करण्यासाठींच ' याहीवरि ' हा शब्द ज्ञानोबांनीं योजला आहे. नुसत्या टाळ कुटण्यानें भगवत्प्राप्ति होत असती तर सगळेच टाळकुटे तुकारामबुवा झाले असते. भक्तिमार्ग हा योगादि मार्गांपेक्षां सुलभ असला तरी सामान्य लोकांस तो जितका सुलभ वाटतो तितका सुलभ तो खास नाहीं. त्याला फार कडक पथ्य पाळावें लागतें. स्वतः तुकारामबुवाच सांगतात—

" भक्ति तों कठिण शूलावरील पोळी । निवडे तो बळी विरळा शूर ॥
जेथें पाहें तेथें देखीचा पर्वत । पायाविण भिंत तांतडीची ॥
कामावलें तरी पाका ओज घडे । रुचि आणि जोडे श्लाघ्यता हे ॥
तुका म्हणे मना पाहिजे अंकुश । नित्य नवा दिस जागृतीचा ॥ "

भक्तिमार्गाचीं हीं सगळीं कडक पथ्यें तुकारामबुवा मोठ्या कसोशीनें पाळीत होते. " सर्व सिद्धीचें कारण " जी मनाची प्रसन्नता ती संपादन करीत असतां, उपासना, भजनपूजन, कीर्तन, उपोषण इत्यादि भक्तिमार्गाचीं जीं बाह्य साधनें त्यांचेंही अवलंबन त्यांनीं केलेंच होतें. मागील प्रकरणीं सांगितल्याप्रमाणें, पंधरा खंडी धान्य आयतें घरांत चालून आलेलें असतां त्याचा स्वीकार त्यांनीं

केला नाहीं याचें कारण त्यांची निरपेक्षताच होय. लोकांस तो वेडेपणा वाटला असेल, व त्यांची पत्नी जिजाई हिच्या अंगाचा तर अगदीं तिळपापडच झाला. महीपति सांगतातः—

**घरीं कांता हळहळ करीत । म्हणे ' आलें धान्य न घेचि सत्य ।**
**संसार घातला पाण्यांत । खतेंही समस्त बुडविलीं ॥**
**लोक म्हणती पीक आलें । घरीं तों उपवासी मरती मुलें ।**
**दैवें दिधलें कर्में नेलें । तैसेंचि झालें आम्हांसी ' ॥**

आणि जिजाईची ही तक्रार अगदींच निरर्थक होती असेंही म्हणतां येत नाहीं. कारण मुद्दाम श्रम करून पोटास कांहीं तरी मिळविण्याचें तर बुवांनीं सोडिलेंच होतें, परंतु घरीं चालून आलेल्या सामग्रीचाही उपयोग ते तिला करूं देत नसत. येरवीं, पांडुरंगानें जरी त्यांना अद्याप प्रत्यक्ष दर्शन दिलें नव्हतें तरी त्यांच्या योगक्षेमाची काळजी तो वहात होता हें बुवांच्याच पुढील उद्गारांवरून सिद्ध होत आहे. ते म्हणतातः—

**" देवावरी भार । वृत्ति अयाचित सार ॥**
**देह देवाचे सांभाळी । सार योजे यथाकाळीं ॥**
**विश्वासीं निर्धार । विस्तारील विश्वंभर ॥**
**तुका म्हणे व्हावें । बळ एकचि जाणावें ॥ "**

" देवावर भार ठेवून अयाचितवृत्तीनें राहिलें असतां, देवाचे देह देव सांभाळतो, " हा आपला अनुभव त्यांनीं वरील अभंगांत व ' कांहीं पडतां जडभारी । दासें आठवावा हरि ॥ मग तो होऊं नेदी शीण । आड घाली सुदर्शन " वगैरे इतर अभंगांत स्पष्ट सांगितला आहे. पण ' सर्व सुखें घरीं चालून येत असतांही माझी फजिती कांहीं चुकत नाहीं, ' अशी जी जिजाईची कुरकुर होती तिचें कारण आपल्या घरास द्रव्याचा विटाळही होऊं द्यावयाचा नाहीं हा बुवांचा निर्धारच होय. बुवांच्या या निरपेक्षतेचा अतिरेक झाला म्हणजे जिजाईच्या संतापाचाहि अतिरेक होत असे आणि त्याच्या भरांत ती स्वतःला, नवऱ्याला आणि पोरांना कशा प्रकारचीं दुरुत्तरें बोलत असे, त्यांचा नमुना पुढील अभंगांत सांपडेलः—

" मजचि भोंवता केला येणें जोग । काय याचा भोग अंतरला ।।
चालोनियां घरा सर्व सुखें येती । माझी तों फजिती चुकेचिना ।।
कोणाची बाईल होऊनियां वोढूं । संवसारीं काढूं आपदा किती ।।
काय तरी देऊं तोडितील पोरें । मरती तरी बरें होतें आतां ।।
कांहीं नेदी वांचों धोवियेलें घर । सारवाया ढोर शेण नाहीं ।।
तुका म्हणे रांड न करितां विचार । वाहूनियां भार कुंथे माथां ।।

काय नेणों होता दावेदार मेला । वैर तो साधिला होउनि गोहो ।।
किती सर्व काळ सोसावें हें दुःख । किती लोकां मुख वासूं तरी ।।
×× आपुली आई काय माझें केलें । धड या विठ्ठलें संसाराचें ।।
तुका म्हणे येती बाईले आसडे । फुंदोनियां रडे हांसे कांहीं ।।

गोणी आली घरा । दाणे खाऊं नेदी पोरां ।।
भरी लोकांची पांटोरी । मेला चोरटा खाणोरी ।।
खवळली पिसी । हाता झोंबे जैसी लांसी ।।
तुका म्हणे खोटा । रांडे संचिताचा सांटा ।।

आतां पोरा काय खासी । गोहो जाला देवलसी ।।
डोचकें तिंबी घातल्या माळा । उदिमाचा सांडी चाळा ।।
आपल्या पोटा केली थार । आमचा नाहीं येसपार ।।
हातीं टाळ तोंड वासी । गाय देउळीं देवापासीं ।।
आतां आम्ही करूं काय । न वसे घरीं राना जाय ।।
तुका म्हणे आतां धीरी । आझुनी नाहीं झालें तरी ।।

निजों नेदी सकाळ वेळीं । राती काळीं चिनचिनी ।।
वोंगळानें घेतली पाठी । केली आटी जीवासी ।।
मेळवोनी सर्वे जन । चिंता नेणें देवळींच ।।
तुका म्हणे आलों घरा । तोंडा घोरा बाइलेच्या ।।

न करवे धंदा । आइता तोंडीं पडे लोंदा ।।
उठितें तें कुटितें टाळ । अवघा मांडिला कोल्हाळ ।।

जिवंतचि मेले । लाजा वाटोनियां प्याले ॥
संवसाराकडे । न पाहती ओस पडे ॥
तळमळती यांच्या रांडा । घालिति जीवानांत्रें धोंडा ॥
तुका म्हणे बरें जालें । घे गे बाइले लिहिलें ॥

या अभंगांवरून जिजाईचा कजागपणा जसा व्यक्त होतो त्याप्रमाणें बुवांच्या सहनशीलतेचीही कल्पना होते. शिवाय आणखी पुष्कळ गोष्टी या अभंगांवरून कळण्यासारख्या आहेत. जिजाईनें खुद्द पांडुरंगासदेखील आईमाईवरून शिव्या दिल्या आहेत यावरून ती अगदींच ग्राम्य आणि कमालीची फटकळ होती हें उघड दिसतें. तुकारामबुवांच्या घरीं कोठून तरी धान्याच्या गोण्या येत होत्या व त्यांतलें धान्य तुकोबा लोकांस पांट्या भरभरून वांटीत असत असेंही वरील अभंगांवरून दिसतें. त्याचप्रमाणें अगदीं आरंभीं तुकारामबुवांच्या वैराग्यशीलतेचा गांवांतील लोकांनीं जरी उपहास केला तरी मागाहून त्यांच्या साधुत्वाची खात्री पटतांच ते लोक त्यांच्याबरोबर देवळांत भजनास जाऊं लागले असेंही, ‘ मेळवोनी सर्वे जन ’ या शब्दांवरून दिसतें. जिजाई ही श्रीमंताची मुलगी होती हें पूर्वीं सांगितलेंच आहे. पुढें मुलेंबाळें झाल्यावर तिला एकदम अन्नान्नदशा प्राप्त झाल्यामुळें, व नवऱ्यानें संसाराचा त्याग केल्यामुळें पुढेंही आपली स्थिति सुधारण्याचा संभव नाहीं, या निराशेमुळें ती अगदीं कावून गेली. बरें, बाहेरून कोठून तरी घरांत कांहीं सामानसुमान आलें तर बुवा त्याची कशी वासलात लावीत त्याचा उल्लेख वर आलाच आहे. अशा स्थितींत तिच्यासारख्या कुणबाऊ स्त्रीच्या तोंडून याहून सुंदर भाषा कोठून येणार ? परंतु इतकें झालें तरी, तुकोबांवर तिचें निस्सीम प्रेम होतें व तुकोबांनाही ती फार प्रिय होती हें लक्षांत ठेवलें पाहिजे. जिजाई संतापून दुरुत्तरें करूं लागली म्हणजे बुवांस मोठी गंमत वाटून ते तिला उलट चिडवीत असावे असें “ तुका म्हणे येती बाईले आसडे । फुंदोनियां रडे हांसे कांहीं ” या चरणांतील हांसण्याच्या उल्लेखावरून दिसतें. येरवीं स्फुंदस्फुंदून रडतांना हांसण्याचें काय कारण ?

एकदां अशी मौज झाली कीं, जिजाई आंघोळीस बसली असतां एक गरीब स्त्री वस्त्र मागावयास तुकोबांपाशीं आली. तेव्हां जिजाईचें लुगडें बाहेर

वाळत होतें तें तिला देऊन बुवांनीं तिला लवकर निघून जाण्यास सांगितलें. इतक्यांत जिजाई येऊन पाहते तों वाळत घातलेल्या जागीं लुगडें नाहीं. म्हणून तिनें मुलांपाशीं चौकशी केली. मुलांनीं सांगितलें कीं, एक गरीब बाई आली होती तिला बाबांनीं लुगडें देऊन टाकलें. हें ऐकतांच जिजाईच्या अंगाची लाही झाली. पुढें काय होणार हें जाणून बुवा अगोदरच पळून गेले होते. नवरा कोठें दिसत नाहीं हें ऐकतांच जिजाई गरजली, " माझें लुगडें भिकारणीला देऊन मेला कोठें पळून गेला ? आतां कशाला तोंड दाखवील ? माझें एक लुगडें होतें आणि तेंही माझ्या माहेरून मला मिळालें होतें, तें यानें भिकारणीस देऊन टाकलें ! आतां मी काय नेसूं ? माझी सवत बिचारी रखमाई मरून गेली ती सुटली ! नाहीं तर तिचे अस्से हाल झाले असते !" अशा रीतीनें तिची सरबत्ती सुरू आहे तों त्याच वेळीं अगदीं नेमके, तिचे कांहीं नातेवाईक तिच्या घरीं आले आणि जिजाई कोठें आहे म्हणून चौकशी करूं लागले. जिजाई ओलें फाटकें लुगडें नेसून उभी होती तिला त्यांच्यासमोर जाण्यास लाज वाटूं लागली. पाहुणे घरांत आले तर आपल्या फजितीस पारावार नाहीं या विचारानें ती अतिशय चिंताक्रांत झाली. इतक्यांत कोठून तरी एक पीतांबर तिच्या अंगावर पडला व तो घाईघाईनें नेसून ती मोठ्या तोऱ्यानें बाहेर आली. तो पीतांबर इतका तेजस्वी होता कीं त्याच्या तेजानें पाहुण्यांचे डोळे दिपून गेले व दरिद्री तुकारामाच्या घरीं असला भारी किंमतीचा पीतांबर कोठून आला याचें त्यांना मोठें आश्चर्य वाटलें. 'भक्ता नारायण नुपेक्षी सर्वथा । कृपावंत ऐसें कळों आलें' हे तुकारामबुवांचे उद्गार अगदीं यथार्थ आहेत असेंच या प्रसंगावरून म्हणावें लागतें.

एखादे वेळीं जिजाई फारच त्रागा करूं लागली म्हणजे सौम्य शब्दांनीं बुवा तिची समजूत घालण्याचा प्रयत्न करीत. ते तिला सांगत—

" कोण घरा येतें आमुच्या कशाला । ज्याचा काय त्याला धंदा थोडा ॥
देवासाठीं जालें ब्रह्मांड सोइरें । कोमळया उत्तरें काय वेंचे ॥
मानें पाचारितां नव्हे आराणूक । ऐसे येती लोक प्रीतीसाठीं " ॥
तुका म्हणे रांडे नावडे भूषण । कांतेलेंसें श्वान लागे पाठीं ॥

नको धरूं आस व्हावें या बाळांस । निर्माण तें त्यांस त्यांचें आहे ॥
आपुला तूं गळा घेईं उगवूनी । चुकवीं जाचणी गर्भवास ॥
ऐवज देखोनी बांधितील गळा । म्हणोनी निराळा पळतसें ॥
देखोनियां त्यांचा अवघड मार । कांपे थरथर जीव माझा ॥
तुका म्हणे जरी आहे माझी चाड । तरी करीं वाड चित्त आतां ॥

भले लोक तुज बहु मानवती । वाढेल या कीर्ति जगामाजी ॥
म्हणे मेलीं गुरें भांडीं नेलीं चोरें । नाहींत लेंकुरें जालीं मज ॥
आस निरसुनी कठिन हें मन । करीं वो समान वज्र तैसें ॥
किंचित हें सुख टाकीं वो थुंकोनी । पावशील धणी परमानंद ॥

जिजाईला बुवांनीं केलेल्या या 'पूर्णबोधा'चे १२ अभंग असून त्यांत एक अभंग असा आहे:—

पिकल्या शेताचा आम्हा देतो वांटा ।
चौधरी गोमटा पांडुरंग ॥
सत्तर टक्के बाकी उरली मागे तो हा ।
मागें झडले दहा आजिवरी ॥
हांडा भांडीं गुरें दाखवी ऐवज ।
माजघरीं बाजे बैसलासे ॥
मज यासी भांडतां जाब नेदी बळें ।
म्हणे एक वेळ ध्याल वांटा ॥
तुका म्हणे स्त्रिये काय वो करावें ।
नेदितां लपावें काय कोठें ॥

असो. अशा रीतीनें जिजाईला परमार्थाचा उपदेश बुवा मधून मधून करीत असत; मात्र या उपदेशाचा जिजाईच्या मनावर कितपत परिणाम झाला होता हा प्रश्न अलाहिदा !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम श्रीतुकाराम ३६६८४ वि: ५२७
क्रमांक १२८९ नों: दि: १४-९-५४

प्रकरण ५ वें

# समाजसेवक तुकोबा

"आत्मवत् सर्व भूतानि यःपश्यति सपश्यति।"

—श्रीमद्भगवद्गीता

देहू गांवांतलें पुरातन देवालय अगदीं जीर्ण होऊन मोडकळीस आलें होतें त्याचा जीर्णोद्धार करावा असें बुवांच्या मनांत येऊन तें काम त्यांनीं हातीं घेतलें. स्वतः कुदळ घेऊन देवालयाच्या जुन्या भिंती त्यांनीं पाडून टाकल्या आणि नवीन भिंती घालण्यासाठीं माती कालवून तयार केली. परंतु एकट्याच्या हातून तें काम पुरें होण्यासारखें नव्हतें. शिवाय, लांकूडसामान, कौलें वगैरे साहित्यासाठीं पैशाची जरुरी होती. म्हणून, देवानें महादजीपंत देशपांडे यांस स्वप्नांत दृष्टांत देऊन आज्ञा केली कीं, "तुमच्यापाशीं जें पंधरा खंडी धान्य आहे तें विकून येईल तो पैसा देवळाच्या कामास लावावा." पंतांनीं ही गोष्ट गांवांतील लोकांस कळविली व त्यांच्या अनुमतानें, तुकोबांच्या मदतीस पांच मजूर व कांहीं कारागीर देण्यांत आले. थोड्याच दिवसांनीं देवळाची इमारत तयार झाली. महादजीपंतांकडील धान्य संपून गेलें. देवळाचें उद्यापन करून ब्राह्मणभोजन घालावयाचें त्यास पैसा नाहीं म्हणून बुवा काळजींत पडले. तोंच महादजीपंतांस पुनः दृष्टांत झाला कीं, "तुम्हां ग्रामस्थांकडून एक अन्याय घडला आहे. शेतकऱ्याचें दोन खंडी धान्य तुम्ही तुकोबांकडून त्यास देवविलें, परंतु शेत राखण्याबद्दल शेतकऱ्यानें तुकोबांस जें अर्धामण धान्य देण्याचें कबूल केलें होतें तें त्याजकडून तुम्ही घेतलें नाहीं. तरी त्याजकडून व्याजासह तें धान्य घ्या आणि तुकोबांस द्या." त्याप्रमाणें ग्रामस्थ लोक त्या शेतकऱ्याकडे गेले असतां त्यानेंही आपणास 'वाढीसह धान्य देण्या-विषयीं' दृष्टांत झाल्याचें कळविलें व अर्धामण धान्य वाढीसह तत्काळ त्यांच्या स्वाधीन केलें. शिवाय, गांवांतील लोकांनीं, कोणी तांदूळ, कोणी कणीक, कोणी तूप, कोणी गूळ, असें साहित्य मोठ्या आनंदानें पुरविलें व त्यामुळें उद्यापनाचा आणि ब्राह्मणभोजनाचा समारंभही मोठ्या थाटानें झाला. आपल्या हातून भगवंतानें आपल्या देवालयाचें काम पुरें करविलें याबद्दल बुवांस मोठा

आनंद झाला. पुढें त्या देवालयांत बुवा स्वतः कीर्तन करूं लागले. नामदेवांचे अभंग, कबीरांचे दोहरे, व इतर जुन्या संतांची कविता त्यांनीं पाठ केली होती तिचा उपयोग ते कीर्तनांत करीत. पुढें त्यांनीं एकनाथी भागवताची एक प्रत मिळविली व ती वाचून तिचें मनन करण्यासाठीं ते भंडारा डोंगरावर जाऊन बसूं लागले. त्याप्रमाणें ज्ञानेश्वरी, भावार्थरामायण, अमृतानुभव, योगवासिष्ठ इत्यादि ग्रंथही त्यांनीं वाचले. रामकृष्णादि अवतारी पुरुषांच्या कथा समजून घेतल्या. ज्या भंडारा डोंगरावर बुवा जाऊन बसत असत तेथें पूर्वीं पाणी नव्हतें, परंतु तेंही पुढें मोठ्या चमत्कारिक रीतीनें उत्पन्न झालें. बुवांची पत्नी जिजाई ही जरी महाभयंकर कर्कशा होती तरी बुवांचें जेवण झाल्याशिवाय ती अन्नग्रहण करीत नसे, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. ती बुवांस नित्य भाकरपाणी नेऊन देण्यासाठीं डोंगरावर जात असे. पण अशा रीतीनें रोज तीनचार कोसांचा प्रवास करतां करतां ती अगदीं कंटाळली. एके दिवशीं ती बुवांचें जेवण घेऊन डोंगरावर जाण्यास निघाली असतां, कडक उन्हानें तिचा जीव कासावीस झाला. अनवाणी असल्यामुळें तापलेले खडे पायांस बोंचतच होते. इतक्यांत आणखी एक मोठा करवंदीचा कांटा तिच्या पायांत रुतला. त्या दुःखानें तिला घेरी येऊन ती तेथेंच मूर्छित पडली. हातांतलें पाण्याचें भांडें जमिनीवर पडून सगळें पाणी वाहून गेलें! कांहीं वेळानें ती डोळे उघडून पाहते तों पायांतून रक्ताचा प्रवाह चालला आहे. तिनें पायांतला कांटा उपटून काढण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण तो कांहीं निघेना. तेव्हां ती अगदीं मेटाकुटीस येऊन मोठमोठ्यानें रडूं लागली. पण, अशा स्थितींतही देवाचें नांव तिच्या तोंडून येईना. देवाला ती वैऱ्यासमान मानीत असे. त्याला हांक मारली तर तो ‘मेला’ धावून येईल अशी तिला भीति वाटे. त्यानेंच आपल्या संसाराचें वाटोळें केलें अशी तिची अगदीं प्रामाणिक समजूत होती. आतां जर ही येथें अशीच रडत बसली तर तुकोबांस उपास पडेल या विचारानें भक्तवत्सल पांडुरंग जिजाबाईपुढें अकस्मात् येऊन उभा राहिला. अशा संकटाच्या वेळीं आपला वैरी आपल्यापुढें येऊन उभा राहिला आहे हें जिजावाईस आवडलें नाहीं. देवाच्या तोंडावर आपली नजर पडूं नये म्हणून तिनें आपलें तोंड दुसऱ्या दिशेस फिरविलें. पण तिकडेही तिला पांडुरंग दिसूं लागला. ज्या ज्या

दिशेस तिनें तोंड फिरवावें तिकडे तिकडे पांडुरंग! शेवटीं संतापून तिनें आपलें तोंड पदरानें झांकून घेतलें. तों तिच्या अंतर्दृष्टीलाही पांडुरंगच दिसूं लागला! आणि मग मात्र तिचा संताप अगदीं अनावर झाला. ती मनांत म्हणाली, "मी याची आठवणदेखील काढली नसतां हा येथें या वेळीं कशाला आला आहे? हा कोण मेला विनाकारण त्रास!" इतक्यांत पंढरीनाथानें तिच्या पाठीवरून हात फिरवून तिला म्हटलें, "आवली, तूं माझी मुलगी आहेस, असें असतां तूं मला आपला दावेदार समजतेस, याचें कारण काय बरें? मी तुझा असा कोणता दावा साधला आहे? तुझ्या नवऱ्याला मी विदेही केलें असें तुझें म्हणणें, पण खरा प्रकार निराळाच आहे. फळ देंठापासून सुटावें आणि इतक्यांत वारा येऊन तें खालीं पडावें, त्याप्रमाणें तूं आपल्या नवऱ्याच्या वैराग्याला मी कारण झालों असें समजतेस. संसारावर पाणी सोडून आणि अरण्यांत बसून त्यानें आपलें तनुमनधन मजकडेच लाविलें असल्यामुळें तुझ्याप्रमाणें मलाही त्याच्यामागून, तो जाईल तिकडे, हिंडावें लागतें. तुम्हांला खायाला अन्न नाहीं म्हणून मी शेतांत महामूर पीक आणलें, पण तें घेण्यास तुझा नवरा तयार नाहीं. हा काय माझा दोष?" इतकें बोलून भगवंतानें तिचा पाय आपल्या मांडीवर घेतला आणि पायांत रुतलेला कांटा हलक्या हातानें काढून टाकला. जिजाई सगळे क्लेश विसरली आणि घाईघाईनें तुकोबांचें जेवण घेऊन डोंगरावर गेली. भगवंतही तिच्यामागून चालत होता. त्या दोघांसही दुरून येतांना पाहून तुकोबांस मोठें आश्चर्य वाटलें. 'रजनी' आणि 'गभस्ती' किंवा 'समुद्र' आणि 'अगस्ति' यांचें हें सान्निध्य आश्चर्य वाटण्यासारखेंच होतें. बुवांनीं उठून प्रभुपदांवर मस्तक ठेवलें. नंतर ते जिजाईस म्हणाले, "भगवंतास भोजन घाल." हें ऐकतांच जिजाई लज्जायमान् झाली. कारण तिनें फक्त एकच भाकर आणली होती. मग तिनें ती सबंध भाकर देवापुढें ठेवली. तेव्हां देव म्हणाला, "जिजे, तुकोबांना जेवण दे." जिजाई पितळीवरचें वस्त्र काढून पाहते तों पितळी पक्वान्नांनीं भरलेली आहे! तिला मोठा आनंद झाला. आपल्या खंडेरायानें आणि भवानीनें आपली लाज राखली असें तिला वाटलें. जेवण झाल्यावर पाण्याची जरूरी लागली, पण त्या डोंगरावर पाणी नव्हतें. जिजाई मोठ्या विचारांत पडली. तेव्हां जवळच एका खडकाला एक खांच

होती तिजकडे बोट दाखवून पांडुरंग आवलीस म्हणाला, “ जिजाई, त्या खांचेवर दगड दिसतो आहे तो काढून टाक. तेथें खालीं पाण्याचा झरा आहे असें मला वाटतें.” आवली दगड काढून पाहते तों खरोखरच तेथें पाण्याचा झरा वाहत आहे ! पण इतकें झालें तरी हें सगळें पांडुरंगानेंच केलें असें मानावयास आवली तयार झाली नाहीं !

तुकोबांनीं संतसेवाही पुष्कळ केली. कोणी साधुसंत, हरिदास, गांवांत आले म्हणजे त्यांच्या पायांचें तीर्थ घ्यावें, कीर्तनांत त्यांच्यामागें उभें राहून ध्रुपद धरावें, केव्हां दिवटी धरून उभें रहावें, शक्य तेव्हां संतांस आपल्या घरीं नेऊन भोजन घालावें, अशी नाना प्रकारांनीं त्यांनीं साधुसंतांची सेवा केली. सगळी लाजलज्जा गुंडाळून ठेवून आणि निःसंग होऊन ते थै थै नाचत भजन करूं लागले म्हणजे श्रोत्यांची वृत्ति तदाकार होऊन, आपण स्वर्गसुखाचा अनुभव घेत आहोंत असें त्यांस वाटे. तुकारामबुवांचें कीर्तन म्हणजे प्रत्यक्ष अमृतवृष्टि होती. आपल्या कीर्तनशैलीच्या परिणामकारकतेविषयीं त्यांना किती आत्मविश्वास वाटत असे हें त्यांच्या पुढील अभंगावरून वाचकांच्या लक्षांत येईल—

**“ घोंटवीन लाळ ब्रह्मज्ञान्या हातीं । मुक्ता आत्मस्थिति सांडवीन ॥**
**ब्रह्मीभूत काया होतसे कीर्तनीं । भाग्य तरी ऋणी देवाऐसा ॥**
**तीर्थभ्रामकासी आणीन आळस । कडू स्वर्गवास करीन भोग ॥**
**सांडवीन तपोनिधा अभिमान । यज्ञ आणि दान लाजवीन ॥**
**भक्तिभाग्यप्रेमा साधीन पुरुषार्थ । ब्रह्मींचा जो अर्थ निजठेवा ॥**
**धन्य म्हणवीन येहलोकीं लोकां । भाग्य आम्ही तुका देखियेला ” ॥**

“ आम्ही तुकारामबुवांस प्रत्यक्ष पाहिलें, आमचें केवढें भाग्य ! ” असें मी लोकांकडून म्हणवीन, हे शेवटच्या चरणांतले बुवांचे उद्गार त्यांच्या आत्मविश्वासाचे द्योतक आहेत, घमेंडीचे नव्हत. “ ब्रह्मज्ञान्यालाही लाळ घोंटावयास लावणारें ” हें तुकोबांचें कीर्तन श्रवण करण्याची संधि ज्यांना मिळाली असेल, ते खरोखरच धन्य होत. खुद्द शिवाजी महाराजांसारखा महान् पुरुष बुवांच्या कीर्तनासाठीं कित्येक कोसांची मजल मारून येत

होता तो उगाच नव्हे. आपल्या कीर्तनाचें वर्णन आणखी एका अभंगांत बुवांनीं केलें आहे तें असें—

" अहो कोटी संतर्पण । पुरे एकचि कीर्तन ॥
नगरद्वारीं लाविला टिळा । दिलें अवदान सकळां ॥
श्रवणद्वारें घेती ग्रास । सदा सोवळे हरिचे दास ॥
न लगे खरकटें हात धुणें । अभेद हरीचें कीर्तन ॥
आपण जेउनि जेवविं लोकां । संतर्पण करितो तुका " ॥

भगवंताच्या ठायीं बुवांची वृत्ति इतकी तदाकार झालेली होती कीं भगवंत नेहमीं आपल्या सन्निध असतो आणि आपले सगळे व्यवहार तोच चालवितो अशी त्यांची भावना होती. ते म्हणतात—

" जेथें जातों तेथें तूं माझा सांगाती । चालविसी हातीं धरूनियां ॥
चालों वाटे आम्ही तुझाचि आधार । चालविसी भार सवें माझा ॥
बोलों जातां बरळ करिसी तें नीट । नेली लाज धीट केलों देवा ॥
अवघे जन मज जाले लोकपाळ । सोइरे सकळ प्राणसखे ॥
तुका म्हणे आतां खेळतों कौतुकें । जालें तुझें सुख अंतर्बाहीं " ॥

तुकारामबुवा धंदेवाईक हरिदास नव्हते. त्यांच्याकडे बिदागीचा प्रश्न नव्हता. कीर्तन करून पैसा मिळविणें हें महापातक आहे अशी त्यांची समजूत होती. या बाबतींत त्यांचा दंडक असा आहे—

" जेथें कीर्तन करावें । तेथें अन्न न सेवावें ॥
बुका लावूं नये भाळा । माळ घालूं नये गळां ॥
तट्टावृषभासी दाणा । तृण मागों नये कोणा ॥
तुका म्हणे द्रव्य घेती । देती तेही नरका जाती ॥ "

दुसऱ्या एका अभंगांत, कन्या, गाय, आणि हरिकथा यांची विक्री करणारास त्यांनीं 'चांडाळ' म्हटलें आहे. या बाबतींत त्यांचा येवढा कटाक्ष असण्याचें कारण हें कीं वक्ता 'आशाबद्ध' असला म्हणजे हा आतां काय मागेल कोण जाणे ही विवंचना श्रोत्यांस लागून हरिकथेकडे त्यांचें दुर्लक्ष होतें. " आशाबद्ध वक्ता । भय श्रोतियांच्या चित्ता ' ह्या अभंगांत त्यांनीं हेंच सांगितलें आहे.

शेंकडों सुशिक्षित पुरुष आणि स्त्रिया ज्यांच्या भजनीं लागलेल्या आहेत असे कांहीं अर्वाचीन संत केवढा धनसंचय करून घरेंदारें बांधीत आहेत आणि कसे चैनींत रहात आहेत हें पाहिलें म्हणजे द्रव्य मृत्तिकेसमान मानणाऱ्या तुकोबांसारख्या संतांची खरी योग्यता लक्षांत येऊन त्यांजविषयींची पूज्यबुद्धि द्विगुणित होते. ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास इत्यादि संतांच्या नांवावर आपला संसार थाटणाऱ्या या आधुनिक संतांस, खरें म्हटलें तर, त्या थोर पुरुषांच्या नांवांचाही उच्चार करण्याचा अधिकार नाहीं. आणि अत्यंत आश्चर्याची आणि दुःखाचीही गोष्ट ही कीं, ज्ञानदेव-तुकारामादि अस्सल संतांची जीवंत वाणी ग्रंथरूपानें आमच्या सुशिक्षितांस उपलब्ध असतां, त्या संतांच्या पादत्राणासही स्पर्श करण्याचा ज्यांचा अधिकार नाहीं अशा श्रीमंत साधूंचीं वेडींवांकडीं प्रवचनें ऐकण्यांत ते मोठी धन्यता मानीत असतात ! असो. मर्जी त्यांची.

तुकारामबुवा रात्रौ भजन करीत असतां, त्यांना झोंप येऊं लागली म्हणजे—

**" शेंडीस बांधूनियां दोरी । आपुल्या हातें टांगी वरी ।**
**म्हणे मानेसि आसडा बैसल्यावरी । निद्रा दुरी पळेल " ॥**

अशी युक्ति ते योजीत असत. बुवांच्या परोपकारशीलतेचेंही मोठें रसभरित वर्णन महीपतिबुवांनीं केलें आहे. रस्त्यांत कोणा पांथस्थाची गांठ पडली तर त्याला विसांवा देण्यासाठीं त्याचें ओझें बुवांनीं आपल्या पाठीवर वाहावें. गांवांत आलेले कोणी वाटसरू पावसांत सांपडले तर त्यांना त्यांनीं चात्रडीवर नेऊन पोंचवावें किंवा आपल्या घरीं न्यावें. कोणा यात्रेकरूचे प्रवासामुळें पाय सुजले तर त्यांना तेल लावून ऊन पाण्यानें ते शेकावे. कोणी निर्दय लोकांनीं निकामी झालेले गाईबैल सोडून दिले तर बुवांनीं त्यांना चारापाणी घालून कुरवाळावें. सर्व भूतें एकाच भगवंताचीं स्वरूपें आहेत ही त्यांची भावना इतकी दृढ झाली होती कीं "कोण्याहीं जीवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वरपूजनाचें ॥" हें साधुत्वाचें मुख्य साधनच त्यांनीं ठरविलें होतें. उन्हाळ्यांत कीर्तनाचे वेळीं उष्मा होऊं लागला तर हातांत पंखा घेऊन ते लोकांस वारा घालीत. कोणी दुर्दैवी मनुष्य अन्नाविणें उपाशी मरत आहे असें आढळलें तर हरप्रयत्न करून बुवा त्याला अन्न देत. आणखी—

उष्णकाळीं जीवन वाटेवर । नसतां उपाय करितसे थोर ।
घागर भरोनी सत्वर । मार्गावर ने तेथें ॥
वाचातप हेंचि थोर । असत्य न बोले सर्वथा उत्तर ।
परोपकारीं वेंची शरीर । आळस अणुमात्र असेना ॥
पांथस्थांसी व्याधी मार्गीं होत । जवळी नसतां सुहृदआप्त ।
तयांसी राहवोनी देउळांत । औषध पथ्य करवीतसे ॥

एकंदरींत, तुकारामबुवा हे देहू गांवांतले एक ‘समाजसेवकच’ होते असें म्हणण्यास हरकत नाहीं. मात्र त्यांची समाजसेवा मनुष्यजातीपुरतीच मर्यादित झालेली नसून, कीडमुंगीपासून मनुष्यापर्यंत त्यांचें समाजक्षेत्र विस्तृत होतें. गाईबैल निरुपयोगी झाले म्हणजे त्यांना मारून टाकावें, हें अर्वाचीन अर्थशास्त्र तर काय, पण कोणतेंच ‘अर्थ’ शास्त्र त्यांना ठाऊक नव्हतें. आपला जीव तसा दुसऱ्याचा जीव, आपणास जशा सुखदुःखाच्या संवेदना होतात तशा इतर प्राण्यांसही होतात, काम करून करून निरुपयोगी झालेल्या मनुष्यास जसा जगण्याचा हक्क आहे तसाच तो जनावरांसही आहे, कारण दोघांनाही एकाच भगवंतानें उत्पन्न केलेलें आहे, अशी या बाबतींत, तुकारामबुवांची व एकनाथादि इतर संतांची विचारसरणी होती. आणि त्याप्रमाणें त्यांचें वर्तनही होतें. त्यांच्या या भूतदयेमुळेंच त्यांना ईशप्राप्ति झाली हें जर खरें असेल तर याविरुद्ध ज्यांची विचारसरणी आणि वर्तन असेल ते ईश्वरापासून फार दूर आहेत असें समजण्यास हरकत नाहीं.

बुवा एकदां इंद्रायणीच्या तीरावर भजन करीत बसले असतां, कांहीं लोक नवलाख्याच्या उंचबाऱ्यास व्यापारासाठीं चालले होते. ते बुवांस थट्टेनें म्हणाले, “तुकोबा, आमच्याबरोबर बाजारास येतां का?” बुवा म्हणाले “अवश्य,” आणि ते त्यांजबरोबर चालूं लागले. वाटेंत त्यांना एक वृद्ध ब्राह्मणस्त्री भेटली, ती काठी टेंकीत हळूहळू चालली होती. तुकोबा तिला म्हणाले, “आई, तुम्ही फार थकलेल्या दिसतां, तर माझ्या पाठीवर बसा. मी तुम्हाला बाजारास घेऊन जातों.” बाई म्हणाली, “मी तेल आणावयास बाजारांत चालल्यें आहें, तें तेल जर तूं बाजारांतून घेऊन येत असलास तर मी परत जात्यें.” तुकोबा म्हणाले, ‘ठीक आहे, मी तुमचें तेल आणतों.’ बाईनें

तुकोबांपाशीं पैसे आणि तेलाचें भांडें दिलें व ती परत देहूस गेली. दुसरे दिवशीं तुकोबांनीं तिला तेल आणून दिलें, तेव्हां ती म्हणाली, "तुक्या, तुझे मजवर मोठे उपकार झाले आहेत, पण तुला द्यायला मजपाशीं कांहींच नाहीं." पुढें तिला असें आढळून आलें कीं, आठ दिवस पुरेल इतकें तेल आणलें होतें तें पंधरा दिवस पुरलें. मग ही गोष्ट तिनें आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांस सांगितली व त्यांच्या तोंडून ती सर्वतोमुखीं झाली. मग काय विचारतां, जो तो तुकोबांस आपलें तेल आणावयास सांगूं लागला! 'आज्ञा मायबाप,' असें म्हणून आणि तेलाचीं नळकांडीं गळ्यांत अडकवून बुवा पुनः बाजारास जाण्यास निघाले! बुवांच्या गळ्यांत एक पिशवी होती तींत लोकांनीं आपापले पैसे टाकले. वाटेवरील गांवांतल्या लोकांस हें वर्तमान समजतांच त्यांनींही आपापलीं नळकांडीं आणून त्यांच्या गळ्यांत अडकवलीं आणि पैसे पिशवींत टाकून त्यांचें तेल आणावयास सांगितलें. बुवा भजन करीत करीत बाजारांत गेले आणि तेल्याचें दुकान पाहून तीं सगळीं नळकांडीं आणि पैसे त्यांनीं तेल्याच्या स्वाधीन केले. तेल्यानें विचारलें, "तुकोबा, कोणत्या भांड्यांत किती पैशांचें तेल घालूं?" बुवा म्हणाले, "तें मला विचारूं नकोस, तुला जसें योग्य वाटेल तसें कर!" इतक्यांत बाजारास आलेल्या कांहीं व्यापाऱ्यांनीं बुवांस हांक मारून आपलीं पालें उभारण्यास सांगितलें. कोणास 'नाहीं' म्हणावयाचें नाहीं हें बुवांचें ब्रीदच असल्यामुळें ते व्यापाऱ्यांस मदत करण्यास गेले. त्यांनीं त्यांचीं पालें उभारलीं, जमीन साफ केली आणि त्यांच्या जनावरांस चारापाणी दिलें. रात्रौ तेथील देवळांत बुवांचें कीर्तन झालें. दुसरे दिवशीं सकाळीं व्यापारी आपापल्या गांवीं परत जाण्यास निघाले तेव्हां त्यांचीं ओझीं वगैरे बांधून तीं बैलांच्या पाठीवर चढविण्यास बुवांनीं मदत केली. नंतर ते तेल्याकडे गेले. तो म्हणाला, "सर्व भांड्यांत सारखें तेल घातलें आहे." "ठीक केलेंस," असें म्हणून तीं सगळीं नळकांडीं गळ्यांत अडकवून बुवा देहूस जाण्यास निघाले. वाटेवरील गांवांतील लोकांनीं आपापलीं नळकांडीं त्यांजकडून घेतलीं, त्यामुळें तेवढें ओझें कमी झालें. पुढें, प्रत्येकास असें आढळून आलें कीं, आपण जेवढे पैसे दिले होते तेवढ्याचेंच

तेल आपल्या भांड्यांत मोजून घातलेलें आहे! वस्तुस्थिति काय होती हें पूर्वी सांगितलेंच आहे.

आपल्या नवऱ्याला लोकांनीं आपल्या तेलाचीं ओझीं वहावयास लावलें हें आवलीस समजतांच लोकांची तिनें जी काय खरडपट्टी काढली ती विचारूं नका. ती म्हणाली, "या मेल्यांना काय धाड भरली आहे आपलें तेल आणायला! यांचे पाय काय मोडले आहेत? माझा नवरा वेडा झाला आहे म्हणून या हरामखोरांनीं त्याजकडून फुकटच्या फाकट आपलीं कामें करून घ्यावीं कीं काय? एका बैलाचें ओझें या मेल्यांनीं माझ्या नवऱ्याच्या पाठीवर लादलें, त्यामुळें तो मेला असता तर?" अशा रीतीनें सगळ्या गांवाचा जेव्हां ती उद्धार करूं लागली तेव्हां एकानें तिला विचारलें, "आवले, तुझा नवरा जर लोकांचीं कामें न ऐकता तर लोकांनीं तीं त्याला कशाला सांगितलीं असतीं? आपला दाम खोटा, मग लोकांना शिव्या देण्यांत अर्थ काय?" आवली म्हणाली, "खरें आहे; माझेंच नशीब फुटकें, त्याला कोण काय करणार?"

एके दिवशीं तुकोबांच्या वडिलांची श्राद्धतिथि होती, तेव्हां त्यांची पत्नी त्यांस म्हणाली, "घरांत कांहींच साहित्य नाहीं, आतां श्राद्ध कसें घालणार?" तुकोबा म्हणाले, "मी रानांत जाऊन कसली तरी भाजी घेऊन येतों, ती शिजवून पितरांस घाल." इतकें बोलून ते रानांत जाण्यास निघाले. वाटेंत कांहीं शेतकरी गहूं उपटीत होते ते तुकोबांस म्हणाले, "आम्हांला जरा गहूं उपटण्यास मदत कर." "करतों" असें म्हणून बुवा त्यांजबरोबर गहूं उपटूं लागले. तोंडानें नामस्मरण चाललेंच होतें. आपण भाजी आणावयास रानांत चाललों होतों, याची त्यांना आठवणही राहिली नाहीं. इकडे, नवरा अद्याप घरीं येत नाहीं म्हणून आवलीनें शिव्यांचा वर्षाव सुरू केला. ती बडबडूं लागली, "मी कोणाची बायको होऊन पोरांना अन्नवस्त्र पुरवूं? घरीं पितर सांगितलेले असतां हा आपला खुशाल रानावनांत हिंडत आहे! लोकांचीं कामें करावयास त्याला वाटेल तेवढा वेळ मिळतो, आणि घरच्या कामास असा चुकारपणा!"

हळुहळू जेवणाची वेळ जवळ येत चालली. पितर आतां जेवावयास येतील त्यांच्यापुढें काय ठेवावें या विवंचनेनें आवली अगदीं वैतागून गेली. इतक्यांत असा

चमत्कार झाला कीं तुकारामाचें रूप धारण करून पांडुरंग त्या ठिकाणीं प्रगट झाला. डोक्यावरून त्यानें सामानाचें ओझें आणलें होतें. सामान खालीं उतरून तो आवलीस म्हणाला, "हें सामान घे आणि लवकर स्वयंपाक कर. तोंपर्यंत मी बाहेर जाऊन कोणाकडून तरी चार भांडीं मागून आणतों." इतकें बोलून देव तेथून निघून गेला. आवलीनें मोट सोडून पाहिली तों त्यांत सर्व प्रकारचें साहित्य आहे असें तिला आढळून आलें. साहित्य पाहून तिला मोठें नवल वाटलें, परंतु विशेष विचार करण्यास अवधि नसल्यामुळें ती घाईघाईनें स्वयंपाकाच्या कामास लागली. इकडे, देवानें घरोघर जाऊन सर्व लोकांस जेवणाचें आमंत्रण दिलें. तें पाहून त्यांनाही आश्चर्य वाटलें. तुकोबा आतां पुनः संसारांत मन घालूं लागले असावे, अशी त्यांची समजूत झाली. कोणी म्हणाले, "पण हें आमंत्रण खरें कशावरून? याच्या घरांत तर उंदीर शेपट्या बडवताहेत!" असो. जेवणाची वेळ झाली. आवलीचा सैंपाकही तयार झाला. लोक इंद्रायणीवर स्नान करून आले. तेव्हां तुकारामवेषधारी पांडुरंगानें त्यांची यथाविधि पूजा करून त्यांच्या कपाळीं बुका लावला आणि गळ्यांत तुळसीमाळा घातल्या. नंतर आवलीनें पानें वाढलीं. अन्नशुद्धि झाल्यावर देवानें संकल्प सोडला. सर्व लोक पोटभर जेवून तृप्त झाले. करशुद्धि झाल्यावर देवानें त्यांस विडे आणि दक्षिणा दिली. लोक फार संतुष्ट झाले. मग ते आवलीस म्हणाले, "आवले, आतां तुला संसाराची चिंता करावयास नको. तुकोबा पुनः संसारांत मन घालूं लागले असें दिसतें." आवली म्हणाली, "तुम्ही सांगतां खरें, पण मला यांचा विश्वास नाहीं." कांहीं वेळानें सर्व लोक घरोघर निघून गेले. गांवांतले गरीब महार वगैरे अन्न मागावयास आले त्यांस आवलीनें भरपूर अन्न दिलें. नंतर देव आवलीस म्हणाला, "लोकांचीं भांडीं गोळा करून आणलीं आहेत तीं ज्यांचीं त्यांस परत नेऊन देतों, व मग सावकाश येऊन जेऊं." इतकें बोलून देवानें इंद्रायणीवर जाऊन भांडीं घांसून स्वच्छ केलीं आणि तीं ज्यांचीं त्यांस नेऊन देऊन तो गुप्त झाला.

इकडे तुकारामबुवांचें गहूं उपटण्याचें काम चाललेंच होतें. त्यांना घरच्या श्राद्धाचीदेखील आठवण नाहीं, तेथें स्वतःच्या जेवणाची गोष्ट काय विचारतां? गहूं उपटून झाल्यावर शेताच्या मालकानें त्यांना चार गव्हांच्या पेंढ्या दिल्या,

त्या डोक्यावर घेऊन ते घरीं येण्यास निघाले. वाटेंत, त्यांच्या डोक्यावरील पेंढ्या एका मधमाशांच्या मोहळास लागल्या त्याबरोबर त्या सगळ्या माशांनीं त्यांजवर हल्ला करून त्यांना अगदीं जर्जर करून सोडलें. परंतु त्यांनीं माशांना हांकून लावण्याचा प्रयत्न बिलकुल केला नाहीं. त्यांच्या दंशामुळें झालेल्या वेदना निमूटपणें सोसल्या. ते मनांत म्हणाले, "आज आमच्या वडिलांची पुण्यतिथि, पण ती साजरी होण्याचें कांहीं चिन्ह दिसेना, म्हणून हे आमचे पितरच ह्या मधमाशांच्या रूपानें आले असावे." थोड्या वेळानें ते घरीं येऊन आवलीस म्हणाले, "ह्या चार गव्हांच्या लोंब्या मी आणल्या आहेत, त्यांतले गहूं काढून त्यांचा सांजा कर आणि पितरांना भोजन घाल." आवली हंसून म्हणाली, "माझी थट्टा करतां कीं काय? तुम्हीच तर सर्व साहित्य आणून दिलें आणि त्याचा स्वयंपाक करून सर्व लोकांस आपण जेवणदेखील घातलें. तुम्हीच संकल्प सोडला; तुम्हींच त्यांना विडे दक्षिणा दिली, आणि लोकांचीं भांडीं पोंचवून येतों असें सांगून तुम्ही गेलां. आणि आतां हें काय बोलतां? तुम्हांला वेड तर नाहीं लागलें?" आवलीचें हें भाषण ऐकतांच तुकारामाचा कंठ सद्गदित होऊन त्यांच्या नेत्रांतून अश्रूंच्या धारा वाहूं लागल्या. आपली लाज राखण्यासाठीं त्या भक्तवत्सल पांडुरंगानेंच हें नाटक केलें व आपल्यासाठीं त्याला येवढी तसदी पडली हें त्यांच्या लक्षांत येऊन त्यांना फार वाईट वाटलें. त्यांनीं मोठ्या कृतज्ञतेनें पांडुरंगाची मनोमय पूजा केली.

तुकारामबावांनीं आपल्या देहू गांवाचें एका अभंगांत सुंदर वर्णन केलें आहे, तो अभंग असा—

"धन्य देहू गांव पुण्यभूमी ठाव। तेथें नांदे देव पांडुरंग॥
धन्य क्षेत्रवासी लोक ते दैवाचे। उच्चारिती वाचे नामघोष॥
कर कटीं उभा विश्वाचा जनिता। वामांगीं ते माता रखुमादेवी॥
गरुडपारीं उभा जोडोनियां कर। अश्वत्थ समोर उत्तरमुख॥
दक्षिणे शंकर लिंग हरेश्वर। शोभे गंगातीर इंद्रायणी॥
लक्ष्मीनारायण बल्लाळाचें वन। तेथें अधिष्ठान सिद्धेश्वर॥
विघ्नेराज द्वारीं बहिरव बाहेरी। हनुमंत शेजारीं सहित दोघे॥
तेथें दास तुका करितो कीर्तन। हृदयीं चरण विठोबाचे॥

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
गुरूपदेश आणि कवित्वस्फूर्ति
अनुक्रम...... दि: ......
...... नों. दि: ......७८-९-५५

# गुरूपदेश आणि कवित्वस्फूर्ति

" माझिये मनींचा जाणोनियां भाव । तो करी उपाव गुरुराजा ॥
आवडीचा मंत्र सांगितला सोपा । जेणें नव्हे गुंफा कांहीं कोठें ॥ "

उत्तरवयांत तुकारामबुवा आषाढी आणि कार्तिकी एकादशीस पंढरीची वारी नियमानें करीत असत आणि तीही अनवाणी चालून. शिवाय परोपकारार्थ ते आपला देह कसा झिजवीत असत हें मागील प्रकरणीं सांगितलेंच आहे. अशा रीतीनें बुवांना मोठें कायिक तप घडलें. सत्य भाषण आणि नामस्मरण यांमुळें त्यांना वाचिक तप घडलें. आणि मनाच्या समतेमुळें मानसिक तप घडलें. त्यामुळें मनाची प्रसन्नता वाढून त्यांचें ' अनंताशीं साधर्म्य ' होत चाललें. अशा रीतीनें त्यांची मनोभूमिका पूर्णपणें अनुग्रहक्षम झाल्यावर एके रात्रीं स्वप्नांत बाबाजी नामक सत्पुरुषानें त्यांजवर अनुग्रह करून ' राम कृष्ण हरि ' हा मंत्र सांगितला. ही गोष्ट कधीं घडली हें तुकोबांनींच पुढील अभंगांत सांगितलें आहे :—

" सद्गुरुरायें कृपा मज केली । परि नाहीं घडली सेवा कांहीं ॥
सांपडविलें वाटे जातां गंगास्नाना । मस्तकीं तो जाणा ठेविला कर ॥
भोजना मागती तूप पावशेर । पडिला विसर स्वप्नामाजी ॥
कांहीं कळे उपजला अंतराये । म्हणउनि काये त्वरा जाली ॥
राघवचैतन्य केशवचैतन्य । सांगितली खूण माळिकेची ॥
बाबाजी आपुलें सांगितलें नाम । मंत्र दिला राम कृष्ण हरि ॥
माहो शुद्ध दशमी पाहूनि गुरुवार । केला अंगीकार तुका म्हणे " ॥

या ' बाबाजी ' च्या नांवाचा उल्लेख तुकोबांनीं इतरत्रही केला आहे. आतां या माहितीवरून तीन प्रश्न उद्भवतात ते असेः—( १ ) बुवांस स्वप्नांत गुरूपदेश कसा व कां झाला ? ( २ ) हे बाबाजी कोण ? आणि ( ३ ) ही गोष्ट कोणत्या वर्षी घडली असावी ? ह्या तीन्ही प्रश्नांचा आतां यथामति विचार करूं. तुकारामबुवांस ' बाबाजी ' नामक सत्पुरुषांनीं आपण होऊन स्वप्नांत उपदेश

दिला याचें कारण बुवांची मनोभूमिका उपदेशग्रहणास पूर्णपणें पात्र झालेली होती हें होय. उपवर मुलीला एखादा प्रियकर जसा आपोआप मिळावा त्याप्रमाणें परमार्थोन्मुख मनुष्याची मुमुक्षावस्था परिणत होतांच त्याला गुरूही आपो-आपच मिळतो. त्याला गुरूचा शोध करीत फिरावें लागत नाहीं, तर गुरूच त्याला शोधीत येतो. इतर संतांच्या बाबतींतही अशीं उदाहरणें घडल्याचा दाखला आहे. प्रसिद्ध मराठी कवि वामन यांना मलयाचलावर सच्चिदानंद नामक यतींनीं व सोहिरोबानाथ आंबिये यांना ते प्रवासांत असतांना अरण्यांत गैबीनाथ नामक सिद्ध पुरुषांनीं, अकस्मात् प्रगट होऊन उपदेश दिल्याच्या कथा प्रसिद्ध आहेत; व खुद्द तुकारामबुवा स्वर्गस्थ झाल्यावर त्यांनींही कचेश्वर आणि महीपति यांस स्वप्नांत दृष्टांत दिल्याचा उल्लेख त्या दोन्ही सत्पुरुषांनीं आपल्या कवितेंत केलेला आहे. 'स्वानुभवदिनकर'कर्ते दिनकरबुवा रामदासी यांनाही स्वप्नांतच समर्थांचा उपदेश झाला. अशा स्थितींत, तुकोबांस स्वप्नांत गुरूप-देश झाला यांत कांहीं आश्चर्य नाहीं. आतां, बुवांचे गुरु बाबाजी हे कोण व ते कोणत्या कालीं आणि स्थळीं होऊन गेले हें पाहूं. तुकारामचरित्रकार व तुका-रामशिष्य महीपतिबावा यांचा यासंबंधानें एक अभंग प्रसिद्ध आहे तो असा:—

"बाबाजी चैतन्य योगिराज धन्य। तुकयालागून प्रगटले ॥
शालिवाहन शके चौदाशें त्र्याण्णव। प्रजापतिनाम संवत्सरीं ॥
वैशाख वद्य द्वादशीचे दिनीं। समाधि स्वामींनीं घेतलीसे ॥
तेथून तीस वर्षां भेटी तुकयासी। देऊनि तयासी पूर्णपण ॥
महीपति म्हणे जाले समाधिस्थ। तुकया क्रीडत ब्रह्मानंदें" ॥

राघवचैतन्य, केशवचैतन्य वगैरे चैतन्य सांप्रदायी सत्पुरुषांचा वृत्तांत 'निरंजन' नामक एका पुरुषानें 'चैतन्यकथाकल्पतरु' नामक ओवीबद्ध ग्रंथांत दिला आहे. हा ग्रंथ शके १७०९ त लिहिलेला आहे; व तोही 'कृष्णदास बैरागी' नामक एका पूर्वकालीन लेखकानें शके १५९९ त लिहिलेल्या एका जुन्या ग्रंथाच्या आधारें लिहिला आहे. 'चैतन्यकथाकल्पतरु' ग्रंथांत तुकोबांची गुरुपरंपरा, श्रीविष्णु–ब्रह्मदेव – नारद – व्यास – राघवचैतन्य – केशवचैतन्य ऊर्फ बाबाजी–तुकाराम, अशी दिली आहे. राघवचैतन्य हे मोठे अधिकारी पुरुष

शालिवाहन शकाच्या १५ व्या शतकांत होऊन गेले. त्यांच्यासंबंधाची विस्तृत माहिती जर कोणास पाहिजे असेल तर त्याला ती 'चैतन्यकथाकल्पतरु' या ग्रंथांत मिळेल. ग्रंथ छापून प्रसिद्ध झालेला आहे.

उपरिनिर्दिष्ट केशवचैतन्य यांचेंच दुसरें नांव 'बाबाजी' होतें व तेच तुकारामबुवांचे गुरु असें वरील ग्रंथांत म्हटलें आहे. त्यांनीं, पुणें जिल्ह्यांत ओतूर येथें शके १४९३, प्रजापति संवत्सर, वैशाख शुद्ध १२ या दिवशीं समाधि घेतली. हे विद्यमान असतांना व समाधिस्थ झाल्यावरही यांनीं अनेक चमत्कार केले, ते वरील ग्रंथांत वर्णिले आहेत. येथें एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे ती ही कीं, तुकोबांच्या घराण्यांतील पुरुषांनीं लिहून ठेवलेल्या वाडांत केशवचैतन्य आणि बाबाजी चैतन्य हे दोन निरनिराळे पुरुष असून, बाबाजी चैतन्य हे केशवचैतन्याचे शिष्य असें म्हटलें आहे. खरा प्रकार काय असावा हें समजण्यास कांहींच मार्ग नाहीं. केशवचैतन्य ऊर्फ बाबाजी यांनीं किंवा केशवचैतन्याचे शिष्य बाबाजी यांनीं तुकोबांस स्वप्नांत अनुग्रह दिला हाही एक चमत्कारच होय, आणि खुद्द तुकोबांनींच असंदिग्ध रीतीनें त्याचा निर्देश केलेला असल्यामुळें तो विश्वसनीय मानल्याशिवाय गत्यंतर नाहीं. आतां हा उपदेश बुवांस कोणत्या वर्षीं झाला हा एकच प्रश्न शिल्लक राहतो व त्याचीं उत्तरें निरनिराळ्या लेखकांनीं निरनिराळीं दिलीं आहेत. 'चैतन्यकथाकल्पतरु' ग्रंथांतली एतद्विषयक माहिती तर अगदींच निराधार दिसते. एकंदर पुराव्याचा आणि शक्याशक्यतेचा विचार करितां, मला असें वाटतें कीं बुवांच्या ३० व्या आणि ३५ व्या वर्षांच्या दरम्यान कोणत्या तरी वर्षीं हा अनुग्रह त्यांना झाला असावा. ह. भ. प. पांगारकर यांनीं, माघ शुद्ध १० गुरुवार शके १५५४ हा उपदेशकाल दिला आहे. 'चैतन्यकथाकल्पतरु' ग्रंथांत दिलेली बुवांची गुरुपरंपरा, आणि बुवांच्या परंपरेंतले निळोबा, बहिणाबाई, आणि महीपति यांनीं दिलेल्या गुरु-परंपरा यांपैकीं एकीचा एकीशीं मेळ नाहीं! सगळा घोंटाळा आहे. परंतु तुकारामबुवांच्या चरित्रांत या परंपरांचें फारसें महत्त्व नसल्यामुळें, यासंबंधानें मी येथें विशेष विस्तार करीत नाहीं. तुकारामबुवांच्या ३०-३५ व्या वर्षीं, चैतन्य-परंपरेंतल्या बाबाजी चैतन्य नामक मृत सत्पुरुषानें तुकोबांस स्वप्नांत दृष्टांत

देऊन ‘ रामकृष्ण हरि ’ हा षडक्षरी मंत्र सांगितला, आणि तोच उपदेश असें समजून तुकोबा हे बाबाजींस आपले गुरु मानूं लागले हा यांतला निष्कर्ष वाचकांनीं लक्षांत ठेवावा म्हणजे झालें. ‘ मानियेला स्वप्नीं गुरूचा उपदेश ’ असें बुवांनीं म्हटलें आहे यावरून, आतां आणखी दुसरा गुरु करण्याची आपणास आवश्यकता नाहीं, असेंच सूचित करण्याचा त्यांचा उद्देश दिसतो. इतर कांहीं संतांनीं गुरूचें जेवढें महत्त्व वर्णिलें आहे तेवढें तुकोबांनीं वर्णिलेलें नाहीं. ‘ सद्गुरूवांचोनी सांपडेना सोय ’ हा तुकोबांच्या नांवावर प्रसिद्ध असलेला अभंग कीर्तनांत वरचेवर ऐकूं येतो खरा, परंतु हा अभंग बुवांच्या कोणत्याही सांप्रदायी गाथ्यांत सांपडत नाहीं. तथापि, यावरून, तो त्यांचा अभंग नसेलच असें मात्र माझें म्हणणें नाहीं.

सद्गुरु बाबाजी चैतन्य यांनीं तुकोबांस सांगितलेला ‘ रामकृष्ण हरि ’ हा मंत्र वारकरी पंथांत फार जुन्या काळापासून चालत आलेला आहे. निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान यांच्या अभंगांत या नामांचा उल्लेख अनेक ठिकाणीं आला आहे. वारकरी संप्रदायांत हरिनामस्मरणाचेंच माहात्म्य विशेष असल्यामुळें त्या संप्रदायाच्या भजनास “ जय जय रामकृष्ण हरि ” या नामोच्चारापासूनच मुळीं प्रारंभ होतो.

तुकारामबुवांस गुरूपदेश झाला त्याच सुमारास त्यांना काव्यस्फूर्तीही झाली. ‘ बालक्रीडेचे अभंग ’ ही त्यांची पहिली काव्यरचना होय, असें महीपतिबुवा सांगतात. बुवांस काव्यस्फूर्ति झाली तेव्हांपासून त्यांच्या समाधिकालापर्यंत त्यांची अभंगरचना सारखी सुरू होती व तेवढ्या कालांत त्यांनीं सुमारें १०,००० अभंग रचिले असावेत. बुवांच्या कवित्वासंबंधानें एक स्वतंत्र प्रकरणच पुढें लिहावयाचें असल्यामुळें येथें त्याविषयीं विशेष कांहीं लिहीत नाहीं.

प्रकरण ७ वें

# मंबाजी आणि तुकाराम

दुर्जनाची जाती । त्याचे तोंडीं पडो माती ।।
त्याची बुद्धि त्यासी नाडी । वाचे अनुचित बडबडी ।।
पाहे संतांकडे । दोषदृष्टी, सांडी भडे ।।
उंच नीच कांहीं । तुका म्हणे खळा नाहीं ।।

देहू येथील पांडुरंगाच्या देवालयांत तुकोबांचें नित्य कीर्तन होत असे व शेंकडों भाविक लोक कीर्तनास येत असत. बुवांच्या काव्यस्फूर्तीचा प्रवाह येवढा दांडगा असे कीं ते कीर्तन करतां करतां तेथल्या तेथें भराभर अभंग रचून त्यांवर निरूपण करीत असत. आरंभीं आरंभीं लोकांनीं त्यांचा उपहास केला, परंतु पुढें त्यांच्या साधुत्वाविषयीं जेव्हां त्यांची पूर्ण खात्री झाली तेव्हां तेच लोक त्यांच्या भजनीं लागले. बुवांच्या कीर्तनशैलीचें वर्णन करतांना महीपति म्हणतात :—

जैसा मेघ वर्षतां साचार । अगणित उठती तृणांकुर ।
कां सागरीं तरंग येती अपार । संख्या न करवे तयांची ।।
तैशाचपरी तुकयाप्रती । कीर्तनीं अनेक शब्द स्फुरती ।
संशय न राहे कोणाप्रती । खळ तेही होती भाविक ।।

तात्पर्य, बुवांची कीर्ति वाढत चालली आणि साधु या नात्यानें बहुजनसमाज त्यांना मोठा मान देऊं लागला.

त्या वेळीं मंबाजी या नांवाचा एक ब्राह्मण चिंचवड येथें कांहीं दिवस रहात होता तो पुढें गोसावी होऊन देहूस येऊन मठ बांधून राहिला. त्याची शिष्य-मंडळीही बरीच होती व त्यांजकडून मिळणाऱ्या द्रव्यावर त्याचा योगक्षेम चालत असे. 'महापुरुष मंबाजी गोसावी' या नांवानें तो प्रसिद्ध होता. तुकारामबुवांची प्रतिष्ठा वाढत चाललेली पाहून मंबाजी त्यांचा द्वेष करूं लागला. एकाच गांवांत, आपण महंत आणि तुकाराम संत अशी जोडी असणें म्हणजे एका म्यानांत दोन

तलवारी घुसडण्यासारखें आहे असें त्याला वाटलें. त्याची तक्रार ही होती कीं " या तुक्यानें आमच्या डोळयांदेखत जुन्या कवींची कविता पाठ केली आणि ती म्हणून हा कीर्तन करूं लागला. असें असतां लोक इतके मूर्ख कीं ते याच्या भजनीं लागतात. आणि माझ्यासारख्या महापुरुषास कोणी विचारीत नाहीं. श्रेष्ठ वर्णाचे ब्राह्मणदेखील या तुक्याच्या पायां पडूं लागले! हा जातीचा शूद्र, आणि मी ब्राह्मण, पण याची प्रतिष्ठा मोठी आणि माझी कांहीं किंमत नाहीं! ठीक आहे म्हणावें, नांवाचा मंबाजी असेन तर याचा सूड उगवल्यावांचून राहणार नाहीं. "

मंबाजी तुकोबांचा भयंकर द्वेष करीत असे. तरीही तो लौकिकार्थ बुवांच्या कीर्तनाला जाऊन बसत असे. देवालयाच्या मागें दक्षिणेच्या बाजूस थोडी जागा होती तेथें मंबाजीनें कांहीं झाडें लावलीं होतीं व त्यांच्या जोपासनेंत त्याचा बराच वेळ जात असे. तुकोबांची पत्नी जिजाई हिला, तिचे वडील अमाजी गुळवे यांनीं एक म्हैस दिली होती, ती एके दिवशीं मंबाजीच्या बागेचें कुंपण मोडून बागेंत शिरली आणि तिनें कांहीं झाडें खाऊन फस्त केलीं. मंबाजीनें जेव्हां हें पाहिलें तेव्हां त्याला मोठा राग येऊन त्यानें शिव्यांची लाखोली वाहिली. पुढें एकादशी आली तेव्हां देवदर्शनास पुष्कळ लोक येऊं लागले. तेव्हां, त्यांना अडथळा व्हावा म्हणून मंबाजीनें मुद्दाम प्रदक्षिणेच्या वाटेवर कांटे पसरून ठेविले! ही गोष्ट तुकोबांस समजतांच त्यांनीं ते कांटे उचलून टाकले आणि वाट मोकळी केली. तुकोबांची कुरापत काढून त्यांजबरोबर भांडण करावें अशी मंबाजीची फार दिवस इच्छा होती, ती पूर्ण करून घेण्यास ही संधि बरी आहे असें पाहून तो तुकोबांच्या अंगावर धांवला आणि एक काठी घेऊन त्यांना झोडपीत सुटला. तोंडानें अपशब्दांचा वर्षाव सुरूच होता. एक काठी मोडली कीं दुसरी घ्यावी असें करून तुकोबांच्या पाठीचें त्यानें धिरडें केलें. परंतु तुकोबांनीं तो सगळा मार निमूटपणें सोसला, हूं कां चूं केलें नाहीं.

दहावीस काठ्या मोडल्या तरी तुकोबा तेथून हालले नाहींत. शेवटीं जेव्हां मंबाजीचेच हात दुखून आले तेव्हां मारणें बंद करून तो आपल्या मठांत निघून गेला. या प्रसंगाविषयीं बुवांचे कांहीं अभंग आहेत ते असे:—

बरवें बरवें केलें । विठोबा बरवें ॥
पाहोनि अंत क्षमा । अंगीं कांटीवरी मारविलें ॥
शिव्या गाळी नीत नाहीं । बहु फार विटंबिलें ॥
तुका म्हणे क्रोधाहातीं । सोडवूनी घेतलें रे ॥

पावलों पावलों । देवा पावलों रे ॥
बरवें संचित होतें तैसें जालें रे । आतां काय बोलों रे ॥
सोज्वळ कंटकवाटा भावें करूं गेलों रे ॥
तुका म्हणे करूनी वेगळा केलों रे ॥

कां होती कां होती । देवा एवढी फजीती ॥
मुळीं वर्म नसतों चुकलों । तो मी ऐसें चित्तीं ॥
होणार तें होउनि गेलें । मिथ्या आतां खंती रे ॥
तुका म्हणे पुरे आतां । दुर्जनाची संगती रे ॥

मंबाजीच्या मारामुळें बुवांच्या अंगांत कांटे मोडून सगळें शरीर रक्तबंबाळ झालें व त्यामुळें त्यांना फार दुःख होऊं लागलें. त्यांची ही करुणास्पद स्थिति पाहून सज्जनांस त्यांची दया आली आणि ते हळहळूं लागले. शेवटीं जिजाईनें तुकोबांस घरीं नेऊन त्यांच्या अंगांतले कांटे काढले व त्यांस औषधोपचार केला. रात्रौ एकादशीचें कीर्तन होतें. बुवा मंदिरांत जाऊन कीर्तनास उभे राहिले. नेहमींप्रमाणें मंबाजी कीर्तनास आला आहे कीं नाहीं याची त्यांनीं चौकशी केली तेव्हां तो आलेला नाहीं असें समजलें. तेव्हां तुकोबा म्हणाले, “मंबाजी गोसावी रोज कीर्तनास येतात, मग आजच ते कां आले नाहींत बरें?” इतकें बोलून, त्यांनीं एक मनुष्य मंबाजीस बोलावण्यास पाठविला. मंबाजीनें सांगितलें कीं “माझें अंग फार दुखत आहे.” हें ऐकतांच बुवा त्याच्या मठांत धांवत गेले आणि त्याला साष्टांग दंडवत घालून त्याचें अंग रगडीत बसले. ते मंबाजीस म्हणाले, “मला मारतांना तुम्हांला फार श्रम झाले व त्यामुळें तुमचें अंग दुखूं लागलें, याबद्दल मला फार वाईट वाटतें. मीच जर त्या कांट्या उचलून टाकल्या नसत्या, तर तुम्हाला येवढी तसदी कां पडली असती? म्हणून हा माझाच अपराध आहे व याबद्दल आपण मला क्षमा

करून नेहमींप्रमाणें कीर्तनास आलें पाहिजे. " बुवांचें हें भाषण ऐकून मंबाजीस लाज वाटली व तो बुवांबरोबर कीर्तनास गेला. पण एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे ती ही कीं हा मंबाजी शेवटपर्यंत तुकोबांचा द्वेष्टाच राहिला ! खापराला परीस लावला तरी त्याचें जसें सोनें होणें शक्य नाहीं, तद्वत् तुकोबांसारख्या महासाधूच्या संगतींचा आणि शिकवणीचा लवलेशही परिणाम मंबाजीच्या मनावर झाला नाहीं. या विधानाला पुरावा पाहिजे असेल तर तोही भरपूर आहे. मात्र तो तुकारामबुवांच्या चरित्रांत नसून, तुकारामाची शिष्यीण बहिणाबाई हिच्या चरित्रांत आहे.

बहिणाबाई ही ब्राह्मण स्त्री कोल्हापूरची राहणारी. ती तुकोबांचें दर्शन घेण्यासाठीं, आपल्या पतीसह कोल्हापुराहून देहूस आली. तिनें आपल्याबरोबर एक गाय आणली होती. बाईचा पति मध्यान्हकालीं गांवांत भिक्षा मागण्यास गेला असतां कोंडाजी नामक एका ब्राह्मणानें त्याला आपल्या घरीं जेवणाचें आमंत्रण दिलें. तेव्हां त्यानें कोंडाजीस सांगिलें कीं "आम्ही एकंदर पांच माणसें आहों; इतक्या माणसांची सोय तुमच्या येथें कशी होणार ?" तेव्हां कोंडाजी म्हणाला, "वस्तीस एखादी जागा पाहून तेथें रहा व मध्यान्हकालीं सर्व मंडळी भोजनास इकडे या." तेव्हां मंबाजीचा मठ चांगला प्रशस्त आहे असें पाहून बहिणाबाईच्या पतीनें त्याजकडे राहण्यास जागा मागितली. तेव्हां मंबाजीस मोठा क्रोध येऊन तो त्याला मारावयास उठला, इतकेंच नव्हे तर त्याला त्यानें घराबाहेर हांकून लाविलें ! नंतर ही कोल्हापूरकर मंडळी एका ओरींत राहिली. बहिणाबाई आणि तिचा नवरा तुकोबांच्या कीर्तनास जातात, हें पाहून मंबाजीनें बाईच्या पतीस विचारलें, " अहो, तुम्ही आणि तुमची पत्नी दोघेंही विरक्त दिसतां, मग माझा उपदेश तुम्हीं कां घेत नाहीं ?" ब्राह्मण म्हणाला, " आम्ही तुकोबांचा उपदेश पूर्वींच घेतला आहे." बहिणाबाईस, ती कोल्हापुरांत असतांनाच, तुकोबांनीं स्वप्नांत उपदेश दिला होता ती हकीकत त्यानें मंबाजीस सांगितली. तुकोबांचें नांव ऐकतांच मंबाजीच्या अंगाचा अगदीं तिळपापड झाला. तो उसळून म्हणाला, " काय गप्पा मारतां हो ? स्वप्नांतल्या गुरूनें स्वप्नांत दिलेल्या उपदेशानें कधीं कोणाचें

१ हिची विस्तृत माहिती पुढें 'तुकोबांचा शिष्यवर्ग' या प्रकरणांत येईल.

समाधान झालें आहे? जोंपर्यंत सद्‌गुरुसेवा घडली नाहीं व प्रत्यक्ष सद्गुरूनें मस्तकावर हात ठेवला नाहीं तोंपर्यंत मनुष्य अनुग्रहशून्यच समजला पाहिजे. आणि तुक्या तर बोलून चालून शूद्र, त्याला ज्ञानप्राप्ति कोठून होणार? आणि जो स्वतः अज्ञानी तो दुसऱ्यांस कसला उपदेश देणार?

**" स्वप्नींचा अनुग्रह गुरु केला शूद्र । तोही बळिभद्र ज्ञानहीन ॥ "**

तुम्ही या गुरुभक्तीच्या गप्पा मजपाशीं मारूं नका. तुम्ही शूद्राचे शिष्य म्हणवितां ही गोष्ट ब्राह्मणांस कळवून तुम्हांस वाळीत टाकीन तरच मी नांवाचा मंबाजी!" येवढें नुसतें बोलूनच मंबाजी थांबला नाहीं, तर ह्या मंडळीशीं त्यानें उघडाउघड द्वेष मांडला! एके दिवशीं बहिणाबाईस वाटेंत मंबाजी भेटला असतां ती त्याला नमस्कार करावयास गेली, तोंच तो दूर होऊन तिला म्हणाला, "तुमची जात कोण आहे कोण जाणे! तुम्ही सोनार आहांत कीं गोळक आहांत? तुमच्या ठायीं ब्राह्मणांची क्रिया कांहींच दिसत नाहीं, म्हणून मी तर तुम्हांला शूद्र समजतों. तुम्ही जर कोणाचे घरीं जेवावयास जाऊन भ्रष्टाकार कराल तर याद राखून ठेवा; मी तुम्हांला दिवाणांत खेंचल्याशिवाय राहणार नाहीं." मंबाजीनें दिलेली ही धमकी बहिणाबाईनें आपल्या भ्रतारास व महादाजीपंत कुळकर्णी आणि कोंडोपंत यांस सांगितली. परंतु मंबाजीच्या दुष्ट-पणास ते तरी बिचारे कसा आळा घालणार?

बहिणाबाई व तुकोबा यांजविषयींची मंबाजीची द्वेषबुद्धि वाढतच चालली. बाई सांगतात :—

**" परंतु तो द्वेष चालवी अत्यंत । मारूं पाहे घात चिंतूनियां ॥**
**म्हणे " हे ब्राम्हण गुरु तरी शूद्र " । हेंचि तया छिद्र सांपडलें ॥**
**द्वेषही वाढला अत्यंत अद्भुत । सर्वांही लोकांत कळों आलें ॥**
**बहेणी म्हणे देव छळी नाना परी । निश्चय निर्धारीं पाहतसे " ॥**

आपाजी गोसावी या नांवाचे एक विख्यात राजयोगी पुण्यांत राहत असत. त्यांस मंबाजीनें पत्र लिहिलें कीं, "तुकोबा गोसावी हा जातीनें शूद्र असून देवळांत नेहमीं कथा करतो व ब्राह्मण त्याच्या पायांवर डोकें ठेवतात! रामेश्वरभट्ट हे थोर विद्वान् ब्राह्मणदेखील त्याला नमस्कार करतात. आम्हास हा

मोठा अधर्म वाटतो; कारण हा प्रकार अगदीं वेदबाह्य आहे. ह्या अधार्मिक तुकारामास शासन करण्यास आपण समर्थ आहांत, तरी त्याला आपण पुण्यास बांधून नेऊन त्याचें पारिपत्य करावें. शिवाय आणखी एक गोष्ट येथें नमूद करण्यासारखी आहे ती ही कीं, एक कोठलें तरी नवीन जोडपें येथें आलें असून त्यानें तुकारामाचें शिष्यत्व पत्करलें आहे. हीं नवरा बायको स्वतःस ब्राह्मण म्हणवितात, परंतु वस्तुतः तीं सोनार आहेत. आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं गांवचे कुळकर्णी या जोडप्यास मोठा मान देतात. तेव्हां आतां या वर्तनास काय म्हणावें? हा जो स्वधर्माचा उघड उघड उपमर्द होत आहे त्याला आपण कांहीं तरी आळा घालाल ह्या आशेनें हें पत्र लिहीत आहें. ह्या धर्मभ्रष्ट लोकांस जर योग्य तें शासन केलें नाहीं तर उद्यां राज्यदेखील[1] बुडेल!"

मंबाजीचें हें पत्र वाचून आपाजी गोसावी यांच्या अंगाची लाही झाली. ते आपल्याशींच म्हणाले, "तुकाराम हा शूद्र असून लोकांकडून नमस्कार करून घेतो? कोण हा अधर्म!

सोनाराची जात म्हणविती ब्राह्मण। तयांचें दर्शन घेऊं नये॥
शूद्राचा अनुग्रह घेताती ब्राह्मण। भ्रष्टाकार पूर्ण होत असे॥

तर अशा या पापी लोकांस शिक्षा केलीच पाहिजे." मग त्यांनीं मंबाजीस उत्तर पाठवून कळविलें कीं, "तुम्ही लिहिलेला मजकूर समजला. यथाकाल जें काय करावयाचें तें करूं."

इकडे मंबाजीनें बहिणाबाई व तिचा भ्रतार यांच्यामागें सारखें टुमणें लावलें कीं 'तुम्ही येथून गेलेंच पाहिजे.' त्यामुळें त्या उभयतांस मोठी काळजी पडली. बाई म्हणतातः—

"कोणाचें न घेतां न बोलतां कांहीं। नसोनी अन्यायी द्वेष कां हा॥
देवासी आठवीं चिंतुनी मानसीं। साक्ष तूंचि यासी पांडुरंगा॥
माझें अंतरींचें जाणतोसी तूंचि। चित्तांत द्वेषासी ठाव नाहीं॥
हें विघ्न आणिलें यासी तूं निवारीं। तुकारामा शिरीं आहेसी तूं॥
बहेणी म्हणे देवा संचितासारखीं। नाना सुखदुःखें प्राप्त होती॥

1 हें राज्य कोणाचें? शिवाजीचें कीं विजापुरचें?

बहिणाबाईनें कोल्हापुराहून आपली गाय बरोबर आणली होती ती दूध देत असे. ह्या गाईस मंबाजीनें आपल्या घरांत नेऊन बांधून ठेविलें आणि तिला तो सोट्यांनीं बडवूं लागला! गाईचें दर्शन होईना म्हणून बाईस फार वाईट वाटलें, व त्यामुळें तुकोबाही फार कष्टी झाले. मंबाजीनें तीन दिवस गाय बांधून ठेवली होती. तेवढ्या वेळांत तिला गवत, पाणी वगैरे कांहीं न मिळाल्यामुळें ती एकसारखी हंबरत होती. तिसऱ्या दिवशीं सकाळीं तुकोबा जागृत झाले तेव्हां त्यांची पाठ सुजली आहे असें दिसून आलें. सोट्याच्या आघाताचे वळही त्यांच्या पाठीवर स्पष्ट दिसत होते. मंबाजीकडून गाईस मिळत असलेला मार तुकोबा सोशीत होते. गाईच्या मुक्ततेविषयीं तुकोबांनीं पांडुरंगाची फार विनवणी केली. इतक्यांत असा चमत्कार झाला कीं मंबाजीच्या घरास अकस्मात् आग लागली! चोहींकडून लोक धांवले व त्यांनीं आग विझविली. गाय सारखी हंबरडे फोडीत होती. तीन दिवस ज्या गाईचा शोध लागत नव्हता ती मंबाजीनें आपल्या घरांत बांधून ठेवल्याचें पाहून लोक फार संतापले. त्यांनीं गाय सोडून बाहेर आणली तेव्हां तिच्याही पाठीवर माराचे वण स्पष्ट दिसत होते. लोकांनीं बहिणाबाईच्या भ्रतारास बोलावून आणलें आणि 'ही आपली गाय सांभाळ' म्हणून सांगितलें. तुकोबांनीं धावून गाईस भक्तिपूर्वक प्रदक्षिणा घातली आणि नमस्कार केला. ते तिला म्हणाले, "दाखविलें स्वप्न मज माये तुवां। न कळेचि धांवा केला मग॥ तुझा माझा आत्मा एक सर्वगत। ते साक्षी निश्चित आली मज." ॥ तुकोबांचे हे कळवळ्याचे उद्गार ऐकून बहिणाबाईंसही फार वाईट वाटलें. त्या म्हणतात, "मजही तैसेच क्लेश झाले फार। साक्ष हें अंतर विठ्ठलाचें."

"दुष्ट मंबाजीनें गाईच्या पाठीवर ओढलेल्या रट्ट्यांचे वण तुकोबांच्या पाठीवर उमटलेले सर्वांनीं स्पष्ट पाहिले. पुढें ही हकीकत रामेश्वरभट्ट यांस समजतांच ते धांवून आले व त्यांनीं तुकोबांचें दर्शन घेतलें. गाईच्या व तुकोबांच्या, दोघांच्याही पाठीवर माराचे वण उठलेले पाहून त्या सहृदय ब्राह्मणास रडें कोसळलें." ही सर्व हकीकत खुद्द बहिणाबाईंनींच सांगितलेली असल्यामुळें ती पूर्ण विश्वसनीय आहे हें सांगावयास नकोच. असो.

ह्या हृदयद्रावक कथानकावरून मंबाजीच्या निसर्गदुष्टतेची यथार्थ कल्पना

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
श्रीतुकाराम ८८९८ वि: ४७८२१
२९८ १८-८-८५

[illegible]तर होतेच, पण तत्कालीन सामाजिक परिस्थितीवरहि थोडासा प्रकाश पडतो. गोसाव्याचा आणि योग्याचा वेष घेऊन धर्माच्या नांवावर सज्जनांचा छळ करणाऱ्या मंबाजीसारख्या दुरात्म्यांचें समाजांत त्या वेळीं केवढें प्रस्थ होतें हें यावरून स्पष्ट दिसतें. सुवर्ण आणि निकषपाषाण यांची उत्पत्ति जशी एकाच कालीं झाली त्याप्रमाणें संत आणि त्यांचे छलक एकसमयावच्छेदें-करूनच निर्माण होत असतात. आणि छलकांकडून होणाऱ्या छलाच्या कसोटीस संत जेव्हां पूर्णपणें उतरतात, तेव्हांच त्यांचें संतत्व तावून सुलाखून निघतें. या दृष्टीनें, मंबाजीसारख्या लब्धप्रतिष्ठित दुष्टांचाही थोडाबहुत उपयोग आहे असें म्हणावें लागतें आणि म्हणून तुकोबांसारख्या हिऱ्याच्या चरित्रांत मंबाजी-सारख्या गारगोटीचाही उल्लेख होणें अपरिहार्य होऊन राहिलें आहे.

मंबाजी गोसावी हा तुकारामबोवांचा जो इतका द्वेष करीत असे त्याला एक व्यावहारिक गोष्टही कारणीभूत झाली असावी असें कांहीं जुन्या कागद-पत्रांवरून दिसतें. प्रस्तुत ग्रंथाच्या ११ व्या प्रकरणांत दोन जुनीं पत्रें दिलीं आहेत. त्यांवरून तुकोबा आणि मंबाजी यांचा एका कालीं धनी आणि कूळ या नात्यानें संबंध आलेला होता हें सिद्ध होत आहे. देहू येथील विठ्ठलमंदिराच्या खर्चासाठीं १५ बिघे जमीन पूर्वापार इनाम होती व तिची व्यवस्था कांहीं दिवस मंबाजी गोसाव्याकडे तुकोबांनीं सोंपविली होती असें या पत्रांवरून दिसतें. कदाचित् याच कारणामुळें पुढें कांहीं तरी भानगड उपस्थित होऊन तुकोबा आणि मंबाजी यांचा बेबनाव झाला असावा. मंबाजीचे वंशज अद्याप देहू येथें आहेत.

---

प्रकरण ८ वें

# तुकोबांच्या आयुष्यांतील आणखी कांहीं प्रसंग

एकदां तुकोबा देवळांत कीर्तन करीत असतां कांहीं चोरट्यांनीं त्यांच्या घरीं जाऊन त्यांची म्हैस लांबविली. जिजाई घरांत स्वस्थ निजली होती. म्हैस घेऊन चोरटे देहूपासून पश्चिमेस पावकोसावर बोडक्याची वाडी आहे तेथपर्यंत जाऊन पोंचले. पांडुरंगाच्या ध्यानांत ही गोष्ट येतांच त्यानें एका विक्राळ पुरुषाचें रूप धारण केलें आणि हातांत एक भला लठ्ठ सोटा घेऊन तो चोरांच्या वाटेवर जाऊन उभा राहिला. त्याला पाहतांच चोरटे आपसांत बोलूं लागले, "हा रे कोण धटिंगण वाटेवर उभा ? हा तर मोठा बलाढ्य दिसतो आहे. याच्यापुढें आपला निभाव लागेलसें वाटत नाहीं." इतकें बोलून चोरटे दुसऱ्या दिशेनें जावयास निघाले. तों तिकडेही त्या भयानक पुरुषानें जाऊन त्यांची वाट अडविली ! चोरट्यांची अगदीं गाळण उडाली. तुकोबांसारख्या सत्पुरुषाची म्हैस आपण चोरून नेत आहोंत म्हणून हा कोणीतरी ब्रह्मराक्षस आपणास शिक्षा करण्यास आला असावा असें त्यांना वाटलें. मग म्हैस नेऊन होती तेथें बांधावी असें ठरवून ते देहूकडे येण्यास निघाले. मागून तो भयानक पुरुष येतच होता. शेवटीं, भीत भीत ते चोरटे एकदांचे तुकोबांचे घरीं जाऊन पोंचले व म्हैस बांधून परत जाण्यास निघाले. पण तो काळपुरुष त्यांना कांहीं केल्या सोडीना. त्यानें त्यांचा अगदीं पिच्छा पुरविला. ते जिकडे जिकडे जातील तिकडे तिकडे तो आपला सोटा घेऊन उभा ! चोरांचा अगदीं निरुपाय झाला. मग त्यांनीं असें ठरविलें कीं तुकोबा देवळांत कीर्तन करीत आहेत त्यांस भेटून हा प्रकार कळवावा. त्याप्रमाणें ते देवळांत जाऊन तुकोबांसमोर हात जोडून उभे राहिले व म्हणाले, "तुकोबा, आम्ही तुमची म्हैस चोरून नेत होतों तों वाटेंत एक मोठा भयंकर पुरुष हातीं मुसळ घेऊन आम्हांस मारावयास आला. तेव्हां आम्ही घाबरून तुमची म्हैस तुमच्या घरीं नेऊन बांधली व पळून जाऊं लागलों. पण तो काळपुरुष अगदीं वेशीवरच बसलेला आहे. त्यामुळें आमचा निरुपाय होऊन, तुमच्या कानावर ही गोष्ट घालावी म्हणून आम्ही येथें आलों आहों.

तुम्ही विष्णुभक्त, शत्रु आणि मित्र तुम्हांला सारखे, तर आतां आमची सुटका होईल असा कांहीं तरी उपाय तुम्ही योजला पाहिजे." चोरांचें हें भाषण ऐकून सर्व श्रोते आश्चर्यचकित झाले. तुकोबांनीं अंतर्दृष्टीनें पाहिलें तेव्हां त्यांना असें दिसून आलें कीं पांडुरंगमूर्ति कीर्तनांत नाहीं !

**नेत्र झांकूनियां तेव्हां । पांडुरंगाचा मांडिला धांवा ।**
**म्हणे पंढरिनाथा देवाधिदेवा । गेलासि केव्हां येथुनी ॥**
**आम्ही करितों हरिजागरण । तूं तरी फिरतोसि रानोरान ।**
**ढोरें राखावयाची सवे जाण । पहिल्यापासोन लागली ॥**
**आम्ही सद्भावें वर्णितों गुण । येथें न रंजेचि तुझें मन ।**
**आणि वेडेंवांकडें रूप धरोन । देशी दर्शन तस्करांसी ॥**
**आतां प्रभातसमय जाहला पाहीं । आरतीचे समयीं तरी येईं ।**
**कृपासागरा शेषशायी । उचित नाहीं हें तुज ॥**

इतक्यांत तो भयानक पुरुष तेथें आला व देवळांत जाऊन अदृश्य झाला. सर्व श्रोत्यांनीं त्याला पाहिलें. मग तुकोबा चोरांस म्हणाले, "आतां तुमची वाट मोकळी झाली. तुम्हाला माझी म्हैस हवी असेल तर खुशाल घेऊन जा." चोरटे म्हणाले, "नको महाराज ! म्हैस नको आणि कांहीं नको. जीव वांचला हेंच पुष्कळ झालें !"

तुकारामबुवांस दोन पुत्र होते; मोठा महादेव आणि धाकटा विठोबा. महादेवास मुतखड्याचा विकार झाल्यामुळें तो फार कासावीस झाला. त्यास वरें वाटावें म्हणून जिजाबाईनें पुष्कळ उपासतापास केले, नाना प्रकारचे औषधोपचार केले, गंडे दोरे आणून बांधले, पण कांहीं केल्या विकार हटेना. लघुशंका करतांना मुलास फार वेदना होऊन तो ओरडे त्या वेळीं त्याचें दुःख पाहून तुकोबांसही फार वाईट वाटे व ते उदास होऊन देवळांत जात. शेवटीं मुलाची इतकी वाईट स्थिति झाली कीं त्याच्या हातापायांच्या काड्या होऊन तो अगदीं मरणोन्मुख झाला. जिजाईच्या शेजारणींनीं जेव्हां महादेवाची ही स्थिति पाहिली तेव्हां त्या जिजाईला म्हणाल्या, "तुझ्या नवऱ्यानें देवाचा ध्यास धरला आहे त्याचा हा परिणाम. येथें औषधोपचारांचा

काय उपयोग होणार ? तुझ्या नवऱ्यानें जोंपर्यंत पांडुरंगाची उपासना सोडली नाहीं तोंपर्यंत तुमच्यावर अशींच संकटें येत राहणार. तुकोबा ह्या मार्गास लागले तोंच त्यांची पहिली बायको आणि मुलगा हीं मरण पावलीं." शेजारणींनीं जिजाईच्या दुःस्थितीचें केलेलें हें निदान तिला पटलें. संध्याकाळीं मुलाचें मूत कोंडून त्याचें पोट फुगलें आणि हालचाल बंद झाली. हातपायही गार पडले. तेव्हां जिजाईनें विचार केला कीं येवींतेवीं पोर आतां मरणारच तर त्याला देवळांत नेऊन देवाच्या पायावर आपटावें आणि देवावर हत्या घालावी ! मग एका हातांत जोडा घेऊन आणि दुसऱ्या हातानें मुलाचा हात धरून ती त्याला फरफरां ओढीत देवळांत घेऊन गेली. देवासमोर उभी राहून देवाच्या पायावर मुलाला आपटण्यासाठीं तिनें त्याला वर उचललें तोंच मूर्तीच्या मागील भागांतून "तुझा मुलगा बरा झाला आहे, त्याला तूं घरीं घेऊन जा," असे शब्द आलेले तिच्या कानीं पडले. जिजाईला आश्चर्य वाटलें. येथें कोणी मनुष्य नसतां, हे शब्द कोठून आले ? पाषाणाच्या मूर्तीनेंच हे शब्द उच्चारले असतील काय ? असे प्रश्न ती आपल्या मनास विचारीत आहे तों तिची दृष्टि मुलाकडे गेली व त्याचें कोंडलेलें मूत्र सुटत आहे असें तिनें पाहिलें. मग देवळांत घाण होऊं नये म्हणून ती मुलास घेऊन बाहेर आली. महादेवाची पुष्कळ लघवी जाऊन त्याचें पोट साफ रिकामें झालें आणि त्याला फार भूक लागली. आपला मुलगा आतां बरा झाला असें जिजाईस वाटून ती मनांत म्हणाली, "काळ्याला माझें भय वाटलें म्हणूनच त्यानें माझ्या मुलास बरें केलें." मग ती मुलास घेऊन आपल्या घरीं गेली.

मुलगा बरा झाल्याची हकीकत तुकोबांस समजतांच, पांडुरंगाची त्यांनीं कृतज्ञतापूर्वक करुणा भाकली.

"भक्ता नारायण नुपेक्षी सर्वथा । कृपावंत ऐसें कळों आलें," हा आपला अनुभव तुकोबांनीं संतांस सांगितला आहे तो खोटा नव्हे हें त्यांच्या चरित्रांतील अशा प्रकारचे प्रसंग पाहिले म्हणजे लक्षांत येतें. ज्यानें आपलें सर्वस्व पांडुरंगचरणीं वाहिलें आणि जो त्याला अनन्यभावानें शरण गेला, त्याची उपेक्षा जर पांडुरंगानें केली तर त्याच्या भजनीं कोण लागेल ?

पण भगवंत आपल्या अनन्यभक्ताची उपेक्षा करीतच नाहीं. खुद्द तुकोबाच सांगतात—

आलिया भोगासी असावें सादर । देवावरी भार घालोनियां ॥
मग तो दयाळू वारील सांकडें । येर तें बापुडें काय रंक ॥
भयाचिये पोटीं दुःखाचिया राशी । शरण देवासी जातां भलें ॥
तुका म्हणे काय नव्हे त्या करितां । चिंतावा तो आतां विश्वंभर ॥

पडतां जड भारी । दासीं आठवावा हरि ॥
मग तो होऊं नेदी सीण । आड घाली सुदर्शन ॥
नामाच्या चिंतनें । बारा वाटा पळती विघ्नें ॥
तुका म्हणे प्राण । करा देवासी अर्पण ॥

अशाच अर्थाचे आणखी कितीतरी अभंग तुकोबांच्या गाथ्यांत सांपडतील, आणि हे सगळे तुकोबांच्या स्वानुभवाचे उद्गार आहेत. इतर सर्व संतांचाही अनुभव असाच आहे.

समर्थाचिया सेवका वक्र पाहे । असा सर्व भूमंडळीं कोण आहे ॥
जयाची लिला वर्णिती लोक तीन्ही । नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥
सदा चक्रवाकासि मार्तंड जैसा । उडी घालितो संकटीं स्वामि तैसा ॥
अनन्यासि रक्षीतसे चापपाणी । नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥

हे समर्थांचे उद्गार प्रसिद्धच आहेत. हे सगळे संत ही धडधडीत खोटी गोष्ट सांगत आहेत असें म्हणण्याचें धाष्टर्य कोण करील ? देवावर आमचा तितका विश्वास नाहीं म्हणून आम्हास तसा अनुभव येत नाहीं इतकेंच. असो.

आवलीच्या धसमुसळेपणामुळें व फटकळ भाषणानें बुवा एकदां इतके कंटाळले कीं ती कटकट चुकविण्यासाठीं ते दोन महिने रानांत जाऊन राहिले होते. रात्रौ चार प्रहर देवळांत कीर्तन करून पहाटे इंद्रायणीचें स्नान करावें आणि रानांत जाऊन भजन करीत बसावें. कोणी चतकोर भाकर आणून दिली तर ती खाऊन वर पाणी प्यावें. असा क्रम त्यांनीं दोन महिने चालविला. नवरा घरीं येत नाहीं म्हणून आवली शेजारच्या बायका जमवून त्यांना

नवऱ्याचें गाऱ्हाणें सांगूं लागली. ती म्हणाली, "पिसा गांवांत असून मला भेटत नाहीं किंवा माझी वास्तपुस्त करीत नाहीं. माझी काय वाट लावण्याचें त्यानें योजलें आहे तें तरी त्याला एकदा विचारा." पुढें एकदां अशी गंमत झाली कीं आवली सकाळींच पाणी आणावयास इंद्रायणीवर गेली असतां बुवांची आणि तिची अकस्मात् गांठ पडली. मग काय विचारतां ? आवलीनें बुवांचा पदर धरला आणि ती त्यांना विचारते, "आज दोन महिने झाले, तुम्ही घराचें तोंड पहात नाहीं. तर मी आतां कोणाची बायको होऊन संसार चालवूं ?" बुवांनीं सांगितलें, "विठ्ठल-रुक्मिणी आपले मायबाप आहेत त्यांचे पाय आठवीत जा, म्हणजे संसारांत तुला विपत्ति येणार नाहींत." आवली म्हणाली, "तें मला ठाऊक आहे, पण तुम्ही आतां घरीं चला." बुवा म्हणाले, "विनाकारण कटकट करणार नाहीं असें मला वचन दे म्हणजे येतों." मग तसें वचन देऊन आवलीनें त्यांना घरीं नेलें. बुवा दारांतल्या तुळसीवृंदावनाजवळ जाऊन बसले. त्या दिवशीं एकादशी असल्यामुळें लोक बुवांच्या दर्शनास व त्यांचें प्रवचन ऐकण्यास येऊं लागले. तें पाहून आवलीचा कपाळशूळ पुन्हां उठला आणि लोकांना ती अद्वातद्वा बोलूं लागली. बुवा शांत होते, पण लोक मात्र पळून गेले. मग बुवांनीं तिला दोन उपदेशाच्या गोष्टी सांगितल्या तेव्हां तिनें आपलें तोंड बंद केलें !

तुकोबांचे वेळीं, देहूपासून जवळच चिंचवड येथें चिंतामणि देव या नांवाचे एक गाणपत्य होते. त्यांनीं तुकारामबुवांची कीर्ति ऐकून, त्यांच्या सामर्थ्याची प्रतीति पहावी या उद्देशानें त्यांना बोलावून आणण्यासाठीं एक मनुष्य देहूस पाठविला. चिंतामणि देव आपल्या भेटीची इच्छा करीत आहेत हें तुकोबांस अगोदरच अंतर्ज्ञानानें समजलें व ते भजन करीत देहूहून चिंचवडास जाण्यास निघाले, तों अर्ध्या वाटेंत देवांचा मनुष्य त्यांना भेटला व त्यानें त्यांचा निरोप तुकोबांस कळविला. तुकोबा म्हणाले, "मी तिकडेच जाण्यास निघालों आहें." कांहीं वेळानें बुवा चिंचवडास येऊन दाखल झाले. चिंतामणि देव घरांत स्नान-संध्येंत गुंतले होते. तुकोबा बाहेर आले आहेत हें त्यांस समजलें नाहीं. गण-पतीची मानसपूजा करून देव बाहेर येऊन पाहतात तों तुकोबा दारांत उभे ! देवांस पाहतांच तुकोबांनीं त्यांना साष्टांग दंडवत घातला. पण देवांच्या मनांत

असा विकल्प आला कीं, तुकोबा शूद्र, आपण ब्राह्मण, तेव्हां त्यांना आपण नमस्कार कसा करावा ? मग ते तुकोबांस म्हणाले, "तुमची गांठ पडली, आनंद झाला." देवांचा असा विचार होता कीं, तुकोबांबरोबर पांडुरंग जेवतो वगैरे ज्या गोष्टी आपण ऐकतों त्यांची कांहीं सत्यता जर आपल्या अनुभवास आली तर आपण त्यांना नमस्कार करूं. पुढें देवांच्या घरांत जेवणाची तयारी झाली तेव्हां देवांनीं तुकोबांसाठींही एक पान वाढण्यास सांगितलें. ब्राह्मणांच्या पंक्तीपासून चार हातांवर बुवांचें पान वाढण्यांत आलें. "आणखी दोन पानें वाढा," असें तुकोबांनीं देवांस सांगितलें व त्याप्रमाणें दोन पानें वाढण्यांत आलीं. नंतर देवांनीं तुकोबांस विचारलें, "तुकोबा, हीं दोन पानें कोणासाठीं ?" बुवा म्हणाले, "एक माझ्या पांडुरंगासाठीं आणि दुसरें, तुमची उपास्य देवता जो गणपति त्याच्यासाठीं. तर आतां आपण गणपतीचें आवाहन करून त्याला बोलवा." देव म्हणाले, "तुकोबा, असें कोठें झालें आहे ? मंत्र म्हणून नैवेद्य दाखविला म्हणजे तो गजाननास पोंचतो. प्रत्यक्ष गजानन येथें कसा येईल ?" तुकोबा म्हणाले, "साक्षात् गणपति येथें येऊन जेवल्याशिवाय माझें समाधान होणार नाहीं. देवतेचा साक्षात्कार जर होत नसेल तर तिची उपासना व्यर्थ आहे." देव म्हणाले, "आम्ही पुष्कळ वर्षांपासून गणपतीची उपासना करीत आहों, पण साक्षात् गणपति आमच्या घरीं येऊन कधींच जेवला नाहीं व आमचें तेवढें सामर्थ्यही नाहीं. पण साक्षात् पंढरीनाथ तुमच्याबरोबर येऊन जेवतो आणि तुमच्याशीं बोलतो चालतो असें लोक सांगतात. हें जर खरें असेल तर तुम्हीच गणपतीला पाचारण करून येथें आणा." बुवा म्हणाले, "ठीक आहे. आपल्या कृपेनें मी गजाननास येथें आणतों." इतकें बोलून त्यांनीं गणपतीची मनोमय पूजा करून त्याला पाचारण केलें. त्याबरोबर, गजानन सगुणरूपानें त्या ठिकाणीं प्रगट होऊन पात्रावर बसला. आपली आराध्यमूर्ति सगुणरूपानें प्रत्यक्ष आपल्या घरीं येऊन जेवावयास बसली आहे हें पाहतांच देवांस परमावधीचा आनंद झाला. त्यांनीं मंगलमूर्तीस प्रेमपूर्वक साष्टांग नमस्कार घातला. मग ते तुकोबांस म्हणाले, "आतां पांडुरंगास बोलवा." तुकोबांनीं क्षणभर नेत्र झांकून पांडुरंगमूर्तीचें स्मरण केलें, त्याबरोबर ती श्यामसुंदर चतुर्भुज मूर्ति तेथें प्रगट होऊन पाटावर जाऊन बसली देवांनीं त्या

मूर्तीलाही वंदन केलें. भोजन झाल्यावर तुकोबांनीं दोन्ही मूर्तीस विडे दिले. नंतर तुकोबा आणि चिंतामणि देव यांचा निरोप घेऊन पांडुरंग आणि गणपति अंतर्धान पावले. तुकोबांचें हें विलक्षण सामर्थ्य पाहून देवांच्या मनांतला विकल्प दूर झाला आणि त्यांनीं मोठ्या भक्तिभावानें बुवांस साष्टांग नमस्कार घातला.

वरील कथा, तुकारामचरित्रकार महीपतींनीं आपल्या भक्तलीलामृतांत जशी वर्णिली आहे तशीच–पण थोड्याशा संक्षेपानें–मी येथें दिली आहे. हे असले चमत्कार खरोखरच घडले असतील कीं त्या त्या संतांच्या अनुयायांनीं आपल्या गुरूची प्रतिष्ठा वाढावी म्हणून मागाहून या चमत्कारांच्या कथा रचल्या असतील, हें निश्चयपूर्वक सांगणें कठिण आहे. तथापि या मुद्द्याचा विचार पुढील एका प्रकरणांत पुनः करावा लागणार आहे तेथें यासंबंधानें आणखी थोडीशी चर्चा करूं. तूर्त इतकेंच सांगतों कीं या परंपरेनें चालत आलेल्या दंतकथा जशाच्या तशा देणें हें ग्रंथकाराचें कर्तव्य आहे अशी माझी प्रामाणिक समजूत असल्यामुळें, आजपर्यंत ज्या ज्या संतांचीं चरित्रें मी लिहिलीं त्या त्या संतांच्या अशा प्रकारच्या आख्यायिका त्यांच्या चरित्रांत मी देत आलों आहें व त्याप्रमाणें तुकारामबुवांनीं केलेल्या चमत्कारांच्या कथाही त्यांच्या प्रस्तुत चरित्रांत मी देत आहें. असल्या कथांवर कितपत विश्वास ठेवावयाचा किंवा मुळींच ठेवावयाचा नाहीं हें ठरविण्याचें काम वाचकांचें आहे. या बाबतींत माझें स्वतःचें मत, संतांसाठीं देव कधीं कधीं कांहीं चमत्कार करून दाखवितो, असें आहे हें मात्र मी लपवून ठेवूं इच्छीत नाहीं. असो.

तुकारामबुवा, चिंतामणि देवांच्या आग्रहावरून चिंचवडास त्यांच्या घरीं गेले होते त्या प्रसंगास अनुलक्षून "देवांनीं स्वामीस चिंचवडास नेलें होतें–ते अभंग," या सदराखालीं तुकोबांच्या सांप्रदायी गाथ्यांत पांच अभंग दिलेले आहेत. त्यांची थोडीशी चिकित्सा येथें करूं. पहिला अभंग असा आहे—

"वांजा गाई दुभती । देवा ऐसी तुझी ख्याती ॥  
ऐसें मागत नाहीं तुज । चरण दाखवावे मज ॥  
चातक पाखरूं । त्यासी वर्षे मेघधारू ॥

पक्षी राजहंस । अमोलिक मोतीं त्यास ॥ "
तुका म्हणे देवा । कां गा खोंचलासी जीवा ॥

या अभंगांत 'देव' हा शब्द दोन वेळां आला आहे खरा पण तेवढ्यावरून तो अभंग बुवांनीं चिंतामणि देवांसच अनुलक्षून लिहिला आहे असें म्हणतां येणार नाहीं. 'परमेश्वर' या अर्थींही तुकोबांनीं 'देव' शब्द वापरला असेल. 'वांझ गाई दुभविण्या'चें सामर्थ्य चिंतामणि देवांच्या अंगीं होतें व बुवांनीं पहिल्या चरणांत त्यांचाच उल्लेख केला आहे असें जर मानलें तर पुढील चार चरणांतला मजकूर चिंतामणि देवांपेक्षां परमेश्वरासच अधिक लागू पडण्यासारखा आहे. यावरून, हा अभंग तुकोबांनीं चिंतामणि देवांची स्तुति करण्यासाठींच लिहिला ही गोष्ट मान्य करतां येत नाहीं. दुसरा अभंगः—

"परतें मी आहें सहजचि दुरी । वेगळें भिकारी नामरूपा ॥
नलगे रुसावें धरावा संकोच । सहज तें नीच आलें भागा ॥
पडिलिये ठायीं उच्छिष्ट सेवावें । आर्त तेंचि द्रेवें केलें ऐसें ॥
तुका म्हणे तुम्ही आम्हां जी वेगळे । केलेती निराळे द्विज देवें ॥"

असा आहे. यांत देवांच्या नांवाचा उल्लेख नाहीं, परंतु "आम्हां शूद्रांहून निराळे असे तुम्ही ब्राह्मण आहांत," असें तुकोबांनीं यांत म्हटलें असून, शेवटच्या चरणाचा अन्यपाठ 'केले ते निराळे द्विज देवा' असा असल्यामुळें हा अभंग कदाचित् चिंतामणि देवांस लागू पडेल असें वाटतें. तिसरा अभंग असा आहेः—

"चिंतामणि देवा गणपतीसी आणा । करवावें भोजना दुजे पात्रीं ॥
देव म्हणती तुक्या एवढी कैंची थोरी । अभिमानाभीतरीं नागवलों ॥
वाढ वेळ जाला सिळें जालें अन्न । तटस्थ ब्राह्मण बैसलेती ॥
तुका म्हणे देवा तुमच्या सुकृतें । आणीन त्वरित मोरयासी ॥ "

या अभंगांत मात्र वरील दंतकथेचा स्पष्ट उल्लेख असून, चिंतामणि देवांचाही निर्देश केलेला आहे. परंतु हा अभंग तुकोबांचाच असेल कीं काय, याविषयीं थोडीशी शंका येते. "आम्ही अभिमानानें नागवलों आहोंत, आमच्या अंगीं

येवढें सामर्थ्य कोठलें ?" असे शब्द चिंतामणि देवांनीं जरी कदाचित् उच्चारले असले, तरी ते अभंगांत ग्रथित करून, देवांना कमीपणा आणून स्वतःची प्रौढी मिरविण्याचें काम तुकोबांसारख्या अत्यंत निरभिमान वृत्तीच्या सत्पुरुषा-कडून होईल असें माझी मनोदेवता मला सांगत नाहीं. यामुळें ह्या अभंगाच्या अस्सलपणाविषयीं मला जरा शंकाच वाटते. चौथा अभंगही असाच सामान्य स्वरूपाचा आहे. त्यांत देवांचा उल्लेख नाहीं. पांचवा अभंग मात्र निःसंशय देवांसच अनुलक्षून लिहिल्याचें दिसतें. हा अभंग असाः—

" माझा स्वामी तुझी वागवितो लात । तेथें मी पतित काय आलों ॥
तीर्थें तुमच्या चरणीं जाहलीं निर्मळ । तेथें मी दुर्बळ काय वाणूं ॥
तुका म्हणे तुम्ही देवा द्विज वंद्य । मी तों काय निंद्य हीनयाती ॥ "

तुकारामबुवांस एकंदर तीन मुली होत्या. पहिली काशीबाई, दुसरी भागीरथी व तिसरी गंगू. या मुलींचीं लग्नाचीं वयें झालीं तेव्हां त्यांना कशा उजवाव्या ह्या काळजींत जिजाई पडली. "मुलींच्या लग्नाची तजवीज केली पाहिजे," असें तिनें तुकोबांस सांगितलें. तेव्हां त्यांनीं, रस्त्यांत कांहीं मुलें खेळत होतीं, त्यांतले स्वज्ञातीचे तीन मुलगे घरीं आणले आणि लागलीच ब्राह्मणांस बोलावून, आपल्या तिन्ही मुलींचीं त्या तीन मुलांबरोबर लग्नें लावून दिलीं ! मुलांच्या आईबापांस यांतलें कांहींच वर्तमान ठाऊक नाहीं ! दुसरे दिवशीं जेव्हां आपल्या मुलांच्या लग्नाची बातमी त्यांना समजली तेव्हां ते वऱ्हाड घेऊन तुकोबांच्या घरीं आले व गांवांतील लोकांनीं साहित्य जमवून लग्नसमारंभ साजरा केला ! तुकोबांच्या या व्याह्यांचीं नांवें, मोसे, गाडे आणि जांबुळकर अशीं होतीं.

बीड परगण्यांतला देशपांडे आडनांवाचा एक ब्राह्मण पंढरीस धरणें धरून बसला. आपणास अभ्यासाशिवाय, विद्वत्ता प्राप्त व्हावी अशी त्याची इच्छा होती. पंढरींत त्याला स्वप्नांत असा दृष्टांत झाला कीं "तूं आळंदीस जाऊन ज्ञानदेवांची आराधना कर म्हणजे तुझी इच्छा पूर्ण होईल." त्याप्रमाणें तो ब्राह्मण आळं-दीस गेला आणि प्रायोपवेशन करण्याच्या निर्धारानें ज्ञानदेवांच्या समाधीजवळ धरणें धरून बसला. बारा दिवस त्यानें अशी कडक तपश्चर्या केली, तेव्हां ज्ञानोबांस विचार पडला कीं "याच्या नशीबीं विद्या नसतां हा विनाकारण

देहदंडन करीत आहे. तर याला आतां काय उपाय करावा ?" मग त्यांनीं ब्राह्मणाला दृष्टांत देऊन देहूस तुकोबांकडे जाण्यास सांगितलें. त्याप्रमाणें तो देहूस येऊन तुकोबांस भेटला व दृष्टांताचा वृत्तांत त्यानें त्यांस सांगितला. तेव्हां तुकोबांनीं तेथल्या तेथें अकरा अभंग लिहून त्याला दिले आणि प्रसादाचा नारळ देऊन त्याला जाण्यास सांगितलें. हें पाहून ब्राह्मण संतापला आणि नारळ टाकून देऊन तुकोबांस म्हणाला, "मला 'पुराणव्युत्पत्ति' प्राप्त व्हावी म्हणून मी तुमच्याकडे आलों. आणि तुम्ही मला हे प्राकृत अभंग लिहून देतां, याचा अर्थ काय ? मी विनाकारण येथें येण्याचे श्रम घेतले!" इतकें बोलून तो रागानें पुनः आळंदीस गेला आणि ज्ञानोबांच्या समाधीपुढें पुनः धरणें धरून बसला! इकडे तुकोबांनीं तेरा अभंगांचें एक पत्र लिहून आळंदीस ज्ञानोबांकडे पाठविलें. ह्या तेरा अभंगांऐवजीं गाथ्यांत २४ अभंग दिलेले आहेत व ते लक्षपूर्वक वाचून पाहतां त्यांतील बहुतेक अभंगांचा वरील आख्यायिकेशीं मुळींच संबंध नसल्याचें दिसून येतें. आख्यायिकेशीं संबंध असलेले अभंग येणेंप्रमाणें:—

"काय ज्ञानेश्वरीं उणें । तिहीं पाठविलें धरणें ॥
ऐकोनियां लिखित । म्हूण जाणवली हे मात ॥
तरी जाणे धणी । वदे सेवकाची वाणी ॥
तुका म्हणे भार । तुम्ही जाणा थोडा फार ॥

ज्ञानियांचा राजा गुरु महाराज । म्हणती ज्ञानदेव ऐसें तुम्हा ॥
मज पामरा हें काय थोरपण । पायींची वाहाण पायीं बरी ॥
ब्रह्मादिक जेथें तुम्हा वोळगणे । इतर तुळणे काय पुरे ॥
तुका म्हणे नेणें युक्तीची ते खोली । म्हणोनी ठेविली पायीं डोई ॥

बोलिलीं लेंकुरें । वेडीं वांकुडीं उत्तरें ॥
करा क्षमा अपराध । महाराज तुम्ही सिद्ध ॥

---

१ 'अलकापुरींत ब्राह्मण धरणें धरून बेचाळीस दिवस उपवासी होता त्यास ज्ञानोबांनीं स्वप्नीं येऊन सांगितलें कीं देहूस तुकोबांपाशीं जाणें. ब्राह्मण स्वामीपाशीं आला, त्यास करून दिलेले अभंग,' या सदराखालीं, हे अभंग गाथ्यांत दिले आहेत. पण ते सातच आहेत.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थापना
अनुक्रम १२८८ वि: ५१२७
नों दि: १४-८-५


नाहीं विचारिला । अधिकार त्यां आपुला ॥
तुका म्हणे ज्ञानेश्वरा । राखा पायांपें किंकरा ॥

काय तुम्ही जाणा । करूं अव्हेर नारायणा ॥
तरि या लटक्याची ग्वाही । निवडली दुसरे ठायीं ॥
कळों अंतरींचा गुण । नये फिटल्यावांचून ॥
आणिलें अनुभवा । जनांच्या हें ज्ञानदेवा ॥
आणीक कोणी भिती । त्यांच्या चिंतनें विश्रांति ॥
तुका म्हणे बीज पोटीं । फळ तैसेंचि शेवटीं ॥

जयाचिये द्वारीं सोन्याचा पिंपळ । अंगीं ऐसें बळ रेडा बोले ॥
करील तें काय नव्हे महाराज । परि पाहे बीज शुद्ध अंगीं ॥
जेणें हे घातली मुक्तीची गवांदी । मेळविली मांदी वैष्णवांची ॥
तुका म्हणे तेथें सुखा काय उणें । राहे समाधानें चित्ताचिया ॥

तुम्ही येथें पाठविला धरणेकरी । त्याची जाली परी आइका ते ॥
आतां काय पुढें वाढवुनी विस्तार । जाला समाचार आइका तो ॥
देवाचे उचित एकादश अभंग । महाफळत्याग करूनि गेला ॥
तुका म्हणे सेवा समर्पूनि पायीं । जालों उतराई ठावें असो ॥

वरील अभंगांवरून, धरणेकऱ्याची ही आख्यायिका अगदींच निराधार नाहीं हें स्पष्टपणें दिसून येतें. हा धरणेकरी तुकोबांनीं दिलेल्या अभंगांचा व महाफलाचा त्याग करून पुनः आळंदीस जाऊन धरणें धरून बसला तेव्हां ज्ञानोबांनीं त्याला हांकून लाविलें, असें महीपतींनीं लिहिलें आहे.

तुकोबांनीं लिहून दिलेले ११ अभंग आणि प्रसादाचा नारळ तेथेंच टाकून तो ब्राह्मण आळंदीस निघून गेला, तोंच कोंडोबा या नांवाचा दुसरा एक धष्टपुष्ट ब्राह्मण सहज रस्त्यानें चालला असतां तुकोबांच्या दर्शनास आला. कोंडोबा अक्षरशत्रु असल्यामुळें त्याला अभिमान नव्हता. तुकोबांपुढें जाऊन त्यानें त्यांस मोठ्या भक्तिभावानें वंदन केलें. हा त्याचा निरभिमानीपणा पाहून तुकोबा संतुष्ट झाले व त्यांनीं ते ११ अभंग आणि तो प्रसादाचा नारळ त्यास दिला. खोबरें खाण्यासाठीं कोंडोबानें तो नारळ तेथेंच फोडला, तों त्याच्या

आंत मोत्यें भरलेलीं आहेत असें त्यास दिसून आलें. अहमदाबादच्या एका सावकारानें ज्ञानदेव महाराजांस असा नवस केला होता कीं, "जर माझे मनोरथ पूर्ण झाले तर हजारों रुपये किंमतीचें जवाहीर मी तुमच्या समाधीवर वाहीन." सुदैवानें सावकाराचा मनोरथ पूर्ण झाला तेव्हां तो आपला नवस फेडण्यासाठीं आळंदीस आला. थेंते ज्ञानोबांनीं त्याला दृष्टांत दिला कीं, "हें जवाहीर देहू येथें तुकोबांस नेऊन द्यावें." मग सावकारानें एक नारळ घेऊन तो कोरला आणि तो मोत्यांनीं भरून तुकोबांस नेऊन दिला. इतक्यांत तो धरणेकरी तुकोबांपाशीं आला असतां त्यांनीं तो नारळ प्रसादादाखल त्याला देऊन टाकला. पण त्याच्या नशीबीं विद्या व धन दोन्ही नसल्यामुळें तो नारळ टाकून चालता झाला. शेवटीं, वर सांगितल्याप्रमाणें, तो नारळ कोंडोबाच्या हातीं आला व तीं हजारों रुपये किंमतीचीं मोत्यें त्याला मिळालीं ! शिवाय, तुकोबांनीं दिलेले ते अकरा अभंगही त्यानें मुखोद्गत केले व त्यामुळें त्याच्या बुद्धीचें जडत्व जाऊन तो पुढें मोठा व्युत्पन्न झाला. शिवाजी महाराजांपाशीं जो पंडित पुराण सांगत असे त्याच्या आश्रयास हा कोंडोबा होता. कोंडोबाचा हा वृत्तांत जेव्हां पंडितांच्या तोंडून महाराजांनीं ऐकला, तेव्हां आपणही एकदां तुकोबांचें दर्शन घ्यावें अशी इच्छा त्यांस उत्पन्न झाली असें महीपतींनीं लिहिलें आहे.

एकदां आळंदी येथें महाद्वारीं तुकोबांचें कीर्तन चालू असतां लोहगांवचे कांहीं भाविक लोक त्यांजकडे आले आणि "आपण एकदां लोहगांवीं येऊन आमचा आश्रम पवित्र करावा," अशी त्यांनीं त्यांस विनंति केली. त्यांची विनंति मोठ्या आनंदानें मान्य करून बुवा दुसरे दिवशीं त्यांजबरोबर लोहगांवास गेले. तेथील गांवकऱ्यांनीं मोठा मंडप उभारून कीर्तनाची सर्व व्यवस्था केली होती, त्या मंडपांत रात्रौ तुकोबांचें मोठें प्रेमळ कीर्तन झालें. पुढें आणखी एक महिनाभर त्यांचें वास्तव्य लोहगांवींच होतें. तेवढ्या अवधींत रोज बुवांचीं कीर्तनें होत असत. लोहगांवावर त्या वेळीं भक्तिप्रेमरसाचा जणूं काय लोंढाच आला होता. बुवांच्या कीर्तनाचें गांवकऱ्यांस नुसतें वेड लागून राहिलें. रोज ब्राह्मणसंतर्पण होत होतें.

## तुकोबांच्या आयुष्यांतील आणखी कांहीं प्रसंग

लोहगांवांत राहणारी एक वृद्ध ब्राह्मण स्त्री एके दिवशीं तुकोबांकडे येऊन त्यांस म्हणाली, "महाराज, माझ्या घरीं तुम्ही एकदां जेवावयास यावें अशी माझी इच्छा आहे." तुकोबा म्हणाले, "ठीक आहे, तुम्ही जेवणाची तयारी करून, कोणत्या दिवशीं यावयाचें तें मला कळवा." मग त्या ब्राह्मण स्त्रीनें मोलमजुरी करून थोडेसे पैसे मिळविले आणि दहा असामींस पुरेल इतकी भोजनाची सामग्री विकत आणली. भोजनाचा दिवस नक्की ठरवून त्याप्रमाणें ती तुकोबांस कळविणार तों मध्येंच एक विघ्न उपस्थित झालें. पाऊस फार पडल्यामुळें बाईच्या खोपटाची भिंत पडण्याच्या बेतांत आली. तेव्हां तिनें तुकोबांपाशीं जाऊन ही गोष्ट त्यांस कळविली. तुकोबांनीं तिला सांगितलें, "तुम्ही बिलकुल काळजी करूं नका. आम्ही जेवल्याशिवाय भिंत पडत नाहीं." आणि शेवटीं तसेंच झालें. भिंतीचा आधार सुटून ती कलंडली असतांही, तुकोबांचें जेवण होईपर्यंत ती पडली नाहीं. पुढें चार दिवसांनीं बाईनें भोजनाची सिद्धता करून बुवांस जेवणाचें आमंत्रण दिलें. बुवांबरोबर कांहीं ब्राह्मणांसही तिनें जेवणास बोलावलें होतें. त्याप्रमाणें, सर्वांचें यथासांग भोजन झाल्यावर बुवा त्या ब्राह्मण स्त्रीस म्हणाले, "तुम्हीही आतां लवकरच जेवून घ्या." बाईचें जेवण झाल्यावर बुवांनीं तिच्या खोपटांतलें सर्व सामान बाहेर काढविलें व तिलाही बाहेर पडण्यास सांगितलें. इतकें झाल्यावर बुवा व इतर मंडळी जाण्यास निघालीं तोंच झोंपडीची भिंत कोसळून पडली! मग, गांवकऱ्यांस सांगून बुवांनीं त्या बाईस एक दुसरें घर देवविलें व रात्रौ त्या घरांत स्वतः कीर्तन केलें. महिपति म्हणतातः—

**"संत जाती ज्याचे घरीं। त्याचीं विघ्नें पळती दुरी।**
**सुदर्शन घेऊनि श्रीहरि। नाना परी रक्षितसे॥"**

लोहगांवांत एक महिना राहिल्यावर तुकोबा परत देहूस गेले.

## प्रकरण ९ वें

# तुकोबा आणि रामेश्वर भट्ट

" चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती। "

—तुकाराम

दिवसेंदिवस तुकोबांची प्रतिष्ठा जसजशी वाढत चालली, तसतशी त्यांजविषयींची कांहीं व्यक्तींची द्वेषबुद्धीही वाढत चालली. विशेषतः, तुकाराम हा जातीनें शूद्र असतां ब्राह्मणांसुद्धां सर्व जातींचे लोक त्याच्या पायां पडतात याबद्दल कांहीं विद्वान् ब्राह्मणांस मोठा विषाद वाटूं लागला. श्रीसमर्थ रामदासांसारखे तत्कालीन ब्राह्मण संतही जर ' नीच जातीचा गुरु करूं नये ' असा दंडक घालतात, तर सामान्य ब्राह्मणांस तुकारामबुवांसारख्या शूद्र साधूची प्रतिष्ठा वाढत चाललेली पाहून थोडेंबहुत वैषम्य वाटलें तर त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. तत्कालीन लोकांच्या समजुतीच तशा असल्यामुळें तुकोबांचा द्वेष करणाऱ्या ब्राह्मणांस याबद्दल फारसा दोष देतां येईल असेंही वाटत नाहीं. ज्ञानदेव आणि एकनाथ हे दोन्ही सत्पुरुष जातीनें ब्राह्मण असतां त्यांचाही शक्य तेवढा छळ करण्यास त्या वेळच्या कर्मठ ब्राह्मणांनीं जर कमी केलें नाहीं तर तुकोबांसारख्या शूद्राचा ते काय मुलाहिजा राखणार? भागवतधर्मीय संत आणि कर्मठ ब्राह्मण यांचा हा अहिनकुलसंबंध फार पुरातन आहे. ब्राह्मण्याच्या तेजाची थोडीशी चुणूक ' महापुरुष मंबाजी गोसावी ' यांनीं बुवांस पूर्वी दाखविलीच होती, आतां दुसरे एक पट्टीचे विद्वान् बुवांचें पारिपत्य करण्यास अस्तन्या सारून पुढें सरसावले.

वाघोली गांवीं रामेश्वर भट्ट या नांवाचे एक षड्शास्त्रसंपन्न ब्राह्मण राहत होते त्यांच्या कर्णपथावर जेव्हां तुकारामबुवांच्या साधुत्वाची कीर्ति जाऊन आदळली, तेव्हां त्यांचें मन फार अस्वस्थ होऊन त्यांना अगदीं चैन पडेनासें झालें. तुकोबाचें हें बंड मोडलेंच पाहिजे, नाहीं तर महाराष्ट्राचा तरणोपाय नाहीं, असें त्यांना वाटलें. मग स्वतः देहूस जाऊन स्वतःच्या विद्वत्तेच्या जोरावर बुवांचा तेजोभंग करावा असें त्यांनीं ठरविलें. पण तसें करण्यापूर्वी

ते अगोदर ग्रामाधिकाऱ्याकडे गेले आणि त्याजपाशीं त्यांनीं अशी तक्रार केली कीं, "तुका जातीचा शूद्र असून आपल्या कवितेंत श्रुतीचा अर्थ सांगतो. हरिकीर्तन करून भाविक लोकांस तो मोहनी घालतो. ब्राह्मणदेखील त्याच्या पायांवर डोकीं ठेवतात, हें ऐकून आम्हांस मरणप्राय दुःख होतें. ब्राह्मणांनीं शूद्रास नमस्कार करवा, ही गोष्ट आमच्या वर्णश्रेष्ठत्वास लांच्छनास्पद आहे. स्नानसंध्या, यज्ञयाग वगैरे वेदोक्त कर्मांचें महत्त्व कमी करून नुसत्या भक्तिमार्गाचें आणि नामस्मरणाचें स्तोम त्यानें माजविलें आहे. तरी याचा कांहीं तरी बंदोबस्त जर लवकरच केला नाहीं तर मोठा अनवस्था प्रसंग येईल." हें ऐकून ग्रामाधिकाऱ्यास तुकोबांच्या वर्तनाचा मोठा संताप आला आणि त्यानें तत्काळ देहूच्या पाटलास चिठ्ठी पाठविली कीं "तुक्यास गांवाबाहेर काढून लावावें." देहूंतील लोकांनीं ती चिठ्ठी वाचून पाहिली आणि तुकोबांस दाखविली. तेव्हां तुकोबा म्हणालेः—

"आतां काय खावें कोणीकडे जावें । गांवांत रहावें कोण्या बळें ॥
कोपला पाटील गांवींचे हे लोक । आतां मज भीकं कोण घाली ॥
आतां येणें चवी सांडिली म्हणती । निवाडा करिती दिवाणांत ॥
भल्या लोकांपाशीं सांगितली मात । केला माझा घात दुबळ्याचा ॥
तुका म्हणे याचा संग नव्हे भला । शोधीत विठ्ठला जाऊं आतां ॥"

नंतर तुकोबांनीं असा विचार केला कीं स्वतः वाघोलीस जाऊन हे रामेश्वर भट्ट कोण आहेत तें एकदां पहावें. मग लगेच ते देहूहून निघून वाघोलीस रामेश्वर भट्टांच्या घरीं गेले. भट्टजी संध्या करीत बसले होते त्यांस बुवांनीं साष्टांग

१ 'भिक्षापात्र अवलंबणें । जळो जिणें लाजिरवाणें,' असें तुकोबांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे, यावरून 'भीक' हा शब्द येथें 'भिक्षा' या अर्थानें वापरला नसावा असें वाटतें. तुकारामबुवा भिक्षा मागत होते असें मानण्यास कांहीं सबळ पुरावा नाहीं. तथापि, निव्वळ पोटासाठीं भिक्षा मागणें आणि कांहीं उदात्त हेतु मनांत धरून भिक्षा मागणें यांत अंतर आहे, आणि बुवांचे वरील उद्गार पहिल्या प्रकारच्या भिक्षेकऱ्यांस अनुलक्षून आहेत. समर्थांनीं मात्र 'ब्राह्मणाची मुख्य दीक्षा । मागितली पाहिजे भिक्षा । ॐ भवति या पक्षा । रक्षिलें पाहिजे," असें स्पष्टच सांगितलें आहे !

दंडवत घातला व तेथेंच कीर्तन सुरू केलें. कीर्तन ऐकून रामेश्वरभट्ट म्हणाले, "तूं जातीचा शूद्र, आणि कीर्तनांत अभंग म्हणतोस त्यांत श्रुतींचा अर्थ उमटतो. वेदाचा अर्थ सांगण्याचा तुला अधिकार नाहीं. हें तुझें वर्तन अगदीं शास्त्रबाह्य आहे. यामुळें तुला आणि तुझ्या श्रोत्यांना–दोघांनाही रौरवयातना प्राप्त होतील. म्हणून अतःपर कविता रचण्याचें सोडून दे." हें ऐकून बुवा मनांत म्हणाले, "पांडुरंगानें मला कवित्व करण्याची आज्ञा केली म्हणून मी आजपर्यंत अभंग रचीत आलों. पण, ही सगळी वल्गना मी अगदीं विनाकारण केली असें यांच्या बोलण्यावरून दिसतें." मग त्यांनीं रामेश्वर भट्टांस सांगितलें, "महाराज, आपली आज्ञा मला शिरसामान्य आहे. मी यापुढें कवित्व करणार नाहीं. आपण भूदेव, प्रत्यक्ष ईश्वरमूर्ति, आपल्या आज्ञेचें उल्लंघन कोण करील? पण, मी एवढेंच नम्रपणें विचारतों कीं आतांपर्यंत जी कविता मी केली आहे तिचें काय करूं?" भट्ट म्हणाले, "तें सगळें कवित्व तूं आपल्या हातानें इंद्रायणींत नेऊन बुडव!" "अवश्य" म्हणून बुवा देहूस परत आले व सरळ विठ्ठलमंदिरांत गेले. पांडुरंगमूर्ति दृष्टीस पडतांच बुवांचे डोळे पाण्यानें भरून आले. भगवंतास त्यांनीं सप्रेम साष्टांग नमस्कार घातला व हात जोडून ते म्हणाले, "विठाबाई, तुझ्या आज्ञेनें वेडीवांकडी कांहीं कविता मी लिहिली. पण तोही आतां इंद्रायणींत नेऊन बुडविण्याची आज्ञा मला झाली आहे. असो. तुझी इच्छा!" इतके निर्वाणीचे शब्द बोलून ते आपल्या घरीं गेले आणि अभंगांच्या वह्या घेऊन इंद्रायणीवर आले. मग सर्व वह्या एका वस्त्रांत बांधून व त्यांत दगड घालून "पुंडलीक वरदा हरिविठ्ठल!" या नामाचा गजर करून त्यांनीं इंद्रायणीच्या डोहांत बुडविल्या. हें पाहून प्रेमळ भाविक लोक फार हळहळूं लागले; परंतु तुकोबांचा द्वेष करणाऱ्या दुष्टांस मात्र आनंद झाला. ते आपसांत कुजबुजूं लागले, "तुक्याची भली खोड मोडली. कविता रचून यानें जगांत आपली महंती वाढविली, पण शेवटीं तो रामेश्वरभट्ट याला वस्ताद भेटला. अहो, त्या विद्वान् ब्राह्मणापुढें या टाळकुट्याचें काय चालतें? तेरव्याचा रंग तीन दिवस तशी स्थिति झाली आणि तोंड वासून बसण्याचा प्रसंग आला!" पण खुद्द तुकोबांच्या चित्ताचा मात्र फारसा विक्षोभ झाला नाहीं. ते आपले स्वस्थ भजन करीत बसले. अशा रीतीनें पांच दिवस

गेले. गांवांतल्या कुटाळांनीं, त्यांच्या सभोंवतीं जमून आणि नाना प्रकारचीं दुरुत्तरें बोलून, त्यांचें डोकें उठविण्याचा उद्योग सुरू ठेवलाच होता. ते म्हणूं लागले, " तुक्या, मागें घरांतले कागदपत्र इंद्रायणींत बुडवून तूं प्रपंचाचें वाटोळें केलेंस आणि आतां हें कवित्व बुडवून परमार्थाचाही सत्यनाश केलास! अशा रीतीनें, प्रपंच आणि परमार्थ–दोन्ही बुडविलेस. अशा स्थितींत, तुझ्या ठिकाणीं जर दुसरा कोणी असता तर त्यानें जीवच दिला असता!" दुष्ट लोकांचे हे तीक्ष्ण शब्दशर मात्र तुकोबांच्या वर्मीं लागून त्यांना अगदीं मरणप्राय दुःख झालें. त्यांनीं जरी आपले मनोविकार जिंकले होते तरी मनुष्याच्या दुःखाला आणि सहनशीलतेलाही कांहीं मर्यादा असते. बुवांना हें दुःख अनिवार झालें. आत्महत्या करावी असाही विचार क्षणभर त्यांच्या मनांत येऊन गेला, परंतु आत्महत्या करणें हें मोठें पाप आहे हें लक्षांत येतांच तो विचार त्यांनीं सोडून दिला. मग, आतां काय होईल तें होवो, अन्नपाणी वर्ज्य करून देवाच्या दारांत पडून रहावयाचें असा त्यांनीं निश्चय केला आणि तो तेरा दिवस पाळला. विठ्ठलमंदिरासमोरील वृंदावनांत एक दगड होता त्या दगडावर बुवा जाऊन बसले व तेथें २९ अभंग[1] रचून त्यांनीं निरवानिरव केली.

ह्या निरवानिरवीच्या अभंगांत रामेश्वर भट्टांचा किंवा वह्या बुडविल्याचा प्रत्यक्ष उल्लेख नाहीं, पण तशा अर्थाचा थोडासा ध्वनि त्यांतून निघतो. उदाहरणार्थ बुवांचे पुढील उद्गार पहाः

" करूं कवित्व काय नाहीं आतां लाज।
मज भक्तराज हांसतील॥

× × ×

" नाहीं आयकत तुम्ही माझे बोल।
कासया हें फोल उपणूं भूस॥"

× × ×

---

१ महीपतींनीं, २९ अभंग बुवांनीं रचले असें म्हटलें आहे, पण गाथ्यांत या प्रसंगाचे फक्त २० च अभंग सांपडतात. महीपतींनीं त्या २९ अभंगांचा गोषवाराही दिला आहे.

"आतां नेम जाला । याच कळसीं विठ्ठला ॥
हातीं न धरीं लेखणी । काय भुसकट ते वाणी ॥
जाणें तेणें काळ । उरला सारीन सकळ ॥
तुका म्हणे घाटी । चाटूं कोरडा शेवटीं ॥"

"माझा मज नाहीं । आला उबग तो कांहीं ॥
तुमच्या नामाची जतन । न्हवतां थोर वाटे सीण ॥
न पडावी निंदा । कानीं स्वामीची गोविंदा ॥
तुका म्हणे लाज । आम्हा स्वामीचें तें काज ॥"

"देवा! तुम्ही जर माझे बोल ऐकत नाहीं, तर ही काव्यरचनेची उठाठेव मी कशास करूं? या निर्वाणीच्या प्रसंगीं माझा अगदीं निश्चय झाला आहे कीं यापुढें हातीं लेखणी धरावयाची नाहीं. माझ्या कवित्वाचा लोक निषेध करतात, याबद्दल मला मुळींच उद्वेग वाटत नाहीं; परंतु ज्या कवितेंत तुझ्या नामाचा महिमा मी वर्णिला आहे ती कविता मला जतन करून ठेवतां येत नाहीं याचा मला मोठा शीण वाटतो," इत्यादि उद्गारांवरून, वह्या बुडविण्याच्या प्रसंगींच हे अभंग बुवांनीं रचले असावेत असें वाटतें. असो.

अभंग रचून झाल्यावर बुवा डोळे मिटून त्या शिळेवर पडले व त्या स्थितींत तेरा दिवस राहिले. लोकांनीं तर त्यांचा उपहास केलाच, पण खुद्द त्यांच्या बायकोनें-देखील तेवढ्या वेळांत त्यांचा समाचार घेतला नाहीं! इतर जे भाविक लोक बुवांच्या भजनीं लागले होते त्यांच्या मनांत, हें नवीन विघ्न पाहून, विकल्प उत्पन्न झाल्यामुळें तेही अलिप्त राहिले. एकदोन असामींनीं बुवांपाशीं जाऊन त्यांना अन्नपाणी घेण्याचा आग्रह केला, परंतु बुवा हूं कीं चूं करीनात. ते असे निश्चेष्ट पडले होते कीं ते जिवंत आहेत कीं पंचत्व पावले आहेत याची-देखील लोकांस शंका उत्पन्न झाली. बुवांच्या आयुष्यांतला हा अगदीं निर्वाणीचा प्रसंग ( climax ) होय; आणि ते म्हणूनच ह्या प्रसंगांतून पार पडले. कसे तें लवकरच समजेल.

इकडे, रामेश्वरभट्टांची स्वारी नागेश्वराच्या दर्शनास पुण्यास गेली असतां, तेथें अनगडशहा सिद्ध या नांवाचा एक फकीर होता, त्याच्या बागेंत चुकून

शिरली. बरोबर दोन विद्यार्थी होते. प्रातःस्नानाची वेळ झाली म्हणून बागेंतील पाण्यांत रामेश्वर उतरले आणि मंत्र म्हणत स्नान करूं लागले. त्यांचा मंत्रोच्चार अनगडशहानें दुरून ऐकला आणि तेथूनच त्यानें भट्टजींस शाप दिला कीं "माझ्या नमाजाच्या पाण्यांत स्नान करून तें पाणी खराब करणाराच्या अंगाचा दाह होईल." अनगडशहाकडून हे शब्द उच्चारले जातांच रामेश्वरभट्टांच्या अंगाचा भयंकर दाह होऊं लागला. ते ताबडतोब पाण्यांतून बाहेर आले आणि सारखे तळमळूं लागले. विद्यार्थी त्यांस म्हणाले, "फकीरानें कांहींतरी प्रयोग केला असावा; तर त्यालाच आपण शरण जावें. दुसरा उपाय दिसत नाहीं." भट्ट म्हणाले, "मी उच्च जातीचा विद्वान् ब्राह्मण, त्या यवनास मी शरण जाऊं? छे. हें कदापि होणार नाहीं." चार घटका झाल्यावर रामेश्वरभट्टजी तेथून निघाले. शिष्य त्यांच्या अंगावर वरचेवर पाणी शिंपडीतच होते. वाघोलीस घरीं जावें तर अंगाचा नुसता भडका उडालेला! अशा स्थितींत त्यांना पुण्यांतच रहावें लागलें. त्यांनीं अनुष्ठान करविलें, आणखी कांहीं उपाय केले, पण दाह कांहीं कमी होईना. भट्टजींची ही स्थिति पाहून अनेक लोक अनेक प्रकारीं बोलूं लागले. कोणी अनगडशहाच्या शापसामर्थ्याचें कौतुक करूं लागले तर कोणी म्हणाले, "भट्टजींनीं तुकोबांचे अभंग इंद्रायणींत बुडविले त्यामुळें हें असें झालें असावें." शेवटीं, सर्व उपाय थकल्यावर रामेश्वरभट्ट आळंदीस गेले आणि तेथें ज्ञानोबांच्या समाधीजवळील अजानवृक्षाखालीं धरणें धरून बसले!

आतां इकडे देहूस काय वर्तमान झालें तें पाहूं. प्रायोपवेशनाच्या तेराव्या दिवशीं श्रीकृष्णाची बालमूर्ति आपल्या सन्निध येऊन, "तुझे अभंग उदकांत सुरक्षित आहेत, तूं कांहीं काळजी करूं नकोस," असें आपणास सांगत आहे, असा दृष्टांत तुकोबांस झाला. गांवांतील कांहीं लोकांसही त्या रात्रीं स्वप्नांत, "तुकोबांच्या अभंगांच्या वह्या मी पाण्यांत कोरड्या ठेवल्या असून त्या आतां पाण्यावर तरंगत आहेत, तरी तुम्ही त्या काढून न्या," असा दृष्टांत देवानें दिला. त्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं सकाळींच गांवांतील लोक मोठ्या उत्सुकतेनें नदीवर गेले आणि पाहतात तों बुवांच्या अभंगांच्या वह्या खरोखरच पाण्यावर तरंगत आहेत! "आमच्या तुकोबांस विठोबा पावला,"

असें म्हणून हरिनामाचा त्यांनीं मोठा गजर केला. त्यांत कांहीं पोहणारे होते त्यांनीं भराभर डोहांत उड्या टाकून वह्या बाहेर काढल्या. मग ते धांवतच देवळांत तुकोबांपाशीं आले आणि वह्या सुरक्षित असल्याचें त्यांनीं त्यांस कळविलें. तुकोबांनीं डोळे उघडून पाहिलें तों वह्या अगदीं सुरक्षित आहेत. प्रभूची ही कृपा पाहून त्यांचा कंठ दाटून आला आणि डोळ्यांतून प्रेमाश्रूंच्या धारा चालल्या. मग सात अभंग रचून भगवंताची त्यांनीं स्तुति केली. हे सातही अभंग फार महत्त्वाचे असल्यामुळें ते मी येथें उतरून घेतों:—

"थोर अन्याय केला । तुझा अंत म्यां पाहिला ।
जनांचिया बोलासाठीं चित्त क्षोभविलें ॥
भागविलासी केला सीण । अधम मी यातीहीन ।
झांकूनि लोचन दिवस तेरा राहिलों ॥
अवघें घालूनियां कोडें । तान भूकेचें सांकडें ।
योगक्षेम पुढें तुज करणें लागेल ॥
उदकीं राखिले कागद । चुकविला जनवाद ।
तुका म्हणे ब्रीद साच केलें आपुलें ॥

कृपाळू माउली । आम्हां दीनांची साउली ।
न संवरीत आली । बाळवेशें जवळी ॥
माझें केलें समाधान । रूप गोजिरें सगुण ।
निवविलें मन आलिंगन देऊनि ॥
कृपा केली जनाहातीं । पायीं ठाव दिला संतीं ।
कळों नये चित्तीं दुःख कैसें आहे तें ॥
तुका म्हणे मी अन्यायी । क्षमा करीं वो माझे आई ।
आतां पुढें काई तुज घालूं सांकडें ॥

कापो कोणी माझी मान । सुखें पीडोत दुर्जन ।
तुज होय सीण तें मी न करीं सर्वथा ॥

चुकी जाली एक वेळां । मजपासूनि चांडाळा ।
उभें करोनियां जळामाजी वह्या राखविल्या ॥
नाहीं केला हा विचार । माझा कोण अधिकार ।
समर्थासी भार नकळे कैसा घालावा ॥
गेलें होऊनियां मागें । न ये बोलों तें वाउगें ।
पुढिलीया प्रसंगें तुका म्हणे जाणावें ॥

काय जाणे मी पामर । पांडुरंगा तुझा पार ।
धरिलिया धीर काय एक न करिसी ॥
उताविळ जालों आधीं । मतिमंद हीनबुद्धि ।
परि तूं कृपानिधि नाहीं केला अव्हेर ॥
तूं देवांचाही देव । अवघ्या ब्रह्मांडाचा जीव ।
आम्हां दासां कींव कां भाकावी लागली ॥
तुका म्हणे विश्वंभरा । मी तों पतितचि खरा ।
अन्याय दुसरा दारीं धरणें बैसलों ॥

नव्हती आली सीसा सुरी । अथवा घाय पाठीवरी ।
तों म्या केला हरी एवढा तुम्हा आकांत ॥
वांटिलासी दोहीं ठायीं । मजपाशीं आणि डोहीं ।
लागों दिला नाहीं येथें तेथें आघात ॥
जीव घेती मायबापें । थोड्या अन्यायाच्या कोपें ।
हें तों नव्हे सोपें साहों त्यांचि जाणितलें ॥
तुका म्हणे कृपावंता । तुजऐसा नाहीं दाता ।
काय वाणूं आतां वाणी माझी कुंठली ॥

तूं माउलीहून मवाळ । चंद्राहून शीतळ ।
पाणियाहूनि पातळ कल्लोळ प्रेमाचा ॥
देऊं काशाची उपमा । दुजी तुज पुरुषोत्तमा ।
ओवाळूनि नामा तुझ्यावरूनि टाकिलों ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ...... वि: ......
क्रमांक ......

तुवां केलें जें अहिता । गोड त्याही तूं परता ।
पांचां तत्त्वांचा जनिता सकळ सत्तानायक ॥
कांहीं न बोलोनि आतां । उगाच चरणिं ठेवितों माथा ।
तुका म्हणे पंढरिनाथा क्षमा करीं अपराध ॥

मी अवगुणी अन्यायी । किती म्हणोन सांगों काई ।
आतां मज पायीं ठाव देईं विठ्ठले ॥
पुरे पुरे हा संसार । कर्म बळिवंत दुस्तर ।
राहों नेदी स्थिर एके ठायीं निश्चळ ॥
अनेक बुद्धीचे तरंग । क्षणक्षणा पालटती रंग ।
धरूं जातां संग तंव तो होतो बाधक ॥
तुका म्हणे आतां । अवघीं तोडीं माझी चिंता ।
येउनि पंढरीनाथा वास करीं हृदयीं ॥

तुकारामबुवांनीं केलेल्या इतर अलौकिक चमत्कारांच्या सत्यतेविषयीं कोणाचें कांहीं म्हणणें असो, पण त्यांच्या अभंगांच्या वह्या पाण्यांत तेरा दिवस कोरड्या राहिल्या या चमत्काराची सत्यता खुद्द तुकोबांच्याच वरील अभंगांवरून अगदीं पूर्णपणें सिद्ध होत आहे. स्वतः तुकोबांनीं तो चमत्कारच मानला आहे व आज अडीचशें वर्षें महाराष्ट्रांतील सर्व लोक तो चमत्कारच मानीत आले आहेत. वस्त्रांत बांधून आणि त्यांत मोठमोठे दगड घालून खोल पाण्यांत बुडविलेल्या वह्या तेरा दिवसांनंतर साफ कोरड्या निघाल्या, हा चमत्कार नव्हे असें ज्यांना वाटत असेल त्यांना माझी अशी नम्र विनंति–आव्हान नव्हे–आहे कीं त्यांनीं आपल्या वह्या अशा रीतीनें पाण्यांत बुडवून, त्या तेरा दिवसांनीं तर काय पण तीनच दिवसांनीं, कोरड्या काढून दाखवाव्या. पाण्यांत बुडविलेल्या अभंगांच्या वह्या तेरा दिवसांनंतर कोरड्या निघाल्या यांत चमत्कार कांहींच नाहीं, असें ठरविण्याचा प्रयत्न कै. बाळकृष्ण अनंत भिडे यांनीं आपल्या तुकारामचरित्रांत केला आहे तो अगदीं अश्लाघ्य आहे. कै. भिडे म्हणतात, "तेराव्या दिवशीं तुकारामबुवांच्या पोथ्या पाण्यावर आपोआप तरंगतांना दिसल्या व त्या कोणी बाहेर काढल्या अशी दंतकथा आहे. परंतु

ती भाकडकथा दिसते. तुकारामबोवांनीं फार बंदोबस्तानें आपल्या पोथ्या बांधून व वरखालीं धोंड्याच्या चिपा लावून नदींत टाकिल्या होत्या. त्या पाण्यांत बुडाल्या, पण वेष्टनामुळें भिजल्या नाहींत; व धोंड्यांच्या वजनामुळें वाहूनही गेल्या नाहींत, असा खरा प्रकार आहे. त्याला आधार गाथेचा आहे."

हा गाथेचा आधार न देण्याची पूर्ण खबरदारी कै. भिडे यांनीं घेतली आहे. गाथ्यांत जो काय आधार आहे तो खुद्द तुकोबांच्या वरील सात अभंगांचा. "तुकोबांनीं आपल्या पोथ्या फार बंदोबस्तानें पाण्यांत बुडविल्या होत्या," या कै. भिडे यांच्या वाक्यावरून, लोकांस फसविण्याचा बुवांचा डाव होता असें ध्वनित करण्याचा त्यांचा हेतु दिसतो, तो अत्यंत तिरस्करणीय होय. आपण आपल्या पोथ्या पाण्यांत भिजूं नयेत अशा बंदोबस्तानें बुडविल्या आहेत तेव्हां त्यांविषयीं काळजी करण्याचें कांहीं कारण नाहीं, अशी जर बुवांस जाणीव असती तर देवाच्या दारीं धरणें धरून तेरा दिवसपर्यंत खडतर प्रायोपवेशन करण्याची त्यांस काय जरूरी होती? कै. भिडे यांनीं 'पोथ्या' हा शब्द मुद्दाम वापरला आहे, पण वस्तुतः त्या पोथ्या नसून वह्या होत्या. आणि त्या बुडवितांना, त्या सुरक्षित रहाव्या म्हणून त्यांच्या खालीं वर दगडाच्या चिपा घातल्या होत्या या त्यांच्या विधानास तर काडीचाही आधार नाहीं. उलट वह्या बुडाव्या, पाण्यावर तरंगूं नयेत, म्हणून ज्या वस्त्रांत त्या बांधल्या होत्या त्यांत भारी वजनाचे दगड टाकण्यांत आले होते, असें महीपतींनीं लिहिलें आहे. आश्चर्याची गोष्ट ही कीं 'कवित्व कोरडें आहे, तें उदकांतून काढणें,' असा दृष्टांत स्वप्नांत देवानें तुकोबांस दिला ही गोष्ट कै. भिडे खरी मानतात! यांत कांहीं चमत्कार आहे असें त्यांस वाटत नाहीं! म्हणजे चमत्काराच्या कथेचा अर्धा भाग खरा आणि अर्धा खोटा असें त्यांचें म्हणणें आहे.

आतां बुवांच्या वरील सात अभंगांत या गोष्टीविषयीं आपणास कोणती माहिती मिळण्यासारखी आहे हें पाहूं. बुवा म्हणतात– "हे पांडुरंगा, मी तुझा मोठा अपराध केला आहे. मी तुझा अगदीं अंतच पाहिला. लोकांच्या टीकेकडे लक्ष देऊन मी माझ्या चित्ताचा क्षोभ करून घेतला. मी अगदीं

दुष्ट आणि हलक्या जातीचा मनुष्य. मी तुला विनाकारण शीण दिला. तेरा दिवस तुझ्या दारांत मी डोळे मिटून पडून राहिलों. सगळें संकट मी तुजवर घातलें. तहानभूक यांचा परिहारही तुजकडेच सोंपविला; आणि, ( असा त्रागा केल्यावर ) माझा योगक्षेम तुला चालवावा लागेल हें मला ठाऊक असून मी असें केलें. पण देवा, माझ्या वह्यांचें पाण्यांत तूं रक्षण केलेंस आणि मी कविता करतों म्हणून लोकांचा जो आक्षेप मजवर होता त्याचें निरसन केलेंस. तूं आपलें ‘ भक्तवत्सल ’ हें ब्रीद अशा रीतीनें सार्थ केलेंस. आम्हा दीनदुर्बलांची जणूं काय साउलीच अशी ही कृपाळू माउली ( भगवंत ) बालवेषानें माझ्याजवळ आली आणि तिनें माझें समाधान केलें. त्या रूपसुंदर बालमूर्तीनें मला आलिंगन देऊन माझें मन निववलें. जनांची कृपा मजवर झाली. संतांनीं आपल्या पायांपाशीं मला ठाव दिला. दुःख म्हणजे काय आहे हेंदेखील मला तूं कळूं दिलें नाहींस. भगवंता, मी अन्यायी आहें. माझे आई, मला क्षमा कर. आतां यापुढें असें संकट मी तुला घालणार नाहीं. माझी कोणी मान कापो, दुर्जन मला कितीही छळोत, पण देवा, तुला श्रम होतील असें मी कांहीं कदापि करणार नाहीं. मज चांडाळाकडून एकवार ही चुकी झाली. तुला पाण्यांत उभा करून तुजकडून मी आपल्या वह्यांचें रक्षण करविलें. माझा अधिकार काय, समर्थाला आपण भार कसा घालावा, याचा विचार मी केला नाहीं. असो. झाली गोष्ट होऊन गेली, आणि त्याविषयीं पुनःपुनः बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं. पुढें मात्र खबरदारी घेतली पाहिजे. पांडुरंगा, मी पामर तुझा पार काय जाणणार ? मनुष्यानें जर धीर धरला ( देवावर भार टाकला ) तर (त्याच्यासाठीं ) तूं काय करणार नाहींस ? मतिमंद आणि हीनबुद्धि असा मी विनाकारण उतावळि झालों. परंतु, हे कृपानिधि, तूं माझा अव्हेर केला नाहींस. पांडुरंगा, तूं सगळ्या देवांचा देव आणि जीवांचाहि जीव असतां आम्हां भक्तांना तुझी अशी करुणा भाकण्याचा प्रसंग कां यावा ? विश्वंभरा, मी पतित आहें हीच गोष्ट खरी; आणि माझा दुसरा अन्याय म्हणजे, मी तुझ्या दारांत धरणें धरून बसलों. माझ्या मानेवर कोणी सुरी ठेवली नव्हती किंवा पाठीवर कोणी घाव घालीत नव्हता; असें असतां, हे प्रभो, तुझ्या नांवानें मी एवढा आकांत केला. माझ्यापाशीं आणि डोहांत, असा

तूं दोन ठिकाणीं विभागला गेलास आणि मला येथें व माझ्या वह्यांना पाण्यांत, आघात लागूं दिला नाहींस. ”

खुद्द तुकोबांची ही वरील साक्ष, त्यांच्या वह्या पांडुरंगानें तेरा दिवसपर्यंत पाण्यांत कोरड्या राखल्या या कथेची सत्यता निःसंदेह रीतीनें सिद्ध करीत आहे. अशा स्थितींत हा चमत्कार घडलाच नाहीं, लोकांनीं उठविलेली ती एक गप्प आहे, असें म्हणून या घटनेचें महत्त्व कमी करण्याचा प्रयत्न करणें म्हणजे तुकारामबुवांसारखा थोर सत्पुरुष, स्वतःचें स्तोम माजविण्यासाठीं धडधडीत खोटें बोलतो असें म्हणण्यासारखें आहे, असें म्हटल्याशिवाय माझ्यानें राहवत नाहीं.

“ तुकोबांचें कवित्व आपणास मान्य आहे आणि म्हणून तें आपण डोहांत सुरक्षित ठेवलें आहे, ” असा दृष्टांत पांडुरंगानें दिला म्हणूनच तेरा दिवसांनंतर लोकांनीं त्यांच्या अभंगांच्या वह्या पाण्यांतून बाहेर काढल्या; येरवीं, ज्या वह्या बुडून नष्ट व्हाव्या म्हणूनच मुद्दाम दगड घालून पाण्यांत टाकण्यांत आल्या होत्या त्या बाहेर काढण्याचें कारण काय? तुकारामबुवा प्रायोपवेशनानें आत्महत्या करतील या भीतीनें लोकांनीं वह्या बाहेर काढल्या असतील असा जर कोणाचा आक्षेप असेल, तर तेरा दिवसपर्यंत वह्या पाण्यांत कोरड्या राहिल्या या सोळा आणे सत्य गोष्टीची वासलात ते कशी लावणार? ज्या रामेश्वरभट्टांनीं वह्या बुडविण्याची आज्ञा तुकोबांस केली होती त्यांची या बाबतींत अशी साक्ष आहेः—

**“ राघवें सागरांत । पाषाण तारिले ॥**
**तैसे हे तुकोबांचे । अभंग उदकीं रक्षिले ॥ ”**

“श्रीरामचंद्रानें सेतुबंधनकालीं पाण्यावर जसे पाषाण तारले त्याप्रमाणें त्यानें तुकोबांचे अभंगही पाण्यांत रक्षिले,” असें रामेश्वरभट्ट स्पष्ट सांगतात. तेराव्या दिवशीं वह्या पाण्याच्या पृष्ठभागावर येऊन तरंगूं लागल्या ही महीपतींनीं दिलेली माहिती खरी आहे हें रामेश्वरभट्टांच्या या साक्षीवरून सिद्ध होतें. तात्पर्य, कांहीं तरी चमत्कार होऊन, तुकारामबुवांवर पांडुरंगाची पूर्ण कृपा आहे याबद्दल त्यांच्या सर्व आक्षेपकांची खात्री झाली, तेव्हांच रामेश्वरभट्टांसारखा महाविद्वान्

ब्राह्मण त्यांचा शिष्य झाला. येरवीं असें होणें अगदीं असंभवनीय होय. रंगनाथादि तत्कालीन इतर संतांनींही 'तुकोबांच्या वह्या देवानें पाण्यांत कोरड्या राखल्या," या चमत्काराचा उल्लेख आपल्या कवितेंत केलेला आहे. तेव्हां आतां हा चमत्कार घडला हें तर नक्की ठरलें, पण तो कसा घडला असेल याचाही थोडासा विचार केला पाहिजे. देव, आपल्या भक्तांवर संकट आलें म्हणजे त्या संकटांतून त्यांना सोडविण्यासाठीं, आपल्या कर्तुमकर्तुम् अन्यथाकर्तुम् शक्तीच्या जोरावर सकृद्दर्शनीं निसर्गाच्या नियमाविरुद्ध दिसणारी अशी एखादी गोष्ट करून दाखवितो, तिला आपण चमत्कार म्हणतों. कर्तुमकर्तुम् अन्यथा कर्तुम् असा जो परमात्मा त्याच्याशीं सारूप्य पावलेल्या संतांच्या अंगींही, लोहचुंबकन्यायानें, तसें थोडेंसें सामर्थ्य उत्पन्न होत असतें व प्रसंगविशेषीं, लोकसंग्रहबुद्धीनें, त्या सामर्थ्याचा उपयोग ते करीत असतात. या सामर्थ्याला 'सिद्धि' असें नांव असून या सिद्धींचें सविस्तर वर्णन ज्ञानेश्वरमहाराजांनीं आपल्या ज्ञानेश्वरींत व एकनाथांनीं आपल्या भागवतांत केलेलें आहे. कांहीं विशिष्ट नियम कडक रीतीनें पाळून मनुष्यानें दैवी शक्ति संपादन केली म्हणजे तो केवळ आपल्या इच्छाशक्तीनें, सामान्य लोकांस असंभाव्य वाटणाऱ्या गोष्टी सहजासहजीं करून दाखवितो व आपणांस त्यांचा उलगडा होत नाहीं, म्हणून त्यांना आपण चमत्कार म्हणतों. तुकाराम-बुवांच्या वह्या तेरा दिवस पाण्यांत ठेवल्या असतांही कोरड्या राहिल्या हा चमत्कार जर घडला नसता, तर आरंभीं तुकोबांस शासन करावयास निघालेला रामेश्वरभट्टांसारखा पहिल्या प्रतीचा विद्वान् ब्राह्मण, बुवांसारख्या शूद्राचा शिष्य खात्रीनें झाला नसता. अर्थात् चमत्कार घडला हीच गोष्ट मान्य करणें भाग आहे. ह्या शास्त्रीय प्रश्नाचें याहून अधिक विवेचन करण्याचें हें स्थल नव्हे. मात्र एका आक्षेपाचा थोडासा विचार करणें जरूर आहे. संत चमत्कार करतात आणि गारुडीही चमत्कार करतो, मग त्या दोघांत अंतर काय, असा एक प्रश्न, वेड घेऊन पेडगांवास जाणारे लोक मोठ्या साळसूदपणानें विचारीत असतात. अशा लोकांच्या या प्रश्नास काय उत्तर द्यावयाचें ? पण मी त्यांना अत्यंत नम्रतापूर्वक असें विचारतों कीं, संतांचे चमत्कार किंवा संतांसाठीं देवानें केलेले चमत्कार आणि गारुड्याचे चमत्कार हे एकाच कोटींतले आहेत असें तुमचें

खरोखरच प्रामाणिक मत आहे कीं विनाकारण कांहीं तरी वितंडवाद घालावयाचा येवढ्यासाठींच हा आक्षेप तुम्ही पुढें आणीत असतां ? अत्यंत अमंगल रीतीनें राहणारा गारुडी आपल्या टिचभर पोटाची खळगी भरण्यासाठीं ढोलकें बडवून निव्वळ हातचलाखीनें आणि क्वचित् नजरबंदीनें जे खेळ करून दाखवितो, त्यांच्याशीं तुकारामबुवांसारख्या महासाधूंच्या चमत्कारांची तुलना करून "श्वा युवा मघवा" प्रमाणें त्यांची एकाच कोटींत गणना करणें म्हणजे शंभर नंबरी सुवर्ण आणि सोनपितळ यांना एकाच मोलानें मोजण्यासारखें आहे. गारुड्यानें केलेले रुपये इतके अल्पायुषी असतात कीं ते त्याचे त्यालाही उपयोगीं पडत नाहींत आणि तुकारामबुवांचे, पाण्यांत कोरडे राहिलेले अभंग आज अडीचशें वर्षें आपल्या उपयोगीं पडत आहेत व पुढेंही अनंत कालपर्यंत ते महाराष्ट्रीयांच्या उपयोगीं पडणार आहेत. तो जर, गारुड्याच्या प्रयोगाप्रमाणें नजरबंदीचा प्रयोग असता तर, गारुड्याच्या पुष्पफलयुक्त आम्रवृक्षाप्रमाणें बुवांच्या वह्या, लोकांच्या दृष्टीस क्षणभर कोरड्या दिसून, कांहीं वेळानें त्या भिजून आणि कुजून गेलेल्या दिसल्या असत्या. असो. असल्या बाष्कळ आक्षेपास याहून अधिक महत्त्व देण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

खुद्द बुवांनीं मात्र असें स्पष्ट सांगितलें आहे कीं "माझ्या स्वतःच्या अंगीं चमत्कार करण्याचें सामर्थ्य नाहीं." ते एका अभंगांत देवास म्हणतातः—

"कपट कांहीं एक। नेणें भुलवायाचें लोक ॥
तुमचें करितों कीर्तन। गातों उत्तम ते गुण ॥
दाऊं नेणें जडीबुटी। चमत्कार उठाउठी ॥
नाहीं शिष्यशाखा। सांगों अयाचित लोकां ॥
नव्हें मठपति। नाहीं चाहुरांची वृत्ति ॥
नाहीं देवार्चन। असे मांडिलें दुकान ॥
नाहीं वेताळ प्रसन्न। कांहीं सांगों खाणखूण ॥
नव्हें पुराणिक। करणें सांगणें आणीक ॥
नेणें वाद घटापटा। करितां पंडित करंटा ॥
नाहीं जाळीत भणदीं। उदो म्हणोनी आनंदी ॥

नाहीं हालवीत माळा । भोंवतें मेळवुनि गबाळा ॥
आगमींचें कुडें नेणें । स्तंभन मोहन उच्चाटणें ॥
नव्हे यांच्या ऐसा । तुका निरयवासी पिसा ॥"

'मला उठाउठी चमत्कार करतां येत नाहींत,' असें वरील अभंगांत बुवा स्पष्ट सांगतात, पण त्यामुळें, भक्तासाठीं भगवंत चमत्कार करतो या माझ्या म्हणण्यास बाध येत नाहीं. भक्तांसाठीं देव अशक्य गोष्टीदेखील करून दाखवितो अशा अर्थाचे उद्गार बुवांनीं अनेक वेळां काढले आहेत. 'अशक्य तों तुम्हा नाहीं नारायणा । निर्जीवा चेतना आणावया' या पुढें उद्धृत केलेल्या अभंगांत, "सान्दीपनीचा मुलगा कृष्णानें परत आणून दिला वगैरे ज्या पौराणिक गोष्टी आम्ही ऐकतों तशा प्रकारच्या गोष्टी आजही आमच्या दृष्टीस कां पडूं नयेत ?" असा प्रश्न करून 'तुका म्हणे माझे निववावे डोळे । दावूनी सोहळे सामर्थ्याचे' अशी प्रभूची विनवणी बुवांनीं केली आहे. यावरून आपल्या 'भक्ताचे डोळे निवविण्यासाठीं' त्याच्या शब्दास मान देऊन देव अलौकिक गोष्टी करून दाखवितो असा तुकोबांचा पूर्ण विश्वास होता हें स्पष्ट दिसतें. आपल्या वह्या इंद्रायणीच्या डोहांत तेरा दिवसपर्यंत कोरड्या राहिल्या हा देवानें आपल्यासाठीं एक चमत्कारच केला अशीच बुवांची समजूत होती. असो.

चालू प्रकरणाच्या आरंभीं, तुकारामबुवांनीं आपल्या वह्या रामेश्वरभट्टांच्या आज्ञेवरून बुडविल्या असें विधान महिपतींच्या लेखाधारें मी केलें आहे. परंतु 'जनांचिया बोलासाठीं चित्त क्षोभविलें,' या तुकोबांच्या उद्गारांवरून व 'अलकापुरीं कीर्तनांत लोकांनीं कवित्वाचा निषेध केला, तेव्हां कवित्व बुडवून पांच दिवस होते,' ह्या गाथ्यांतील मथळ्यावरून, रामेश्वरभट्टांप्रमाणें इतर लोकांकडूनही या अभंगरचनेच्या बाबतींत बुवांस बराच उपसर्ग पोंचला असावा असें वाटतें. या त्रासानें ते इतके वैतागलेले दिसतात कीं 'आतां यापुढें लेखणी हातीं धरणार नाहीं,' असादेखील निश्चय एका अभंगांत त्यांनीं केला आहे—

" आतां नेम जाला । याच कळसीं विठ्ठला ॥
हातीं न धरीं लेखणी । काय भुसकट ते वाणी ॥

जाणें तेणें काळ । उरला सारीन सकळ ॥
तुका म्हणे घाटी । चाटूं कोरडा शेवटीं ॥ ''

आणि देवानें त्यांच्या अभंगांचें रक्षण करून त्यांचें कवित्व आपणास मान्य असल्याचें जर व्यक्त केलें नसतें तर हा नियम बुवांनीं खात्रीनें पाळला असता. वास्तविक पाहिलें तर, काव्यरचना करणारे तुकारामबुवा हेच कांहीं महाराष्ट्रांतले पहिले ब्राह्मणेतर संत नव्हते; कारण त्यांच्यापूर्वी नामदेव, जनी, गोरा कुंभार, सांवता माळी, चोखामेळा वगैरे ब्राह्मणेतर संतांनीं पुष्कळ कविता केली होती व ती महाराष्ट्रांत लोकप्रियही झाली होती. असें असतां, तुकोबांच्याच कवित्वावर त्या वेळच्या कांहीं लोकांनीं एवढा गहजब कां केला असावा हें कांहीं समजत नाहीं. असो.

तुकारामबुवांच्या अभंगांच्या वह्या पाण्यांतून बाहेर काढल्यावर लोकांनीं त्या घरोघर नेल्या असें महीपतींनीं म्हटलें आहे. बुवांच्या हातच्या सगळ्या वह्या बुवांच्या वंशजांच्या संग्रहीं नसण्याचें मुख्य कारण हेंच दिसतें. शिवाय बुवांनीं लिहिलेल्या ८।१० हजार अभंगांपैकीं फक्त ४।५ हजार अभंग शिल्लक राहून बाकीचे चार-पांच हजार नष्ट झाले याचेंही कारण हेंच असलें पाहिजे. तुकारामाच्या अभंगांचें पाण्यांत देवानें रक्षण केलें ही वार्ता सर्व देशभर पसरून बुवांच्या साधुत्वाची सर्वत्र मोठी कीर्ति झाली.

इकडे, रामेश्वरभट्ट आळंदी येथें आपल्या अंगाचा दाह शांत व्हावा म्हणून ज्ञानोबांच्या समाधीपुढें धरणें देऊन बसले होते हें मागें सांगितलेंच आहे. त्यांस ज्ञानोबांनीं दृष्टांत देऊन आज्ञा केली कीं, " भक्तश्रेष्ठ तुकाराम याची तुजकडून निंदा घडल्यामुळें तुझी पुण्याई नष्ट झाली; व त्यामुळें हें दुःख तुला भोगावें लागत आहे. तरी तूं आतां, सद्भाव धारण करून तुकोबांस शरण जा म्हणजे ही तुझी व्यथा दूर होईल, इतकेंच नव्हे तर तुझा भवरोगही दूर होईल. " खुद्द ज्ञानदेवमहाराजांनींच असा दृष्टांत दिल्यावर, तुकारामबुवांची खरी योग्यता काय आहे हे रामेश्वरभट्टांच्या लक्षांत आलें आणि अशा थोर सत्पुरुषाचा आपण अपमान केला याबद्दल त्यांना

पश्चात्ताप झाला. मग त्यांनीं तुकोबांस एक पत्र लिहून तें आपल्या एका शिष्याबरोबर देहूस त्यांजकडे पाठविलें. शिष्यानें तुकोबांस पत्र देऊन सविस्तर हकीकत त्यांस सांगितली. ती ऐकून तुकोबांस रामेश्वरांची दया आली. मग त्यांनीं एक अभंग रचून तो त्याच शिष्याबरोबर भट्टजींकडे पाठविला. हा अभंग येणेंप्रमाणें:—

> **" चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती । व्याघ्र ते न खाती सर्प तया ॥**
> **विष तें अमृत आघात तें हित । अकर्तव्य नीत होय त्यासी ॥**
> **दुःख तें देईल सर्व सुख फळ । होतील शीतळ अग्निज्वाळा ॥**
> **आवडेल जीवां जीवाचिये परी । सकळां अंतरीं एक भाव ॥**
> **तुका म्हणे कृपा केली नारायणें । जाणिजेते येणें अनुभवें ॥ "**

हा अभंग रामेश्वरांच्या हातांत पडतांच ते तो वाचूं लागले. वाचतां वाचतां 'होतील शीतळ अग्निज्वाळा' हे शब्द उच्चारल्याबरोबर त्यांचा दाह शांत झाला ! साधूंच्या शब्दांत हें असें दिव्य सामर्थ्य असतें. त्यांचे सामान्य शब्दही मंत्ररूप असतात. दाह शांत होतांच रामेश्वरभट्ट तत्काल देहूस आले आणि तुकोबांस साष्टांग नमस्कार घालून म्हणाले, " तुमची योग्यता न जाणतां म्या पामरानें तुम्हास आपलें कवित्व बुडविण्यास सांगितलें. जगदुद्धारार्थ कलियुगीं आपला अवतार आहे हें न जाणून आम्ही तुमचा विनाकारण छल केला. तरी आमच्या या घोर अपराधाबद्दल तुम्ही आम्हास क्षमा करावी. " तुकोबा म्हणाले, " महाराज, हें काय बोलतां ? मी हीन यातीचा एक क्षुद्र मनुष्य आहें. आपलीच कृपा मजवर निरंतर असावी अशी माझी विनंति आहे. " रामेश्वरभट्ट म्हणाले, " तुम्ही जो अभंग लिहून पाठविला तोच आपला अनुग्रह असें समजून मी आतां तुमचा शिष्य झालों आहें. आतां यापुढें आपल्या समागमांतच मी राहणार; पुनः वाघोलीस जाण्याचा माझा विचार नाहीं. " असा निश्चय करून रामेश्वरभट्ट पुढें देहूसच कायमचे राहिले, आणि त्यांनीं आपलें शेष आयुष्य बुवांच्या सहवासांत घालविलें.

पांडुरंगानें इंद्रायणीच्या डोहांत बुवांच्या अभंगांच्या वह्या कोरड्या राखल्या आणि तुकोबांच्या कृपेनें रामेश्वरभट्टांचा दाह शांत झाला या दोन्ही

चमत्काराविषयीं खुद्द रामेश्वरभट्टांचें म्हणणें काय आहे तें येथें देऊन हें प्रकरण पुरें करितों. भट्ट म्हणतातः—

“ माझी मज आली रोकडी प्रचीत । होऊनि फजित दुःख पावें ॥
कांहीं द्वेष त्याचा करितां अंतरीं । व्यथा या शरीरीं बहुत जाली ॥
ज्ञानेश्वरें मज केला उपकार । स्वप्नीं सविस्तर सांगितलें ॥
तुका सर्वश्रेष्ठ प्रिय आम्हां थोर । कां जे अवतार नामयाचा ॥
त्याची तुज कांहीं घडली रे निंदा । म्हणोनि हे बाधा घडली तुज ॥
आतां एक करीं सांगेन तें तुला । शरण जाईं त्याला निश्चयेंसी ॥
दर्शनेंचि तुझ्या दोषा परिहार । होय तो विचार सांगितला ॥
तोचि हा विश्वास धरूनि मानसीं । जाय कीर्तनासी नित्यकाळ ॥
म्हणे रामेश्वर त्याच्या समागमें । जालें हें आराम देह माझें ॥ ”

तुकाराम तुकाराम । नाम घेतां कांपे यम ॥
धन्य तुकोबा समर्थ । जेणें केला पुरुषार्थ ॥
जळीं दगडासहित वह्या । तारियेल्या जैशा लाह्या ॥
म्हणे रामेश्वर भट्ट द्विजां । तुका विष्णु नाहीं दुजा ॥ ”

आतां, हे अभंग रामेश्वरभट्टांचे नसून, तुकोबांचें स्तोम माजवूं इच्छिणाऱ्या कोणी तरी त्यांच्या सांप्रदायिकानें ते स्वतः रचून भट्टांच्या नांवावर दडपून दिले असले पाहिजेत असा आक्षेप कोणी घेतला नाहीं म्हणजे मिळविली !

बुवांची कविता बुडविण्याच्या या कल्पनेवरून असा मात्र एक विचार मनांत येतो कीं बऱ्याचशा अर्वाचीन कवींची बरीचशी कविता बुडविण्याच्या लायकीची असूनही ती कोणी कां बुडवीत नाहीं ! रामेश्वरभट्टांनीं बुवांच्या कवितेवर जो प्रयोग केला तोच प्रयोग जर महाराष्ट्र-साहित्य-संमलेनाकडून कांहीं अर्वाचीन कवींच्या कवितेवर अगदीं आरंभापासूनच केला गेला असता तर लोकांच्या मागचा किती तरी त्रास खचित वांचला असता. तुकोबांची कविता त्यांच्या आक्षेपकांच्या इच्छेप्रमाणें जर खरोखरच नष्ट झाली असती तर महाराष्ट्रवाङ्मयाची केवढी हानि झाली असती याची नुसती कल्पना-देखील अंगावर रोमांच उभे करिते. जुन्या मराठी वाङ्मयांतील अगदीं

स्वतंत्र सुंदर कवितेचा नमुना म्हणजे तुकोबांची कविता होय. तीच नष्ट झाल्यावर तिची जागा भरून काढण्याचें सामर्थ्य कोणत्या कवीच्या अंगीं होतें ? तुकोबांच्या कालानंतर पेशवाईच्या अखेरीपर्यंत लहान मोठे शेंदोनशें कवि महाराष्ट्रांत होऊन गेले असतील, परंतु तुकोबांच्या कवितेच्या तोलाची कविता त्यांतल्या एकाही कवीस निर्माण करतां आली नाहीं व त्यामुळें "अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची" हा रामचंद्र बडव्यांसारख्या रसिकानें दीडशें वर्षांपूर्वी मारलेला शेरा अद्याप कायम आहे. अशी ही नितांत सुंदर आणि महाराष्ट्रवाङ्मयास ललामभूत असलेली कविता नष्ट करून टाकण्याची क्लृप्ति ज्यांच्या सुपीक डोक्यांतून निघाली असेल त्यांच्या गाजरपारखीपणाची तारीफ करावी तेवढी थोडीच होईल. आदिकवि मुकुंदराज यांच्या वेळेपासून आजपर्यंतच्या सातशें वर्षांत असा दुर्धर प्रसंग दुसऱ्या कोणत्याही कवीवर आला नाहीं. कोणाची कविता जळाली, कोणाची चोरीस गेली, पण कोणाचीही कविता मुद्दाम नष्ट करण्याचा प्रयत्न कधीं झाला नाहीं. इंद्रायणीच्या डोहांत तुकोबांची कविता सुरक्षित ठेवून, महाराष्ट्राचा देव जो पांडुरंग त्यानें महाराष्ट्रावर खरोखर हे मोठे उपकार केलेले आहेत. महाराष्ट्रानें ते विसरूं नयेत म्हणजे झालें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ३८८८५ दि: ५/१२/२८-९-५५
क्रमांक २२८९ नों: वि:प्रकरण २० वें


## आणखी कांहीं आख्यायिका

रामेश्वरभट्ट यांस आपण जो शाप दिला होता त्या शापाचें मोचन तुकोबांनीं केलें हें वर्तमान पुण्यांत अनगडशहास कळतांच तो म्हणाला, "रामेश्वरभट्टास मी शाप दिलेला असतां, तो मला शरण न येतां तुकोबाकडे गेला आणि त्यानें त्याच्या अंगाचा दाह शांत केला, तर असा हा तुकोबा आहे तरी कोण आणि त्याचें सामर्थ्य तरी काय आहे हें एकदां पाहिलें पाहिजे." असा विचार करून तो देहूस जाण्यास निघाला. वाटेंत त्याला चिंचवड गांव लागला, तेथें गणपतीचे उपासक चिंतामणि देव रहात होते हें पूर्वीं सांगितलेंच आहे. त्यांच्या घरीं जाऊन फकीरानें भिक्षा मागितली. "आपल्या हातांत जो कटोरा आहे तो धान्यानें भरून मिळाला पाहिजे," असें तो म्हणाला. देवांच्या कारभाऱ्यानें त्याच्या कटोऱ्यांत भिक्षा घातली पण कितीही धान्य टाकलें तरी तो कटोरा भरेना! कारभाऱ्यानें ती गोष्ट चिंतामणिदेवांस कळविली तेव्हां ते म्हणाले, "घरांत असेल तेवढें सगळें धान्य कटोऱ्यांत घाला, पण अतिथि विन्मुख दवडूं नका." शेवटीं घरांतलीं धान्याचीं पेंवें खोललीं तरी फकीराचा कटोरा भरेना. तेव्हां चिंतामणिदेवांनीं मूर्तिमंत सिद्धि निर्माण केली व तिच्या हातून कटोऱ्यांत धान्य टाकविलें तेव्हां तो कटोरा भरला! मग अनगडशहा तेथून देहूस गेला आणि तुकोबांच्या घरीं जाऊन आवलीस म्हणाला, "माई, माझा हा कटोरा पिठानें भरून द्या." आवली स्वयंपाकांत गुंतली होती; तिनें जेव्हां फकीराचे हे शब्द ऐकले तेव्हां ती कडाडली, "कोण ग मेला आला आहे बाहेर? धटिंगण मेले! या मेल्यांनीं

१ तुकोबांचे वंशज गोपाळबावा यांनीं ही कथा एका प्रकरणांत सांगितली आहे. त्यांनीं या संबंधानें दिलेली माहिती थोडीशी निराळी आहे ती अशी:— अनगडशहाचा कटोरा धान्यानें भरेना, तेव्हां चिंतामणिदेवांनीं मूर्तिमंत सिद्धि तेथें उभी केली. परंतु अनगडशहानें एका क्षणांत तिचें विसर्जन केलें! फकीराचें हें सामर्थ्य पाहून देवांनीं त्याचा सन्मान केला व नंतर तो देहूस जाण्यास निघाला.

अगदीं डोकें उठविलें!" आवलीची अशी गर्जना चालली आहे तों तिची धाकटी मुलगी गंगू ही चिमूटभर पीठ घेऊन फकीरास देण्यास निघाली. तें पाहून आवली तिच्या हातास झोंबली. त्या झोंबाझोंबींत त्यांतलें कांहीं पीठ जमिनीवर सांडलें. उरलेलें थोडेंसें पीठ गंगूनें फकीराच्या कटोऱ्यांत नेऊन घातलें तों तेवढ्याच पिठानें त्याचा कटोरा तोंडोतोंड भरून निघाला! अनगडशहाला मोठें आश्चर्य वाटलें. मग तो मुलीस विचारतो, "तुकोबा हें तुझेंच नांव काय?" हें ऐकून गंगूस हसूं आलें. ती म्हणाली, "असें वेड्या-सारखें भलतेंच काय विचारतोस? तुकोबा हें पुरुषाचें नांव आहे, स्त्रीचें नाहीं. माझ्या वडिलांचें नांव तुकोबा; ते सकाळींच स्नान करून देवळांत जाऊन बसले आहेत." हें ऐकून फकीर देवळाकडे गेला व त्यानें बाहेरूनच तुकोबांस निरखून पाहिलें. त्यावरून त्याची खात्री झाली कीं हा महासाधु आहे खरा. मग त्यानें निरभिमानपणें बुवांस साष्टांग नमस्कार घातला व तेथें दोन दिवस मुक्काम करून तुकोबांचें कीर्तन त्यानें ऐकलें. दोन्ही दिवस कीर्तनांत तो बसला नाहीं, सारखा उभा राहून कीर्तन ऐकत होता. तिसरे दिवशीं बुवांचा निरोप घेऊन तो पुण्यास गेला.

तुकोबांच्या कीर्तनास लांबलांबचे शेंकडों लोक येत असत; त्यांत एक स्त्री येत असे. ती रूपानें फार सुंदर होती. एके दिवशीं कीर्तन संपल्यावर ती बुवां-पाशीं एकांतीं येऊन त्यांस म्हणाली, "महाराज, तुमचा माझा समागम व्हावा अशी माझी फार इच्छा आहे, तरी ती तुम्ही पूर्ण केली पाहिजे!" बाईचें हें विचित्र भाषण ऐकून तुकोबांच्या अंगावर शहारे आले. त्यांनीं तिला समजावून सांगितलें, "बाई, हा भलताच विचार तुझ्या मनांत कोठून आला? आम्ही विष्णुदास असल्या भानगडींत पडणारे नव्होंत. माझे आई, असलें वाईट भाषण तूं करूं नकोस; तुझें हें पतन माझ्यानें पाहवत नाहीं. तुला जर कोणी तरी पुरुष पाहिजेच असेल तर गांवांत इतर लोक काय थोडे आहेत?" या प्रसंगांस अनु-लक्षून लिहिलेले दोन अभंग गाथ्यांत आहेत ते येणेंप्रमाणें :—

"पराविया नारी रखुमाईसमान। हें गेलें नेमून ठायींचेंचि ॥
जाई वो तूं माते न करीं सायास। आम्हीं विष्णुदास नव्हों तैसे ॥

न सहावे मज तुझें हें पतन । नको हें वचन दुष्ट वदों ॥
तुका म्हणे तुज पाहिजे भ्रतार । तरी कां इतर लोक थोडे ॥

स्त्रियांचा तो संग नको नारायणा । काष्ठा या पाषाणा मृत्तिकेच्या ॥
नाठवे हा देह न घडे भजन । लाचावलें मन आवरेना ॥
दृष्टिमुखें मरण इंद्रियांच्या द्वारें । लावण्य तें खरें दुःखमूळ ॥
तुका म्हणे जरी अग्नि जाला साधु । परि पावे बाधू संघट्टणें ॥ ”

तुकोबांसारख्या परम वैराग्यशील सत्पुरुषाकडे असली याचना करण्याची बुद्धि त्या बाईस कशी काय झाली असेल कोण जाणे. गांवांतल्या कुटाळ लोकांनीं तुकोबांच्या वैराग्याची कसोटी पाहण्यासाठीं कदाचित् हा डाव मुद्दाम रचला असेल; किंवा तुकोबांसारख्या सत्पुरुषाचा समागम झाल्यानें आपला उद्धार होईल अशी त्या बाईचीच कदाचित् समजूत असेल. हरिदासांच्या नादीं लागून त्यांचें आणि स्वतःचें पतन घडवून आणणाऱ्या स्त्रिया जर अद्याप आढळतात, तर अडीचशें वर्षांपूर्वींच्या एखाद्या भोळ्या स्त्रीच्या मनांत असली कल्पना येणें असंभवनीय नाहीं. असो. त्या बाईचें नशीब मोठें म्हणून ही गोष्ट आवलीस कळली नाहीं, नाहीं तर तिची कांहीं धडगत नव्हती ! सत्पुरुषाशीं समागम झाल्यानेंच उद्धार होणें शक्य असतें तर बिचाऱ्या आवलीचाहि झाला असता. पण तसा झालेला दिसत नाहीं. यावरून तरी लोकांनीं सावध व्हावें व या असन्मार्गापासून परावृत्त व्हावें.

लोहगांव येथील गांवकऱ्यांच्या आग्रहावरून बुवा पूर्वी एकदां त्या गांवीं महिनाभर जाऊन राहिले होते हें पूर्वीं सांगितलेंच आहे. त्यानंतर पुनः एकदां त्या गांवच्या लोकांनीं बुवांस आपल्या गांवीं नेलें. बुवांबरोबर रामेश्वरभट्ट, कान्होबा, गंगाजी मवाळ, संताजी तेली वगैरे त्यांचे अनुयायी होते. लोहगांवांतील प्रत्येक मनुष्यानें यथाशक्ति ब्राह्मणभोजन घालून बुवांचें कीर्तन करविलें. परंतु त्या गांवांत शिवजी कांसार या नांवाचा एक मनुष्य मोठा दुष्ट, कुटिल, निंदक आणि कृपण होता. तो तुकोबांच्या कीर्तनास कधीं जात नसे. म्हणून एके दिवशीं बुवांनीं त्याला बोलावून आणण्यास एक मनुष्य पाठविला. पण बुवांच्या निरोपास मान देऊन तो आला तर नाहींच, पण उलट



ग्रं. क्र. : ५२६५

अपशब्द उच्चारून बुवांची त्यानें अवहेलना केली. इकडे आळंदीस, एक ब्राह्मण, आपलें दहा हजार रुपयांचें कर्ज फिटावें म्हणून ज्ञानदेवांच्या समाधीजवळ [1]धरणें देऊन बसला होता. सहा महिन्यांनंतर त्याला तेथें असा दृष्टांत झाला कीं "तूं तुकोबास भेट म्हणजे तो तुझें कर्ज फेडील." त्याप्रमाणें, देहूस येऊन त्या ब्राह्मणानें ती हकीकत तुकोबांस सांगितली. तेव्हां त्यांनीं लोहगांवांतील लोकांस सांगितलें कीं "शिवजी कांसाराकडे जाऊन आणि त्याला भीड घालून, तो जें काय देईल तें घेऊन या." शिवजी कांसार कवडीदेखील देणार नाहीं हें लोकांस ठाऊक होतें, परंतु तुकोबांच्या शब्दास मान देऊन ते शिवजीकडे गेले आणि मोठ्या खटपटीनें त्याजकडून त्यांनीं एक ढबू पैसा आणून तो तुकोबांच्या हातीं दिला. मग तुकोबांनीं रस्त्यांतला एक खडा उचलून त्या ढबू पैशास घांसला, त्याबरोबर तो ढबू सोन्याचा झाला! तें सोनें ब्राह्मणास देऊन बुवांनीं त्याला आपलें कर्ज फेडण्यास सांगितलें. तेव्हां ब्राह्मण म्हणाला, "एवढ्याश्या सोन्यानें दहा हजारांचें कर्ज फिटेल काय?" तुकोबा म्हणाले, "तर मग तुमच्या-पाशीं तांब्याची कांहीं वस्तु असेल तर काढा."

बुवांनीं सांगितल्याप्रमाणें ब्राह्मणानें आपल्या गवाळ्यांतून तांब्याचीं पूजेचीं उपकरणीं काढून तीं बुवांकडे दिलीं. बुवांनीं त्याला तो खडा लावून त्यांचें सोनें केलें व तें ब्राह्मणास दिलें. ब्राह्मण संतुष्ट होऊन आळंदीस गेला. बुवांनीं तो खडा विहिरींत फेंकून दिला. शिवजी कांसारास जेव्हां हें वर्तमान समजलें तेव्हां, तुकोबांपाशीं परीस आहे अशी त्याची समजूत होऊन तो त्यांच्या भजनीं लागला. बुवांची कृपा संपादन करून परीस मिळवावा आणि श्रीमंत व्हावें असा त्याचा विचार होता. एक वर्ष बुवांच्या सहवासांत राहून त्यांचें कीर्तन शिवजीनें ऐकलें. पुढें अशी मौज झाली कीं, मुंबईहून

---

१ जरा कांहीं संकट आलें कीं आळंदीस जाऊन ज्ञानोबांच्या दारीं धरणें धरून बसावयाचें ही त्या वेळीं एक चालच पडून गेली होती असें दिसतें. ज्ञानेश्वरीचा अर्थ आपणास कळावा या हेतूनें साखरेबुवांच्या एका पूर्वजानें आळंदीस असेंच धरणें घेतलें होतें अशी आख्यायिका आहे.

कथील आणण्यासाठीं त्यानें छत्तीस बैल पाठविले होते, ते परत आल्यावर त्यांच्या पाठीवरील गोण्या तपासून पाहतां त्यांत कथील नसून रुपें आहे असें आढळून आलें. मुंबईच्या व्यापाऱ्यानें चुकीनें कथलाच्या ऐवजीं रुपें पाठविलें असेल या समजुतीनें आपल्या नोकराबरोबर त्यानें तें रुपें परत मुंबईस पाठविलें. मुंबईच्या व्यापाऱ्यानें आपला हिशोब वगैरे तपासून पाहिला व सांगितलें कीं, "आमच्याकडून कांहीं चूक झालेली नाहीं. तुम्ही आपला माल घेऊन जा." नोकरांनीं बैल परत देहूस आणले आणि रुपें शिवजी कांसाराच्या स्वाधीन केलें. हजारों रुपये किंमतीचें तें रुपें पाहून शिवजी कांसारास आश्चर्य वाटलें. मग त्यानें बुवांस विचारलें कीं "या एवढ्या पैशाचें मी काय करूं?" बुवा म्हणाले, "तुझ्या दैवानें हें द्रव्य तुला प्राप्त झालें आहे, तर त्याचा कांहीं तरी सद्व्यय कर." मग शिवजीनें ते पैसे खर्चून एक मोठी विहीर बांधली ती "कांसारविहीर" या नांवानें अद्याप प्रसिद्ध आहे. शिवाय त्यानें अनेक ब्राह्मण-भोजनें घातलीं. पुढें शिवजीनें घरदार सोडून वैराग्य धारण केलें आणि तो तुकोबांपाशीं येऊन राहिला.

शिवजी कांसार विरक्त होऊन तुकोबांच्या भजनीं लागल्यामुळें त्याची बायको तुकोबांचा फार द्वेष करूं लागली. ह्या तुक्यानें माझ्या नवऱ्यास वेड लावून माझ्या संसाराचें वाटोळें केलें असें म्हणून बुवांचा सूड उगविण्याची संधि ती पाहूं लागली. एके दिवशीं तिनें मोठ्या आग्रहानें बुवांस आपल्या घरीं बोलावलें आणि चार हांडे आधणाचें पाणी स्नानाच्या मिषानें त्यांच्या अंगावर ओतलें! बुवांचें सगळें अंग पोळून निघालें. त्यांनीं एक अभंग म्हणून पांडुरंगाचें स्मरण केलें तेव्हां त्यांचें दुःख कमी झालें. हा अभंग असाः—

**"जळे माझी काया लागला वोणवा। धांव रे केशवा मायबापा॥**
**पेटली सकळ कांति रोमावळी। नावरे हे होळी दहन जालें॥**
**फुटोनियां दोन्ही भाग होऊं पाहे। पहातोसी काय हृदय माझें॥**
**घेऊनी जीवन धांवें लवलाहीं। कवणाचें कांहीं न चले येथें॥**
**तुका म्हणे माझी होसी तूं जननी। आणीक निर्वाणीं कोण राखे॥"**

अशा रीतीनें बुवांचें स्नान झाल्यावर ते भोजनास बसले. शिवजीच्या बायकोनें जेवणांत सोमल घातला होता, परंतु बुवांच्या प्रकृतीवर त्याचा कांहींच परिणाम झाला नाहीं. उलट, तिलाच कृतकर्मांचें प्रायश्चित्त भोगावें लागलें. तिच्या अंगास तत्काळ कोड फुटलें ! शिवजी कांसार घरीं येऊन पाहतो तों बायको दुःख करीत बसली आहे. इतक्यांत दारांतल्या मंडपास पुष्पहार अडकवला होता तो त्याच्या दृष्टीस पडला. बुवा रात्रौ कीर्तन करीत होते त्या वेळीं त्यांच्या गळ्यांत घातलेला हा हार आहे हें त्यानें ओळखलें व त्यावरून, आपल्या बायकोनें कांहीं तरी निमित्तानें बुवांस घरीं आणून त्यांचा छळ केला असावा व त्यामुळेंच हिला कोड फुटलें असावें असा त्यानें तर्क केला. मग रामेश्वरभट्टांनीं असा उपाय सुचविला कीं ज्या जागीं बुवांनीं स्नान केलें त्या जागचा चिखल हिच्या अंगास लावावा, म्हणजे हिची पीडा दूर होईल. मग शिवजी कांसारानें तो उपाय करतांच त्याच्या बायकोस आराम वाटला, व तीही तुकोबांचें कीर्तन भक्तिभावानें श्रवण करूं लागली.

लोहगांवांत बुवांचा मुक्काम असतां तेथील एक भाविक मनुष्य रोज रात्रौ त्यांच्या कीर्तनास अगदीं नियमानें येत असे. घरांत त्याचें मूल फार आजारी होतें तें एके दिवशीं मरणोन्मुख झालें असतांही तो कीर्तनास आला व इकडे तें मूल मरण पावलें. तेव्हां त्याची बायको मुलाचें प्रेत घेऊन कीर्तनांत आली आणि तें प्रेत बुवांपुढें ठेवून त्यांस म्हणाली, "माझ्या नवऱ्यास तुमच्या कीर्तनाचें वेड लागल्यामुळें, मुलाची वास्तपुस्त न करतां तो येथें येऊन बसला आणि तिकडे माझें मूल मरण पावलें !" कीर्तनांत हा विक्षेप झालेला पाहून श्रोते उद्विग्न झाले व बुवांसही वाईट वाटलें. मग त्यांनीं तेथल्या तेथें एक अभंग रचून भगवंताचा धांवा केला. ते म्हणाले:—

"अशक्य तों तुम्हा नाहीं नारायणा । निर्जीवा चेतना आणावया ॥<br>
मागें काय जाणों स्वामीचे पवाडे । आतां कां रोकडे दावूं नये ॥<br>
थोर भाग्य आम्ही समर्थाचे कासे । म्हणवितों दास काय थोडें ॥<br>
तुका म्हणे माझे निववावे डोळे । दावूनी सोहळे सामर्थ्याचे ॥"

**अर्थ**—" हे नारायणा, निर्जीव वस्तूंत जीव घालणें हें कांहीं तुला अशक्य नाहीं. पूर्वीं तूं ज्या अशा प्रकारच्या गोष्टी केल्यास त्यांच्या कथा आम्ही पुराणांतरीं वाचतों, मग तोच अनुभव तूं आतांही कां दाखवूं नयेस? तुझ्यासारख्या समर्थाच्या कांसेला आम्ही लागलों असून तुझे दास म्हणवितों, हें काय थोडें झालें? तुकोबा म्हणतात, तर हे पांडुरंगा, आपल्या सामर्थ्याचा प्रताप दाखवून तूं आमचे डोळे निवव. " प्रभूची अशी प्रार्थना करून तुकोबांनीं श्रोतेमंडळीस विठ्ठलनामाचा गजर करण्यास सांगितलें. गजर सुरू होतांच तें मृत मूल चलनवलन करूं लागलें व कांहीं वेळानें साफ बरें झालें!

नावजी माळी या नांवाचा एक भाविक मनुष्य लोहगांवीं रहात असे, तो एके दिवशीं बुवांचें कीर्तन चालू असतां त्यांस म्हणाला, " तुकोबा, तुम्ही थोडीशी विश्रांति घ्या. मी तुमच्या जागीं थोडा वेळ उभा राहून भजन करतों. " बुवा म्हणाले, " ठीक आहे, कर. " मग नावजीनें चार घटकापर्यंत नृत्य करून असें प्रेमळ भजन केलें कीं शेवटीं तो थकून खालीं बसला. हा नावजी पुढें रोज फुलांचे हार तयार करून कीर्तनास येणाऱ्या ब्राह्मणांच्या गळ्यांत घालीत असे. कंबरेस धोतर बांधून तुकोबांच्या पुढें तो मोठ्या प्रेमानें नाचत असे. तो अगदींच अशिक्षित असल्यामुळें "द्वारकेचें केणें आलें याचि ठाया। पुढें भक्तराया चोजवीत," हा तुकोबांचा अभंग म्हणतांना, 'चोजवीत' च्या ऐवजीं तो 'चोदवीत' म्हणत असे. तें ऐकून तुकोबांसुद्धां सर्व श्रोते पोट धरधरून हांसत. त्यामुळें, आपल्या भजनावर मंडळी फार खूष आहे असें नावजीस वाटून तो अधिकच आवेशानें नाचूं लागे! एके दिवशीं, कीर्तनास येणारा एक ब्राह्मण तळ्यावर स्नानास गेला असतां तेथें त्याची व नावजीची गांठ पडली; तेव्हां त्यानें 'चोजवीत' बद्दल 'चोदवीत' हा ग्राम्य शब्द उच्चारल्याबद्दल नावजीची कानउघाडणी केली. नावजीस फार वाईट वाटलें व पुनः तो शब्द आपण उच्चारणार नाहीं असें त्यानें सांगितलें. पुढें तो ब्राह्मण आपल्या घरीं गेला तों त्याला बोलतां येईना. त्याची वाचा गेली. ही गोष्ट त्यानें पाटीवर लिहून रामेश्वरभट्टांस कळविली व त्यांनीं ती तुकोबांस सांगितली. इतक्यांत एका कुणब्यानें बुवांस देण्यासाठीं एक कांकडी आणली. बुवांनीं त्या कांकडीच्या चार फांकी करून त्यांतल्या तीन स्वतः खाल्ल्या, तेव्हां रामेश्वरभट्ट

म्हणाले, "आम्हालाही थोडासा प्रसाद द्यावा." बुवा म्हणाले, "तुम्हाला देण्यासारखी ही वस्तु नसल्यामुळें मी ती एकट्यानेंच खाल्ली." असें म्हणून, उरलेल्या फांकीचा अर्धा भाग त्यांनीं त्या ब्राह्मणास दिला व तो त्यानें खातांच त्याची गेलेली वाचा परत आली! अर्ध्या भागाचे तुकडे करून इतरांस दिले. तुकडा तोंडांत टाकतांच तोंड वाईट करून जो तो थुंकूं लागला, कारण कांकडी किराइतासारखी कडू होती!

सालोमालो या नांवाचा कोणी गृहस्थ होता तो बुवांच्या अभंगांत थोडीशी फिरवाफिरव करून स्वतःच्या नांवावर ते अभंग प्रसिद्ध करूं लागला. 'कवि' होण्याची "राक्षसी महत्त्वाकांक्षा" धारण करणारे हल्लींचे कांहीं तरुण तीसपस्तीस वर्षांपूर्वीच्या एखाद्या कवीची कविता उतरून काढून स्वतःच्या नांवानें ती जशी एखाद्या मासिकाकडे पाठवितात, त्यांतलाच हा प्रकार होता. अंतर एवढेंच कीं बुवांच्या हयातींतच त्यांची कविता हा सालोमालो आपल्या नांवावर प्रसिद्ध करूं लागला. त्याचें हें काव्यचौर्य जेव्हां बुवांच्या निदर्शनास आलें तेव्हां त्यांनीं आठ अभंग रचून त्याच्या या वर्तनाचा निषेध केला. त्यांतले चार अभंग नमुन्यादाखल येथें देतों:—

"सालोमालो हरिचे दास। यानीं केला अवघा नास॥
अवघें वचमंगळ केलें। म्हणती एकाचें आपुलें॥
मोडुनि संतांचीं वचनें। करिती आपणा भूषणें॥
तुका म्हणे कवि। जगामधीं रूढ दावी॥

जायांचे अळंकार। बुडवूनि होती चोर॥
त्यांसी ताडणाची पूजा। योग घडे बऱ्या वोजा॥
अभिलाषाच्या सुखें। अंतीं होती काळीं मुखें॥
तुका म्हणे बावी। मोडुनि मदार बांधावी॥

विकल तेथें विका। माती नांव ठेवुनि बुका॥
हा तो निवाड्याचा ठाव। खऱ्या खोट्या निवडी भाव॥
गऱ्हवारे हा विधि। पोट वाढविलें चिंधी॥
तुका म्हणे ज्ञान। दिमाखाची भणभण॥

नाहीं घाटावें लागत । एका सितें कळे भात ॥
क्षीर निवडिते पाणी । चोंची हंसाचिये आणी ॥
आंगडें फाडुनि घोंगडें करी । अदकळा तये परी ॥
तुका म्हणे कण । भुसीं निवडे कैंचा सीण ॥

या अभंगांवरून असें दिसतें कीं सालोमालो हा कोणी तरी हरिदास असून बुवांच्या अभंगांप्रमाणें इतर जुन्या कवींचीही कविता तो आपल्या नांवावर दडपून देत असावा.

लोहगांवीं एक ब्राह्मण सावकार होता, तो सराफीचा धंदा करीत असे. त्याचें कुलदैवत श्रीरामचंद्र असून, रामनवमीचा उत्सव तो मोठ्या थाटानें करीत असे. पुढें दुर्दैवानें त्याला दारिद्र्य आलें त्यामुळें हरिदास, पुराणिक वगैरे लोक उत्सवास येईनात. एका वर्षी, उत्सवाचे वेळीं कोणी हरिदास नसल्यामुळें तो सावकार मोठ्या काळजींत पडला; कारण हरिदासाची बिदागी देण्यास त्याजपाशीं पैसा नव्हता. शेवटीं त्याला कोणी सुचविलें कीं देहू गांवांत तुकोबा आहेत ते कीर्तनाबद्दल कोणाकडून पैसा घेत नाहींत, तरी त्यांना बोलावलें असतां ते मोठ्या आनंदानें येऊन कीर्तन करतील. हें ऐकून तो देहूस तुकोबांकडे गेला आणि त्यांस त्यानें आपली अडचण सांगितली. तेव्हां तुकोबा त्याजबरोबर लोहगांवीं गेले आणि त्याच्या घरीं कीर्तन करून रामनवमीचा उत्सव त्यांनीं साजरा केला.

तुकोबा एकदां धनगरवाड्यांत भिक्षेला गेले असतां तेथें धनगराचा एक मोठा भयंकर कुत्रा गुरगुरत त्यांच्या अंगावर धावून गेला, तेव्हां ते त्याला म्हणाले, "मी शांत आहें. तुझ्याविषयीं माझ्या मनांत कांहीं वैरभाव नाहीं. मग तूं कां विनाकारण आपला संताप करून घेतोस?" हें ऐकतांच तो कुत्रा एकदम इतका शांत झाला कीं त्यानंतर तो कोणाच्याही अंगावर धावून गेला नाहीं.

एका गांवांत एक सावकार होता तो इतका कद्रू होता कीं, आपल्या घरांतलें द्रव्य कोणी तरी घेऊन जाईल या काळजीनें तो रात्रभर पाहारा करीत बसे. एके दिवशीं तो तुकोबांस म्हणाला, "तुम्ही सबंध रात्र जागे राहून भजन करीत असतां,

तर आजपासून माझ्या घराभोंवतीं फिरून भजन करीत जा, म्हणजे मी सुखानें झोंप घेईन." बुवांनीं तें मान्य केलें व रात्र होतांच हातीं तंबोरा घेऊन सावकाराच्या घरासभोंवतीं ते भजन करीत फिरूं लागले. मध्यरात्रीच्या सुमारास कांहीं चोर चोरी करण्याच्या उद्देशानें तेथें आले असतां बुवांनीं त्यांना विचारलें, "इतक्या रात्रीं येथें येण्याचें काय कारण ?" चोर म्हणाले, " आम्ही सावकाराच्या घरीं चोरी करण्यास आलों आहोंत, तरी तुम्ही या भिंतीला टेंकून येथें स्वस्थ उभे रहा. आम्ही आंत जाऊन कांहीं मिळेल तर पाहतों." बुवा त्याप्रमाणें भिंतीस टेंकून उभे राहिले तेव्हां ते चोर त्यांच्या खांद्यावर चढून घरांत शिरले व सावकाराचें द्रव्य घेऊन चालते झाले. सकाळीं सावकार जागा होऊन पाहतो तों सर्व द्रव्य चोरीस गेलें आहे ! मग तो रागानें बुवांपाशीं आला आणि त्यांना धरून म्हणाला ," माझें द्रव्य मी तुमच्याकडून भरून घेणार." बुवा मोठ्या विचारांत पडले व त्यांनीं पांडुरंगाचें स्मरण केलें. तों अशी मौज झाली कीं द्रव्य घेऊन गेलेल्या त्या चोरांची दिशाभूल होऊन ते त्याच ठिकाणीं परत आले आणि सावकाराचें द्रव्य सावकारास देऊन निघून गेले.

बुवांची पत्नी जिजाई बुवांस एकदां म्हणाली, "फडावर जाऊन मुलाला ऊंस घेऊन या." त्याप्रमाणें बुवा फडावर गेले असतां फडाच्या मालकानें त्यांना मोळीभर ऊंस दिले. ते घेऊन ते घरीं येत असतां वाटेंत गांवांतल्या पोरांनीं एकेक ऊंस लांबविला. शेवटीं एक ऊंस शिल्लक राहिला तो आणून त्यांनीं जिजाईपाशीं दिला. एकच ऊंस आणलेला पाहून ती महामाया इतकी संतापली कीं तोच ऊंस तिनें बुवांच्या पाठीवर जोरानें मारला. त्याबरोबर ऊंस मोडून त्याचे तीन तुकडे झाले. बुवांनीं त्यांतले दोन तुकडे गांवांतलीं दोन मुलें तेथें उभीं होतीं त्यांस दिले व तिसरा तुकडा आपल्या मुलास देऊन ते जिजाईस म्हणाले, " शाबास ! तूं वांटे कसे अगदीं बरोबर केलेस !"

तुकोबा एकदां एका गांवीं कीर्तनास गेले असतां, तेथें माळामुद्रा धारण करणारा एक ढोंगी बुवा होता त्याच्या दर्शनास गेले. बुवा त्या वेळीं तोंडावरून वस्त्र घेऊन ध्यान करीत बसला होता. " गांवांतले सर्व लोक आपले शिष्य झाले आहेत, तर आतां त्यांजपाशीं आपण गुरुदक्षिणेदाखल एखादी जमीन मागून

घेऊं, आणि तींत ऊंस लावूं," अशा प्रकारचें ध्यान चाललें होतें. कांहीं वेळानें त्यानें तोंडावरचें वस्त्र काढतांच तुकोबांनीं त्याला नमस्कार केला; तेंव्हां तो तुकोबांस विचारतो, "तुम्ही केंव्हां आलांत?" तुकोबांनीं उत्तर दिलें, "शिष्यांकडून मिळणाऱ्या जमिनींत ऊंस लावण्याची कल्पना आपल्या मनांत आली त्या वेळीं मी येथें आलों." हें ऐकतांच बुवा अगदीं ओशाळला आणि त्यानें तुकोबांचे पाय धरले.

एके दिवशीं लोहगांवीं बुवांचें कीर्तन सुरू असतां तेथें दोन संन्यासी येऊन बसले होते. बुवा हरिनाममाहात्म्य वर्णीत होते. नामस्मरणापुढें जपतपादि इतर साधनें तुच्छ आहेत हें बुवांचें मत त्या संन्याश्यांस अशास्त्र वाटल्यामुळें त्यांनीं, पुणें येथें दादाजी कोंडदेव यांजकडे फिर्याद केली कीं तुकाराम हा वेदोक्त कर्ममार्गाचा उच्छेद करीत आहे. तरी त्यास शिक्षा करावी. दादाजी कोंडदेव हे मोठे धूर्त आणि चाणाक्ष होते. व तुकोबांची योग्यताही ते जाणून होते. त्यांनीं संन्याश्यांस सांगितलें कीं "तुकारामाचा आणि तुमचा वाद करवूं, व त्यांत जो हरेल त्याला शिक्षा करूं." मग दादाजींनीं तुकारामबुवांस बोलावणें पाठविलें. त्याप्रमाणें बुवा पुण्यास येऊन संगमाजवळ उतरले. रात्रौ त्यांचें कीर्तन सुरू होतांच ते संन्यासी तेथें येऊन बसले. बुवांनीं त्या दिवशीं कीर्तनांत असा रंग भरला कीं 'घोंटवीन लाळ ब्रह्मज्ञान्याहातीं। मुक्ता आत्मस्थिति सांडवीन' ही आपली प्रतिज्ञा त्यांनीं अक्षरशः खरी करून दाखविली. बुवांचें कडकडीत वैराग्य, निःसीम हरिभक्ति आणि दगडासही पाझर फोडणारें अलौकिक प्रेम पाहून संन्याश्यांची चित्तवृत्ति पालटली आणि अशा थोर पुरुषाविरुद्ध आपण तक्रार केली याबद्दल त्यांना पश्चात्ताप झाला.

तुकारामबुवा एकदां मुळा-मुठा आणि भीमा यांच्या संगमावर स्नानास गेले असतां जवळच रांजणगांवीं एका ब्राह्मणाची व त्यांची गांठ पडली. मध्यान्हकालीं तुकोबांसारखा थोर विष्णुभक्त आपल्या घरीं आलेला पाहून ब्राह्मणास मोठा आनंद झाला व त्यानें मोठ्या आदरानें त्यांना भोजन घातलें. त्या ब्राह्मणाचा एक आठ वर्षांचा मुलगा होता त्याला बोलतां येत नसे व त्यामुळें त्याचा व्रतबंध व्हावयाचा राहिला होता. ब्राह्मणानें ही हकीकत तुकोबांस सांगितली, तेव्हां तुकोबांनीं मुलास आपल्याजवळ बोलावून त्याला "विठ्ठल

विठ्ठल" म्हणण्यास सांगितलें. त्याबरोबर तो मुलगा बोलूं लागला. मग त्याच्या बापानें त्याचा लवकरच व्रतबंध केला.

मालजी गाडे येलवडकर या आडनांवाचा तुकोबांचा एक जांवई होता त्यानें तुकोबांस एके दिवशीं अशी विनंति केली कीं "मला कांहीं तरी नित्यनेम सांगा." बुवांनीं त्याला भगवद्गीतेचा नित्यपाठ करावयास सांगितलें. त्याप्रमाणें तो मोठ्या भक्तिभावानें रोज गीतेचें पारायण करूं लागला. पुढें एके दिवशीं त्याच्या घरीं खेडकर जोशी या नांवाचा एक ब्राह्मण आला. त्यानें जेव्हां मालजीचे अशुद्ध उच्चार ऐकले तेव्हां तो त्यास म्हणाला, "तुझे उच्चार इतके अशुद्ध आहेत कीं अशा प्रकारच्या वाचनापासून तुला फायदा तर कांहीं होणार नाहींच, पण उलट तूं नरकांत जाशील." मालजी म्हणाला, "असें असेल तर मी आजपासून गीता वाचणार नाहीं." मालजीच्या मनांत अशा प्रकारचा विकल्प उत्पन्न करून खेडकर जोशी आपल्या गांवीं निघून गेला. तों त्याच रात्रीं स्वप्नांत त्याला दृष्टांत झाला कीं, "मालजी भक्तिभावानें गीतेचें पारायण करीत होता, त्याच्या मनांत विकल्प उत्पन्न करून तूं त्याचें वाचन बंद पाडलेंस, हें तूं अनुचित केलेंस. तरी आतां पुनः त्याच्या घरीं जाऊन त्याला पूर्ववत् गीतेचा नित्यपाठ करावयास लाव." दृष्टांत होतांच ब्राह्मण घाबरला आणि दुसरे दिवशीं सकाळीं येलवडीस जाऊन मालजीस म्हणाला "अरे बुवा, तूं आपला पूर्ववत् गीतेचें पारायण करीत जा." मालजी म्हणाला, "पण अशुद्ध रीतीनें गीता वाचून काय फायदा?" मग त्या ब्राह्मणानें येलवडीस चार महिने राहून मालजीस गीता शुद्ध रीतीनें वाचावयास शिकविली.

एकदां चैत्रमासीं तुकोबा शिखर शिंगणापूर येथें जावयास निघाले. गंगाजी मवाळ व संतोबा तेली हे दोघे बरोबर होते. वाटेंत जेथें जेथें मुक्काम होई तेथें तेथें रात्रौ बुवांचें कीर्तन होत असे. सातव्या दिवशीं शिंगणापुरचें शिखर दिसूं लागलें तेव्हां बुवांनीं तेथूनच नमस्कार केला. कोथळेश्वराच्या डोंगरावर महादेवाचें देवालय असून खालीं शिंगणापूर क्षेत्र आहे. डोंगरावर पाणी नसल्यामुळें बुवांनीं व त्यांच्या अनुयायांनीं शिंगणापूरच्या तळ्यावर स्नान केलें. स्नान झाल्यावर शिष्य म्हणाले, "आतां शंकराचें दर्शन घेऊं." तेव्हां बुवा म्हणाले,

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. ...
अनुक्रम........आणखी कांही आख्यायिका....
क्रमांक १२४९ नों. दि. २८-९

"अगोदर शंकरास भोजन घालूं." बुवांचें मनोगत जाणून शिष्यांनीं स्वयंपाकाची सिद्धता केली. इतक्यांत कोणी एक दिगंबर पुरुष त्या ठिकाणीं प्रगट होऊन तुकोबांस म्हणाला, "मला भोजन घाला, मी फार दिवसांचा उपवासी आहें." बुवांनीं त्याला बसावयास आसन दिलें आणि साष्टांग दंडवत घातला. शिष्यांनीं चार पात्रें वाढलीं. तेव्हां तुकोबा म्हणाले, "अगोदर अतिथीचें जेवण होऊं द्या, आपण मागाहून जेऊं." पण त्या अतिथीचा आहार इतका भयंकर होता कीं त्या चारी पात्रांतलें अन्न त्यानें थोड्याच वेळांत फस्त करून टाकलें! जेवण झाल्यावर तुकोबांस आशीर्वाद देऊन अतिथि कोथळेश्वराच्या डोंगरावर निघून गेला. मग बुवा शिष्यांस म्हणाले, "पाहिलेंत? आपण जर त्या गोसाव्याबरोबरच जेवावयास बसलों असतों तर त्याला अर्धपोटीं उठावें लागलें असतें." मग त्यांनीं नवीन स्वयंपाकाचें साहित्य आणण्यासाठीं संताजीस गांवांत पाठविलें. सामान आल्यावर, अन्नावर माशा बसूं नयेत म्हणून स्वयंपाकाच्या पात्रांवर वस्त्र टाकलें होतें तें काढून पाहतात तों सर्व भांड्यांत भरपूर अन्न शिल्लक आहे! हा चमत्कार पाहतांच, जेवावयास आलेला अतिथि दुसरा कोणी नसून साक्षात् शंकरच होता ही गोष्ट शिष्यांच्या ध्यानांत येऊन ते आश्चर्यचकित झाले. मग जेवण करून ते तिघेही डोंगरावर गेले आणि त्यांनीं शंकराचें दर्शन घेतलें. बुवांनीं तेथें पांच दिवस मुक्काम केला. रोज कीर्तन होत असे. या कीर्तनांत बुवांनीं 'कावडीचे अभंग' रचून त्यांवर निरूपण केलें असें महीपतिबुवांनीं लिहिलें आहे.

बुवा एकदां कीर्तनांत सहज म्हणाले कीं, "मुखानें नामस्मरण करणाराला पावलोपावलीं यज्ञ केल्याचें पुण्य लागतें." लोहगांवचा एक ब्राह्मण कीर्तनास आला होता त्यानें हें ऐकलें व संतांची वाणी खरीच असली पाहिजे या विश्वासानें, चालतेवेळीं पावलागणिक हरिनामोच्चार करून एका सुताच्या दोऱ्याला एक गांठ मारावयाची असा क्रम एक वर्षभर चालविला. त्या वेळीं, एका गांवीं एक प्रसिद्ध गृहस्थ रहात असे त्याला समंधाची बाधा होती, म्हणून त्यानें हरिहरेश्वरास जाऊन बरेच दिवस शंकराची उपासना केली. तेव्हां समंधानें अंगांत येऊन सांगितलें कीं 'तूं जर मला एका यज्ञाचें पुण्य देशील तर मी तुला सोडीन.' हें ऐकून तो गृहस्थ काळजींत पडला; कारण त्याला यज्ञ करण्याचें सामर्थ्य नव्हतें. मग तो गांवोगांव

फिरून लोकांस विनंति करूं लागला कीं "जर कोणी यज्ञ केला असेल तर त्यानें त्या यज्ञाचें पुण्य मला देऊन या समंधापासून मला सोडवावें." अशा रीतीनें तो पुष्कळ गांव हिंडला, पण यज्ञ करणारा त्याला कोणी भेटला नाहीं. शेवटीं तो लोहगांवास आला व आपली वरील विनंति त्यानें लोकांस कळविली. नामस्मरण करीत चालणाराला पावलागणिक एका यज्ञाचें पुण्य मिळतें ह्या बुवांच्या वचनावर विश्वास ठेवून दोऱ्यास गांठी मारणाऱ्या वरील ब्राह्मणानें जेव्हां ही गोष्ट ऐकली तेव्हां त्यानें त्या गृहस्थास आपल्या घरीं नेऊन दोऱ्याची एक गांठ कापली आणि ती पाण्यांत धुऊन तें पाणी त्याला पाजलें. पाणी पोटांत जातांच त्याच्या अंगांतला समंध तत्काळ बाहेर पडून चालता झाला व तो गृहस्थ एक प्रहरभर अगदीं निश्चेष्ट पडला. गांवांतल्या लोकांनीं जेव्हां हा प्रकार पाहिला तेव्हां तुकोबांच्या शब्दांची यथार्थता त्यांस पटून ते आश्चर्य-चकित झाले.

"तुकारामबुवांच्या कुळांत पंढरीची वारी पूर्वीपासूनच होती व ती त्यांनींही पुढें अव्याहत चालू ठेवली होती. दरवर्षीं आषाढी कार्तिकीस ते नियमानें पंढरपुरास जात असत. एका वारीच्या वेळीं ते हिमज्वरानें आजारी पडल्यामुळें वारीस जाणें त्यांना अशक्य झालें व त्यामुळें त्यांच्या मनास मोठा खेद झाला. तापानें ते इतके क्षीण झाले होते कीं एक पाऊल टाकण्याचें त्यांना सामर्थ्य नव्हतें. वारीस जाण्यासाठीं निघण्याचा वेळ येतांच देहू गांवांतले व आसपासचे १४०० वारकरी पताका घेऊन तुकोबांस बरोबर घेऊन जाण्यासाठीं त्यांच्या घरीं आले. पण बुवांची किती असहाय स्थिति झाली होती हें वर सांगितलेंच आहे. वारी चुकणार या विचारानें बुवा फार दुःखी झाले. शेवटीं त्यांनीं पांडुरंगास देण्यासाठीं २४ अभंग लिहून त्या वारकऱ्यांबरोबर पंढरपुरास पाठविले" अशी एक दंतकथा आहे. हे २४ अभंग गाथ्यांत दिलेले आहेत. त्यांतले कांहीं निवडक अभंग येथें देतों:—

"कां माझा विसर पडिला मायबापा। सांडियेली कृपा कोण्या गुणें ॥
कैसा कंठूनियां राहों संवसार। काय एक धीर देऊं मना ॥
नाहीं निरोपाची पावली वारता। न करावी ते चिंता ऐसी कांहीं ॥
तुका म्हणे एक वेंचूनि वचन। नाहीं समाधान केलें माझें ॥

कांहीं माझे कळों आले गुणदोष । म्हणऊनी उदास धरिलें ऐसें ॥
नाहीं तरी येथें न घडे अनुचित । नाहीं ऐसी रीत तया घरीं ॥
कळावें तें मना आपुलिया सवें । ठायींचें हें घ्यावें विचारूनी ॥
तुका म्हणे मज अव्हेरिलें देवें । माझिया कर्तव्यें बुद्धीचिया ॥

कां माझे पंढरी न देखती डोळे । काय हें न कळे पाप यांचें ॥
पाय पंथ कां हे न चालती वाट । कोण हें अदृष्ट कर्म बळी ॥
कां हें पायांवरी न पडे मस्तक । क्षेम कां हस्तक न पवती ॥
कां या इंद्रियांची न पुरे वासना । पवित्र होईना जिव्हा कीर्ती ॥
तुका म्हणे कई जाऊनि मोटळें । पडेन हा लोळें महाद्वारीं ॥

येती वारकरी । वाट पाहतों तोंवरी ॥
घालूनियां दंडवत । पुसेन निरोपाची मात ॥
पत्र हातीं दिलें । तया येथें पाठविलें ॥
तुका म्हणे येती । जाइन सामोरा पुढती ॥

तुम्ही संतजनीं । माझी करा विनवणी ॥
काय तुक्याचा अन्याय । त्यासी अंतरले पाय ॥
भाका बहुतां रीतीं । माझी कींव काकुळती ॥
न देखे पंढरी । तुका चरण विटेवरी ॥"

हे २४ अभंग लक्षपूर्वक वाचले असतां व पूर्वग्रहदूषित दृष्टि सोडून अगदीं स्वतंत्र दृष्टीनें त्यांचा विचार केला असतां, तुकारामबुवा या वेळेपर्यंत पंढरीस गेलेच नव्हते असाच निष्कर्ष या अभंगांतून निघतो असें मला वाटतें. "पांडुरंगास माझी आठवण कशी होत नाहीं ? तो अद्याप मला पंढरीस कां बोलावीत नाहीं ?" वगैरे प्रश्न या अभंगांत बुवांनीं विचारले आहेत; "मी आजारीं असल्यामुळें या खेपेस मला पंढरीस येतां आलें नाहीं," अशा अर्थाचे उद्गार त्यांत कोठेंही नाहींत. पुढील अभंगावरून बुवा अद्याप पंढरपुरास गेलेच नव्हते, पांडुरंगाकडून बोलावणें येण्याची ते वाट पहात होते, असेंच स्पष्टपणें ध्वनित होत आहे:—

" कोणा मुखें ऐसी ऐकेन मी मात । चाल तुज पंढरिनाथ बोलावितो ॥
मग मी न धरीं आस मागील बोभाट । वेगीं धरीन वाट माहेराची ॥
निलाजिरें चित्त करी तळमळ । केधवां देखती मूळ आलें डोळे ॥
तुका म्हणे कई भाग्याची उजरी । होईल पंढरी देखावया ॥ "

" तुला पंढरीनाथ पंढरीस बोलावीत आहे, असें वचन मी कोणाच्या तोंडून ऐकेन ? मला जर भगवंताचें बोलावणें येईल तर घरची सगळी काळजी सोडून मी या घटकेस पंढरीची वाट धरीन. पंढरीस जाण्यासाठीं माझें चित्त फार तळमळत आहे; पांडुरंगानें मला बोलावलें आहे असें मी कधीं ऐकेन ? पंढरपुर दृष्टीस पडण्याइतकें माझें भाग्य कधीं उदयास येईल ? " ह्या वरील अभंगांतील उद्गारांवरून बुवांनीं त्या वेळेपर्यंत पंढरपुर पाहिलें नव्हतें, हें अगदीं स्पष्ट होत आहे. आणखी पुरावा पहा :—

" धरितों वासना परी नये फळ । प्राप्तीचा तो काळ आला नाहीं ॥
तळमळी चित्त घातलें खापरीं । फुटतसे परी लाहिचिया ॥ "

" पंढरीस जाण्याची इच्छा धरून आहें, पण ती पूर्ण होण्याचा काळ अद्याप आला नाहीं. त्यामुळें, खापरांतली लाही जशी फुटते तद्वत् माझ्या मनाची तळमळ होत आहे. "

" होइल कृपादान । तरि मी येईन धांवोन ॥
होतिल संतांचिया भेटी । आनंदें नाचों वाळवंटीं ॥
रिघेन मातेपुढें । स्तनपान करीन कोडें ॥
तुका म्हणे ताप । हरती देखोनियां बाप ॥ "

" पांडुरंग जर मला कृपा करून बोलावील तर मी पंढरपुरास धावून जाईन, " असें या अभंगांत बुवांनीं स्पष्ट म्हटलें आहे; यावरून, बुवा आजारी पडल्यामुळें त्यांची वारी चुकली व म्हणून त्यांनीं हे २४ अभंग वारकऱ्यांबरोबर पाठविले ही दंतकथा अगदीं निराधार असून, बुवा त्या वेळेपर्यंत पंढरपुरास गेलेच नव्हते; निदान, पूर्वीं कधीं गेले असले तरी मध्यंतरीं

वरींच वर्षें गेले नव्हते, पांडुरंगाच्या निरोपाची ते वाट पहात होते, हीच गोष्ट निःसंदेह रीतीनें सिद्ध होत आहे.

बुवांनीं दिलेले २४ अभंग घेऊन वारकरी पंढरीस गेल्यावर, आपल्या पत्राचें पांडुरंगाकडून काय उत्तर येईल ही विवंचना बुवांस लागली व त्या विवंचनेंत असतांना त्यांनीं १९ अभंग रचिले. नंतर कांहीं दिवसांनीं वारकरी परत येऊन बुवांस भेटले त्या वेळीं बुवांनीं आणखी ११ अभंग लिहिले. मिळून एकंदर हे ५४ अभंग अत्यंत हृदयद्रावक असून, तुकोबांचें अलोट भगवत्प्रेम व भगवद्दर्शनाविषयींची त्यांची अत्युत्कट उत्सुकता त्यांत शब्दागणिक दृष्टोत्पत्तीस येते. असो. यानंतर मात्र तुकोबा नियमानें पंढरीची वारी करूं लागले. अगदीं पहिल्यानेंच श्रीविठ्ठलमूर्तीचें दर्शन जेव्हां त्यांना घडलें तेव्हां त्यांना जो ब्रह्मानंद झाला असेल त्याची केवळ कल्पनाच केली पाहिजे.

एक वेदांतप्रिय ब्राह्मण होता, तो मुकुंदराजकृत विवेकसिंधु ग्रंथाचें अध्ययन करीत असे. बरेच दिवस अध्ययन करूनही त्याला त्या ग्रंथाचा अर्थ उकलेना, म्हणून तुकारामबुवांची कीर्ति ऐकून तो देहूस आला. बुवा इंद्रायणीतीरीं नामस्मरण करीत बसले होते तेथें जाऊन त्या ब्राह्मणानें त्यांस नमस्कार केला आणि सांगितलें कीं "मी हा विवेकसिंधु ग्रंथ वाचून त्याचा अर्थ सांगतों, तो आपण ऐका व मी कोठें चुकतों कीं काय तें कृपा करून सांगा." बुवांनीं त्याची विनंति मान्य केली आणि डोक्यावरून गोधडी पांघरून आणि डोळे मिटून ते स्वस्थ बसले. ब्राह्मण 'विवेकसिंधु' वाचून त्याचा अर्थ सांगूं लागला. एक प्रहर ग्रंथवाचन झालें तरी बुवा कांहीं बोलत नाहींत असें पाहून ब्राह्मणानें त्यांच्या अंगावरची गोधडी काढून पाहिलें, तों कानांत बोटें घालून ते मुखानें नामस्मरण करीत आहेत असें त्याच्या दृष्टीस पडलें. तेव्हां ब्राह्मण त्यांस म्हणाला, "तुकोबा, माझें हें वाचन अरण्यरुदनच झालें म्हणावयाचें! अहो, मी सारखा प्रहरभर कंठशोष करीत आहें, आणि तुम्ही आपले कानांत बोटें घालून बसलां आहांत, याचा अर्थ काय?" तुकोबा म्हणाले, "महाराज, रागावूं नका. पण मी तुम्हांस स्पष्ट सांगतों कीं वेदांताची मला फारशी आवड नाहीं; आणि अद्वैतसिद्धांताचें ज्ञान आकलन होण्याइतका मी व्युत्पन्नही नाहीं. देव आणि भक्त यांच्या प्रेमांत जेणेंकरून व्यत्यय येईल तें ज्ञान मला नको.

मुखें सांगती आत्मज्ञान । कीं ब्रम्हरूप अवघे जन ।
आणि कवडीसाठीं देती प्राण । करिती भांडण बाजारीं ॥
अवघें ब्रह्मरूप भासलें आहे । तरी गेल्या आल्याची हळहळ काय ।
निर्गुणीं कांहींच बोलूं नये । शब्दठाय खुंटला ॥

आणि म्हणूनच मीः—

“ याजसाठीं वनांतरा । जातों सांडूनियां घरा ॥
माझें दिठावेल प्रेम । बुद्धि होईल निष्काम ॥
अद्वैताची वाणी । नाहीं ऐकत मी कानीं ॥
तुका म्हणे अहं ब्रह्म । आड येऊं नेदीं भ्रम ॥ ”

तुकोबांचें हें भाषण ऐकून, त्या ब्राह्मणानें अध्यात्माची शुष्क काथ्याकूट सोडून दिली आणि तो तुकोबांच्या भक्तिमार्गाचा अनुयायी झाला.

लोहगांवच्या लोकांची तुकोबांवर फार भक्ति होती. ते त्यांना वरचेवर आग्रह करून आपल्या गांवीं घेऊन जात असत. एकदां तुकोबा त्या गांवीं गेले असतां तेथें एक खाऱ्या पाण्याची विहीर होती, तींत त्यांनीं स्नान केलें. त्याबरोबर त्या विहिरीचें पाणी गोड झालें, असें महीपतींनी लिहिलें आहे.

लोहगांवांत एक भाविक ब्राह्मण होता तो सोमवारव्रत करीत असे. एका सोमवारीं त्यानें तुकोबांस आपल्या घरीं फराळास बोलविलें. फराळ सुरू असतां दिव्यांतलें तेल संपून दिवा मालवण्याच्या बेतांत आला. घरांत तेल शिल्लक नव्हतें. तेव्हां ब्राह्मणाच्या पत्नीस बुवा म्हणाले, “ बुधल्यांत पहा, थोडें तरी तेल असेल. ” बाई म्हणाली, “ बुधला साफ रिकामा आहे. त्यांत तेलाचा एक थेंबही नाहीं. ” बुवा म्हणाले, “ असें कोठें झालें आहे ? तुम्ही पुनः एकदां पहा. थोडें तरी तेल सांपडेल. ” बाईनें बुधल्यांत पाहिलें तों खरो-खरच अर्धा बुधला तेलानें भरलेला !

तुकोबा लोहगांवीं असतांना, तेथील पाटलाच्या दारांत एक शिळा होती, तिजवर बसत असत. ही शिळा ‘ अद्याप तेथें आहे, ’ असें महीपति लिहितात.

कोंडोबा लोहकरे या नांवाचा एक मनुष्य लोहगांवीं असे तो तुकोबांचा

भक्त होता. तुकोबांच्या कीर्तनांत तो त्यांच्या मागें उभा राहून ध्रुपद धरीत असे. त्याच्या मनांत काशीयात्रेस जावयाचें होतें, पण जवळ पैसा नसल्यामुळें त्याची इच्छा पूर्ण होईना. शेवटीं त्यानें ही आपली अडचण तुकोबांस सांगितली व 'पट्टी' करून खर्चापुरते पैसे जमवून देण्याची विनंति केली. बुवांनीं आपल्या आसनाखालीं हात घालून एक होन काढला व तो कोंडोबास दिला. तेव्हां कोंडोबा म्हणाला, "महाराज, एवढ्या एका होनांत काशीयात्रा कशी होईल ?" तुकोबांनीं त्याला सांगितलें, "हा होन मोडून त्यांतले पैसे खर्चीत जा आणि रोज त्यांतला एक पैसा शिल्लक ठेव. दुसऱ्या दिवशीं त्या पैशाचा होन होईल. मात्र हें द्रव्य सत्पात्रीं खर्च कर, अपव्यय करूं नको. परत आल्यावर हा आमचा होन आम्हाला देऊन टाक." कोंडोबानें त्याच दिवशीं त्या गोष्टीचा अनुभव पाहण्याचें ठरवून तो होन मोडला व त्यांतला एक पैसा शिल्लक ठेवून बाकीच्या सर्व पैशांचे खाद्य पदार्थ विकत घेतले. तो जेव्हां काशीयात्रेस जाण्यास निघाला तेव्हां बुवांनीं तीन अभंग लिहून त्याजपाशीं दिले आणि ते गंगेंत टाकण्यास सांगितले. हे अभंग येणेंप्रमाणें:—

"परिसें वो माते माझी विनवणी । मस्तक चरणीं ठेवीतसें ॥
भागीरथी महादोषनिवारिणी । सकळ स्वामिणी तीर्थांचिये ॥
जितां भुक्ति मोक्ष मरणें तुझ्या तीरीं । अहिक्य परत्रीं सुखरूप ॥
तुका विष्णुदास संतांचें पोसणें । वाक्पुष्प तेणें पाठविलें ॥

तुम्ही विश्वनाथ । दीन रंक मी अनाथ ॥
कृपा कराल ते थोडी । पायां पडिलों बराडी ॥
काय उणें तुम्हापाशीं । मी तों अल्पचि संतोषी ॥
तुका म्हणे देवा । कांहीं भातुकें पाठवा ॥

पिंड पदावरी । दिला आपुलिये करीं ॥
माझें जालें गयावर्जन । फिटलें पितरांचें ऋण ॥
केलें कर्मांतर । बोंब मारिली हरिहर ॥
तुका म्हणे माझें । भार उतरलें ओझें ॥"

भागीरथी, काशीविश्वेश्वर आणि गया येथील विष्णुपद यांना उद्देशून हे अभंग

लिहिलेले आहेत. महीपति सांगतात कीं कोंडोबानें प्रयागास जाऊन, तुकोबांचा अभंग गंगेंत टाकण्यासाठीं जेव्हां बाहेर काढला तेव्हां गंगेनें आपला रत्नकंकण-मंडित हात बाहेर काढून त्या अभंगांचा स्वीकार केला व काशीविश्वेश्वरास कोंडोबानें अभंग वाचून दाखवितांच पिंडीवरील बेल व पुष्पें खालीं पडलीं! यात्रा पुरी झाल्यावर कोंडोबा स्वदेशीं येण्यास निघाला. तुकोबांनीं दिलेल्या होनाच्या वळावर त्यानें पाण्यासारखा पैसा खर्च केला. तो लोहगांवच्या जवळपास आल्यावर त्याला वाटलें कीं तुकोबांचा होन म्हणजे जणूं काय परीसच आपल्या हातीं आला आहे, तरी तो तुकोबांस परत न देतां आपल्यापाशींच ठेवावा. कांहीं वेळानें तो लोहगांवीं येऊन दाखल झाला. तुकोबा वेशीजवळच एकांतीं बसले होते. त्यांना पाहून कोंडोबानें त्यांचें दर्शन घेतलें आणि म्हणाला, "तुकोबा, आपल्या कृपेनें माझी त्रिस्थली यात्रा सुखरूपपणें पार पडली." हें ऐकतांच, त्याला दिलेल्या होनाची तुकोबांस आठवण होऊन त्यांनीं तो होन परत मागितला. कोंडोबानें 'होन हरवला' असें खोटेंच सांगितलें. "बरें आहे," असें म्हणून तुकोबा स्वस्थ राहिले. होन घशांत उतरल्याबद्दल कोंडोबास मोठा आनंद झाला. मग तो आपल्या घरीं जाऊन, धोतराची गांठ सोडून पाहतो तों होन आहे कोठें? कोंडोबा मनांत म्हणाला, आज दुपारीं वाटेंत स्नान केलें तेव्हां होन होता, धोतराला मारलेली गांठ तशीच आहे, मग होन गेला कसा? बरें, तुकोबांस ही गोष्ट कळवावी तर तिकडूनही फजीती! कारण होन हरवला म्हणून आपण त्यांस सांगितलें आहे. शेवटीं कोंडोबा आंबट तोंड करून चुरमुरे खात स्वस्थ बसला!

पुढें पुढें तुकोबा बालोन्मत्तपिशाचवृत्तीनें वागूं लागले. ते अकस्मात् उठत आणि कोणासही न सांगतां एखाद्या गांवास चालते होत. मागाहून शिष्यांना धांवाधांव करावी लागे. "तुकोबा कोठें चाललां?" असें जर कोणी विचारलें तर 'वैकुंठास चाललों' असें ते उत्तर देत. महीपति लिहितात कीं, तुकोबा एकदां लोहगांवीं कीर्तन करीत असतां, त्यांच्या देहासभोंवतीं दिव्य प्रभा फांकल्याचें श्रोत्यांच्या दृष्टीस पडलें. लोहगांवच्या लोकांची महीपतींनीं फार तारीफ केली आहे:—

" लोहगांवींचे भाविक नर। त्यांसी तुकयाची सेवा घडली फार।
त्यांनींच प्रेमा लुटिला समग्र। कीर्तनगजर ऐकतां॥
जैसा कृष्ण अवतार मथुरेसी झाला। परी गोकुळीं क्रीडला घनसांवळा।
तो व्रजवासी भोगिती सोहळा। तैसेंच मजला भासतसे॥"

कोणासही न सांगतां तुकोबा एकदां आळंदीस जाऊन ज्ञानोबांच्या समाधी-जवळील अजानवृक्षाखालीं बसले असतां, त्यांचे टाळकरी मागाहून त्यांचा शोध करीत तेथें आले आणि पाहतात तों बुवांच्या अंगावर पक्षी निर्भयपणें बसले आहेत. 'अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च। निर्ममो निरहंकारः समदुःखसुखः क्षमी' ही भगवंतांनीं वर्णिलेली भक्ताची अवस्था तुकोबांस प्राप्त झाल्याचा हा दाखला आहे. कारण जे पक्षी तुकोबांच्या अंगावर निर्भयपणें उड्या मारीत होते तेच, तुकोबांचे शिष्य तेथें येतांच, त्यांना पाहून उडून गेले!

## प्रकरण ११ वें

# तुकाराम, रामदास आणि शिवाजी महाराज

तुकोबांच्या साधुत्वाची कीर्ति श्रवण करून दूरदूरचे लोक त्यांच्या दर्शनास व त्यांचें कीर्तन ऐकण्यास मुद्दाम देहूस येऊं लागले. तुकोबा म्हणजे कोणी तरी एक वेडगळ प्राणी आहे अशी जी गांवांतील लोकांची आरंभीं समजूत होती ती कालांतरानें पालटली व तेही तुकोबांविषयीं मोठा अभिमान बाळगूं लागले. परमार्थदृष्ट्या बुवा आतां मुक्तावस्थेस पोंचले होते. "तुका म्हणे आतां। उरलों उपकारापुरता," असे उद्गार त्यांनीं एका अभंगांत काढले आहेत. याच सुमारास पुण्याच्या आसपासच्या भागांत शिवाजी महाराजांचें वास्तव्य असे व त्यांच्याही कानावर तुकोबांच्या साधुत्वाच्या गोष्टी जात असत. अनेक कार्यव्यापत्वामुळें तुकोबांच्या दर्शनाचा लाभ महाराजांस अद्याप घडला नव्हता, पण लवकरच देहूस जाऊन तुकोबांचें एकदां दर्शन घ्यावें अशी उत्कट इच्छा त्यांच्या मनांत उत्पन्न झाली होती. दर्शनास जाण्यापूर्वी, तुकोबांस मदत करण्याच्या हेतूनें म्हणा किंवा त्यांच्या वैराग्याची कसोटी पाहण्याच्या उद्देशानें म्हणा, महाराजांनीं आपल्या एका कारकुनाबरोबर छत्रचामरें, घोडा, पोषाक, द्रव्य वगैरे देऊन त्याला तुकारामबुवांस बोलावण्यास पाठविलें. बुवा त्या वेळीं लोहगांवीं होते, तेथें जाऊन त्या कारकुनानें त्यांना महाराजांचा निरोप कळविला व महाराजांनीं पाठविलेल्या वस्तु त्यांजपुढें ठेविल्या. तेव्हां बुवांनीं तेथल्या तेथें चार अभंग रचून ते कारकुनाच्या हातीं देऊन महाराजांस नेऊन देण्यास सांगितलें. चारच अभंग पाठविल्याचा उल्लेख महीपतींनीं केला आहे, परंतु 'सांप्रदायी' म्हणून जे गाथे प्रसिद्ध आहेत त्यांत या अभंगांची संख्या ९ आहे. महीपतींची माहिती अधिक विश्वसनीय असल्यामुळें, गाथ्यांत सांपडणारे ९ अभंग मागाहून कोणी तरी एकत्र करून त्या सदरांत घातले असावेत असें वाटतें. या ९ अभंगांतले मूळचे चार अभंग कोणते हें ओळखण्याचें काम कठीण आहे, कारण सर्वच अभंग बुवांचे

असून ते त्या प्रसंगाला शोभण्यासारखे आहेत. माझ्या मतें, बुवांनीं पाठविलेले मूळचे चार अभंग पुढीलप्रमाणें असावेत :—

"दिवट्या छत्री घोडे । हें तों बऱ्यांत न पडे ॥
आतां येथें पंढरिराया । मज गोंविसी कासया ॥
मानदंभ चेष्टा । हे तों शूकराची विष्ठा ॥
तुका म्हणे देवा ! माझे सोडवणें धांवा ॥

मुंगी आणि राव । आम्हा सारिखाचि जीव ॥
गेला मोह आणि आशा । कळिकाळाचा हा फांसा ॥
सोनें आणि माती । आम्हा समान हें चित्तीं ॥
तुका म्हणे आलें । घरा वैकुंठ सांवळें ॥

तिहीं त्रिभुवनीं । आम्ही वैभवाचे धनी ॥
हातां आला घाव डाव । आमचा मायबाप देव ॥
काय त्रिभुवनीं बळ । अंगीं आमुच्या सकळ ॥
तुका म्हणे सत्ता । अवघी आमुचीच आतां ॥

आम्ही तेणें सुखी । म्हणा विठ्ठल विठ्ठल मुखीं ॥
तुमचें येर वित्त धन । तें मज मृत्तिकेसमान ॥
कंठीं मिरवा तुळसी । व्रत करा एकादशी ॥
म्हणवा हरिचे दास । तुका म्हणे मज हे आस ॥"

ह्या चार अभंगांत तुकारामबुवांची ऐहिक वैभवाविषयीं जी पूर्ण उदासीनता, किंबहुना तुच्छता, दिसून येते तीच त्यांच्या साधुत्वाचा आणि वैराग्यवृत्तीचा मोठा पुरावा आहे. राजानें बहुमानानें घरीं पाठविलेलें द्रव्य मृत्तिकेसमान मानून तें परत करणें ही निरपेक्षता जगाच्या इतिहासांत अत्यंत दुर्मिळ आहे. अठरा विश्वे दारिद्र्य घरांत कायमचें वास्तव्य करीत असतां, घरीं चालून आलेल्या द्रव्याचा मोह आवरणें ही गोष्ट सोपी नाहीं. बुवांच्या या निरपेक्षतेचा छत्रपति शिवाजी महाराजांच्या मनावर काय परिणाम झाला असेल हें कल्पनेनेंही ताडतां येण्यासारखें आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ...... वि: ...
क्रमांक ......


त्या अभंगांशिवाय, इतर कांहीं गाथ्यांत—

१ विरिंचीनें केलें ब्रह्मांड सकळ ।
२ ऐसी माझी वाणी दीनरूप पाहे ।
३ तुम्हापाशीं आम्ही येऊनियां काय ।
४ आतां एक योग साधावा हा नीट ।
५ आतां हे विनवणी प्रधान अष्टका ।
६ राया छत्रपति ऐकावें वचन ।

या चरणांनीं प्रारंभित होणारे सहा अभंग दिले आहेत व त्यांची एकंदर रचना तुकोबांच्या रचनेशीं बरीच सदृश आहे. परंतु हे अभंग तुकोबांचेच असें निक्षून सांगणें मात्र कठीण आहे. तुकोबांच्या रचनेची जर ही नक्कल असेल तर नक्कल करणारानें ती मोठ्या कुशलतेनें केली आहे यांत संशय नाहीं. एखाद्या रामदास सांप्रदायी मनुष्यानें तुकोबांच्या नांवावर हे अभंग लिहून एखाद्या गाथ्यांत घुसडले असावेत असें दिसतें. कारण या अभंगांत रामदासस्वामींचा पुनः पुनः तीन वेळां उल्लेख केला आहे तो तुकोबांच्या अभंगांत येणें शक्य नाहीं, आणि याचें कारणही उघड आहे. एक तर त्या वेळेपर्यंत, शिवाजीमहाराजांस समर्थांचा उपदेश तर काय, पण त्यांचें दर्शनही झालें नव्हतें आणि दुसरी गोष्ट ही कीं, महाराजांनीं आपले अष्टप्रधान त्या वेळेपर्यंत नेमले नव्हते. वारकरी सांप्रदायी लोकही हे अभंग प्रक्षिप्तच मानतात.

रामदासस्वामी आणि तुकारामबुवा यांची कधीं भेट झाल्याचाही विश्वसनीय पुरावा उपलब्ध नाहीं. समर्थ एकदां पंढरीस गेले होते असें त्यांच्या चरित्रांत लिहिलें आहे, त्या वेळीं कदाचित् तुकोबांची त्यांची भेट झाली असेल तर कोण जाणे. "हुमुंजी रंगाचा उंच मोतीदाणा । रामदासी बाणा तैसा असे," हा रामदासवर्णनात्मक अभंग तुकोबांच्या नांवावर प्रसिद्ध आहे, पण तो कोणत्याही सांप्रदायी गाथ्यांत सांपडत नसल्यामुळें, वरील अभंगांप्रमाणेंच तोही प्रक्षिप्तच आहे असें म्हणावें लागतें. महीपतींनीं 'भक्तविजय' व 'भक्तलीलामृत' या आपल्या दोन ग्रंथांत तुकारामबुवांचें व 'संतविजय' ग्रंथांत समर्थांचें चरित्र दिलें आहे, त्या दोन्ही

ठिकाणीं रामदास व तुकाराम यांची भेट झाल्याचा उल्लेख नाहीं. गिरिधरकृत 'समर्थप्रताप' ग्रंथांतही त्या भेटीचा निर्देश नाहीं. उलट नामा शिंपी व समर्थांचे इतर कांहीं चरित्रलेखक यांनीं रामदास व तुकाराम यांच्या भेटीचा प्रसंग मोठ्या रसभरित वाणीनें वर्णिला आहे. परंतु या सर्व लेखकांत विशेष साक्षेपी लेखक जे महीपति व गिरिधर यांनीं ज्याअर्थी या भेटीचा उल्लेख केलेला नाहीं त्याअर्थी ही भेट झालीच नसावी असें मला वाटतें. समर्थांच्या दासबोधांतल्या कांहीं ओंव्या मात्र तुकोबांसच अनुलक्षून लिहिलेल्या दिसतात. उदाहरणार्थः—

"या गलबल्यामध्यें गलबला । कोणी कोणी वाढविला ।
त्यास देखों सकेनासा जाला । वैदिक लोक ॥"

ही ओंवी तुकारामबुवांसच लागू पडते, कारण त्या वेळच्या दुसऱ्या कोणत्याही संताचा वैदिकांकडून छळ झाल्याची हकीकत प्रसिद्ध नाहीं.

रा. रा. त्र्यंबक विश्वनाथ महाजनी, यावल, पूर्वखानदेश, यांनीं आपले गुरु ह. भ. प. चिंचोलीकर यांच्या संग्रहीं असलेले, रामदास-तुकारामाच्या भेटीसंबंधाचे दोन अभंग मागें 'केसरी' पत्रांत प्रसिद्ध केले होते ते असेः—

"धन्य तुकाराम धन्य तुझी वाणी । ऐकतां उन्मनी दीप लागे ॥
धन्य निस्पृहता एकविध निष्ठा । श्रुतिभाव स्पष्ट दाखविसी ॥
संतोषलें चित्त होतां दरुषण । कळों आली खूण अवताराची ॥
घातलासे धडा नामाचा पैं गाढा । प्रेमें केला वेडा पांडुरंग ॥
नवविधा भक्ति रूढविली जगीं । तारूं कलयुगीं दास म्हणे ॥"

"कां स्तविसी माते दुर्बळा पतिता । नमितों समर्था पाय तुझे ॥
ब्रह्मज्ञ ब्राह्मण वैराग्यपुतळा । रामभजनीं लीळा अनुपम्य ॥
त्रेतायुगीं स्वामीसेवा केली भारी । श्रीराम-अवतारी महारुद्रा ॥
हें आम्हा कळलें स्वामीचे प्रतापें । वदलों पांयापें समर्थांचे ॥
असावी ते कृपा समचरणीं दृष्टि । विटेवरी गोमटी वृत्ति राहो ॥
भाकितसों दीन स्वामीपें करुणा । विठ्ठलकीर्तना राहो प्रेम ॥
तुम्हा संतांलागीं मागतसों एक । तुका म्हणे सुख संतापायीं ॥"

पहिल्या अभंगांत समर्थांचें व दुसऱ्यांत तुकोबांचें नांव आहे; परंतु रचना व मजकूर या दोन्ही दृष्टींनीं हे अभंग उघड उघड प्रक्षिप्त दिसत असल्यामुळें, त्यांविषयीं अधिक कांहीं लिहिण्याचें कारण नाहीं.

स्वराज्यसंस्थापक छत्रपति श्रीशिवाजी महाराज यांचें वास्तव्य व कार्यक्षेत्रही त्या वेळीं पुण्याच्या आसमंताद्भागांतच असल्यामुळें त्यांची मात्र तुकोबांशीं भेट झाली असण्याचा पूर्ण संभव आहे. बुवांच्या कीर्तनाचाही लाभ महाराजांस कांहीं वेळां घडला असावा. तुकारामबुवांच्या दर्शनास शिवाजी महाराज गेले त्या प्रसंगाचें वर्णन महीपतींनीं 'भक्तलीलामृता'च्या ३६ व्या अध्यायांत केलें आहे. महाराज एकदां लोहगांवीं तुकोबांच्या कीर्तनास गेले असतां यवन सेनापतीनें त्यांजवर पाळत ठेवून छापा घातला व त्या प्रसंगीं देवानें महाराजांचें रक्षण केलें अशी एक कथा प्रसिद्ध असून ती महीपतींनींही आपल्या भक्तविजयांत दिली आहे. ही कथा येणेंप्रमाणें :—

लोहगांवीं तुकोबांचा मुक्काम असतांना, एकदां शिवाजी महाराज एकटेच घोड्यावर बसून त्यांच्या कीर्तनास आले. महाराजांच्या हालचालीवर चाकणच्या यवन सेनापतीची नजर होतीच; त्यानें शिवाजीस पकडण्यास ही संधि बरी आहे असें पाहून कांहीं घोडेस्वार लोहगांवीं पाठविले. ज्या वाड्यांत महाराज तुकोबांचें कीर्तन ऐकत बसले होते त्या वाड्याला या स्वारांनीं वेढा दिला. ते बाहेरच्या मनुष्यास आंत व आंतील मनुष्यास बाहेर जाऊं देईनात. आपणास गिरफदार करण्यासाठीं मुसलमान घोडेस्वारांनीं वाड्यास वेढा घातला आहे ही बातमी महाराजांस समजतांच ते जरा चिंताक्रांत झाले. श्रोतेमंडळींतही कुजबूज सुरू झाली. कीर्तनाकडे श्रोत्यांचें लक्ष नाहीं हें बुवांच्या लक्षांत येतांच त्यांनीं चौकशी केली, तेव्हां वाड्यास यवनांचा वेढा पडला असल्याचें वर्तमान त्यांस समजलें. कांहीं लोक तुकोबांस म्हणाले, "आपली जर आज्ञा असेल तर महाराजांस आम्ही युक्तीनें बाहेर काढून सुरक्षित ठिकाणीं घेऊन जातों." तुकोबा म्हणाले, "काय वाटेल तें झालें तरी कीर्तनांतून कोणीही उठूं नये." हें ऐकून, पांडुरंग रक्षण करणारा आहे, असें म्हणून महाराज तेथेंच बसून राहिले. वाड्यांत शत्रूंच्या हेरांच्या येरझारा चालूच

होत्या, परंतु शिवाजी कोणता हें त्यांना समजेना. शेवटीं त्या स्वारांच्या मुख्यानें असा हुकूम सोडला कीं कीर्तनांत बसलेल्या सर्वच लोकांस मारून टाकावें. तुकोबांस हें कळतांच त्यांनीं तीन अभंग म्हणून भगवंताची प्रार्थना केली. ते अभंग असेः—

“न देखवे डोळां ऐसा हा आकांत । परपीडे चित्त दुःखी होतें ॥
काय तुम्ही येथें नसालसें जालें । आम्ही न देखिलें पाहिजे हें ॥
परचक्र कोठें हरिदासांच्या वासें । न देखिजेत देशें राहातिया ॥
तुका म्हणे माझी लाजविली सेवा । हीनपणें देवा जिणें जालें ॥

काय म्यां मानावें हरिकथेचें फळ । तरिजे सकळ जन ऐसें ॥
उच्छेद तो असे हा गे आरंभला । रोकडें विठ्ठला परचक्र ॥
पापावीण नाहीं पाप येत पुढें । साक्षीसी रोकडें साक्ष आलें ॥
तुका म्हणे जेथें वसतील दास । तेथें तुझा वास कैसा आतां ॥

भीत नाहीं आतां आपुल्या मरणा । दुःखी होतां जनां न देखवे ॥
आमची तों जाती ऐसी परंपरा । कां तुम्ही दातारा नेणां ऐसें ॥
भजनीं विक्षेप तेंचि पैं मरण । नवजावा क्षण एक वांयां ॥
तुका म्हणे नाहीं आघाताचा वारा । ते स्थळीं दातारा ठाव मागें ॥”

इतक्यांत असा चमत्कार झाला कीं हुबेहूब शिवाजीमहाराजांसारखा कोणी एक मनुष्य अकस्मात् वाड्यांतून बाहेर पडला आणि घोड्यावर स्वार होऊन भरधांव घोडा उडवीत निघाला. तें पाहून, शिवाजी महाराज पळाले अशी कोणी ओरड केली. त्याबरोबर ते पठाण त्या घोडेस्वाराच्या मागें लागले. स्वार पुढें पळतो आहे व पठाण मागून धांवत आहेत असा प्रकार बराच वेळ चालला. शेवटीं स्वारानें अरण्य गांठलें व त्या अरण्यांत पठाणांस सोडून तो एकाएकीं अदृश्य झाला! पठाणांची अवस्था कांहीं विचारूं नका. खांचखळग्यांतून, नदीनाल्यांतून आणि कांट्याकुट्यांतून धांवतां धांवतां ते अगदीं बेजार झाले आणि ‘तोबा’ ‘तोबा’ म्हणून धापा टाकूं लागले. इकडे मंडपांत तुकोबांचें कीर्तन निर्विघ्नपणें चालू होतें व महाराजां-

सुद्धां सर्व श्रोते अगदीं तल्लीन होऊन ऐकत होते. तुकोबांच्या सामर्थ्यामुळें आपल्यावरचें संकट टळलें ही हकीकत महाराजांस समजतांच तुकोबांविषयीं त्यांच्या मनांत मोठी पूज्यबुद्धि उत्पन्न झाली. दुसरे दिवशीं उजाडल्यावर बुवांचा निरोप घेऊन महाराज पुण्यास गेले.

तुकोबांच्या वरील तीन अभंगांत परचक्राचा स्पष्ट उल्लेख आहे, पण शिवाजी-महाराजांचा नाहीं. या तीन अभंगांवरून बुवांचा आत्मविश्वास केवढा दांडगा होता, परदुःखानें त्यांचें हृदय कसें दुःखी होत असे व स्वतःच्या मरणाविषयीं ते किती बेफिकीर होते हें अगदीं स्पष्ट दिसतें. " काय तुम्ही येथें नसालसें जालें, ' या शब्दांवरून, भगवंत आपल्या कीर्तनांत नेहमीं उपस्थित असतो अशी बुवांची खात्री असल्याचें दिसतें. ' हरिचे दास ज्या ठिकाणीं रहात असतील तेथेंच नव्हे तर ते ज्या देशांत रहात असतील तेथेंदेखील परचक्र येतां कामा नये, ' असें बुवांचें म्हणणें आहे.

---

## प्रकरण १२ वें

# तुकोबांचें निर्याण

आम्ही जातों आमुच्या गांवा ।
आमुचा रामराम घ्यावा ॥

तुकोबांचें अवतारकार्य आतां हळुहळू पुरें होत आलें होतें. ब्राह्मणेतर ज्ञातींत जन्म घेऊन त्यांनीं आपल्या उत्कट भक्तिबलानें स्वतःचा उद्धार केला, आपल्या कुलाचा उद्धार केला, सहस्रावधि लोकांस भक्तिमार्गास लाविलें आणि पुढील पिढ्यांसाठीं सहस्रावधि अभंग लिहून ठेवले. येवढें कार्य त्यांनीं आपल्या ५०–६० वर्षांच्या हयातींत केलें आणि महाराष्ट्रांत आपलें नांव अजरामर करून ठेविलें. 'तुकाराम' हें नांव कानीं पडतांच, भाविकांचे हात आपोआप जोडले जावे, अशी विलक्षण जादू त्या नांवांत भरलेली आहे.

निर्याणापूर्वी कांहीं दिवस तुकोबांनीं कशी निरवानिरव चालविली होती, हें त्यांच्या पुढील अभंगांवरून दिसून येतें:—

"जरा कर्णमूळीं सांगों आली गोष्टी । मृत्याचिये भेटी जवळी आली ॥
आतां माझ्या मना होईं सावधान । ॐ पुण्याची जाण कार्यसिद्धि ॥
शेवटील घडी बुडतां न लगे वेळ । साधावा तो काळ जवळी आला ॥
तुका म्हणे चिंतीं कुळींची देवता । वारावा भोंवता शब्द मिथ्या ॥

आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां । तो जाला सोहळा अनुपम्य ॥
आनंदें दाटलीं तीन्ही त्रिभुवनें । सर्वात्मकपणें भोग जाला ॥
एकदेशी होतों अहंकारें आथिला । त्याचा त्याग जाला सुकाळ हा ॥
फिटलें सुतक जन्ममरणाचें । मी माझ्या संकोचें दुरी जालों ॥
नारायणें दिला वसतीस ठाव । ठेवूनियां भाव ठेलों पायीं ॥
तुका म्हणे दिलें उमटूनि जगीं । घेतलें तें अंगीं लावूनियां ॥

बोळविला देह आपुलिये हातें । हुताशिलीं भूतें ब्रह्माग्नीसीं ॥
एक वेळ जालें सकळ कारण । आतां नारायण नारायण ॥
अमृतसंजीवनी विजविली खाई । अंगें तये ठायीं हारपलीं ॥
एकादशीविध जागरण उपवास । बारावा दिवस भोजनाचा ॥
अवघीं कर्में जालीं घटस्फोटापाशीं । संबंध एकेंसीं उरला नामीं ॥

जाला प्रेतरूप शरीराचा भाव । लक्षियेला ठाव स्मशानींचा ॥
रडती रात्रंदिवस कामक्रोधमाया । म्हणती हायहाय यमधर्म ॥
वैराग्याच्या शेणी लागल्या शरीरा । ज्ञानाग्नि लागला ब्रह्मत्वेंसीं ॥
फिरविला घट फोडिला चरणीं । महावाक्यध्वनि बोंब जाली ॥
दिली तिळांजुळी कुळनामरूपासी । शरीर ज्याचें त्यासी समर्पिलें ॥
तुका म्हणे रक्षा जाली आपोआप । उजळला दीप गुरुकृपा ॥

पिंडदान पिंडें ठेविलें करून । तिळीं तिळत्रण मूळत्रयीं ॥
सारिले संकल्प एकाचि वचनें । ब्रह्मीं ब्रह्मार्पण शेवटींच्या ॥
सव्य अपसव्य बुडालें हें कर्म । एका एक वर्म एको विष्णु ॥
पित्या पुत्रत्वाचें ज़ालें अवसान । जनीं जनार्दन अभेदेंसीं ॥
आहे तैसी पूजा पावली सकळ । सहज तो काळ साधियेला ॥
तुका म्हणे केला अवघ्यांचा उद्धार । आतां नमस्कार शेवटींचा ॥ ”

तुकोबांचे हे अभंग द्वयर्थी दिसतात खरे, पण त्यांत त्यांनीं आपला मृत्युकाल समीप आल्याचेंच ध्वन्यर्थानें व्यक्त केलें आहे; प्राकृत भाषेंत बोलावयाचें म्हणजे ही सगळी निरवानिरव आहे. ‘निर्याणाचे अभंग’ या सदराखालीं गाथ्यांत २३ अभंग दिले आहेत, ते लक्षपूर्वक वाचले असतां, मृत्युकालापूर्वीच बुवांना आपल्या मृत्यूचा सर्व देखावा स्पष्ट दिसत होता, असें दिसतें. भगवंत गरुडावर बसून आपणास वैकुंठीं घेऊन जाण्यास येत आहे असा देखावा त्यांना दिसत होता. हे २३ ही अभंग तुकोबांनीं आपल्या निर्याणाचे वेळींच लिहिले असतील असें मात्र वाटत नाहीं. यांतले कांहीं अभंग त्या प्रसंगास शोभण्यासारखे आहेत, पण इतर अभंग मागाहून कोणी तरी निवडून या सदरांत घातले असावेत. या २३ अभंगांत

“ आम्ही जातों तुम्ही कृपा असों द्यावी । सकळां सांगावी विनंति माझी ॥
वाड वेळ जाला उभा पांडुरंग । वैकुंठीं श्रीरंग बोलावितो ॥
अंतकाळीं विठो आम्हांसी पावला । कुडीसहित जाला गुप्त तुका ॥”

असा जो एक अभंग आहे त्यांतील शेवटच्या ‘कुडीसहित जाला गुप्त तुका’ या वाक्यावरून तो उघड उघड प्रक्षिप्त दिसतो. बुवा जरी खरोखरीच कुडीसहित गुप्त झाले असले तरी ही पुढें झालेली गोष्ट ते अगोदरच आपल्या अभंगांत लिहून ठेवतील हें संभवत नाहीं. असो.

शेवटीं फाल्गुन वद्य द्वितीया सोमवार (१५७३) खर संवत्सर हा दिवस येऊन ठेपला. त्या दिवशीं इंद्रायणीचे कांठीं कीर्तन करीत असतां तुकोबा एकदम अदृश्य झाले. ‘अदृश्य झाले’ याचा अर्थ एवढाच कीं त्यांचें काय झालें हें कोणासच समजलें नाहीं. तुकारामबुवांचा हा मृत्यु म्हणजे एक मोठें ऐतिहासिक गूढ आहे (mystery); व त्याचा समाधानकारक रीतीनें उलगडा करण्याचें काम फार कठीण आहे. तुकारामबुवा शेवटीं काशीयात्रेस गेले; त्यांनीं जलसमाधि घेतली; ते नैसर्गिक रीतीनेंच आपल्या घरीं मृत्यु पावले आणि ते देहासह वैकुंठास गेले, अशीं, या बाबतींत चार प्रकारचीं चार मतें प्रचलित आहेत, व तीं अनुक्रमें पुढील ४ अभंगांच्या आधारावर उभारलेलीं आहेतः—

१ वाराणसीपर्यंत असों सुखरूप । सांगावा निरोप संतांसी हा ॥
येथूनियां आम्हा जाणें निजधामा । सवें असे आम्हा गरुड हा ॥
कृपा असों द्यावी मज दीनावरी । जातसों माहेरीं तुका म्हणे ॥

२ विमानाचे घोष वाजती असंख्य । सुरू झाला डंका वैकुंठींचा ॥
शब्दांचा विश्वास झाली आठवण । करा बोळवण सज्जन हो ॥
आले विष्णुदूत तेचि प्रेममूर्ति । अवसान हातीं सांपडलें ॥
झाला पाठमोरा इंद्रायणीतळीं । नामघोष टाळी वाजविली ॥
प्रथम तो पाय घातला पाण्यांत । राहिली ते मात तुका म्हणे ॥

३ माड्यावरुतें पांजलें हें शरीर । झाला धुंधुकार दाही दिशा ॥
टाळ घोळ वीणा मृदंगाचे घोष । गाती हरिदास नाचताती ॥

नेणों मागें पुढें होती हरिकथा । पहातां पहातां भ्रम लोकां ॥
हातावरी हात मारुनि जातो तुका । परी कोणा एका उमजेना ॥

४ तुका उतरला तुकीं । नवल जालें तिहीं लोकीं ॥
नित्य करितों कीर्तन । हेंचि माझें अनुष्ठान ॥
तुका बैसला विमानीं । संत पाहती लोचनीं ॥
देव भावाचा भुकेला । तुका वैकुंठासी नेला ॥

आतां, तुकोबांच्या अभंगांशीं ज्याचा दीर्घकालीन परिचय आहे असा कोणीही मनुष्य हे अभंग तुकोबांचे आहेत असें म्हणणार नाहीं. आणि एकच तुकोबा, आपणास चार प्रकारांनीं मृत्यु आला असें सांगतील हेंही शक्य नाहीं. अर्थात् हे चारी अभंग उघड उघड प्रक्षिप्त आहेत व म्हणून तुकोबांचें निर्याण कोणत्या रीतीनें झालें या प्रश्नाचा विचार करतांना, हे चारी अभंग साफ दृष्टिआड केले पाहिजेत.

तुकोबांच्या निर्याणकालापासून या घटकेपर्यंत, "तुकारामबुवा सदेह वैकुंठास गेले," ही आख्यायिका महाराष्ट्रांत प्रसिद्ध आहे. तुकोबांच्या शिष्यांनींही तीच गोष्ट नमूद करून ठेवली आहे व त्यांच्या समकालीन व उत्तरकालीन कवींनींही तीच गोष्ट सांगितली आहे. पुढील प्रमाणें पहा :—

"कीर्तन करितां अदृश्य झाले."

—तुकारामसुत नारायणबोवा

"म्हणे रामेश्वर सकळां पुसोनी । गेला तो विमानीं बैसोनियां ॥"

—रामेश्वर भट्ट

"मानवदेह घेउनि निजधामा गेले।"

—निळोबा

"नरदेहा घेउनि वाणी गेला तो ऐका वाणी ॥"

—रंगनाथस्वामी निगडीकर

"तुका बसोनी विमानाप्रती । वैकुंठाप्रती चालिला ॥"

—महीपति

" तुकोबांनीं केला सकळां नमस्कार । बैसले हे त्वरें विमानांत ॥ "

—नामा शिंपी

" संतांत कीर्ति केली । कुडी सायोज्यीं नेली ॥ "

—कचेश्वर

" कीं सतनु मुक्त झाला योगाची सिद्धि हे तुकारामीं । "

—मोरोपंत

" विमानीं बैसविला जडदेह । "

—राजाराम प्रासादी

" जडदेह कसा घेउनि गेला तुकाराम वाणी ॥ "

—विठ्ठलनाथ आजरेकर

अशीं आणखी कितीतरी वचनें सांपडतील. बुवा देहासहित वैकुंठास गेले अशी सर्व लोकांची समजूत होण्याचें मुख्य कारण, शेवटपर्यंत त्यांचें शव सांपडलें नाहीं, हेंच असावें. शिवाय, तुकोबांचे पुत्र नारायणबोवा व शिष्य रामेश्वर भट्ट यांचीही या बाबतींत एकवाक्यता नाहीं. नारायणबुवा म्हणतात, "तुकोबा कीर्तन करीत असतांना अदृश्य झाले," तर रामेश्वर भट्ट म्हणतात "गेला तो विमानीं बैसोनियां." बुवांचा प्रत्यक्ष मुलगा आणि शिष्य यांची जर या बाबतींत एकवाक्यता नाहीं तर इतरांची गोष्ट काय विचारतां ? पूर्ण विचारांतीं या बाबतींत, माझें असें मत झालें आहे कीं बुवा ज्या वेळीं पंचत्व पावले त्या वेळीं तेथें दुसरे कोणी हजर नसावे, किंवा पुष्कळ लोकांदेखत जर ते मृत्यु पावले असतील तर तेथें हजर असलेल्या लोकांच्या डोळ्यांस भ्रांति पडून, बुवांचें काय झालें हें त्यांना समजलें नसावें. बुवा विमानांत बसून वैकुंठास गेले ही शुद्ध अतिशयोक्ति आहे. तुकोबांचे चरित्रकार गोपाळबुवा म्हणतातः—

" अहा म्हणती वाईट झालें । हातींचें रत्न सुटोनि पडिलें ।
जवळीच असतां नाहीं धरिलें । हारपून गेलें नेणों कोठें ॥
एक म्हणती देह विमानीं । घालुनी नेला असेल वैकुंठभुवनीं ।
कोणी म्हणती गुप्त होउनी । विचरत त्रिभुवनीं असेल ॥

एक म्हणती चिखल ओला । देह कैसा नेईल वैकुंठाला ।
इंद्रायणीच्या डोहांत गेला । ऐसें आम्हाला गमताहे ॥
कोणी म्हणती तो परम भला । पोटीं धरेनें जागा असेल दिधला ।
एक म्हणती येईल वहिला । आम्हांविण त्याला न कंठेचि ॥ ”

तुकोबांचा मृतदेह न सांपडल्यामुळें देहूंतील निरनिराळ्या लोकांनीं त्या वेळीं कसे निरनिराळे तर्क केले, ते वरील ओव्यांत गोपाळबुवांनीं सांगितले आहेत. अर्थात्, बुवांचा देह न सांपडल्यामुळेंच लोकांना असे तर्क लढवावे लागले हें उघड आहे. तुकोबांचा देह कां सांपडला नाहीं, त्या देहाचें काय झालें, या कोड्याचा उलगडा शेवटपर्यंत झाला नाहीं व त्यामुळें ‘ बुवा सदेह वैकुंठास गेले,’ ही आख्यायिका प्रचलित झाली.

आतां, एखाद्या मनुष्यास सदेह स्वर्गास जाणें अगदींच अशक्य आहे कीं काय असा एक शास्त्रीय प्रश्न येथें उत्पन्न होतो; व पुराणांतील दाखले देऊन, पूर्वीं अनेक व्यक्ति सदेह स्वर्गास गेल्याचें कांहीं लेखकांनीं दाखवून दिलें आहे. ‘ चित्रमयजगत् ’ मासिकाच्या जुलै १९३२ च्या अंकांत श्री. विष्णु हरि वडेर, एम्. ए., एलएल्. बी. यांचा ‘ प्राचीन काळीं सदेह स्वर्गगमन ’ हा लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यांत त्यांनीं या विषयाची बरीच माहिती दिली आहे. परंतु असले पौराणिक दाखले हल्लींच्या काळीं कोणी मानणार नाहींत. तथापि योगसिद्धीच्या जोरावर मात्र मनुष्याला आपला देह अदृश्य करितां येतो, व त्याप्रमाणें तुकोबांनीं आपला देह कायमचाच अदृश्य केला असावा असें दिसतें. ‘ योगाची सिद्धि हे तुकारामीं ’ असें जें पंतांनीं म्हटलें आहे त्याचें कारण हेंच असावें. चालू काळीं देखील अशा रीतीनें अदृश्य होणारे योगी या आर्यावर्तांत आहेत. १९२७ सालच्या मार्च महिन्यांत, मुंबईनजीक खार येथें शेट बाल-किसनदास यांच्या घरीं श्रीदेवजी महाराज या नांवाचे प्रसिद्ध योगी आले होते ते योगबलानें आपला देह आकुंचित करितां करितां अकस्मात् अदृश्य होत असत व ही गोष्ट त्या वेळीं वर्तमानपत्रांत प्रसिद्धही झाली होती; तेव्हां तुकारामबुवा ‘ कुडीसहित ’ गुप्त झाले या आख्यायिकेच्या शक्यतेविषयीं किंवा सत्यतेविषयीं शंका घेण्याचें कांहीं कारण नाहीं. शिवाय, महाराष्ट्रांत होऊन गेलेल्या शेंकडों संतांपैकीं फक्त एकट्या तुकारामबुवांविषयींच ही आख्या-यिका प्रचलित आहे हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे.

ग्रंथ संग्रहालय,



तुकोबा अदृश्य झाल्यावर देहू गांवांत मोठा हलकल्लोळ उडाला. तुकोबांची पत्नी जिजाई हिला तें वर्तमान समजतांच ती मूर्च्छित पडली. ती त्या वेळीं गरोदर होती. बुवा शेवटीं शेवटीं घरांतून बाहेर पडतांना "आम्ही वैकुंठास जातों," असें म्हणत असत, त्यामुळें, त्या दिवशीं बाहेर पडतांना बुवांनीं जरी हेच शब्द उच्चारले असले, तरी आज हे खरोखरच वैकुंठास जाणार आहेत असें तिला वाटण्याचें कारण नव्हतें. अर्थात् प्रिय पतीच्या आकस्मिक मृत्यूचें वर्तमान कानीं पडतांच तिला मरणप्राय दुःख व्हावें यांत आश्चर्य नाहीं.

कै. विनायक लक्ष्मण भावे यांनीं आपल्या 'महाराष्ट्र सारस्वतां'त तुकोबांच्या मृत्यूची जी उपपत्ति लावली आहे ती इतकी विचित्र आणि हास्यास्पद आहे कीं, तिची विचित्रता आणि हास्यास्पदता त्यांच्या स्वतःच्याच लक्षांत कशी आली नाहीं याचें आश्चर्य वाटतें. ते लिहितात, "तुकोबांनीं इंद्रायणीजवळ किंवा पलीकडे एक समाधिस्थान बांधविलें होतें व ज्ञानेश्वराप्रमाणेंच त्यांनीं तींत समाधि घेतली. आंत गेल्यावर दार बंद करून टाकलें. तीन दिवस त्या समाधिमंदिरांत आवाज येत होता, व पंचमीचे दिवशीं आवाज राहिला व सर्व सामसूम झालें. असें झाल्यावर तुकोबांचा प्राण गेला असें जाणून मंडळी घरोघर परत गेली!" पण या पांडित्यास आधार काय? तुकोबांनीं बांधविलेली ती समाधि नाहींशी कशी झाली? त्यानंतर देहूस एखादा भूकंप झाल्याची हकीकत इतिहासांत नमूद नाहीं. ज्ञानदेव-एकनाथादि प्राचीन संतांच्या समाधि जर अद्याप आहेत तर तुकोबां-सारख्या त्यांहून अर्वाचीन साधु पुरुषाची समाधि नष्ट होण्याचें कारण काय? उलट, अशी समाधि जर तुकोबांनीं खरोखरच बांधलेली असती तर त्यांच्या शिष्यांनीं आणि वंशजांनीं तिचें मोठ्या कसोशीनें रक्षण करून आळंदीच्या यात्रेप्रमाणें, तुकोबांच्या पुण्यतिथीच्या दिवशीं–कण्याच्या पंचमीस–तेथें मोठी यात्रा भरविली असती; व तें स्थल म्हणजे आज एक मोठ्या उत्पन्नाची बाब होऊन बसली असती. शिवाय, तुकोबांच्या समाधीची ही गोष्ट आज २७५ वर्षें गुप्त कशी राहिली? तात्पर्य, कै. भावे यांचें हें पांडित्य केवळ 'मुखमस्तीति वक्तव्यं' या जातीचें असून त्याला काडीचाही आधार नाहीं.

कै. भावे यांनीं तुकोबांचा असाच दुसरा एक मोठा अक्षम्य अपराध केला आहे. कोणत्याही सांप्रदायिक गाथ्यांत न सांपडणारे प्रक्षिप्त अभंग तुकोबांच्या गळ्यांत बांधून त्यांनीं त्यांच्यावर विनाकारण आग पाखडली आहे.

" सर्व हेत जाला आहे एक मनीं । ऐका विनवणी तुम्ही संत ॥
आमुची ही कांता आहे तुमचे पदरीं । दया तिजवरी करावी ते ॥
आहे अचपळ तोंडें फटकळ । सोसा वरदळ मजसाठीं ॥
पसरीं पदर धरीं दाढी होंटी । घालावे जी पोटीं अपराध ॥
इतुक्या शब्दाचा खरा हेत धरा । उपकार करा मजवरी ॥
तुका म्हणे नेणें बोलणें मी फार । करा अंगीकार तुम्ही आतां ॥ "

हा अभंग कोणत्याही सांप्रदायी गाथ्यांत सांपडत नाहीं, व त्याची रचनाही, तो तुकारामबुवांचा नव्हे असेंच दाखविते. अशा स्थितींत, हा अभंग त्यांचाच असें गृहीत धरून कै. भावे लिहितात, " ज्यांनीं संसारमाया सोडिली त्यांनीं अगदीं शेवटीं वैकुंठास जातांना सभोंवतालच्या मंडळीस, माझ्या बायकोला सांभाळा, व माझ्यासाठीं तिचे अपराध पोटीं घाला, अशा एखाद्या संसाऱ्या-सारख्या विनवण्या कराव्या, हें आम्हा अनधिकाऱ्यांना विसंगत वाटतें." पण मला असें वाटतें कीं कोणताही सबळ पुरावा नसतां, तुकारामबुवांसारख्या महान् सत्पुरुषाविषयीं असली कुत्सितपणाची शंका घेण्याइतकें ज्यांचें मन क्षुद्र आहे ते लोक पारमार्थिक दृष्टीनें तर अनधिकारी आहेतच, पण संतचरित्र-लेखनाच्या बाबतींतही ते अनधिकारीच आहेत. अशा अनुदार मनोवृत्तीच्या लोकांनीं संतचरित्रलेखनार्थ लेखणी हातीं धरूं नये हेंच उत्तम. वरील शेरा मारल्यावर मग कै. भावे हळूच लिहितात, " हें थोडें ज्यास्त वाहवलें ! " म्हणजे आपण बरेच वाहवलों याची जाणीव त्यांना मागाहून झाली, पण त्यांचें दुर्दैव इतकेंच कीं तो शेरा खोडून टाकण्याची बुद्धि कांहीं त्यांना शेवटपर्यंत झाली नाहीं.

कै. तुकाराम तात्या यांनीं, ८५०० अभंगांचा जो मोठा गाथा सन १८८९ सालीं, दोन भागांत प्रसिद्ध केला आहे, त्यांत ' तुकारामबावांची शेवटील विनवणी, ' या मथळ्याखालीं जे २८ अभंग दिले आहेत त्यांतून वरील अभंग कै. भावे यांनीं उद्धृत केला असल्यामुळें, या २८ अभंगांचें खरें स्वरूप काय आहे, व हे अभंग बनावट आहेत असें मी कां म्हणतों, हें वाचकांच्या लक्षांत येण्यासाठीं, या अभंगांतील कांहीं विधानांचा निर्देश येथें करितोंः—

" सखे सज्जन हो स्मरा नारायण । संगें येतें कोण सत्य सांगा ॥
आमुचे गांवींचें जरी रत्न गेलें । नाहीं सांगितलें म्हणों नये ॥
म्हणोनियां सकळां केलें जरी ठावें । नाईकलें जावें पुण्यवाटे ॥
इतुकियावरी तुम्ही राहूं नका । विनवितो तुका विठोबासी ॥"

ह्या पहिल्याच अभंगांत, आपल्याबरोबर ( वैकुंठास ) येण्यास कोण कोण तयार आहेत, असें बुवा विचारीत असून, " आमच्या गांवांतलें रत्न गेलें, " असें मागाहून तुम्ही म्हणाल, असेंही ते लोकांस सांगत आहेत. आतां, अशा रीतीनें तुकोबा स्वतःला ' देहू गांवांतलें रत्न, ' म्हणतील कीं काय, याचा विचार वाचकांनींच करावा. दुसरें विचित्र विधानः—

" चार लक्ष तीस हजार हीं पदें । तुम्हांसी विशदें सांगितलीं ॥ "

हीं चार लक्ष तीस हजार पदें आहेत कोठें ? तिसरें विधानः—

" कुडीसहित तुका जाईल वैकुंठासी । हें गुज तुम्हांसी कळलें नाहीं ॥ "

आपण कुडीसहित वैकुंठास जाणार, असें तुकोबा या अभंगांत अगोदरच सांगून ठेवीत आहेत ! तुकोबांनीं अशी सूचना जर आगाऊच देऊन ठेवली होती, तर त्यांच्या मृत्यूचें कोडें लोकांस शेवटपर्यंत कां उलगडतां आलें नाहीं ? असो. अशाच प्रकारच्या विचित्र आणि हास्यास्पद मजकुरानें भरलेले हे अभंग असून त्यांची रचनाही इतकी भिकार आणि अशुद्ध आहे कीं, त्यांचें पितृत्व तुकोबांवर लादणें म्हणजे त्यांची योग्यता जाणून बुजून कमी करणें होय. असल्या या भिकार अभंगांतला एक अभंग घेऊन त्याच्या आधारानें कै. भाव्यांसारख्या जबाबदार लेखकानें तुकोबांवर विनाकारण असा गहजब करावा, हें अगदीं अश्लाघ्य होय.

निर्याणसमयीं तुकोबांचें वय काय होतें हें, त्यांचा जन्मकाल उपलब्ध नसल्यामुळें, नक्की सांगतां येत नाहीं. तरी तें ५० आणि ६० यांच्या दरम्यान असावें असें वाटतें. स्वर्गस्थ झाल्यानंतरही बुवांनीं कांहीं लोकांस प्रत्यक्ष व कांहीं लोकांस स्वप्नांत दर्शन दिलें असें ग्रंथांतरीं लिहिलें आहे. बुवांची एक कन्या गंगाबाई ही बुवांच्या निर्याणकालीं आपल्या सासरीं होती, तिला बुवांच्या मृत्यूची बातमी समजतांच ती फार शोकाकुल झाली, व " तुमची भेट झाल्याशिवाय मी अन्नपाणी घेणार नाहीं, " अशी प्रतिज्ञा करून बसली. तेव्हां ' बेटा-

मध्यें ' बुवांनीं तिला भेटून तिचें समाधान केलें. वाराणसींत एका संन्याश्यालाही त्यांनीं असेंच दर्शन दिलें. बहिणाबाई, निळोबा, महीपति व कचेश्वर यांना त्यांनीं स्वप्नांत दर्शन दिलें. सुदुंबरें गांवात गवरशेट वाणी या नांवाचे एक गृहस्थ होते त्यांनाही बुवांनीं त्यांच्या मृत्युकालीं दर्शन दिल्याचा उल्लेख आढळतो. फाल्गुन वद्य द्वितीयेस बुवा अदृश्य झाल्यावर तीन दिवस मंडळीनें त्यांची वाट पाहिली. तिसरे दिवशीं म्हणजे फाल्गुन वद्य पंचमीस बुवांची गोधडी आणि टाळ हीं सांपडलीं, तेव्हां रामेश्वर भट्टांनीं शास्त्रार्थ पाहून तोच त्यांच्या पुण्यतिथीचा दिवस ठरविला. हिला 'कण्याची पंचमी' असें म्हणतात. टाळाबरोबर सात अभंग सांपडले असें नामा शिंपी यांनीं व ११ अभंग सांपडले असें गोपाळबुवांनीं लिहिलें आहे. परंतु अभंग सांपडल्याचा उल्लेख महीपतिबावा करीत नाहींत.

तुकोबांचे कनिष्ठ बंधु कान्होबा यांनीं तुकोबांच्या मृत्यूनंतर जो शोक केला आहे त्याचे ३६ अभंग असून ते अत्यंत हृदयद्रावक आहेत.

तुकोबांस महादेव आणि विठोबा हे दोन पुत्र पूर्वींच झालेले होते. तुकोबांचे मृत्युकालीं जिजाई गर्भवती होती ती यथाकाल प्रसूत होऊन तिला तिसरा पुत्र झाला त्याचें नांव नारायण ठेविलें. हे नारायणबुवा बापासारखेच विरक्त आणि भगवद्भक्त होते. छत्रपति शिवाजी महाराजांनीं त्यांची भेट घेऊन त्यांना चार गांव इनाम दिले व नंतर त्यांनीं देहू येथील विठोबाच्या देवालयाचें शिखर बांधलें असें महीपति सांगतात. पुढें नारायणबुवांनीं आपलें घर ब्राह्मणांकडून लुटविलें आणि स्वतः तीर्थयात्रेस निघून गेले. महादेव व विठोबा हे दोघेही वडील बंधु त्यांच्या आज्ञेंत असत.

तुकोबा कसे दिसत असत याचें वर्णन, पुढें तुकोबांनीं ज्यांना स्वप्नांत अनुग्रह दिला त्या कचेश्वरांनीं पुढीलप्रमाणें केलें आहे—

" वर्तुळ दोंद पोट । नेत्र नासिक कंठ ॥
देखिल्या दंतपंक्ती । तुकाराम समर्थीं ॥
× × ×
उंच ना ठेंगणा हो । ध्यानीं हेंचि हें राहो ॥ "

जुन्या तुकारामचरित्रकारांनीं दिलेल्या माहितीच्या आधारें आतांपर्यंत जें तुकोबांचें चरित्र मी लिहिलें त्यावरून तुकोबा हे अगदीं निष्क्रिय असून पुढें तर संसाराकडे त्यांनीं अगदींच दुर्लक्ष केलें होतें असा वाचकांचा समज होण्याचा संभव आहे, परंतु तसा समज कोणी करून घेऊं नये. कारण तुकोबांनीं आरंभीं आपला वडिलार्जित वाण्याचा धंदा केला होता हें तर सर्वांस ठाऊकच आहे, परंतु त्यांना वैराग्य उत्पन्न झाल्यावरही ते जमीनजुमल्याकडे लक्ष देत असत ही गोष्ट ऐतिहासिक पुराव्यानें सिद्ध झालेली आहे. ता. ५ सप्टेंबर १९११ च्या 'केसरीं'त कै. वि. का. राजवाडे यांनीं दोन जुनीं पत्रें प्रसिद्ध केलीं आहेत तीं येथें देतों म्हणजे यासंबंधानें वाचकांची खात्री होईल. पूर्वीं, 'तुकाराम आणि मंबाजी' या प्रकरणांत ज्या पत्रांचा उल्लेख केला आहे तीं हींच पत्रें होत.

## पत्र पहिलें.

श्री.

१६४२ श्रावण शुद्ध १०.

श्रीशके १६४२ शारवरी नाम संवछरे श्रा॥ शुद्ध दशमी भोमवासर ते दिवसी राजश्री नारोबा गोसांवी वास्तव्य मौजे देहू ता॥ हवेली प्र॥ पुणें यांसी सटवोजी व बालोजी बिन चांपसेट शेटिये सो मौजे मारर सु॥ सन हजार ११३० कारणे लेहून दिल्हे ऐसे जे मौजे मारी माहास्थल श्री चे देवालय आहे त्यास श्रीच्या उपभोगास इनाम आपले मिरास ╎ ╎ ╎ खंडी ९ नव आहे. त्या ╎ ╎ विठलटिके कास मण .।=॥ साडे सात एकूण रुके २ एकूण बिघे १५ पंधरा कदीम आहेत. त्यास तुमचे बाप श्री तुकोबा गोसांवी सहरहू इनामाची कीर्दी करऊन श्रीच्या मोहछायासी उपैद्र होए त्याचा खर्च करीत असेती दरम्यान कितेक दिवस मंबाजी गोसांवी ब्राह्मण इनामाची कीर्दी करावयासी तुकोबा गोसावीयानी ठेविले होते ते हि खटपट करून इनामांत कीर्दी करून श्रीस भोगवटा घेत असेती ते उभयताहि निवर्तलिया उपरी तुंम्हीं इनामांत कीर्दी करऊन उपैद्र होते ते श्रीस खर्च करीत आलेत त्यास आतां आपण तुम्हासी खटखट करूं लागलों कीं आपल्या मिरासीच्या सेतास श्रीस

इनाम नाहीं म्हणून राजश्री पंतमुतालिक दिा राजश्री पंत-प्रधान यापासी तुम्हीं व आम्हीं उभे राहिलों त्यांचा मुकांम गांवीं जाला त्यांनीं करीना समाकुल पांढरीच्या मुखें मनास आणिला पांढरीच्या मुखें खरेंखुरें जाले कीं सदरहू विठलटिके श्रीस इनाम पुरातन आहे आपण कथला करितो तो हिसाबी नाहीं. या उपरि श्रीचें इनाम विठलटिके आपल्या नवखंडियाचे कार्सेत आहे ते तुम्हीं कीर्दी करऊन सालाबाद करीत आले असा त्याप्रमाणें कीर्दी करऊन श्रीस उपभोग घेवावें. याउपेरि आपण अगर आपले भाऊबंद कोण्हीं विठलटिकयासी कथले करून तरी गोताचे खोटे व दिवाणीचे गुन्हेगार हे लिहून दिल्हे सही.

निा तागडी.



गोही

| | |
|---|---|
| सुभानजी पाटील मोकदम मौजे मजकूर | गोंदजी पाटील मोकदम मौजे मार |
| धमोजी पाटील हगवने मौजे मजकूर | कृष्णा माली टिलेकर मेहतरी मौजे मार |
| जैत माली भूमकर मौजे मजकूर | मोरो गोविंद जोसी व कुलकर्णी मौजे मार |

## पत्र दुसरें.

१६४२ श्रावण शुद्ध १०

श्री

वीठ्ठल

श्रीशके शक १६४२ शारवरी नाम संवछरे श्रा। शुद्ध दशमी भोमवासरे तदिसी सदवोजी व बालोजी वलद चांपशेटी सेटिये मौजे देहू ता। हवेली प्रा

पुणें यासी नारोबा गोसावी वास्तव्य मौजे मा सुा सन हजार ११३० कारणे लेहून दिल्हें ऐसे जे तुमचा अजा पीलसेटी त्याणें मौजे मारी महाराज श्री देव आहे याचे सेवेसी आगांतुक ब्राह्मण मंजावी गोसांवी होते त्यास तुम्ही आपल्या मिरासीच्या सेतपैकीं सिवगंगेचा टुकडा दिल्हा होता कीं तेथे + + बांधोन फुलझाडे करून राहाणे त्यावरून मंबाजी गोसावियांनी त्या टुकडियांत फुलझाडें लाविली होती कित्तेक दिवस त्याचा उपभोग घेत होते मंबाजी गोसांवी निवर्तले याउपेरी तुमचे टुकडे तुम्ही कीर्दी करून लागलेत पुढेहि तुम्ही सिवगंगेचा टुकडा आहे तो कीर्दी करून खाणे आम्हांस त्या सेतासी समंध नाहीं आपला कोण्ही अगर आपण कांहीं कथले करून तरी गोताचे खोटे व दिवाणीचे गुन्हेगार मंबाजी गोसावियासी पीलसेटीनें कागद लेहून दिल्हा होता तो आपणापासी होता तो तुमचा तुम्हां फिराऊन दिल्हा असे हे लिहिले सही.

निा तागडी



गोही

सुभानजी पाटिल मोकदम
मौजे मार
धमोजी पाटिल हगवने
मौजे मार
जैत माली भूमकर
मौजे मार
मालनाक वा
एमनाक माहार मौजे मा

गोंदजी पाटिल मोकदम
मौजे मार
कृष्णा माली टिलेकर
मेहतरी मौजे मार
मोरो गोविंद जोसी
व कुलकर्णी मौजे मार

कै. राजवाडे यांनीं या संबंधानें असा शेरा मारला आहे:—

" शिवाजीमहाराजांनीं तुकारामाला इनाम देण्याचा घाट घातला होता; परंतु तो त्या निरिच्छ पुरुषानें अमलांत येऊं दिला नाहीं, असें कित्येक ठिकाणीं

लिहिलेलें आढळतें. परंतु, मला सांपडलेल्या एकदोन पत्रांत तुकारामानें देहू एथील विठोबाच्या उत्सवाप्रीत्यर्थ पंधरा बिघे जमीन इनाम घेतल्याचा उल्लेख आहे. हीं पत्रें तुकारामाचा पुत्र नारायण याच्या हयातींत शके १६४२ त लिहिलेलीं आहेत. पत्रांत, कित्येक वर्षें तुकारामबोवा शेताची कीर्दी आपण स्वतः करवीत असत व कित्येक वर्षें मंबाजी ब्राह्मण आगंतुक याजकडून करवीत असत, असा उल्लेख आहे. त्यावरून दिसतें कीं, व्यवहाराकडे जरूर पडल्यास तुकाराम लक्ष देई; तो केवळ व्यवहारशून्य होता असें नव्हे. तसेंच तुकारामाचा छळ गांवकऱ्यांनीं व लोकांनीं फार केला असें आपण वाचतों. परंतु ह्या पत्रांवरून दिसून येतें कीं ज्याअर्थीं खुद्द देहू गांवांतील शेट्यानें परमादरानें पंधरा बिघे जमीन श्रीच्या उत्सवार्थ तुकारामाला इनाम दिली, त्याअर्थीं तुकारामबावांची मानमान्यता खुद्द, त्यांच्या गांवांत त्यांच्या हयातींत कांहीं लहानसहान नव्हती. तुकाराम, मंबाजी, नारायण व विठ्ठलटिकें यांचा उल्लेख अस्सल पत्रांत आला, अशीं हीं दोन अस्सल पत्रें प्रथमच प्रसिद्ध होत आहेत. दुसऱ्या पत्रांतील 'वीठल' हीं अक्षरें नारोबा गोसाव्याच्या हातचीं आहेत."

वरील शेऱ्यांतील एकदोन विधानें अगदीं निराधार आहेत. "सदर्हू विठ्ठलटिकें श्रीस इनाम पुरातन आहे," असे स्पष्ट शब्द पहिल्या पत्रांत असतां तुकोबांनीं गांवांतल्या कोणा गृहस्थाकडून १५ बिघे जमीन इनाम घेतली असें विधान कै. राजवाडे कशाच्या आधारावर करतात? हीं दोन्ही पत्रें लक्षपूर्वक वाचलीं असतां असें दिसून येतें कीं, विठ्ठलमंदिरास पुरातन इनाम असलेली जमीन व वरील पत्रांपैकीं पहिलें पत्र लिहून देणारे सटवोजी व बाळोजी सेटिये यांची जमीन, ह्या दोन जमिनी एकमेकींस लागून असल्यामुळें, सेटिये यांच्या मंदिरालगतच्या ज्या जमिनींत मंबाजी गोसावी बागबगीचा करून राहिला होता त्या जमिनीविषयीं, वरील सेटिये बंधु व तुकोबांचे पुत्र नारोबा यांच्या दरम्यान वाद उपस्थित झाला व तें प्रकरण पंतप्रधान यांजकडे जाऊन त्यांनीं 'विठ्ठल टिकें' ही जमीन पुरातन इनाम आहे व तिजवर सेटिये बंधूंचा कोणत्याही प्रकारचा हक्क नाहीं असा निकाल दिला, त्याप्रमाणें कबुली पहिल्या पत्रांत सेटिये बंधु यांनीं नारोबांस लिहून दिली आहे. व दुसऱ्या पत्रांत नारोबांनीं, मंदिरालगतच्या सेटियेबंधूंच्या ज्या जागेंत

मंबाजी रहात असे त्या जमिनीशीं आपला कांहीं संबंध नाहीं असें सेटिये बंधूंस लिहून दिलें आहे. यांत तुकोबांनीं स्वतः जमीन इनाम घेतली असें कोठेंच नाहीं.

तुकोबांच्या पूर्वजांकडे देहू गांवची ' महाजनकी ' पूर्वापर चालत आलेली होती, परंतु तुकोबा पुढें उदासीन वृत्तीनें वागूं लागल्यामुळें त्यांनीं या ' महाजनकी ' ची उपेक्षा केली. पुढें त्यांचे पुत्र नारायणबोवा यांनीं छत्रपति शिवाजीमहाराजांकडून शके १६०० सालच्या फाल्गुनांत ' महाजनकी 'चें आज्ञापत्र पुनः मिळविलें. तुकोबांचे वंशज हल्लीं देहू येथें आहेत.

बुवांच्या वंशजांस मिळालेले इनामगांव त्यांच्या घराण्याकडे अद्याप चालत आहेत. शेवटीं ह. भ. प. लक्ष्मणराव पांगारकर यांच्या तुकारामचरित्राधारें आजच्या देहू गांवाचें संक्षिप्त वर्णन व बुवांची वंशावळ देऊन हें प्रकरण पुरें करितों:—" देहू येथें सांप्रत जें श्रीविठ्ठलमंदिर व त्याच्या भोंवतालच्या ओवऱ्या व प्राकार बांधलेले दिसतात ते अर्थात् मागाहून बांधलेले आहेत. तुकोबांनीं या जुन्या मंदिराचा जीर्णोद्धार केल्यावर, पुढें त्यांचे पुत्र नारायणबुवा यांस तीन गांवें इनाम मिळालीं व त्या पैशानें त्यांनीं, व इतर लोकांनीं मोठ्या प्रमाणावर मंदिर बांधलें. मंदिर उत्तराभिमुख असून त्यांतील विठ्ठलरखुमाई शेजारीं शेजारीं उभे आहेत. समोर गरुडपार आहे. गरुडहनुमंत देवासमोर हात जोडून उभे आहेत. पूर्वेकडील दरवाजाजवळ दक्षिणाभिमुख गजाननमूर्ति असून बाहेर भैरवाचें लहानसें मंदिर आहे. विठ्ठलमंदिराच्या पश्चिमेस हरेश्वरमंदिर आहे व शेजारींच तुकोबांच्या वंशजांचा राहता वाडा आहे. त्याच्या पलीकडेच तुकोबा ज्या घरांत जन्म पावले व राहिले तें घर असून मागाहून त्यांत विठ्ठलमूर्तीची स्थापना केली आहे. वाड्याच्या व या घराच्या पश्चिमेस इंद्रायणीच्या बाजूला एक वखळ आहे तेथें मंबाजीचें घर व बाग होती असें म्हणतात. विठ्ठलमंदिराला प्रदक्षिणा घालतांना ही वखळ वाटेंत लागते. पश्चिमेस बल्लाळाचें वन असून त्यांत सिद्धेश्वराचें मंदिर आहे व जरा पूर्वेस लक्ष्मीनारायणाचें मंदिर आहे. हीं मंदिरें तुकोबांच्या पूर्वींचीं आहेत. इंद्रायणी नदी देहू गांवाला लागून उत्तराभिमुख वहात आहे. मंदिराच्या बाहेर व नदीकांठाजवळ पुंडलिकाचें देऊळ आहे. नदीकांठानें उत्तरेस जातांना मैलदीड मैल लांबीचा प्रचंड डोह आहे. या डोहाच्या कांठीं गोपाळपुर असून तेथें जुनाट पिंपरीचा वृक्ष आहे. या वृक्षाजवळ महाराजांचें

निर्याण झालें. याच्याही खालीं अर्ध्या मैलावर करंजाईचें स्थान आहे. हा डोहाचा मध्य होय. येथें मुरलीधराचें मंदिर आहे. महाराज डोहावर एकांतांत वसत ते याच ठिकाणीं. याच डोहांत बुवांच्या वह्या बुडविण्यांत आल्या होत्या; व त्या वेळीं ज्या शिळेवर बुवांनीं 'तेरा दिवस निद्रा केली' ती शिळाही याच ठिकाणीं होती. पुढें ती तेथून विठ्ठलमंदिरांत आणली व मंदिरालगत तुकोबांची पहिली स्त्री रखमाई हिचें वृंदावन आहे त्याला टेकून उभी करून ठेविली. इंद्रायणीच्या कांठावर उभें राहून पश्चिमेकडे पाहिलें म्हणजे डाव्या बाजूस ६ मैलांवर गोराड्याचा ऊर्फ घोरवडीचा डोंगर दिसतो, व उजव्या बाजूस डोहाच्या पलीकडे देहूहून ८ मैलांवर भामनाथ, भामगिरी ऊर्फ भामचंद्र हा डोंगर दिसतो व देहूच्या थेट पश्चिमेस २ मैलांवर भंडाऱ्याचा डोंगर दिसतो." तुकोबांचें हस्ताक्षरही अद्याप उपलब्ध आहे.

भारत-सेवक-समाजाचे एक प्रमुख सभासद, माझे जुने मित्र, श्री. गोपाळराव देवधर यांनीं सुमारें ३५ वर्षांपूर्वी 'देहूची यात्रा' या नांवाचें एक लहानसें पुस्तक लिहिलें आहे तें या बाबतींत वाचण्यासारखें आहे. श्री. गोपाळराव लिहितात, " देहू गांव फारसा मोठा नाहीं, तरी फार जुनाट आहे. भोंवतालचा प्रदेश डोंगराळ आहे. गांवाभोंवतीं जुन्या तटाच्या पडक्या भिंती असून पूर्व व उत्तर या दोन दिशांस मोठमोठे वेशींचे दरवाजे आहेत. मुख्य पांडुरंगाचें देऊळ पश्चिमेच्या बाजूस अगदीं नदीचे कांठावर आहे, व तेथें एक मोठा विस्तीर्ण घाट आहे. देऊळ दगडी असून फार भक्कम आहे. तुकोबांचे पुत्र नारायणबुवा यांनीं, महाळुंग येथील इंगळे नामक जहागीरदारांच्या मदतीनें हें देऊळ बांधलें व त्याला सुमारें एक लक्ष रुपये खर्च आला असें सांगतात. ज्या ठिकाणाहून तुकोबांनीं 'सतनु' वैकुंठीं गमन केलें तें गोपाळपुरा ठिकाण गांवापासून सुमारें चार पांचशें पावलांवर असून तेथें एक लहानसें देऊळ, एक मोठा मंडप व दोन चार सोपे असून त्यांना लागूनच पश्चिमेच्या बाजूस इंद्रायणीवर एक मोठा घाट आहे. बुवांचे अभंग पाण्यावर तरले तें स्थान गांवापासून एक मैल आहे. येथें विठोबारखुमाईचें लहानसें देऊळ आहे आणि त्याच्याचखालीं एक लहानसा घाट आहे. तेथून जवळजवळ एक मैल लांब गेलेल्या पांच सहा पुरुष खोल पाण्याच्या विस्तीर्ण पात्रास डोह हें नांव देतात." प्रि. गोविंद चिमणाजी भाटे यांनींही आपल्या एका प्रवासवर्णनपर पुस्तकांत देहू गांवाविषयीं बरीच वाचनीय माहिती दिली आहे.

## तुकोबांचा वंशवृक्ष—

- विश्वंभरबुवा ( पत्नी अमाबाई )
  - हरि
    - विठोबा
      - पदाजी
        - शंकर
          - कान्होबा
            - वाल्होबा ( पत्नी कनकाई )
              - सावजी
              - तुकाराम महाराज (पत्नी जिजाई)
                - महादेव
                  - आबाजी
                    - महादेव मुकुंद जयराम
                - विठोबा
                  - रामजी
                  - उधोबा
                    - खंडोबा
                    - विठोबा
                    - नारायण
                  - गणेश
                  - गोविंद
                - नारायणबावा
              - कान्होबा
                - गंगाधर
                  - खंडोबा
                    - गंगाधर
  - मुकुंद

... ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
श्रीतुकाराम २८८९५ वि: ५१८७
अनुक्रम ........ नों. दि: २८-९-६४
क्रमांक १२८ ........

प्रकरण १३ वें

# वारकरीपंथांत तुकोबांचें महत्त्व

" संतकृपा जाली । इमारत फळा आली ॥
ज्ञानदेवें रचिला पाया । उभविलें देवालया ॥
नामा तयाचा किंकर । त्यानें केला हा विस्तार ॥
जनार्दनीं एकनाथ । स्तंभ दिला भागवत ॥
भजन करा सावकाश । तुका झालासे कळस ॥ "

महाराष्ट्रांतील वारकरी पंथ अमुकच कालीं सुरू झाला हें जरी आज नक्की सांगतां येणें शक्य नाहीं, तरी आपली मराठी भाषा जितकी जुनी आहे, तितकाच हा वारकरी संप्रदायही जुना आहे असें समजण्यास हरकत नाहीं. कारण, शालिवाहन शकाच्या तेराव्या शतकांत होऊन गेलेले प्रसिद्ध संत नामदेव यांच्या घराण्यांतले, त्यांच्या पूर्वींच्या कितीतरी पिढ्यांचे लोक पंढरपुरचे वारकरी होते. ज्या पुंडलिकाच्या भक्तीसाठीं पांडुरंग पंढरीस येऊन विटेवर उभा राहिला तो पुंडलीक ऐतिहासिक कालांतला दिसत नाहीं. कारण त्याचें चरित्र 'पांडुरंगमाहात्म्य' ग्रंथांत दिलें आहे तें पौराणिक आहे. तेव्हां तो काल फार जुना म्हणून जरी सोडून दिला तरी, पंढरपुरच्या विठ्ठलमंदिराचा जीर्णोद्धार हेमाद्रीच्या कालीं, म्हणजे शालिवाहन शकाच्या १२ व्या शतकाच्या अखेरीस झाल्याचा जर स्पष्ट उल्लेख शिलालेखांत सांपडतो तर तें मंदिर पहिल्यानें फारच जुन्या काळीं बांधलें गेलें असलें पाहिजे यांत संशय नाहीं. आतां ही गोष्ट खरी कीं, वारकरी पंथ जरी फार प्राचीन काळीं स्थापन झालेला असला तरी त्या संप्रदायाचें महत्त्व तेराव्या शतकांत होऊन गेलेल्या ज्ञानदेव–नामदेवादि संतांनींच वाढविलें व याच कारणामुळें त्या पंथाचे लोक ज्ञानदेवांचा 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ आपला प्रमाणग्रंथ मानतात. ज्ञानदेवांनीं पाया घालून देवालयाची उभारणी केली, नामदेवांनीं त्याचा विस्तार केला, एकनाथांनीं आपल्या भागवतरूपी स्तंभाचा या इमारतीला आधार दिला व तुकोबांनीं तिजवर कळस चढविला, असा वरील अभंगाचा अर्थ

आहे व म्हणूनच या चारी संतांचे ग्रंथ वारकरीसांप्रदायी लोक आपले प्रमाणग्रंथ मानतात. ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ आणि तुकाराम या चौघांशिवाय वारकरीसंप्रदायांत आणखी शेंकडों संत होऊन गेले आहेत; निवृत्ति, सोपान, मुक्ताबाई, जनी, चोखामेळा, सांवता माळी, कूर्मदास, परिसा भागवत, कान्होपात्रा, राका, बंका, विसोबा खेचर, सेना न्हावी, भानुदास, जोगा परमानंद, मालो, मुद्गल, गोरा कुंभार, निंबराज, निळोबा, महीपति, गोपाळबोध मळगांवकर, बोधलेबुवा वगैरे बहुतेक सर्व संत वारकरीच होते, परंतु ते वरील चार मुख्य ग्रहांभोंवतीं फिरणारे उपग्रह असल्यामुळें प्रमुखत्वाचा मान त्यांना प्राप्त झाला नाहीं. तरीपण 'निवृत्ति ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई एकनाथ नामदेव तुकाराम' ही वारकरीसंप्रदायाची नाममालिका कांहीं अगदींच आंखूड नाहीं. हल्लीं मात्र 'ज्ञानदेव तुकाराम' या दोनच नांवाचा उच्चार होऊं लागला असल्यामुळें मधल्या दोन मुख्य ग्रहांस तुकोबांनीं ग्रहण लावलें असावें असें वाटतें.

परमार्थमार्गांत संप्रदायाचें मोठेंसें महत्त्व आहे असें नाहीं. संप्रदाय हा गौण असून व्यक्तीची कर्तबगारीच श्रेष्ठ आहे. किंबहुना व्यक्तींमुळेंच संप्रदाय स्थापन होत असतात व व्यक्तींमुळेंच त्यांना महत्त्व येत असतें. एखाद्या संप्रदायांत शिरल्यानेंच मनुष्यास संतत्व प्राप्त होतें, आणि येरवीं होत नाहीं, असें थोडेंच आहे? संप्रदायामुळेंच जर साधुत्व येत असतें तर आज एक हजार वर्षांत ज्या कोट्यवधि लोकांनीं पंढरीची वारी केली त्यांत ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ आणि तुकाराम कितीसे झाले? त्याचप्रमाणें, तुकारामबुवांच्या पश्चात्, गेल्या अडीचशें वर्षांत, पंढरीच्या वारकरीसंप्रदायांत त्यांच्या तोडीचा पुरुष कोण झाला? तात्पर्य, संप्रदायामुळें साधु निर्माण होत नसून, साधूमुळें संप्रदाय निर्माण होत असतात. भूतदया, अहिंसा, भगवद्भक्ति, सदाचरण वगैरे साधुत्वाचीं जीं मुख्य लक्षणें तीं जर अंगांत नसतील तर नुसती सांप्रदायिकता व्यर्थ आहे, आणि हीं लक्षणें जर अंगांत असतील तर संप्रदायाची फारशी जरुरी नाहीं. तथापि परंपरा आणि शिस्त यांच्या रक्षणासाठीं सामान्य जनांस संप्रदायाची आवश्यकता आहे यांत संशय नाहीं आणि या दृष्टीनें संप्रदायाचें महत्त्व मान्य करावें लागतें.

# श्रीतुकाराम

महाराष्ट्रांत असे कितीतरी संप्रदाय होते व हल्लींही आहेत. महानुभाव पंथ प्रसिद्धच आहे. गिरी, पुरी, भारती, विष्णुस्वामी संप्रदाय, चैतन्य संप्रदाय, नाथ संप्रदाय, रामदासी संप्रदाय, गाणपत्य संप्रदाय, शैव संप्रदाय, आनंद संप्रदाय वगैरे संप्रदाय तर आहेतच, परंतु शाक्त संप्रदायही अद्याप कोठें कोठें आहे. तथापि, महाराष्ट्रांतील बहुजनसमाजाचा मुख्य देव पंढरपूरचा पांडुरंग व मुख्य संप्रदाय वारकरीसंप्रदायच होय यांत संशय नाहीं. ज्ञानदेव–नामदेवांच्या कालापासून या वारकरीसंप्रदायाची वाढ होतां होतां तुकारामबुवांच्या कालीं त्याचा अत्यंत उत्कर्ष झाला व त्यामुळें 'तुका झालासे कळस' हें वचन अगदीं यथार्थ आहे. तुकारामबुवांच्या कुळांत पंढरीची वारी फार जुन्या काळापासून होती, परंतु खुद्द तुकारामबुवा मात्र, अगदीं आरंभीं तरी निदान पंढरपुरास जात नसावे अशी शंका घेण्यास, वारकऱ्यांबरोबर पांडुरंगास त्यांनीं जें पत्र पाठविलें त्यामुळें जागा झाली आहे. तुकोबांचा एक पूर्वज विश्वंभर याला पंढरीस येण्याची दगदग पडूं नये म्हणून पांडुरंगानें देहू येथें वास्तव्य केलें अशी कथा आहे. यावरून देहूच्याच पांडुरंगमूर्तीची उपासना करण्यांत तुकोबांचीं पहिलीं कांहीं वर्षें गेलीं असावींत व वारकऱ्यांबरोबर पाठविलेल्या पत्राचें उत्तर ( अर्थात् दृष्टांतरूपानें ) आल्यानंतर ते पंढरीची वारी करूं लागले असावे, असा माझा तर्क आहे. शिवाय, देहूचा पांडुरंग निराळा आणि पंढरीचा पांडुरंग निराळा, अशी तुकोबांची कल्पना असणें शक्य नाहीं. पण पुढें, लोकसंग्रहार्थ पंढरीची वारी ते नियमानें करूं लागले व त्यांच्या आगमनानें पंढरीक्षेत्राचें आणि पांडुरंगाचें माहात्म्य वाढत चाललें. पांडुरंगाशिवाय दुसरा कोणताही देव तुकोबा मानीत नसत. पुढें उतारवयांत, सर्व विश्वच ब्रह्ममय आहे असें जरी ते पाहूं लागले होते, तरी पांडुरंगाची उपासना त्यांनीं शेवटपर्यंत सोडली नाहीं; कारण भक्तीशिवाय ज्ञान हें पंगु आहे असें त्यांचें ठाम मत होतें. शिवाय सामान्य जनांस निर्गुण निराकार परब्रह्माचें ज्ञान आकलन होणें शक्य नाहीं म्हणून त्यांच्यासाठीं, मूर्तिपूजेचा ओनामा ते शेवटपर्यंत गिरवीत राहिले. सगुणोपासनेंत जें प्रेम आणि सुख आहे तें निर्गुणोपासनेंत नाहीं असा त्यांचा अनुभव असल्यामुळें अद्वैताची भाषा त्यांना फारशी प्रिय नव्हती. देव आणि भक्त यांचा अभेद मानल्यावर

भगवत्प्रेमास जागा कोठें राहिली ? म्हणून 'मी भक्त आणि तूं देव' असें कर, अशी त्यांनीं देवाची प्रार्थना केली आहे.

वारकरीसंप्रदायाचीं मुख्य तत्त्वें काय आहेत, हें मीं स्वतः वारकरी नसल्या-मुळें, मला माहीत नाहीं; म्हणून ह. भ. प. पांगारकर व कै. धुरंधर या वारकरी लेखकांनीं दिलेल्या माहितीच्या आधारें तीं तत्त्वें मी येथें उतरून घेतों—

**देवता**— पंढरीचा पांडुरंग

**मंत्र**— रामकृष्ण हरि

**नियम**— सत्य भाषण

परस्त्री मातेसमान मानणें.

पंढरीची वारी करणें.

तुलसीमाला धारण करणें.

मद्यमांसत्याग

अहिंसा

मानापमानाची कल्पना सोडून देणें.

भेदभावराहित्य

**ग्रंथ**—ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम, निळोबा व इतर वारकरी संप्रदायांतील संत यांची कविता.

या संप्रदायाचा मूळ उगम भगवद्गीतेच्या ९ व्या आणि १२ व्या अध्यायांत सांपडतो. नारद, भीष्म वगैरे पुराणपुरुषांनीं वर्णिलेला भागवत धर्म आणि हा वारकरीसंप्रदाय यांत, कांहीं विशिष्ट बाह्य चिन्हांपलीकडे फारसा भेद नाहीं. श्रीमद्भागवत हा या भागवतसंप्रदायाचा मुख्य प्रमाणग्रंथ होय. मूर्तिपूजा, सगुणोपासना, भजनपूजन, कीर्तन आणि सर्वभूतीं भगवद्भाव हीं या भक्तिपंथाचीं मुख्य तत्त्वें आहेत. 'विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभेद भ्रम अमंगळ' या तुकोबांच्या अभंगांत या संप्रदायाच्या शिकवणीचें सार समाविष्ट झालेलें आहे. तुकोबांपूर्वी ज्ञानदेव आणि एकनाथ यांनीं या भागवत धर्माचें अत्यंत विद्वत्तापूर्ण विशदीकरण ज्ञानेश्वरी आणि नाथभागवत या ग्रंथांत केलेलें असून नामदेवांनीं आपल्या साध्या अभंगवाणीनें त्या धर्माच्या

तत्त्वांचा प्रसार महाराष्ट्रभर केला. या तिघांहून तुकारामबुवांनीं कांहीं निराळें सांगितलें आहे असें नाहीं; त्या तिघांचाच अनुवाद त्यांनींही केला आहे, पण तो अशा परिणामकारक शब्दांनीं केला आहे कीं, त्यांच्या व्यक्तित्वाचा ठसा त्यावर उमटल्यामुळें ती त्यांची स्वतःची स्वतंत्र शिकवणूक आहे अशी सामान्य जनांची समजूत होते. श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या ग्रंथांचाही हाच प्रकार आहे. त्यांच्या दासबोधांत व इतर कवितेंत ज्ञानदेव, दासोपंत आणि एकनाथ यांच्या वाणीचा प्रतिध्वनि सर्वत्र उमटलेला दिसतो.

आतां येथें कोणी असा प्रश्न विचारील कीं, ज्ञानदेव, नामदेव आणि एकनाथ यांच्याच ग्रंथांचा जर तुकोबांनीं अनुवाद केला आहे तर मग वारकरी संप्रदायांत तुकोबांचें वैशिष्टय तें काय ? तर या प्रश्नाचें उत्तर असें आहे कीं जुन्या संतांच्या शिकवणुकीची नुसती उजळणी करूनच तुकोबा थांबले नाहींत तर ती सगळी शिकवणूक त्यांनीं प्रत्यक्ष आचरणांत आणून दाखविली; आणि म्हणूनच वारकरीपंथाचा त्यांनीं उत्कर्ष केला असें पूर्वी म्हटलें आहे. गीतेंत भगवंतांनीं अमुक सांगितलें आहे, भागवतकार तमुक म्हणतात, ज्ञानोबांचें मत असें आहे, इत्यादि शब्दपांडित्य कोणीही करील, परंतु भगवंतांनीं भगवद्गीतेंत किंवा ज्ञानोबांनीं ज्ञानेश्वरींत जीं भक्तीचीं लक्षणें सांगितलीं आहेत तीं सगळीं आपल्या अंगीं आणून दाखविणारा तुकोबांसारखा पुरुष कोटींत एक सांपडणें कठीण. तुळसीच्या भाराभर माळा गळ्यांत घातल्या, कपाळीं बुक्याचा मळवट भरला, सगळा दिवस टाळ कुटून जोराजोरानें भजन केलें आणि हातीं पताका घेऊन अगदीं नियमानें पंढरीची वारी केली; पण वृत्ति जर शेवटपर्यंत पालटली नाहीं, तर या सगळ्या खटाटोपाचा उपयोग काय ? आणि अशाच प्रकारच्या लोकांचा भरणा वारकरीसंप्रदायांत फार मोठा असल्यामुळें "बोले तैसा चाले" या कोटींतल्या तुकारामबुवांचें महत्त्व त्या संप्रदायांत विशेष आहे. त्यांच्या अभंगांना जें येवढें महत्त्व आलें आहे तें त्यांत त्यांनीं आपला सगळा अनुभव ओतला आहे म्हणून आलें आहे. इतर सर्वसामान्य संसारी जनांप्रमाणें त्यांनींही आरंभीं संसार करून पाहिला, सर्व प्रकारचीं सुखदुःखें भोगलीं आणि अनंत प्रयत्न करूनही यश येत नाहीं अशी खात्री झाल्यावर, सर्व विश्वाचा नियंता जो परमात्मा त्याच्या शोधास ते लागले. त्यांनीं

जन्मभर दारिद्र्याचें दुःख अत्यंत शांततापूर्वक सहन करून आपली संतोषवृत्ति कायम ठेवली, जनापवाद सोसला, कर्कशा स्त्रीचीं कटु भाषणें निमूटपणें ऐकून घेतलीं आणि देह व जीव यांची पर्वा न करतां आपलें परमोच्च ध्येय गांठलें. त्यांच्या प्रत्येक अभंगाच्या मागें त्यांची अद्वितीय आणि तेजस्वी व्यक्ति उभी असल्यामुळें, तो अभंग आपल्या कानांत पडतांच प्रत्यक्ष तुकारामबुवाच आपल्याशीं बोलत आहेत अशी आपली भावना होते. इतकी जोरदार भाषा, इतकी कळकळ, इतकें औत्सुक्य, आणि इतका स्वानुभवाचा अधिकार जुन्या मराठी कवितेंत इतरत्र क्वचितच सांपडेल, आणि नव्या कवितेंत तर मुळींच सांपडणार नाहीं.

तुकोबांसारख्या संतांचा देशास किंवा समाजास उपयोग काय, असा एक प्रश्न अलीकडे ही बऱ्याच लोकांकडून विचारण्यांत येऊं लागला आहे. पण या प्रश्नाचें उत्तर देणें सोपें नाहीं. दुसरें असें कीं, संतांचा उपयोग काय हें ज्यांना माहीत आहे ते त्यांचा उपयोग करून घेत आहेत, आणि ज्यांना तें माहीत नाहीं त्यांना तें समजावून देण्याचा प्रयत्न करण्यांत कांहीं अर्थ नाहीं; कारण हा श्रद्धेचा आणि भावनेचा विषय आहे, युक्तिवादाचा नाहीं.

जें संसारांत सांपडत नाहीं व संपत्तीनें विकत घेतां येत नाहीं असें कोणतें तरी अनिर्वाच्य सुख संतकृपेनें प्राप्त होत असतें, म्हणूनच संसारांतील सर्व गोष्टींची पूर्ण अनुकूलता असलेले लोकही संतकृपेची अपेक्षा करीत असतात. जे लोक ईश्वर मानीत नसतील त्यांची गोष्ट निराळी, पण जे मानीत असतील, त्यांना ईश्वराचें सान्निध्य ज्यांनीं मिळविलें आहे त्या संतांविषयीं मोठा आदर वाटावा यांत कांहीं आश्चर्य नाहीं. अशिक्षित मनुष्यास सुशिक्षित मनुष्याविषयीं जसा आदर वाटतो, तद्वत् परमेश्वरापासून दूर असलेल्यांस परमेश्वराच्या सन्निध असणाराविषयीं आदर वाटतो. खरा साधु हा जसा परमेश्वराचा एकनिष्ठ भक्त असतो, त्याप्रमाणें तो अत्यंत सदाचारी, दयाळू आणि परोपकारीहि असतो आणि या त्याच्या सद्गुणांची छाप समाजावर बसून त्याचें थोडेंबहुत अनुकरण करण्याचाही यथाशक्ति प्रयत्न कांहीं लोक करीत असतात. त्यामुळें, तेवढ्या प्रमाणांत, समाजाचें उच्चीकरण ( elavation ) होत असतें. तात्पर्य, समाजाच्या उन्नतीस संतांची जरुरी असते म्हणूनच ते निर्माण होत असतात.

कित्येक शंकेखोर लोकांचा एक असा आक्षेप आहे कीं, "तुकारामबुवांना आपलें बहुतेक सर्व आयुष्य जर हालअपेष्टांतच काढावें लागलें, तर त्यांच्यावर ईश्वराची कृपा होती या म्हणण्यांत अर्थ काय? सारखें जन्मभर जर दुःखच भोगावयाचें आहे तर मग ईश्वरकृपा ती कसली?" सकृद्दर्शनीं हा आक्षेप निरुत्तर करणारा दिसतो खरा, पण पूर्ण विचारांतीं त्याचा फोलपणा लक्षांत आल्याशिवाय राहणार नाहीं. दारिद्र्यामुळें तुकारामबुवांस जन्मभर दुःख भोगावें लागलें यावरून त्यांजवर परमेश्वराची कृपा नसली पाहिजे असाच जर तर्क करावयाचा असेल तर हेनरी फोर्ड, रॉकफेलर, कार्नेजी इत्यादि कोट्यधीशांच्या घरांत ईश्वर पाणी भरतो आहे असें म्हणावें लागेल. पण द्रव्यप्राप्ति हेंच ईश्वरकृपेचें गमक असें अद्याप तरी कोणी ठरविलेलें नाहीं. उलट, सर्वसंगपरित्याग करणारे गौतम बुद्ध, येशू ख्रिस्त, शंकराचार्य, ज्ञानदेव, रामदास, तुकाराम हेच खरे भगवत्कृपासंपन्न होते अशी सर्वांची समजूत आहे. तेव्हां ही भगवत्कृपा तरी कोणत्या प्रकारची व तिचें फल काय? 'भक्ता नारायण नुपेक्षी सर्वथा। कृपावंत ऐसें कळों आलें,' असा आपला अनुभव तुकोबांनीं व इतर संतांनीं नमूद केला आहे. अर्थात् द्रव्यादि साधनांनीं प्राप्त होणाऱ्या सुखापेक्षां कोणत्या तरी श्रेष्ठ प्रकारच्या परम सुखाचा लाभ भगवत्कृपेनें या सर्व सत्पुरुषांस झाला होता असें धरून चालणें भागच आहे. ईश्वराची जर आपल्यावर कृपा असेल तर त्यानें आपणास धनधान्यादि देऊन आपला योगक्षेम चालविला पाहिजे अशी जर संतांची भगवत्कृपेची व्याख्या असती तर त्यांनीं देवापाशीं ऐहिक सुखप्राप्त्यर्थ धनकनकाची याचना करावयास पाहिजे होती; परंतु तशी याचना कोणत्याहि साधूनें केलेली नाहीं; उलट 'न मिळो खावया न वाढो संतान। परि हा नारायण कृपा करो,' असें म्हणून, घरीं चालून आलेल्या संपत्तीवर त्यांनीं लाथ मारली आहे. यावरून भगवत्कृपेची संतांची कल्पना आम्हां प्राकृतांच्या कल्पनेहून अगदीं निराळी असली पाहिजे हें उघड दिसतें. ऐहिक सुखाहून फारच श्रेष्ठ असा जो ब्रह्मानंद तो ज्यांना प्राप्त झाला त्यांना संसारसुखांत काय गोडी वाटणार? अमृत पिणाराला चहाचें फुळकवणी काय आवडणार?

महाराष्ट्रांतील वारकरीसांप्रदायी संतांत नामदेव आणि तुकाराम यांचें पुष्कळ बाबतींत अतिशय साम्य आहे. कसें तें पहा—

## वारकरीपंथांत तुकोबांचें महत्त्व

१ नामदेवांस उद्धवाचा अवतार मानतात तर तुकोबा हे नामदेवांचा अवतार असल्याची वारकरी लोकांची समजूत आहे. 'ज्ञान्याचा एका व नाम्याचा तुका' हें वचन प्रसिद्धच आहे.

२ नामदेव ब्राह्मणेतर होते तसे तुकोबाही ब्राह्मणेतर होते.

३ नामदेव हे ब्राह्मणेतर असतांहि परिसा भागवतासारखे ब्राह्मण त्यांचे शिष्य झाले, त्याप्रमाणें तुकोबा ब्राह्मणेतर असतांही रामेश्वरभट्ट, गंगाराम मवाळ, निळोबा वगैरे ब्राह्मण त्यांचे शिष्य झाले.

४ नामदेवांनीं ज्ञानेश्वरींतल्या उपदेशाचा आपल्या अभंगांनीं जसा महाराष्ट्रभर प्रसार केला, त्याप्रमाणें तुकोबांनींही ज्ञानेश्वरी आणि एकनाथी भागवत या ग्रंथांतील ज्ञानाचा प्रसार आपल्या अभंगांच्या द्वारें केला.

५ दोघेही संसारासंबंधानें सारखेच उदासीन होते.

६ दोघेही पंढरीच्या विठोबाचे निस्सीम भक्त होते व दोघांनींही पंढरी आणि पांडुरंग यांचें माहात्म्य वाढविलें.

७ दोघांनींही कोट्यवधि अभंग लिहिले अशी वारकरी सांप्रदायी लोकांची समजूत आहे.

८ दोघांच्याही कवितेंत इतकें विलक्षण साम्य आहे कीं, एकाच्या अभंगांत दुसऱ्याचें नांव घातलें तर तो त्याचाच अभंग आहे असें कोणासही वाटेल.

९ दोघांनींही सलग असा एखादा मोठा ग्रंथ लिहिलेला नाहीं.

१० दोघांचींही मतें पुष्कळ बाबतींत सारखीं आहेत.

११ सगुणोपासना आणि नामस्मरण यांचा दोघांनींही पुरस्कार केला आहे आणि

१२ दोघांच्याही निर्याणाविषयीं थोडेंबहुत गूढ आहे.

---

प्रकरण १४ वें

# कांहीं आक्षेपांचा अल्प विचार

रे. जे. एफ्. एडवर्डस् या नांवाच्या एका आंग्ल मिशनरी गृहस्थांनीं 'तुकारामबोवांचा सेतु ' या नांवाचें एक पुस्तक अलीकडे प्रसिद्ध केलें आहे. त्यांत त्यांनीं तुकोबांच्या चरित्राविषयींची बरीच उपयुक्त माहिती दिलेली असून तुकोबांसंबंधानें बराच आदरही दाखविला आहे; पण शेवटीं, हरिदासाच्या पालुपदाप्रमाणें, तुकोबा हे अपूर्ण पुरुष होते असें ठरविण्याचा प्रयत्न करून, त्यांच्या मतें पूर्ण पुरुष जो येशू ख्रिस्त त्याला शरण गेल्याशिवाय मनुष्यप्राण्याचा तरणोपाय नाहीं हें मिशनरी पद्धतीचें ठराविक पालुपद गाऊन ग्रंथ पुरा केला आहे. इतर धर्मांत होऊन गेलेले साधुसंत आणि तत्त्ववेत्ते यांना हीन ठरवून, आपला येशूच काय तो सगळ्या जगाचा उद्धारक आणि त्याची कांस धरल्याशिवाय मनुष्याचा उद्धार होणें अशक्य, असें प्रतिपादन करून इतर धर्मांतील लोकांचा बुद्धिभेद करणें आणि जमल्यास त्यांतलीं कांहीं मेंढरें आपल्या कळपांत ओढणें हा या पगारी मिशनऱ्यांचा एक धंदाच होऊन बसलेला असल्यामुळें त्यांच्या असल्या लिखाणाकडे दुर्लक्ष करणें हीच त्यांची योग्य संभावना होय. परंतु आमच्यांतलेच कांहीं परप्रत्ययनेयबुद्धि लोक धूर्त मिशनऱ्यांच्या या युक्तिवादानें इतके मोहून जातात कीं ते त्यांचा पक्ष घेऊन, माझ्यासारख्या साध्याभोळ्या संतचरित्रलेखकास असें आव्हान करूं लागतात कीं, "अमक्या अमक्या मिशनऱ्यानें तुकारामबुवांवर असे असे आक्षेप घेतलेले आहेत, तर त्यांचें तुम्ही कसें काय खंडन करतां पाहूं." जणूं काय, मिशनऱ्यांच्या सर्टिफिकिटावर तुकोबांचें साधुत्व अवलंबून आहे ! या मिशनऱ्यांच्या मतें मोठ्यांतला मोठा पूर्ण पुरुष जो येशू ख्रिस्त त्याजवर त्याच्याच धर्मांतल्या कित्येक पाश्चात्य पंडितांनीं जे आक्षेप घेतलेले आहेत ते अगोदर खोडून काढून, येशूचें पूर्णत्व सिद्ध करणें व ख्रिस्ती धर्मीय लोकांतच त्या धर्माविषयीं जी उदासीनता वाढत चालली

आहे ती नाहींशी करणें हें या मिशनऱ्यांचें मुख्य कर्तव्य असतां, तें करावयाचें सोडून ते जेव्हां परधर्मीय साधुसंतांचीं व्यंगें, डोळ्यांत तेल घालून बारकाईनें शोधूं लागतात, तेव्हां ते परधर्मनिंदेबरोबरच आत्मवंचनाही करीत असतात असें माझें ठाम मत आहे. परधर्म आणि परधर्मीय साधुसंत यांच्यावर तोंड टाकण्याचें आम्हा हिंदुधर्मीय लोकांचें शील नाहीं. सर्व धर्मांचा आदिहेतु परमेशप्राप्ति हा असल्यामुळें त्या धर्मांतले साधुसंत सारखेच वंदनीय होत असें मानणारा आमचा उदार धर्म आहे. आमचे एक जुने कवि निरंजन माधवशिष्य म्हणतातः—

“ सर्व धर्मांची सहायता । करावी सामर्थ्य असतां ।
परी आपल्या धर्मविहिता । सदा फार जपावें ॥
परधर्मांचें आचरण । आपण कदापि न करावें जाण ।
परंतु परधर्म पाहोन । संतोष मानावा मानसीं ॥
हें ईश्वराचें कौतुक । ईश्वर मायाचालक ।
अनेक मार्गदर्शक । ईश्वर सर्व ॥ ”

दुसऱ्याचा धर्म पाहून मनांत संतोष मानावा, सामर्थ्य असल्यास परधर्मास साहाय्य करावें, कारण हे अनेक धर्ममार्ग ईश्वराचेंच कौतुक आहेत, ही आमच्या साधुसंतांची उदात्त शिकवणूक कोणीकडे आणि परधर्मांतले खरे खोटे दोष मुद्दाम हुडकून काढून त्या धर्मांची जन्मभर निंदा करीत बसण्याची ख्रिस्ती मिशनरी लोकांची अश्लाध्य प्रवृत्ति कोणीकडे !

अगोदर, मुख्य प्रश्न आहे तो हा कीं पारमार्थिक दृष्ट्या पूर्ण पुरुष कोण आणि अपूर्ण पुरुष कोण हें कोणी आणि कसें ठरवावयाचें ? पूर्णत्वाची सर्वमान्य व्याख्या करण्याचें काम वाटतें तितकें सोपें नाहीं. एखादा मुसलमान म्हणेल कीं ज्यानें पुष्कळ काफरांस अल्लाचा संदेश पोंचविला असेल तो उत्तम पुरुष, तर एखादा जैन म्हणेल कीं ज्याच्या हातून सबंध जन्मांत बिलकुल हिंसा घडली नसेल तो पूर्ण पुरुष. अशा स्थितींत, रेव्हरेंड जे. एफ्. एडवर्डस् यांच्या मतें येशू ख्रिस्त हा जरी पूर्ण पुरुष असला तरी इतर धर्मीय लोकांस त्याचें पूर्णत्व पटणें शक्य दिसत नाहीं.

कारण पूर्णत्वाची व्याख्या ज्याची त्याची निराळी आहे. आतां रेव्हरेंडसाहेबांनीं तुकोबांवर घेतलेल्या कांहीं आक्षेपांचा थोडक्यांत विचार करूं.

१ तुकोबांस आपल्या पापाची जाणीव होती, आपण पापविमुक्त झालों आहों अशी त्यांची त्यांनाच खात्री नव्हती, हा साहेबमजकुरांचा तुकोबांवर एक आक्षेप आहे. पण मी तर असें समजतों कीं आपल्या दोषांची आपल्याला जाणीव असणें हें पूर्णत्व पावण्याचें एक मुख्य गमक आहे. तुकोबांसारख्या सत्पुरुषांस पापाचें एवढें भय वाटत असतें कीं, ते निष्पाप झाल्यानंतरही, साधुत्वास न शोभणारा असा एखादा विचार क्षणभर जरी त्यांच्या मनांत ओझरता येऊन गेला किंवा त्यांना तसा भास झाला तरी आपल्या हातून ही मोठीच भयंकर गोष्ट घडली असें समजून ते स्वतःविषयीं उगीचच मोठें अकांडतांडव करूं लागतात. खऱ्या पतिव्रता स्त्रीची चुकून जरी परपुरुषावर दृष्टि गेली, तरी त्यामुळें तिच्या मनाला जशी सगळा दिवस हुरहुर लागून राहते, तद्वत् शुद्धान्तःकरणी साधूची मनोवृत्ति अगदीं कांटेतोल झालेली असते. कोणत्याही कारणानें त्यांच्या मनांत क्रोधाची एखादी क्षुद्र लहर जरी ओझरती येऊन गेली तरी आपल्या हातून हें मोठेंच पाप घडलें असें त्यांना वाटूं लागतें आणि तेवढेंदेखील पाप आपल्या हातून होऊं नये म्हणून ते भगवंताची करुणा भाकूं लागतात. पण त्यांच्या त्या उद्गारांचा फायदा घेऊन ते शेवटपर्यंत पापीच राहिले, आपण निष्पाप झालों अशी जाणीव त्यांना कधीं झालीच नाहीं, असा निष्कर्ष काढणें चुकीचें आहे. पतिव्रता स्त्रीची नजर दुसऱ्यावर अगदीं सहजगत्या गेलेली असते, बुद्धिपुरस्सरतेचा किंवा हेतुपूर्वकतेचा तींत लवलेशही नसतो; पण तेवढेंदेखील तिच्या शुद्ध आणि कोमल मनाला खपत नाहीं आणि आपल्या हातून हें महान् पाप घडलें, आपल्या पातिव्रत्यास बाध आला, अशी स्वतःची समजूत करून घेऊन ती त्याबद्दल पश्चात्ताप करीत बसते. पण या तिच्या वर्तनाचा फायदा घेऊन एखादा हलकट मनुष्य "अहो, हिच्या ठायीं व्यभिचारित्वाची जाणीव कायम आहे, तस्मात् ही खरी पतिव्रता नाहीं," अशी जर गांवभर टिमकी वाजवूं लागला तर अशा मनुष्याच्या बाबतींत तुकोबांचा "तुका म्हणे ऐशा नरा । मोजुनी माराव्या पैजारा" हा दंडक अंमलांत आणावयास कांहीं हरकत आहे काय ? दुसरें, पापाची जाणीव

किंवा आत्मनिरीक्षण करणें हेंच जर पापीपणाचें लक्षण धरलें तर जन्मभर लोकांना फसवीत राहून त्याबद्दल किंचित्‌हि क्षिति न बाळगणारा इसम पुण्यवान् म्हणावयाचा कीं काय ?

पूर्वकर्मानुसार जे गुणदोष मनुष्याच्या अंगास जन्मतःच चिकटलेले असतात, ते शेवटपर्यंत थोड्याबहुत प्रमाणांत कायमच राहतात. साधु आणि सामान्य मनुष्य यांत अंतर एवढेंच कीं, साधु हा नेहमीं आत्मपरीक्षण करून, आपल्या आत्म्याची उन्नति करण्याचा सतत प्रयत्न करीत असतो व शेवटीं अनंताशीं साधर्म्य पावतो आणि सामान्य मनुष्य तसा कोणताच प्रयत्न करीत नसल्यामुळें शेवटपर्यंत आपल्या गुणदोषांसच चिकटून राहतो. पण साधु म्हणजे परमेश्वर असा याचा अर्थ नव्हे. परमेश्वर हा एकटाच काय तो 'पूर्ण पुरुष' आहे. त्याला पूर्वकर्म नसल्यामुळें त्याच्याठायीं गुणदोष संभवत नाहींत. मनुष्यप्राणी केवढाही मोठा झाला तरी तो, भगवंत ज्या अर्थानें 'पूर्ण' आहे त्या अर्थानें पूर्ण होणें शक्य नाहीं. शिवाय, मनुष्य पूर्ण झाला म्हणजे तो प्रत्यक्ष परमेश्वरच झाला. आणि असें म्हटल्यास आचार्यांचें अद्वैत तत्त्व निमूटपणें मान्य करावें लागेल. पण तें मान्य करण्यास एडवर्ड्‌स्‌साहेब तयार आहेत काय ?

परंतु, या बाबतींत असल्या युक्तिवादाची मुळीं जरुरीच नाहीं. कारण तुकारामबुवांनीं आपल्या अभंगांत जें काय सांगितलें आहे त्याच्या आधारानें "त्यांना आपल्या पापाची जाणीव होती," हें जसें ठरवितां येईल, त्याप्रमाणें त्यांच्याच अभंगांच्या आधारानें 'आपण आतां पांडुरंगरूप झालों,' असें पुढें त्यांना वाटूं लागलें होतें असेंही ठरवितां येईल. बुवांचे पुढील उद्गार वाचा:—

"आधीं होता संतसंग। तुका झाला पांडुरंग ॥"

× × ×

"अणुरेणुया थोकडा। तुका आकाशाएवढा ॥
गिळुनी सांडिलें कळिवर। भवभ्रमाचा आकार ॥
सांडिली त्रिपुटी। दीप उजळला घटीं ॥
तुका म्हणे आतां। उरलों उपकारापुरता ॥"

"कांहींच मी नव्हें कोणिये गांवींचा । एकटा ठायींचा ठायीं एक ॥
नाहीं जात कोठें येत फिरोनियां । अवघेचि वायांविण बोल ॥
नाहीं मज कोणी आपुलें दुसरें । कोणाचा मी खरें कांहीं नव्हे ॥
नाहीं आम्हां ज्यावें मरावें लागत । आहों अखंडित जैसे तैसे ॥
तुका म्हणे नाम रूप नाहीं आम्हां । वेगळा या कर्मा अकर्मासी ॥"

ह्या तुकोबांच्याच उद्गारांवरून, आरंभीं आरंभीं स्वतःच्या पापीपणाची जाणीव बाळगणारे तुकोबा शेवटीं कर्माकर्मातीत व पापपुण्यातीत झाले होते हें निःसंदेह रीतीनें सिद्ध होत आहे. 'ऐका वचन हें संत । मी तों आगळा पतित' ह्या तुकोबांच्या अभंगांचा आधार घेऊन, 'तुकोबा पापपीडित' होते असें म्हणणारे एडवर्डस् साहेब त्याच तुकोबांच्या वरील उद्गारांवरून, त्यांना 'परब्रह्म' मानावयास तयार आहेत काय ? दोन्ही अभंग तुकोबांचेच असल्यामुळें पहिल्या अभंगांत तुकोबा जें काय म्हणतात तेवढें मात्र खरें आणि दुसऱ्या अभंगांत म्हणतात तें खोटें, असें म्हणून चालणार नाहीं, हें साहेबमजकुरांनीं लक्षांत घ्यावयास नको काय ? There is no virtue which is final; all are initial. The virtues of society are vices of the saint," हें इमर्सनचें वचन प्रसिद्धच आहे. वस्तुतः वरील दोन्ही अभंग लाक्षणिक आहेत. त्यांचा नुसता वाच्यार्थ घेऊन चालणार नाहीं. तुकोबांनीं स्वतःस पापी म्हटलें म्हणून ते पापी होते हें जसें खरें नाहीं, तद्वत् 'मी पांडुरंग झालों,' हें त्यांचें म्हणणेंही अक्षरशः खरें नाहीं.

**पुनरुत्थान**—तुकोबा समाधिस्थ झाल्यानंतर, निळोबा, बहिणाबाई, महीपति, कचेश्वर वगैरे कांहीं व्यक्तींस त्यांनीं स्वप्नांत दर्शन दिलें ह्या आख्यायिकेचा साहेब-मजकुरांनीं उपहास केला आहे. पण येशू ख्रिस्त मरण पावल्यावर त्याचें पुनरुत्थान झालें या गोष्टीवर जर साहेबमजकुरांचा विश्वास आहे, तर तुकोबांनीं मरणोत्तर कांहीं लोकांस स्वप्नांत दर्शन दिलें, ही साधी गोष्ट त्यांना असंभाव्य कां वाटावी तें समजत नाहीं.

**स्त्रियांविषयीं तुकोबांचें मत**—तुकोबांनीं आपल्या अभंगांत कांहीं ठिकाणीं स्त्रियांविषयीं 'अनुदारपणाचे' उद्गार काढले आहेत व हे त्यांच्या साधुत्वास शोभण्यासारखे नाहींत असाही साहेबमजकुरांचा एक आक्षेप आहे. पण बुवांच्या या उद्गारांचें मर्म साहेबांस समजलेलें नाहीं. "स्त्रिया म्हणजे शुद्ध राक्षसी आहेत, त्या जन्मतांच त्यांना मारून टाकावें," असें तर तुकोबांनीं कोठें म्हटलें नाहीं ना? त्यांच्या ह्या अनुदारपणाच्या उद्गारांचा आशय एवढाच आहे कीं स्त्रीलोलुपता ही परमार्थास विघातक आहे. आदामच्या दुःखास ईव्हच कारणीभूत झाली, ही गोष्ट ख्रिस्तीधर्मशास्त्रांतच सांगितलेली आहे. स्त्रीचा सहवास परमार्थास विघातक आहे ही कल्पना एकट्या तुकोबांची किंवा हिंदुधर्माचीच नसून ख्रिस्ती आणि बौद्ध या धर्मांतही ती आढळते. हिंदु संन्यासी किंवा ब्रह्मचारी, बौद्ध भिक्षु, ख्रिस्ती जेसुईट आणि जैन यती हे स्त्रियांशीं संबंध ठेवीत नाहींत याचा अर्थ, ते स्त्रियांचा द्वेष करितात असा करावयाचा काय? आतां इतकेंच कीं तुकारामबुवा हे मोठेसे सुसंस्कृत नसल्यामुळें, त्यांनीं ही कल्पना गुळगुळीत गोड भाषेंत न सांगतां, आपल्या साध्या भोळ्या खेडवळ भाषेंत सांगितली आहे; पण तेवढ्यावरून स्त्रियांविषयींचीं त्यांचीं मतें अगदीं अनुदारपणाचीं होतीं असें कसें म्हणतां येईल? एक पतिता स्त्री तुकोबांपाशीं पापवासनेनें आली असतां त्यांनीं तिला 'माते' या शब्दानें संबोधिलें आहे; ती स्त्री दुराचारी असतांही अपशब्द बोलून बुवांनीं तिची हकालपट्टी केली नाहीं, तर 'तूं माझी आई आहेस,' असें तिला म्हटलें, हा बुवांचा अनुदारपणा काय? पण तुकोबांसारख्या, सर्व भूतीं भगवद्भाव बाळगणाऱ्या सत्पुरुषाच्या मनांत स्त्रियांविषयीं तर काय, पण कोणत्याच प्राण्याविषयीं अनुदारपणाचे विचार येणें शक्य नाहीं; आणि प्रसंगविशेषीं, सकृद्दर्शनीं अनुदारपणाचे दिसणारे कांहीं विचार बुवांच्या तोंडून जरी बाहेर पडलेले असले तरी त्यांच्या मुळाशीं दुर्बुद्धि नसून सद्बुद्धीच आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. कारण स्त्रीच्याच पोटीं बुवांचा जन्म झाला होता व त्यांची पत्नीदेखील स्त्रीच होती. आतां, परमार्थाविषयीं बोलतांना,

**"जेणें भगवंतीं घडे अंतराय। हो कां बाप माय त्यजावे ते॥**
**तेथें स्त्रियापुत्रां कोण करी लेखा। करिती ते दुःखा पात्र शत्रु॥"**

या अभंगांत भगवत्प्राप्तीच्या आड येणाऱ्या आईबापांचादेखील त्याग करावा असें जे तुकोबा स्पष्ट सांगतात ते स्त्रीचा मुलाहिजा काय राखणार ?

**विसंगति** — तुकोबांच्या अभंगांत विसंगतपणा फार आहे असा एडवर्डस् साहेबांचाच नव्हे तर दुसऱ्याही पुष्कळ लोकांचा एक मोठा आक्षेप आहे. पण हा आक्षेप इतका मूर्खपणाचा आहे कीं तो घेण्यापूर्वी वस्तुस्थितीचा विचार आक्षेपकांनीं मुळींच केलेला दिसत नाहीं. तुकोबांचे म्हणून जे काय चार साडेचार हजार अभंग प्रसिद्ध आहेत, तो एकाच वेळीं लिहिलेला एक सलग ग्रंथ आहे काय ? तीसचाळीस वर्षांच्या कालांत निरनिराळ्या विषयांवर निरनिराळ्या वेळीं, प्रसंगानुरोधानें, बुवांनीं व्यक्त केलेले ते स्फुट विचार आहेत. चाळीस वर्षांच्या दीर्घ कालांत बुवांस जे निरनिराळे अनुभव येत गेले व त्यांच्या वृत्तींत जो पालट होत गेला तो त्यांनीं या अभंगांत ग्रथित केला आहे. अर्थात् त्याला 'विसंगति' हें नांव देऊन त्याबद्दल बुवांना दोषी ठरविणें हा शुद्ध वेडगळपण आहे.

**जातिभेद्** — तुकोबांस जातिभेद मान्य असावा यांत कांहीं आश्चर्य नाहीं; कारण ते ज्या हिंदुधर्मांत जन्म पावले होते त्यांत जातिभेद आहे व जातिभेदाच्या परंपरेंतच ते वाढले होते. प्रसंगविशेषीं त्यांनीं ब्राह्मणाची स्तुति केली असली तरी इतर प्रसंगीं त्यांची कानउघाडणीही केली आहे व एखादे वेळीं चांडालादि जातींविषयीं त्यांनीं अनुदारपणाची भाषा वापरली असली तरी 'महारासी शिवे, कोपे ब्राह्मण तो नव्हे,' असें म्हणून अस्पृश्यतेचा धिक्कारही केला आहे. तुकोबा हे साधु होते, परमार्थोपदेशक होते. ते कांहीं समाजसुधारक किंवा धर्मसुधारक नव्हते. जातिभेदासारख्या विषयासंबंधानें तत्कालीन बहुजनसमाजाचें जें मत होतें तेंच, थोड्याबहुत फेरफारानें, तुकोबांचेंही होतें. शिवाय, मनुष्याच्या पारमार्थिक उन्नतीस त्याची जात आड येत नाहीं हें त्यांना स्वानुभवानें कळून चुकलेलें असल्यामुळें, या विषयाचा विशेष विचार करण्याचें त्यांना कारणही नव्हतें. रामेश्वर भट्टांसारखे पट्टीचे विद्वान् ब्राह्मण आपल्या पायां पडतात आणि आपलीं स्तुतिस्तोत्रें गातात, पण आपल्या घरीं जेवीत नाहींत किंवा आपल्याशीं शरीरसंबंध करीत नाहींत, हा सत्यशोधकी विचार बुवांच्या मनांत आला नाहीं; कारण आपल्या पंक्तीला रामेश्वर भट्टानीं जेवण्यांत कांहीं विशेष मोठेपणा आहे, किंवा त्यामुळें परमार्थांत आपली विशेष उन्नति

होणार आहे असें त्यांना स्वानुभवावरून तरी वाटणें शक्य नव्हतें. उलट पक्षीं बुवाही एखाद्या अंत्यजाकडे अन्नग्रहण करण्यास तयार झाले नसते.

**मूर्तिपूजा**—मूर्तिपूजा हें प्रचलित हिंदु धर्माचें एक मुख्यांग आहे हें कबूल करण्यास आम्हांस बिलकुल कमीपणा वाटत नाहीं. हिंदु धर्मांत मूर्तिपूजा आहे म्हणूनच त्या धर्मांत सहस्रावधि साधुसंत होऊन गेले. आमच्या परमार्थसोपानपरंपरेची पहिली पायरी मूर्तिपूजाच असून त्या पायरीवर पाय देऊनच आमच्या बहुतेक सर्व साधुसंतांनीं संतत्वाचें शिखर गांठलें असल्यामुळें ती पायरी झुगारून देण्यास ते तयार झाले नाहींत तर त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. मूर्तिपूजेचें रहस्य एडवर्डस् साहेबांसारख्या मूर्तिनिंदकास समजणें शक्य नाहीं; पण साहेबमजकुरांनीं एवढें मात्र लक्षांत ठेवावें कीं जगांतील बहुतेक सर्व प्रमुख धर्मांत, कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत मूर्तिपूजा आहेच आहे. हिंदु आणि जैन हे तर उघड उघड मूर्तिपूजक आहेत, पण बुद्धाची मूर्ति पुजणारे बौद्ध, मेरी आणि येशूख्रिस्त यांच्या मूर्तींपुढें मेणबत्त्या जाळणारे रोमन कॅथोलिक, जेथें तेथें येशू आणि बायबल यांना पुढें करून त्यांचीं स्तुतिस्तोत्रें गाणारे प्रॉटेस्टंट, मक्केंतील मशिदींतल्या 'काबा' नामक दगडास पवित्र मानणारे आणि मक्केकडे तोंड करून नमाज पडणारे मुसलमान आणि आपल्या ग्रंथसाहेबाची पूजा करून त्याच्या मिरवणुकी काढणारे शीख हे सगळे एक प्रकारें मूर्तिपूजकच आहेत.

**पूर्वजन्म आणि पुनर्जन्म**—हिंदुधर्माचें सगळें तत्त्वज्ञान पूर्वजन्म आणि पुनर्जन्म यांच्या पायावरच उभारलेलें आहे. जन्मतःच एक मनुष्य मोठा बुद्धिवान् तर दुसरा अत्यंत बुद्धिहीन कां निपजतो; एक मोठ्या श्रीमंताच्या घरांत तर दुसरा दरिद्र्याच्या चंद्रमौळी झोंपडींत; एक अत्यंत शुचिर्भूत अशा ब्राह्मणकुळांत तर दुसरा अत्यंत गलिच्छ अशा चांडाळाच्या कुटुंबांत कां जन्म पावतो, या प्रश्नाचें समाधानकारक उत्तर, पूर्वजन्माचें तत्त्व मान्य केल्याशिवाय, देतां येणें शक्य नाहीं. एकाच बापाचा एक मुलगा हायकोर्टाचा जज्ज किंवा इलाख्याचा गव्हर्नर होतो आणि दुसरा तीस चाळीस रुपयांवर खर्डेघांशी करण्यांत जन्म घालवितो, ह्या आश्चर्यकारक विषमतेचा उलगडा पूर्वजन्म आणि पुनर्जन्म यांचें तत्त्व मान्य केलें तरच होऊं शकतो, एरवीं होऊं शकत नाहीं. एक भाऊ जन्मतःच अत्यंत क्रूर तर दुसरा भाऊ अत्यंत सात्त्विक; एक

बहीण जन्मतःच अतिशय मायाळू तर दुसरी कमालीची कजाग, एक भाऊ अतिशय तीव्रबुद्धि तर दुसरा कमालीचा मंदबुद्धि; एकाची देवाधर्मावर पूर्ण श्रद्धा तर दुसरा पक्का निरीश्वरवादी, एक अत्यंत उदार तर दुसरा कवडीचुंबक, एक बहीण अतिशय सुंदर तर दुसरी शुद्ध शूर्पणखा, असलें वैषम्य जगांत सर्वत्र दृष्टीस कां पडावें, हें पूर्वजन्माचें तत्त्व मान्य केल्याशिवाय सांगतां येणें कठिण आहे. अशा प्रकारची ही सार्वत्रिक विषमता जशी मनुष्यप्राण्यांत दिसते, तशी मनुष्येतर प्राण्यांतही दिसते. एक कुत्रा एखाद्या श्रीमंताच्या घरीं मोठ्या लाडांत आणि चैनींत दिवस घालवितो, तर दुसरा गटाराच्या बाजूस अन्नाविणें तडफडून मरतो. पूर्वजन्मींच्या पाप-पुण्याचें फळ अशा रीतीनें प्राणिमात्रास भोगावें लागत असलें पाहिजे अशी कल्पना केल्याशिवाय या कोड्याचा उलगडा होणें शक्य नाहीं. दुसरें, तुकारामबुवांची शिष्यीण बहिणाबाई हिनें आपल्या अनेक पूर्वजन्मांचा वृत्तांत आपल्या कवितेंत सांगितला आहे, तो हल्लींच्या लोकांस कदाचित् विश्वसनीय वाटणार नाहीं; परंतु चालू काळांतदेखील आपल्या पूर्वजन्माची जिला पूर्ण आठवण आहे अशी एखादी व्यक्ती मधून मधून आढळत असते व तिनें दिलेल्या माहितीचा पडताळाही कांहीं लोक घेत असतात. ईश्वरालाहि न मानणारे कांहीं पंथ व धर्म आहेत म्हणून, ईश्वराचें अस्तित्व जसें नष्ट होत नाहीं, त्याप्रमाणेंच, एखाद्या व्यक्तीस किंवा धर्मपंथास पुनर्जन्म मान्य नसला म्हणून त्याचेंही अस्तित्व नष्ट होणें शक्य नाहीं.

**द्वैत, अद्वैत कीं विशिष्टाद्वैत ?** —हिंदुधर्माच्या तत्त्वज्ञानांतले हे मुख्य तीन भेद आहेत. माध्वसांप्रदायी द्वैतवादी, शांकरसांप्रदायी अद्वैतवादी व रामानुजसांप्रदायी विशिष्टाद्वैतवादी. पण ही सगळी घटपटादि खटपट जाड्या विद्वानांसाठीं आहे. असल्या खटपटींत आमचे भोळे तुका-रामबुवा कधींच पडले नाहींत. भगवंत निराळा आणि मी निराळा असें मानलें तरच सगुण हरिभजनाची मजा लुटतां येते, या दृष्टीनें तुकोबांनीं आरंभीं 'अद्वैतीं तों नाहीं माझें समाधान,' असें म्हटलें असलें तरी ज्ञानदेव-महाराजांनीं 'आचार्यातें वाट पुसत' लिहिलेल्या ज्ञानेश्वरीचें अध्ययन करणाऱ्या तुकोबांस अद्वैत तत्त्वाचा अगदींच कंटाळा होता असा निष्कर्ष काढणें योग्य होणार

नाहीं. खरा प्रकार असा आहे कीं कसलाही वेदांत आणि कोणत्याही प्रकारचें ब्रह्मज्ञान, भगवत्प्रेम आणि नामसंकीर्तन यांजपुढें तुच्छ आहे असें तुकोबा मानीत असत. घटपटादिकांचें शुष्क शब्दावडंबर त्यांना नको होतें. "जाणे भक्तीचा जिव्हाळा । तोचि दैवाचा पुतळा ॥ आणीक नये माझ्या मना । हो कां पंडित शाहणा," ह्या त्यांच्या उद्गारांवरून एका भक्तीशिवाय दुसऱ्या कोणत्याही परमार्थमार्गाची त्यांना आवड नव्हती हें उघड दिसतें. अशा स्थितींत, मध्वाचार्य, शंकराचार्य, वल्लभाचार्य आणि रामानुजाचार्य यांच्या संस्कृत ग्रंथांचें अध्ययन करून, द्वैत, अद्वैत, शुद्धाद्वैत आणि विशिष्टाद्वैत या चार प्रकारच्या तत्त्वज्ञानांत श्रेष्ठ तत्त्वज्ञान कोणतें हें ठरवून, त्यांतलें कोणतें तरी एक तत्त्वज्ञान बुवांनीं पसंत केलें होतें असें मानणें हा शुद्ध वेडेपणा आहे. मोरोपंतांसारख्या संस्कृतज्ञ पंडितांनींही जेथें—

**"न लगे व्याकरणाची न्यायाची घटपटादि खटपट ती ।**
**वैकुंठपेंठ मोठी नामावर हीन दीन खटपटती ॥"**

असें म्हणून अध्यात्मज्ञानास हात जोडले आहेत तेथें "कांहीं पाठ केलीं संतांचीं उत्तरें,' हीच ज्यांची विद्वत्ता त्या तुकोबांनीं द्वैतवाद श्रेष्ठ कीं अद्वैतवाद श्रेष्ठ या गहन प्रश्नांचा विचार करून; आपलें कांहींतरी एक ठाम मत बनविलें असेल अशी कोणी कल्पनादेखील करूं नये.

**नैराश्यवाद आणि निष्क्रियता**—तुकोबांनीं आपल्या शिकवणुकीनें महाराष्ट्रांतील लोकांस निराशावादी आणि निष्क्रिय बनविलें हा तुकोबांवर एक मोठा आक्षेप आहे. पण या बाबतींत, आक्षेपकांस माझा पहिला प्रश्न हा आहे कीं ज्या तुकोबांवर तुमचा हा आक्षेप आहे ते तुकोबा स्वतः निष्क्रिय होते काय ? ज्या थोर पुरुषानें स्वतःच्या संसारावर लाथ मारून, जन्मभर कथाकीर्तनें करून आणि हजारों अभंग रचून, लोकांस सन्मार्गास लाविलें, धर्मासंबंधाच्या खोट्या कल्पना काढून टाकल्या, धर्माविषयीं उदासीन झालेल्या बहुजनसमाजांत धर्मजागृति केली, आणि मराठी वाङ्मयांत उत्तम प्रकारच्या स्वतंत्र कवितेची भर घातली ते तुकोबा निष्क्रिय होते असें म्हणणारांस काय म्हणावें हेंच समजत नाहीं. तुकोबांच्या उपदेशामुळें, गेल्या २५० वर्षांत, महाराष्ट्रांतल्या

किती लोकांनीं आपले संसार सोडले आणि आपल्या बायकामुलांस टाकून अरण्याची वाट धरली याची आंकडेवार माहिती कोणा आक्षेपकापाशीं असल्यास ती त्यानें प्रसिद्ध करावी असें माझें त्याला आव्हान आहे. परमार्थ संपादन करून मोक्ष मिळवावा अशी ज्यांची मनापासून इच्छा असेल अशा लोकांना बुवांनीं जो उपदेश केला आहे तो सर्वच लोकांना केला आहे अशी स्वतःची खोटीच समजूत करून घेऊन बुवांवर निष्क्रियतेचा आरोप लादणें ही धृष्टता अगदीं अक्षम्य आहे. बुवांनीं उलट, निष्कामबुद्धीनें संसार कसा करावा, मिळविलेल्या द्रव्याचा सदुपयोग कसा करावा, नीतिदृष्ट्या वर्तन कसें चोख ठेवावें, प्राणिमात्राविषयीं आपलेपणाची भावना कशी ठेवावी वगैरे सुंदर उपदेश आपल्या कवितेंत ठिकठिकाणीं केला आहे. " जोडोनियां धन उत्तम वेव्हारें । उदास विचारें वेंच करीं । " आणि " बांधीं सोपे माझ्या घर । आल्या अतिता सादर याहुनि धर्म कोणता, " असा प्रापंचिक जनांस बुवांचा उपदेश आहे. पण नेभळटपणाचा उपदेश मात्र त्यांनीं कोठेंही केलेला नाहीं. दुर्जनाचें पारिपत्य देव करील असें म्हणून त्याची उपेक्षा करावी असेंही बुवांनीं कोठें सांगितलेलें नाहीं. ' वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि ' अशी त्यांची वृत्ति होती. दुर्बलाविषयीं त्यांना जशी अनुकंपा वाटत असे तशी उन्मत्त दुर्जनाविषयीं त्यांना चीडही येत असे. ' भले तरी देऊं गांडीची लंगोटी । नाठाळाचे काठी देऊं माथां, ' असें ते स्पष्टच सांगतात. ' कंटकांचें निर्दलन करणें, ' हेंही आपलें एक कर्तव्य असल्याचें त्यांनीं एके ठिकाणीं नमूद केलें आहे. एका थोबाडांत मारलें असतां दुसरें थोबाड पुढें करा हा येशू ख्रिस्ती उपदेश तुकोबांस माहीत नव्हता, हें त्यांच्या अनेक वचनांवरून सिद्ध करितां येईल.

## प्रकरण १५ वें

# तुकोबांचे शिष्य आणि टाळकरी

तुकोबा हे वारकरीसंप्रदायाचे अनुयायी असल्यामुळें त्यांचा स्वतःचा असा निराळा संप्रदाय नाहीं व मठस्थापना करून आपली शिष्यपरंपरा वाढवावी असा प्रयत्नही त्यांनीं कधीं केला नाहीं. तथापि तुकोबांच्या हयातींत, त्यांच्या सान्निध्यांत राहून त्यांची सेवाचाकरी करणारे कांहीं लोक होते, त्यांपैकीं त्यांचे चौदा टाळकरी प्रसिद्ध आहेत. त्यांचीं नांवें महीपति व गोपाळबुवा यांनीं आपल्या लिखाणांत नमूद करून ठेवलीं आहेत तीं येणेंप्रमाणें:—

१ रामेश्वर भट्ट वाघोलीकर; २ गंगाधर मवाळ; ३ कोंडभट लोहकरे; ४ संताजी जगनाडे; ५ नावजी माळी; ६ शिवजी कासार; ७ आबाजी जोशी लोहगांवकर; ८ कोंडपाटील लोहगांवकर, ९ महादाजीपंत जोशी कुळकर्णी देहूकर; १० गवरशेट वाणी सुदुंब्रेकर; ११ कान्होबा (तुकोबांचे बंधु); १२ मालजी गाडे येलवाडीकर (जामात); १३ मल्हारपंत कुळकर्णी चिखलीकर. चौदाव्या टाळकऱ्याचें नांव सांपडत नाहीं. आतां या तेरा असामींची थोडक्यांत माहिती देतों.

**१ रामेश्वर भट्ट वाघोलीकर**—पुणें जिल्ह्यांत वाघोली नामक एक गांव आहे तेथें हे रहात असत. हे मोठे विद्वान् होते. यांच्याच आज्ञेवरून बुवांनीं आपल्या वह्या इंद्रायणींत बुडविल्या. पुढें तुकोबांच्या साधुत्वाचा व अलौकिक सामर्थ्याचा अनुभव येतांच हे तुकोबांचे शिष्य झाले आणि शेवटपर्यंत त्यांच्याच सान्निध्यांत राहिले. तुकोबा समाधिस्थ झाल्यावर ते पुनः वाघोली येथें रहावयास गेले. तुकोबांच्या मूळ अभंगांवर यांचा 'हात फिरला' असावा अशी पुष्कळ लोकांची समजूत आहे. यांनीं तुकोबांच्या स्तुतिपर केलेलीं कांहीं पद्यें उपलब्ध आहेत. हल्लीं वाघोलीस रामेश्वर भट्टांच्या बंधूंचे वंशज राहतात व बहुळ येथें खुद्द रामेश्वर भट्टांचे वंशज राहतात. "रामेश्वर भट्टांचे पणजे कानभट हे कर्नाटकांत

बदामी येथें राहात असत; तेथून ते पुणें प्रांतीं आले. हें घराणें मूळचें कानडी असून चार पिढ्यांत महाराष्ट्रीय झालें असावें. कानभट–चौंडंबा–कानभट–रामेश्वर भट्ट अशी यांची वंशावळ मिळाली आहे. रामेश्वरभट्टांचे पुत्र विठ्ठल भट्ट यांचा वंश बहुळ गांवीं आहे. वेदविद्या रामेश्वर भट्टांच्या घरची होती व त्यांचें संपूर्ण अध्ययन त्यांच्या वडिलांपाशींच झालें. रामेश्वरभट्ट रामोपासक होते,. व त्यांच्या पूजेंतली राममूर्ति अद्याप बहुळ येथें आहे. वाघोलीस व्याघ्रेश्वराचें स्थान आहे. या जुनाट देवतेपाशीं रामेश्वर भट्टांनीं अनुष्ठानें केलीं होतीं. त्यांच्या वंशजांकडे वाघोली, भावडी, बहुळ, चिंचोली व शिंद्देगव्हाण हीं जोशी-पणाच्या वतनाचीं पांच गांवें अजून चालत आहेत. रामेश्वरभट्टांची समाधि वाघोलीसच आहे. मार्गशीर्ष शुद्ध १४ ला यांची पुण्यतिथि यांचे बहुळकर वंशज करीत असतात." ( श्री. पांगारकरकृत तुकारामचरित्र )

**२ गंगाधर ऊर्फ गंगाराम मवाळ कडूसकर**—"हे यजुर्वेदी ब्राह्मण दाभाड्याचें तळेगांव येथील रहिवासी. ते तुकोबांच्या कीर्तनप्रसंगीं ध्रुपद धरीत व त्यांचे अभंग लिहून काढीत. यांचा धंदा सराफीचा. वडिलांचें नांव नाभाजी. आडनांव महाजन. यांच्या सात्त्विक वृत्तीमुळें लोक यांना मवाळ म्हणूं लागले. तुकोबांचे दुसरे लेखक संताजी तेली जगनाडे हे यांचे स्नेही होते. मवाळांचे वंशज तळेगांव, पुणें व कडूस येथें अजून आहेत. गंगाराम व संताजी यांची जोडी तुकोबांबरोबर नेहमीं असावयाची. तुकोबांस माघ शुद्ध १० शुक्रवार रोजीं स्वप्नांत गुरूपदेश झाला, तन्निमित्त तुकोबांच्या आज्ञेवरून कडूस येथें गंगारामबोवांनीं जो उत्सव सुरू केला तो त्यांचे वंशज अद्याप १५ दिवस साजरा करीत असतात. या उत्सवाचे दिवसांत मवाळांना सोयरसुतक नाहीं, व त्यांच्या घराण्यांत मूल देवी येऊन मरत नाहीं. गंगारामाचा पुत्र विठ्ठल. त्याचे वंशांत रामकृष्ण नामक एक सत्पुरुष झाले ते परमहंसवृत्तीनें पंढरीस रहात असत." ( पांगारकर )

**३ कोंडभट लोहकरे**—हे काशीयात्रेस जाण्यास निघाले तेव्हां तुकोबांनीं त्यांना एक होन दिला होता व त्यांजबरोबर तीन अभंग पाठविले होते; पुढें परत आल्यावर त्यांनीं होनाचा अभिलाष केला व त्यामुळें होन नाहींसा

झाला वगैरे कथा पूर्वीं आलीच आहे. हे पुढें तुकोबांचे शिष्य होऊन त्यांच्याच समागमांत राहिले. हे बुवांच्या कीर्तनांत ध्रुपद धरीत असत.

**४ संताजी तेली जगनाडे**—हे चाकणचे रहिवासी, जात तेली, आडनांव सोनवणे. यांचा पुत्र बाळाजी. हे तुकोबांचे टाळकरी व लेखक होते. यांचे वंशज दाभाड्याचें तळेगांव येथें असून त्यांच्या संग्रहीं यांच्या हातच्या तुकोबांच्या अभंगांच्या वह्या आहेत. या वह्यांतले अभंग कै. वि. ल. भावे यांनीं उतरून घेऊन दोन भागांत प्रसिद्ध केले आहेत. "कोणे एके दिनीं तुकाराम वाणी। राउळाअंगणीं उभे होते ॥ तेथें संतू तेली आलासे दर्शना । पांडुरंगचरण वंदियेले॥," या अभंगानें प्रारंभित होणारें 'घाण्याचे अभंग' या नांवाचें एक प्रकरण मी एका जुन्या वहींत पाहिलें होतें. आपणांपैकीं ज्याचा मृत्यु अगोदर होईल त्यानें दुसऱ्यास मूठमाती द्यावी अशी, पूर्वीं एकदां गुरें चारतांना, तुकोबांची व संताजींची आणभाक झाली होती. पुढें तुकोबा अगोदर वारले. नंतर संताजी मरण पावल्यावर त्यांच्या आप्तेष्टांनीं त्यांना पुरलें. त्या वेळीं कितीही माती टाकली तरी त्यांचें तोंड झांकेना. शेवटीं मध्यरात्रीं तुकोबा तेथें प्रगट झाले व त्यांनीं जेव्हां मूठभर माती उचलून टाकली तेव्हां संताजींचें तोंड झांकलें गेलें अशी कथा आहे. संताजीचा पुत्र बाळाजी यास तुकोबांनीं त्या वेळीं १३ अभंग दिले, अशी दंतकथा आहे. या तेरा अभंगांत एक अभंग असा आहे:—

> "चारितां गोधन । माझें गुंतलें वचन ॥
> आम्हां येणें जालें । एका तेलिया कारणें ॥
> तीन मुष्टी मृत्तिका देख । तेव्हां लोपविलें मुख ॥
> आलों म्हणे तुका । संत न्यावया विष्णुलोका ॥ "

तुकारामबुवा स्वर्गस्थ झाल्यानंतरची ही त्यांची अभंगरचना आहे असें म्हणण्यापेक्षां तुकोबा व संताजी यांच्या दरम्यान झालेल्या आणभाकेस अनुलक्षून संताजींच्या मृत्यूनंतर हे १३ अभंग कोणी तरी सांप्रदायी मनुष्यानें रचले असतील असें म्हणणें अधिक सयुक्तिक होईल. भंडारा डोंगराच्या पायथ्याशीं सुदुंब्रें गांवीं संताजींची समाधि आहे.

तुकाराम ग्रंथालय. ठाणे.

५ नावजी माळी—यांची हकीकत पूर्वी आलीच आहे. तुकोबांच्या कीर्तनांत हे मोठ्या प्रेमावेशानें नृत्य करीत असत व फुलांचे हार करून श्रोत्यांच्या गळ्यांत घालीत असत.

६ शिवजी कासार—यांचीही हकीकत मागील प्रकरणीं येऊन गेली आहे. हे लोहगांवचे कवडीचुंबक गृहस्थ आरंभीं तुकोबांचा फार द्वेष करीत असत; पण पुढें ते त्यांचे भक्त झाले. लोहगांवीं प्रसिद्ध असलेली कासारविहीर यांनींच बांधली. लोहगांवांत तुकोबांच्या अंगावर ज्या बाईनें कढत पाणी ओतलें ती यांची बायको.

७ आबाजी जोशी लोहगांवकर—लोहगांवीं तुकोबांनीं कीर्तनांत जें मेलेलें मूल जीवंत केलें त्या मुलाचे हे वडील.

८ कोंडपाटील लोहगांवकर—हे लोहगांवचे पाटील. आडनांव खांदवे. तुकोबा लोहगांवीं गेले म्हणजे यांच्या घरीं उतरत असत. हे तुकोबांचे टाळकरी होते.

९ महादाजीपंत जोशी देहूकर—हे देहू येथील जोशी व कुलकर्णी. हे तुकोबांचे मोठे भक्त होते. तुकोबांच्या घरच्या मंडळींची वास्तपुस्त केल्याशिवाय हे अन्नग्रहण करीत नसत. तुकोबांनीं राखण केलेल्या शेतांत जें महामूर पीक आलें त्याचा आपल्या हिश्शाचा वांटा जेव्हां तुकोबा घेईनात तेव्हां तें धान्य महादाजीपंत यांनीं आपल्या घरीं नेऊन ठेविलें; व तें पुढें विठ्ठलमंदिराच्या जीर्णोद्धारार्थ खर्च केलें.

१० गवरशेट वाणी सुदुंब्रेकर—" तुमच्या मृत्युकालीं मी तुम्हांस दर्शन देईन," असें वचन तुकोबांनीं यांना दिलें होतें. तुकोबा समाधिस्थ झाल्यावर पुढें कांहीं वर्षांनीं हे वारले. तेव्हां त्यांच्या मृत्युकालीं तुकोबांनीं त्यांना दर्शन देऊन त्यांच्या कपाळीं बुका लावला व गळ्यांत हार घातले अशी कथा आहे. हे लिंगाईत वाणी, तळेगांवानजीक सुदुंब्रें येथें राहात असत.

११ कान्होबा— हे तुकोबांचे कनिष्ठ बंधु. तुकोबांनीं खतें पाण्यांत बुडविलीं त्या वेळीं त्यांच्याच सांगण्यावरून हे विभक्त झाले. हे तुकारामाच्या कीर्तनांत

ध्रुपद धरीत असत. तुकोबा स्वर्गवासी झाल्यावर यांनीं ३६ अभंग रचून देवाशीं भांडण केलें. यांची कविता थोडीच आहे, परंतु ती फार सुंदर आणि तेजस्वी आहे. तुकोबांपासून जरी हे विभक्त झाले होते तरी त्यांजवर त्यांचें अत्यंत प्रेम होतें व तें त्यांच्या उपरिनिर्दिष्ठ ३६ अभंगांत उत्कटत्वानें व्यक्त झालें आहे.

**१२ मालजी गाडे येलवाडीकर**— तुकारामबुवांची कन्या भागीरथी इचे हे पति. यांचा गीतापाठ अशुद्ध होतो असा आक्षेप खेडकर जोशी नामक एका ब्राह्मणानें घेतला व त्याला पुढें दृष्टांत झाल्यामुळें त्यानें मुद्दाम येलवाडीस तीन महिने राहून यांना गीतेचा शुद्ध पाठ शिकविला, वगैरे हकीकत पूर्वी येऊन गेलीच आहे.

**१३ मल्हारिपंत कुळकर्णी चिखलीकर**—यांची माहिती प्रसिद्ध नाहीं. ह्या तेरा टाळकऱ्यांत सहा ब्राह्मण आहेत हें लक्षांत घेतलें म्हणजे परमार्थांत जातिभेद आणि जातिद्वेष यांना बिलकुल थारा नाहीं हें उघड दिसतें.

आतां, तुकोबा हयात असतांना ज्या एका बाईला व ते स्वर्गस्थ झाल्यावर ज्या तीन पुरुषांना त्यांनीं स्वप्नांत दर्शन देऊन अनुग्रह दिला त्यांची थोडीशी माहिती देऊन हें प्रकरण पुरें करूं.

## बहिणाबाई

हिचें विस्तृत चरित्र महाराष्ट्र कविचरित्राच्या ६ व्या भागांत मी दिलें आहे, त्याचाच सारांश येथें देतों. वेरूळच्या पश्चिमेस देवगांव या नांवाचा गांव आहे तेथें सुमारें २५० वर्षांपूर्वी आउजी कुळकर्णी या नांवाचे गृहस्थ रहात असत, त्यांची मुलगी बहिणाबाई. तिच्या आईचें नांव जानकी. लहानपणापासूनच बहिणाबाईची देवभक्तीकडे प्रवृत्ति होती. सिऊर येथील एका नातेवाइकाशीं तिचें अल्पवयांतच लग्न झालें. त्यानंतर तिच्या आईबापांस एक मुलगा झाला. बहिणाबाईच्या पित्याचें गोत्र मौनस व भ्रताराचें गोत्र गौतम. तिच्या नवऱ्याचें वय लग्नाच्या वेळीं ३० वर्षांचें असून तो बिजवर होता. पुढें तिच्या बापाचा त्याच्या एका गोत्रजाशीं तंटा होऊन त्यानें आपला गांव सोडला व पत्नी, कन्या आणि जामात यांच्यासह, फिरत फिरत, तो कोल्हापूर येथें जाऊन राहिला.

तेथें, वहिरंभट नामक एका अग्निहोत्री ब्राह्मणाकडे त्याचें बिऱ्हाड होतें. या वेळीं बहिणाबाईचें वय सुमारें १० वर्षांचें होतें. रामदासपंचायतनांतले प्रसिद्ध सत्पुरुष जयरामस्वामी वडगांवकर यांचीं कोल्हापुरांत त्या वेळीं कीर्तनें सुरू होतीं व तीं ऐकावयास बहिणाबाई नियमानें जात असे. बाईच्या अकराव्या वर्षी, एका मोठ्या व्रताचे दिवशीं, बहिरंभटाच्या यजमानानें बहिरंभटाला एक सवत्स कपिला गाय दान दिली. "ही गाय बहिणाबाईच्या बापाला देऊन टाक," असा दृष्टांत बहिरंभटास झाल्यामुळें त्यानें ती गाय त्याला दिली. गाईच्या वासरावर बहिणाबाईचें इतकें प्रेम जडलें कीं त्याच्याशिवाय तिला घटकाभरदेखील करमत नसे. उलट पक्षीं त्या वासरालाही तिचा इतका लळा लागला कीं तें तिच्यावरोबर कीर्तनासही जाऊं लागलें. एका एकादशीच्या दिवशीं मोरोपंत नामक गृहस्थांच्या घरीं जयरामस्वामींचें कीर्तन चालू असतां, बहिणाबाईबरोबर असलेल्या तिच्या वासरास लोकांनीं तेथून काढून दरवाजांत नेलें. बहिणाबाई रडूं लागली. जयरामस्वामींस हें वर्तमान समजतांच,

"म्हणे आणा त्यासी वत्सासी अंतरीं । काय नाहीं हरि आत्मवेत्ता ॥
कथेलागीं होतो जीव कासावीस । पशु कीं तयास म्हणों नये ॥"

असें म्हणून त्यांनीं त्या वासरास कीर्तनांत आणून बसविलें; व वासराच्या आणि बहिणाबाईच्या अंगावरून हात फिरवून त्यांचें समाधान केलें. कीर्तन संपल्यावर बहिणाबाई बापावरोबर आपल्या घरीं गेली. तेथें तिच्या नवऱ्यास कीर्तनांत घडलेला प्रकार मिराबाई नामक एका स्त्रीनें सांगितला तेव्हां त्यानें क्रोधाविष्ट होऊन बहिणाबाईस पुष्कळ मार दिला. त्या वेळीं बहिरंभटानें बहिणाबाईच्या बापास दुसरें बिऱ्हाड पाहण्यास सांगितलें. बहिणाबाईच्या दुःखानें ती गाय व आणि तिचें वासरूं या दोघांनाही इतकें दुःख झालें कीं त्या दिवसापासून त्यांनीं अन्नोदकाचा त्याग केला, इतकेंच नव्हे तर आपल्या जागेवरून उठण्याचेंही त्यांनीं बंद केलें. त्यामुळें बहिणाबाईनेंही अन्नोदकाचा त्याग केला. त्या तिघांचा सत्याग्रह पाहण्यास गांवांतले सर्व लोक येऊं लागले. जयरामस्वामीही बहिरंभटाच्या घरीं आले आणि त्यांनीं बहिणाबाईच्या पतीची कानउघाडणी केली. त्यांनीं सांगितलें कीं, "बहिणाबाई, गाय आणि तिचें वासरूं हीं पूर्वजन्मीं एका

जागीं अनुष्ठान करीत असत. ह्या दोघांच्या अनुष्ठानांत कांहीं अंतराय होऊन तें अपूर्ण राहिल्यामुळें ह्यांस गाईचा जन्म प्राप्त झाला. ह्या मुलीचें अनुष्ठान मात्र पूर्ण झाल्यामुळें हिची चित्तशुद्धि झाली.'' पुढें तें वासरूं लवकरच मरण पावलें व त्यामुळें बहिणाबाईस मोठें दुःख झालें. वत्साच्या मृत्यूची हकीकत जयरामस्वामींस समजतांच ते संतमंडळीसह त्या ठिकाणीं आले व—

**" मग सर्व श्रेष्ठ संतसाधुजन । करीत कीर्तन वत्स नेलें ॥**
**दिंडी पताकांनीं मिरविलें वत्स । गाय सर्वे तुच्छ यांनीं देह ॥**
**हुंबरडा हाणोनी चाले मार्गेमार्गें । गाय अंतरंगीं महादुःखी ॥**
**पुरूनियां वत्स आले सर्व जन । करूनियां स्नान गृहा गेले ॥**
**गाय वत्सापाशीं जाउनी हुंबरे । मागुती ते फिरे गृहासी ये ॥**
**मज अवलोकितां मी तों अचेतन । माझा देहीं प्राण आढळेना ॥ "**

अशा रीतीनें बहिणाबाईचे चार दिवस अत्यंत दुःखांत गेले. चौथ्या दिवशीं कोणी एक ब्राह्मण तिच्या स्वप्नांत येऊन "बाई, सावध हो आणि विवेकानें मन आवर," असें तिला बोलला. बाई सांगते—

**" उघडोनियां नेत्र पाहें जंव पुढें । तंव दृष्टीपुढें पांडुरंग ॥**
**देखिली पंढरी ध्याना तेचि येत । जयराम दिसत दृष्टीपुढें ॥**
**ब्राह्मण स्वप्नांत देखिला तो जाण । त्याची आठवण मनीं वाहे ॥**
**न दिसे आणीक नेत्रांपुढें जाण । नामाचें स्मरण मनीं राहे ॥**
**पूर्वील हरिकथा आयकिल्या । त्या मनीं मागुत्या आठवती ॥**
**तुकोबांचीं पदें अद्वैत प्रसिद्धें । तयांच्या अनुवादें चित्त झुरे ॥ "**

ज्या तुकोबांचे अभंग इतके प्रेमळ त्यांचें जर आपणास दर्शन होईल तर किती चांगलें होईल असा विचार तिच्या मनांत घोळूं लागला. येवढ्या अल्पवयांत इतकी अंतःशुद्धि होऊन, तुकोबांचे अभंग कानांत पडतांच त्यांच्या दर्शनाचा ध्यास मनास सारखा लागून रहावा हें पारमार्थिक भाग्याचें पूर्वचिन्ह होय, व यावरून पूर्वजन्मीं बहिणाबाईची आध्यात्मिक उन्नति

पुष्कळच झालेली असली पाहिजे हें उघड दिसतें. तुकोवांच्या दर्शनाचा ध्यास आपणास कसा लागला होता हें बहिणाबाई सांगते—

“ मत्स्य जैसा जळावांचुनी चरफडी । तैसी ते आवडी तुकोबाची ॥
अंतरींचा साक्ष असेल जो प्राणी । अनुभवें मनीं जाणेल तो ॥
तृषितासी जैसें आवडे जीवन । तैसा पिंड प्राणेत्रीण तया ॥
बहिणी म्हणे हेत तुकोबाचे ठायीं । ऐकोनियां देहीं पदें त्याचीं ॥ ”

तुकारामबुवांच्या ह्यातींतच त्यांची कविता कोल्हापुरापर्यंत प्रसार पावली असून कीर्तनादिकांतून तिचा उपयोग होऊं लागला होता हें यावरून सिद्ध होतें. तुकोवांच्या अभंगांच्या वह्या इंद्रायणीच्या डोहांत सुरक्षित राहिल्या, ही गोष्टही बहिणाबाईच्या कानावर गेली होती—

“ तेरा दिवस ज्यानें वह्या उदकांत । घालूनियां सत्य वांचविल्या ॥ ”

वत्साच्या मृत्यूनंतर सात दिवस, तुकोबांनीं आपणास दर्शन देऊन आपल्यावर अनुग्रह करावा या हेतूनें बाईनें त्यांचा धांवा केला, तेव्हां सातव्या दिवशीं तुकोबांनीं तिला स्वप्नांत दर्शन देऊन सांगितलें कीं—

“ नको करूं चिंता आहें मी तुजपाशीं । घेईं अमृतासी हातींचिया ॥
ठेवूनियां कर मस्तकीं बोलिला । मंत्र सांगितला कर्णरंध्रीं ॥
म्यांही पायांवरी ठेविलें मस्तक । दिधलें पुस्तक मंत्र गीता ॥ ”

कार्तिक वद्य पंचमी रविवार, या दिवशीं बहिणाबाईस स्वप्नांत तुकोबांनीं अनुग्रह दिला. शक कोणता हें मात्र बाईनें लिहिलें नाहीं. तुकोबांविषयीं बाईची भावना कोणत्या प्रकारची होती हें तिच्या पुढील अभंगावरून लक्षांत येईल—

“ जयाचिया पदें होतसे विश्रांति । त्याची देहाकृति विठ्ठलचि ॥
विठ्ठलासी तया नाहीं भेदभाव । ऐसें माझें मन साक्ष आहे ॥
पांडुरंग तुका, पांडुरंग तूं का । वेगळीक देखा कैंवी होय ॥
कलियुगीं बौद्धरूप धरी हरि । तुकोबाशरीरीं प्रवेशला ॥
तुकोबाची बुद्धि पांडुरंगरूप । मन तें स्वरूप विठोबाचें ॥
तुकोबाचीं सर्व इंद्रियें चालक । पांडुरंग देख सत्य आहे ॥

तुकोबाचे नेत्र तेही पांडुरंग । श्रोत्र ते अभंग रूप त्याचें ॥
तुकोबाचे हात लिहिताती जें जें । तें तें तें सहजें पांडुरंग ॥
सर्वही व्यापार तुकोबाचे हरि । आपणचि करि अद्वयत्वें ॥
बहेणी म्हणे रूपें व्यापक तुकोबा । ध्यान माझ्या जीवा हेंचि वाहे ॥ "

तात्पर्य, तुकोबांची अमृतमय अभंगवाणी श्रवण करून बहिणाबाईस त्यांचा अगदीं ध्यास लागून राहिला. ध्यानीं, मनीं, स्वप्नीं तिला तुकोबा दिसूं लागले. रामदास, रंगनाथ, जयराम, वामन, आनंदमूर्ति, आत्यास्वामी, केशवस्वामी, शिवराम, हरिनारायण इत्यादि अनेक ब्राह्मण सत्पुरुष महाराष्ट्रांत त्या वेळीं विद्यमान होते व त्यांपैकीं जयरामस्वामींशीं तर बहिणाबाईचा चांगलाच परिचय होता. असें असतां या ब्राह्मणस्त्रीची प्रवृत्ति अब्राह्मण तुकारामबुवांच्या उपदेश-ग्रहणाकडे झाली हा केवळ ऋणानुबंधच समजला पाहिजे.

पुढें बहिणाबाई सांगतात, " ज्ञाननिधि समर्थ जयरामस्वामींनीं अंतर्दृष्टीनें माझी स्थिति पाहिली व बहिरंभटास बोलावून माझी विचारपूस केली. मला तुकोबांनीं दृष्टांत दिल्याचें ऐकून स्वामींस आनंद झाला, व प्रेमानें त्यांचा कंठ दाटून आला. पुढें ते आपल्या मुक्कामीं जाऊन आसनावर स्वस्थ चित्तानें बसले असतां तुकोबांनीं त्यांस मनोमय दर्शन दिलें व त्याच वेळीं मलाही मनोमय दर्शन दिलें. " बाईस दृष्टांत झाल्याचें वर्तमान शहरांतील लोकांस समजतांच बाईच्या दर्शनास लोकांच्या झुंडीच्या झुंडी येऊं लागल्या. हें पाहून बाईच्या भ्रताराचें डोकें अगदीं भणाणून गेलें व बाईविषयीं त्याला वाटत असलेला तिरस्कार अधिकच वाढला. मोठा त्रागा करून, " ही मरेल तर बरें होईल," असें तो उघड उघड बोलूं लागला. त्याचें म्हणणें असें होतें कीं आम्ही वेदपठण करणारे ब्राह्मण, आणि तुकाराम हा तर शूद्र. त्यानें माझ्या बायकोस स्वप्नांत दर्शन दिल्यामुळें ती बिघडली !

" कैंचा जयराम कैंचा पांडुरंग । माझा झाला भंग आश्रमाचा ॥
आम्ही काय जाणों नाम हरिकथा । भक्ति हे तत्त्वता नसे स्वप्नीं ॥
कैंचे साधुसंत कैंची भावभक्ति । भिक्षुकांचे पंक्ती वसों सदा ॥

लोक हिला नमस्कार करणार आणि ही मला तृणाप्रमाणें लेखणार ! हिची

विचारपूस करावयास लोक आमच्या घरीं जमतात आणि आम्हांस कोणी ढुंकूनदेखील विचारीत नाहीं!" शेवटीं, हा अपमान त्याला असह्य वाटून त्यानें वनांत जाण्याचें ठरविलें. मग सासू-सासऱ्यास नमस्कार करून तो म्हणाला, "माझी बायको तीन महिन्यांची गरोदर आहे. हिला देवपिसें लागलें आहे, यासाठीं हिची चांगली काळजी घ्या व हिचें हें वेड घालविण्याचा प्रयत्न करा. मजविषयीं म्हणाल तर अतःपर हिचें मुखावलोकनही करण्याची माझी इच्छा नाहीं.

**"न पाहें मी मुख सर्वथा इयेचें। हीनत्व आमुचें कोण फेडी ॥**
**भंडिमा सोसून कोण राहे येथें। ऐसिया स्त्रियेतें कोण पाळी ॥"**

नवऱ्याचा हा निश्चय ऐकून बहिणाबाई फार चिंताक्रांत झाली. कारण त्याजवर तिची मोठी भक्ति होती. बाई म्हणते—

**"भ्रताराची सेवा तोचि आम्हा देव। भ्रतार स्वयमेव परब्रह्म ॥**
**तीर्थ भ्रताराचें सर्व तीर्थ जाण। तया तीर्थावीण निरर्थक ॥**
**भ्रतारवचनासी उल्लंघीन जरी। पापें माझ्या शिरीं पृथिवीचीं ॥"**

एकदां तर तिला असेंही वाटलें कीं,—

**"पाषाण विठ्ठल स्वप्नांतील तुका। प्रत्यक्ष कां सुखा अंतरावें? ॥"**

बहिणाबाईच्या पतीनें तिला टाकून जाण्याचा निश्चय केला खरा, पण तो सिद्धीस गेला नाहीं. त्याच्या शरीरास अकस्मात् कांहीं व्यथा जडली. एकसारखा सात दिवस त्याच्या शरीराचा दाह होत होता. ओळखीच्या माणसाचें भाषणदेखील तो ऐकून घेईना. बहिणाबाई मात्र अहोरात्र त्याजपाशीं बसून होती. तो औषधही घेईना. एक महिना त्यानें अन्नग्रहणही केलें नाहीं. त्याला भयंकर वेदना होत होत्या. पुष्कळ देवदेवतांना गाऱ्हाणीं केलीं, नवस केले, पण रोग बिलकुल हटेना. शेवटीं त्याला असें वाटूं लागलें कीं आतां मरण येईल तर बरें. आपण पांडुरंगाची आणि तुकोबांची निंदा केली त्याचेंच हें प्रायश्चित्त आपणास भोगावें लागत असेल असाही विचार त्याच्या मनांत आला, तेव्हां त्यानें प्रार्थना केली कीं, "तुकाराममहाराज, मी तुमची निंदा केली

त्यामुळेंच जर ही व्यथा मला जडली असेल तर ती आतां दूर करून आपल्या सामर्थ्याचा चमत्कार दाखवा." असा तो पश्चात्ताप करीत आहे तों कोणी एक वृद्ध ब्राह्मण तेथें येऊन त्याला बोलला, "अरे, तुला मृत्यूची इच्छा कां झाली ? आपल्या धर्मपत्नीचा त्याग करण्यास कां प्रवृत्त होतोस ? तुला जर वांचण्याची इच्छा असेल तर हिचा अंगीकार कर. व तूंही तिजप्रमाणेंच विरक्त होऊन हरिभक्ति कर." बहिणाबाईच्या भ्रतारानें त्या ब्राह्मणाच्या पायांवर मस्तक ठेवून, "महाराज, मला आतां जीवदान द्या. मी हिला याउप्पर कांहीं बोलणार नाहीं. आणि तुमच्या आज्ञेप्रमाणें ईशभक्ति करीत जाईन," असें सांगितलें. तें ऐकतांच ब्राह्मण अदृश्य झाला व बहिणाबाईच्या पतीची व्यथाही तत्काळ नाहींशी झाली. येवढा अनुभव आल्यावर त्यानें सर्व कुटुंबासह देहूस तुकोबांपाशींच जाऊन राहण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें कोल्हापूर सोडून, थोड्याच दिवसांनीं तो देहूस येऊन कोंडाजी नामक ब्राह्मणाच्या घरीं उतरला. तेथें तुकारामद्वेष्ट्या मंबाजीपासून त्यांना कसा त्रास पोंचला ती हकीकत मागें "तुकाराम आणि मंबाजी" या प्रकरणांत दिलीच आहे.

देहूस तुकोबांचें दर्शन झाल्यावर बहिणाबाई व तिच्या कुटुंबांतील माणसें यांनीं तेथील कुळकर्णी महादाजीपंत यांच्या घरीं कायमचा मुक्काम केला. त्या वेळीं देहू येथील लोकांचें तुकोबांविषयीं काय मत होतें हें बहिणाबाईच्या पुढील अभंगावरून लक्षांत येतें:—

**" तुकोबाचा पार वर्णिलसा कोण । कलियुगीं जाण प्रल्हाद हा ॥**
**सर्वांतरसाक्षी करूनियां स्तुति । स्वसुखें रमती आपुलिया ॥**
**बहेणी म्हणे लोक बोलती सकळ । तुकोबा केवळ पांडुरंग ॥ "**

तुकोबांना प्रत्यक्ष पाहून व त्यांच्या निकट सान्निध्यांत राहून त्यांच्याविषयीं बहिणाबाईनीं दिलेली ही माहिती तुकोबांच्या चरित्रांत फार महत्त्वाची आहे.

कांहीं दिवसांनीं बहिणाबाई प्रसूत होऊन तिला मुलगी झाली. तिचें नांव काशीबाई ठेविलें. बहिणाबाईस तर त्या वेळीं असें वाटलें कीं कोल्हापुरांत मरण पावलेलें आपलें वासरूंच ह्या मुलीच्या रूपानें आपल्या पोटीं आलें आहे !

पुढें तुकोबा समाधिस्थ झाल्यावर बहिणाबाई बहुतकरून शिवपुर नामक गांवीं जाऊन राहिली असावी व पुढें तिचे आईबाप व नवरा हे कालांतरानें मरण पावले असावे असें वाटतें. तुकोबा स्वर्गस्थ झाल्यावर त्यांनीं बहिणाबाईस दर्शन दिल्याचा उल्लेख पूर्वीं येऊन गेलाच आहे. काशीबाई ह्या कन्येच्या मागून बहिणाबाईस एक मुलगा झाला होता त्याचें नांव विठोबा.

बहिणाबाईच्या वयाला ७२ वर्षें लोटल्यावर आतां आपला अंतकाळ समीप आला आहे असें जाणून तिनें आपल्या पुत्राला, तो शुक्लतीर्थास गेला होता तेथून, आपल्याजवळ बोलावून आणलें व " आजपासून पांच दिवसांनीं म्हणजे आश्विन शुद्ध १ रोजीं आपण देह ठेवणार," असें त्यास सांगितलें. ह्या विठोबाची बायको नुकतीच वारली होती व तिचें और्ध्वदेहिक करण्यासाठीं तो शुक्लतीर्थावर गेला होता. इकडे घरीं बहिणाबाई 'वायूचें निरोधन करून' विठोबाची वाट पहात होती. विठोबा शुक्लतीर्थीं असतांना त्यानें तेथें आपल्या आईच्या मृत्यूचा देखावा स्वप्नांत पाहिला, तोंच ताबडतोब शिवपुरास निघून येण्याविषयींचें तिचें पत्र त्याच्या हातीं पडलें. विठोबा शिवपुरास आल्यावर त्यानें बहिणाबाईस सांगितलें कीं, गोदातीरीं शुक्लेश्वर हें स्थळ तुझ्या समाधीसाठीं आम्ही पसंत केलें आहे. तरी तुझी मर्जी असेल तसें करूं. बहिणाबाई म्हणाली, " तुम्ही योजिलेलें स्थळ मलाही पसंत आहे, परंतु तेथवर जाण्यास आतां अवकाश उरला नाहीं. आश्विन शुद्ध १ रोजीं मी हा देह टाकणार, आणि आज तर भाद्रपद वद्य १३ आहे. आतां फक्त तीनच दिवसांचा अवधि राहिला. शिवाय हें शिवपुरदेखील मोठें तीर्थच आहे. म्हणून येथेंच समाधि घेण्याचें मी ठरविलें आहे. " यानंतर बहिणाबाईनें आपल्या १३ पूर्वजन्मांचा वृत्तांत विठोबास सांगितला व " हाच माझा शेवटचा जन्म, यापुढें मला जन्म नाहीं, " असें ती म्हणाली. बाईनें सांगितलेली आपल्या पूर्वींच्या १३ जन्मांची ही हकीकत 'महाराष्ट्र कविचरित्रा'च्या ६ व्या भागांत मी विस्तारपूर्वक दिली आहे, ती जिज्ञासूंनीं तेथें पहावी. जगांत आजपर्यंत, आपल्या पूर्वजन्मांचा वृत्तांत लिहून ठेवणारी, ही एकच व्यक्ति होऊन गेली असावी असें वाटतें. कोणास वाटेल, मरणोन्मुख झालेल्या ७२ वर्षांच्या थेरडीची, वायूच्या लहरींतली ही बडबड आहे, तिला कसलें महत्त्व द्यावयाचें ? पण असें मानण्याचें कारण

नाहीं. त्या वेळीं बहिणाबाई सिद्धासनारूढ असल्यामुळें तिला दिव्यदृष्टि प्राप्त झालेली होती व तिच्या योगानें भूत-भविष्य-कालीन गोष्टी सिनेमाच्या चित्रपटाप्रमाणें तिला अगदीं स्पष्ट दिसत होत्या. ती स्वतःच सांगते — " तुला जे मी माझे तेरा जन्म सांगितले ते या वेळीं मला अगदीं स्पष्ट दिसत आहेत. त्याचप्रमाणें माझा मृत्युकालही १८ दिवसांपूर्वींच मला समजला आहे, परंतु मी त्याची वाच्यता केली नाहीं. तुझी पत्नी रुक्मिणी मरण पावली तिच्या उत्तर-क्रियेसाठीं तुला गोदातीरीं जावें लागणार होतें व त्या वेळीं माझा मृत्यु इतका नजीक आला आहे हें जर तुला मी कळविलें असतें तर गोदातीरीं न जातां मजपाशींच रहावें, असें कदाचित् तुला वाटलें असतें. " पुढें आणखी बहिणाबाई सांगते, " मनुष्यानें मृत्युसमयीं ' आत्मनिष्ठ बोध ' राखून सावध असावें, असें भगवंतांनीं गीतेंत सांगितलें असून, तो प्रसंग आज मला प्राप्त झाला आहे. आज माझ्या देहांत अग्नीचें बल असून हृदयांत ज्योति सावधान आहे. माझा मृत्यु शुक्लपक्षांत दिवसा आहे. आतां हल्लीं उत्तरायण नाहीं हें थोडेंसें व्यंग आहे खरें, परंतु सद्गुरुकृपा असल्यावर उत्तरायणाची काय जरूरी? उत्तराभिमुख आसन घालून व प्राणनिरोधन करून मी बसल्यें आहें. सद्गुरु-चरणाच्या योगानें पांचही योगांची मला सिद्धि झाली आहे. अजूनही मला मागील कांहीं जन्म आठवत आहेत. परंतु मृत्युकाळ अगदीं जवळ येऊन ठेपला असल्यामुळें त्या जन्मांची हकीकत सांगण्यास आतां अवकाश नाहीं. " इतकी स्वतःची हकीकत सांगून बाई पुत्रास म्हणाली, " माझ्या गेल्या तेराही जन्मांत तूं माझ्याबरोबर होतास. या जन्मांत तूं पुष्कळ ज्ञान मिळविशील व यापुढें तुला एकाहून एक श्रेष्ठ जन्म प्राप्त होऊन, योगभ्रष्टावस्थेंत तूं कांहीं जन्म घालविशील. तुझे तीन जन्म काशीक्षेत्रांत होतील. एक जन्म संन्याशाचा येईल व त्या जन्मांत थोडेंसें चित्तस्थैर्य प्राप्त होईल. पांचव्या जन्मीं, वयाच्या अठराव्या वर्षीं, तुला विदेहावस्था प्राप्त होईल; व तसें झाल्यावर मग पुढें जन्म होणार नाहीं. "

पुढें आणखी कांहीं अभंग लिहून, आश्विन शुद्ध १ रोजीं बाई समाधिस्थ झाली. बहात्तर वर्षांची ही वृद्ध स्त्री अगदीं शेवटच्या घटकेपर्यंत पूर्ण शुद्धीवर राहून काव्यरचना करण्यास कशी समर्थ झाली याचें कांहीं चिकित्सकदृष्टि

लोकांस आश्चर्य वाटेल. प्राण्याचा मृत्यु म्हणजे केवळ त्याचें देहांतर अशी पूर्ण भावना होऊन ज्यांचें मृत्युभय अगदींच नष्ट झालेलें असेल अशाच मनुष्यांची चित्तवृत्ति मृत्युकालीं इतकी स्थिर राहूं शकेल. इतरांची स्थिति मरणसमयीं कशी होते हें आपण नित्यशः पहातच असतों. बहुतेक सर्व संतांचे मृत्यु मनाच्या अत्यंत शांत स्थितींत झाल्याचें आपण ऐकतों याचें कारण 'आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां,' या तुकोबांच्या उक्तीप्रमाणें, त्यांनीं आपलें मरण डोळ्यांनीं अगोदरच पाहिलेलें असतें, हें होय. परंतु अशी स्पृहणीय स्थिति प्राप्त करून घेण्यास मनुष्यप्राण्यांस किती जन्म धारण करावे लागतात, हें या बहिणाबाईच्या चरित्रावरून स्पष्ट होत आहे. तुकारामबुवा देहूकर हे केवळ भक्तिमार्गी संत होते अशीच महाराष्ट्रांतील बहुतेक लोकांची समजूत आहे; परंतु योगमार्गांतही बुवांची चांगली गति होती हें बहिणाबाईच्या एतद्विषयक उद्गारांवरून सिद्ध होत आहे. तुकोबांच्या मृत्यूनंतर ५१ वर्षें बहिणाबाई हयात होती. तिचा मुलगा विठोबा यानें तिजवर एक आरती लिहिली आहे तींत तिचा मृत्युकाल त्यानें शके १६२२ दिला आहे; यावरून तिचा जन्म शके १५५० मध्यें झाला होता हें उघड दिसतें.

बहिणाबाईच्या अभंगांचा एक भाग रा. धोंडो विश्वनाथ उमरखाने यांनीं प्रसिद्ध केला आहे. इतर कविता अद्याप प्रसिद्ध व्हावयाची आहे. बाईंची गुरुपरंपरा येणेंप्रमाणें:— आदिनाथ– मत्स्येंद्रनाथ– गहिनीनाथ– निवृत्ति– ज्ञानदेव– सच्चिदानंद बाबा– विश्वंभर– राघवचैतन्य– केशवचैतन्य– बाबाजीचैतन्य– तुकाराम– बहिणाबाई. निळोबांनीं दिलेल्या गुरुपरंपरेशीं ही बहिणाबाईची परंपरा जुळत नाहीं.

बहिणाबाईची कविता अगदीं सोपी असून तींत कठीण शब्द फारसे नाहींत. परंतु बाईचा पारमार्थिक अधिकार मोठा असल्यामुळें व तिची सर्वच कविता स्वयंस्फूर्तीची असल्यामुळें एक प्रकारचें दिव्य तेज या कवितेंत सर्वत्र चमकत आहे. शिवाय तिच्या आत्मचरित्रामुळेंही तिच्या कवितेस एक प्रकारचें महत्त्व आलें आहे.

बहिणाबाईच्या कवितेंत, तुकोबा, जयरामस्वामी, मंबाजी व रामेश्वर भट्ट यांच्याशिवाय तत्कालीन रामदासादि प्रसिद्ध पुरुषांचा उल्लेख सांपडत नाहीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. 27257
अनुक्रम 3445
क्रमांक 1245 28-8-54

## तुकोबांचे शिष्य आणि टाळकरी

### कचेश्वर

तुकोबांनीं ज्यांना स्वप्नांत दर्शन देऊन अनुग्रहीत केलें अशा चार व्यक्तींपैकीं कचेश्वर हे एक होत. हे पुणें जिल्ह्यांतील खेड तालुक्यांत चाकण गांवीं एका वैदिक ब्राह्मणाच्या घराण्यांत जन्मले. हे जातीनें ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण; उपनांव ब्रह्मे, गोत्र काश्यप. कचेश्वर हे चाकणच्या रानांत आश्रम बांधून मुलां-बाळांसह अयाचित वृत्तीनें रहात असत. हे मोठे तपस्वी व सत्यसंपन्न असल्या-मुळें त्यांचा योगक्षेम चालविण्याच्या कामीं लोकही यथाशक्ति साहाय्य करीत असत. कचेश्वर हे चाकण येथें असतां छत्रपति शाहू महाराज मोगलांच्या कैदेंतून मुक्त होऊन दक्षिणेंत आले व ताराबाईकडून आपलें राज्य मिळविण्याचा प्रयत्न करूं लागले. एके दिवशीं ते चाकण गांवांतून जात असतां जवळच रानांत कचेश्वरांचा आश्रम असल्याचें त्यांनीं ऐकलें, तेव्हां अशा सत्पुरुषाचें अवश्य दर्शन घ्यावें म्हणून ते कचेश्वरांच्या आश्रमीं गेले. कचेश्वरांनीं महाराजांचा यथो-चित आदरसत्कार करून त्यांस भोजनास ठेवून घेतलें. भोजनोत्तर महाराजांनीं कचेश्वर व त्यांची पत्नि यांस वंदन करून त्यांचा आशीर्वाद घेतला. पुढें महा-राज साताऱ्यास गेले व ताराबाईचा पराभव करून त्यांनीं आपलें राज्य मिळ-विलें. नंतर, कचेश्वरांस साताऱ्यास आणून शाहू महाराजांनीं त्यांचा उपदेश घेतला. त्यांनीं कचेश्वरांस पुष्कळ द्रव्य देऊं केलें पण त्या निरपेक्ष पुरुषानें त्याचा स्वीकार केला नाहीं. कचेश्वर हे पुढें सातारा येथेंच अयाचित वृत्तीनें राहिले. महाराजांकडून त्यांस नित्य शिधा येत असे, पण त्यापैकीं निर्वाहापुरतें घेऊन, बाकीचें साहित्य ते परत करीत असत. महाराजांनीं कचेश्वरांचा उपदेश घेतल्यापासून लोक त्यांस ‘ राजगुरु ’ म्हणूं लागले. पुढें त्यांच्या वंशजांसही ‘ राजगुरु ’ हेंच उपनांव पडलें व तें हल्लींही चालू आहे. कचेश्वरांच्या एका शिष्यानें ‘ आदि ’ या नांवाचा एक ग्रंथ लिहिला आहे त्यांत त्यानें कचेश्वरांचें वर्णन दिलें आहे. साताऱ्यास कांहीं वर्षें राहिल्यावर तें शहर सोडून कचेश्वर हे कृष्णातीरीं उंब्रज येथें येऊन राहिले.

आपण देऊं केलेलें द्रव्य कचेश्वरांनीं घेतलें नाहीं किंवा आपल्या पुत्रासही घेऊं दिलें नाहीं हें पाहून शाहू महाराजांनीं रामचंद्र खटाटोपे या नांवाचा कचे-

श्वरांचा एक शिष्य होता त्याच्या हातावर गुरुदक्षिणा म्हणून सहा गांवांच्या दानाचें उदक सोडलें. हे सहा गांव येणेंप्रमाणें:—सातारा जिल्ह्यांत १ सासवडें व २ अतीत; आणि पुणें जिल्ह्यांत ३ वांकी बुद्रूक ४ चांडोली ५ धावडी व ६ पांगरी. कचेश्वरांस दोन पुत्र होते, त्यांपैकीं एकाच्या वंशजांकडे अतीत, वांकी बुद्रूक व चांडोली हीं तीन गांवें चालतात; व बाकीचीं तीन गांवें दुसऱ्या मुलाच्या वंशजांकडे आहेत. हे वंशज हल्लीं अतीत व सासवडें या गांवीं राहतात. ह्या वंशजांना 'राजगुरु' म्हणतात. जुन्या कागदपत्रांत कचेश्वरांचा उल्लेख 'कचेश्वरभट' या नांवानें केलेला आढळतो. एकदां अवर्षण पडलें असतां चाकणच्या मुसलमान किल्लेदारानें कित्येक ब्राह्मणांस कोंडून ठेवलें व 'तुमच्या देवास पाऊस पाडण्यास सांगा,' असें म्हणून त्यांस चिडविलें. तेव्हां कचेश्वरांनीं भर दोन प्रहरीं भजनास आरंभ केला, तों एकावर एक मेघ येऊन दोन घटकांत इतका पाऊस पडला कीं सगळा प्रदेश जलमय होऊन गेला; व बंदींत ठेवलेल्या ब्राह्मणांची मुक्तता झाली. राजगुरूच्या दप्तरांत शिवाजी महाराजांसंबंधाची पुढील कविता कै. वि. का. राजवाडे यांस सांपडली होती—

"आला असे वीरवतंस राजा । मागें तुम्ही मोगल हो जरा जा ॥
मी सांगतों हें जरि आइकाना । तुम्ही गमावालहि नाककाना ॥
पृथ्वीवरी पाप बहूत केलें । तें तों तुम्हां सर्व फळास आलें ॥
गाई द्विजांला बहु पीडिलेंसे । शापें तयांच्या तप वेंचलेंसे ॥"

हा श्लोक कचेश्वरांचाच असून त्यांतील 'वीरवतंस राजा' हे शब्द शिवाजी-महाराजांसच अनुलक्षून उपयोजिलेले आहेत हा कै. राजवाडे यांचा तर्क जर बरो-बर असेल तर रामदास, वामन, जयराम वगैरे सत्पुरुषांच्या उतारवयांत कचेश्वर त्यांच्याशीं समकालीन होते, हें उघड दिसतें. शिवाजी, संभाजी, राजाराम, दुसरा शिवाजी व शाहू या पांच राजांच्या कारकीर्दी कचेश्वरांनीं पाहिल्या असाव्या. बाळाजी विश्वनाथ पेशवे यांस कचेश्वरांनीं पाठविलेल्या एका पत्रांत "श्रीमद्भग-वद्भजनपरायण सद्गुणाधिष्ठान विवेकसागर राजमानविराजित नानास्वामी गोसावी यांसी," असा मायना लिहून 'अपत्यें कचेश्वरें नमस्कार विशेष' असें म्हटलें आहे,

यावरून बाळाजी विश्वनाथ यांच्याहून कचेश्वर हे वयानें लहान होते असें दिसतें. कचेश्वर हे शके १६५३ त वारले. त्यांनीं बाळाजी विश्वनाथ यांस पाठविलेल्या उपरिनिर्दिष्ट पत्रांत, चऱ्होली गांवचें उत्पन्न व खर्च यांचा हिशोब देऊन शेवटीं 'आमच्या ऋणाची चिंता स्वामीस आहे,' असें कचेश्वरांनीं लिहिलें आहे. यावरून, कचेश्वर हे अगदींच प्रपंचपराङ्मुख होते असें वाटत नाहीं.

कचेश्वरांनीं अभंगवृत्तांत आत्मचरित्र लिहिलें असून त्याचे १११ चरण आहेत. स्वतःस तुकोबांनीं स्वप्नांत उपदेश दिल्याची हकीकत त्यांनीं पुढील अभंगांत सांगितली आहेः—

" ठेवियला माझ्या माथ्यावरी हात । स्वयें जाला गुप्त स्वप्नामाजी ॥
तेथूनियां स्फूर्ति तुकोबानें दिल्ही । येर दिवशीं केली कथा दीनें ॥
स्वरताळज्ञान नव्हतें ठाऊकें । कथा कवतिकें करविली ॥
व्यथा जे जे होती ते ते सर्व गेली । प्रचीत घडली माझी मज ॥
मग म्यां सोडिली लौकिकाची लाज । इतरांशीं काज काय माझें ॥
ब्राह्मण म्हणती यास काय जालें । कांहीं संचरलें महद्भुत ॥
बापापाशीं द्वेषें सांगती गाऱ्हाणें । तुमच्या पुत्रानें बुडविलें ॥
लाज येते आम्हां वैदिक आमुचा । पुत्र हा तुमचा म्हणोनियां ॥
नाचतो बाजारीं यासी शिक्षा करा । येऊं नका घरा देऊं तुम्ही ॥ "

कचेश्वर सांगतात–'तुकोबांनीं मला स्वप्नांत अनुग्रह दिला व तेव्हांपासून मला स्फूर्ति उत्पन्न होऊन मी दुसऱ्याच दिवशीं कीर्तन केलें. माझ्या सर्व व्यथा दूर झाल्या. मग मी लौकिकाची लाज सोडून भरबाजारांत भजन करून नाचूं लागलों व जातीकडे न पाहतां दिसेल त्याला आलिंगूं लागलों. माझ्या या वर्तनाबद्दल वैदिक ब्राह्मणांनीं माझ्या बापाकडे तक्रार करून मला शिक्षा करण्यास सांगितलें. माझ्या बापानें माझी कठोर शब्दांनीं कानउघाडणी करून मला वेगळें ठेवलें. मला थोडेंबहुत अन्नवस्त्र मात्र तो देत असे. माझ्या मुलास वेडें केलें असें म्हणून माझा बाप साधुसंतांस शिव्याशाप देऊं लागला. मला वाळीत टाकण्याच्या गोष्टी कोणी बोलूं लागले, तेव्हां 'तुमची इच्छा असेल तसें करा,' असें मी त्यांस सांगितलें. माझें समाधान करण्यासाठीं हरिभक्त आले, त्यांनीं मला

आशीर्वाद देऊन 'तूं कांहीं चिंता करूं नकोस,' असें सांगितलें. माझ्या घरीं आपोआप धनधान्य येऊं लागलें. पंतप्रधानाकडून, 'चऱ्होली गांवचा मोकासा मला देण्यांत आला आहे,' अशा अर्थाचें पत्र आलें, तेव्हां, भगवंत आपल्या भक्ताची उपेक्षा करीत नाहीं अशी माझी खात्री झाली.' पुढील हकीकत कचेश्वरांच्याच शब्दांत सांगतों:—

" इच्छा जाली चित्तीं निस्पृही असावें । स्थळ दिल्हें देवें तळ्यापाशीं ॥
काष्ठें तोडावींना संकल्प म्यां केला । देवें सिद्धी नेला पण माझा ॥
विहीर खणावी ऐसी जाली वांच्छा । देवें तीही इच्छा पुरविली ॥
पूजावीसी वाटे महाविष्णुमूर्ति । देवें अवचितीं तेही दिल्ही ॥
विस्तीर्ण असावें स्थळ कथेसाठीं । देवानें शेवटीं पूर्ण दिल्हें ॥
अग्निहोत्र घ्यावें स्मार्ताग्निसहित । देवें तें साहित्य घडविलें ॥
करावीसी वाटे स्वयें देवस्तुति । देवें दिल्ही स्फूर्ति कवित्वाची ॥
जो जो हेत माझ्या मनामध्यें येतो । तो तो पुरवितो स्वामी माझा ॥
कोठेंही अंतर पडों नेदी कांहीं । संसाराची नाहीं मज चिंता ॥
माझा अंगीकार पूर्ण देवें केला । अनुभव आला अंतरासी ॥
मागेंपुढें देव मज संभाळितो । बाळातें पाळितो मायबाप ॥
आतां वणवण करूं कशासाठीं । हृदयसंपुष्टीं आला देव ॥
माझा योगक्षेम चालवितो देव । त्यासी अहंभाव पूर्ण माझा ॥
त्याणें उणें कांहीं केलें नाहीं मज । इच्छिलें सहज पावतों मीं ॥
स्नानसंध्या माझी नित्य चालवितो । कथा करवितो अहोरात्रीं ॥
जाऊं नेदी कोठें आपुल्यावेगळें । न धरी निराळें बाळकासी ॥
संकटाचा कांहीं येवों नेदी वारा । वारितो पभारा स्वामी माझा ॥
होणारासारिखी करितो सूचना । सादवितो दीना होई जागा ॥
किती उपकार आठवूं स्वामीचे । सर्व खेळ याचे अगणित ॥ "

हे वरील अभंग वाचकांनीं पुनः एकदां लक्षपूर्वक वाचावे अशी त्यांना माझी आग्रहपूर्वक विनंति आहे. 'अनन्याश्चिंतयंतोमां ये जनः पर्युपासते । तेषां नित्याऽभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ।' या भगवदुक्तीची यथार्थता कचेश्वरांच्या

या स्वानुभवपूर्ण उद्गारांवरून व तुकारामादि इतर संतांच्या याच प्रकारच्या अनेक उद्गारांवरून वाचकांस पटली पाहिजे. असो. थोरले छत्रपति शाहू महाराज, पेशवे बाळाजी विश्वनाथ, बाजीराव, चिमणाजी अप्पा, नानासाहेब, सदाशिवराव भाऊ, रावरंभा निंबाळकर, फत्तेसिंग भोंसले, फत्तेसिंगाची स्त्री अहल्याबाई भोंसले, कान्होजी आंग्रे, तुकोजी होळकर वगैरे तत्कालीन ऐतिहासिक स्त्री-पुरुषांची कचेश्वरांवर व त्यांच्या पुत्रपौत्रांवर भक्ति असे असें कै. राजवाडे यांनीं लिहिलें आहे.

कचेश्वरांचें देहावसान कृष्णातीरीं उंब्रज येथें शके १६५३ फाल्गुन शुद्ध द्वितीया या दिवशीं झालें. त्यांचे गुरुभक्त शिष्य रामचंद्रपंत खटाटोपे यांनीं त्यांच्या देहाचें दहनादि सार्थक कृष्णावेण्यासंगमीं माहुली येथें केलें व तेथेंच आपल्या अंगणांत त्यांच्या अस्थी पुरून त्यांजवर समाधि बांधली. ह्या समाधीचा एक मजला जमिनींत असून त्यांत कचेश्वरांच्या पादुका आहेत. ह्या ठिकाणीं त्यांचे अतीत येथील वंशज दरवर्षी येऊन फाल्गुन शुद्ध द्वितीयेस त्यांच्या पुण्यतिथीचा उत्सव करितात. इतर वंशज आपापल्या गांवींच हा उत्सव साजरा करितात. पुणें जिल्ह्यांत खेड व चांडोली या गांवीं कचेश्वरांनीं पांडुरंगाच्या मूर्ति स्थापन केल्या आहेत. कचेश्वरांची बरीच कविता त्यांचे वंशज व शिष्यसांप्रदायी लोक यांच्या संग्रहीं आहे. त्यापैकीं सुदामचरित्र व गजेंद्रमोक्ष हीं त्यांचीं दोन काव्यें मात्र 'काव्यसंग्रहां'त प्रसिद्ध झालीं आहेत. इतर कविता अद्याप अप्रकाशित आहे. कचेश्वरांची एकंदर कविता मध्यम प्रतीची आहे. तींत यमकचमत्कार नाहींत, अलंकार नाहींत किंवा फारसें भाषासौष्ठवही नाहीं. परंतु त्या कवितेंत प्रसाद असून, वरील दोन काव्यांत तर करुण व भक्ति या रसांचा परमोत्कर्ष झालेला आहे.

तात्पर्य, एकंदरींत, कचेश्वरांचें हें चरित्र तुकारामबुवांच्या शिष्यास शोभण्यासारखेंच आहे यांत संशय नाहीं. कचेश्वरांनीं तुकोबांची आरती रचली आहे ती पुढें "तुकारामबुवांचा जयजयकार," या प्रकरणांत देऊं.

## निळोबा पिंपळनेरकर

वारकरीपंथांत, तुकोबांच्या पश्चात् जे सत्पुरुष होऊन गेले त्यांत प्रमुखत्वाचा मान निळोबा पिंपळनेरकर यांचा आहे. तुकोबांच्या अभंगांच्या खालोखाल यांचे अभंग वारकरी लोक प्रमाण मानतात.

निळोबांचा नक्की काल उपलब्ध नाहीं, तथापि संतचरित्रकार महीपति यांनीं ज्याअर्थीं यांचें चरित्र लिहिलें आहे त्याअर्थीं, तुकोबा आणि महीपति यांच्या दरम्यानच्या कालांत हे होऊन गेले असले पाहिजेत हें उघड आहे. हे पिंपळनेरचे कुळकर्णी; आश्वलायन शाखेचे देशस्थ ब्राम्हण. हे पिंपळनेर गांवीं फाल्गुन शुद्ध प्रतिपदेस समाधिस्थ झाले व त्या दिवशीं वरील गांवीं मोठा उत्सव होतो, असें समजतें. तुकोबा विद्यमान असतांना, आपल्यावर अनुग्रह करण्याविषयीं निळोबांनीं त्यांस विनंति केली तेव्हां "तुमच्यावर अनुग्रह केल्यावांचून मी निजधामास जाणार नाहीं," असें आश्वासन तुकोबांनीं त्यांस दिलें होतें. पण पुढें तो योग न येतां तुकोबा वैकुंठवासी झाले. त्या वेळीं निळोबा पिंपळनेरास होते. पुढें ते देहूस आले तेव्हां तुकोबांच्या वैकुंठगमनाची बातमी त्यांस समजली, त्या वेळीं त्यांस मोठें दुःख झालें. आपल्यावर अनुग्रह न करितां आपले सद्गुरु निजधामास गेले, तस्मात् आपला जन्म व्यर्थ आहे; सद्गुरु पुनः प्रगट होऊन जर आपणास उपदेश देणार नाहींत तर आपण अन्नपाणी वर्ज्य करून देहत्याग करूं, अशा दृढनिश्चयानें निळोबा बेचाळीस दिवस इंद्रायणीच्या कांठीं पडून राहिले. शेवटीं तुकोबा तेथें प्रगट होऊन त्यांनीं आपला वरदहस्त त्यांचे मस्तकीं ठेवला व त्यांस अनुग्रह दिला. या प्रसंगाविषयीं निळोबा लिहितात—

"येवोनियां कृपावंतें । तुकयास्वामी सद्गुरुनाथें ॥
हात ठेविला मस्तकीं । देउनि प्रसाद केलें सुखी ॥
माझी वाढविली मती । गुण वर्णावया स्फूर्ति ॥
निळा म्हणे मी बोलता । दिसें परी त्याची सत्ता ॥"

पुढें तुकाराममहाराजांचा मान व अधिकार, संप्रदायपरंपरेनें निळोबांकडे आला. निळोबांचे शिष्य शंकरस्वामी हे मोगलाईंतील शिऊर गांवचे रहिवासी. हे मोठे अधिकारी असल्यामुळें निळोबांनीं त्यांस अनुग्रह दिला. शंकरस्वामीचे शिष्य

मल्लाप्पा आप्पा हे जातीचे लिंगाईत वाणी, मोगलाईंतील वाशी गांवचे राहणारे. हेही परम वैराग्यशील आणि उपासनानिष्ठ होते. तुकारामबुवांची संप्रदायपरंपरा हल्लीं मल्लाप्पांच्यास वंशजांकडे आहे. पूर्वी पंढरपुरांत यांचाच फक्त एक भजनी फड होता. हल्लीं जरी त्याच्या पुष्कळ शाखा निघाल्या आहेत तरी त्या सर्वांचें अग्रेसरत्व वासकरांकडेच आहे.

महीपतींनीं आपल्या भक्तविजयाच्या ५६ व्या अध्यायांत निळोबांच्या चरित्रांतील एक प्रसंग वर्णिला आहे, त्यांत कांहीं चमत्कारांच्या कथा दिल्या आहेत. निळोबा हे जुन्या कवींची व प्रसंगीं स्वतःची कविता म्हणून कीर्तन करीत असत. ते गृहस्थाश्रमी होते. त्यांचे वंशज पिंपळनेरास आहेत असें समजतें. निळोबांच्या गाथ्यांत त्यांच्या सुमारें १९०० कविता छापल्या आहेत. निळोबांनीं तुकारामस्तुतिपर ३३२ श्लोक भुजंगप्रयातवृत्तांत रचले आहेत. चांगदेवचरित्रावरही त्यांचा एक अभंगबद्ध ग्रंथ आहे. निळोबांची इतर कविता म्हटली म्हणजे पंढरीमाहात्म्य, पांडुरंगवर्णन, स्वात्मनिवेदन, संतस्तुति, जनांस उपदेश, बालक्रीडा इत्यादि विषयांवर आहे. यांची काव्यरचना साधी पण गोड आणि प्रासादिक आहे.

## महीपति

सगळ्या जुन्या मराठी वाङ्मयांत संतचरित्रकार या नात्यानें महीपतिबुवा ताहराबादकर यांचें स्थान अगदीं स्वतंत्र आणि महत्त्वाचें आहे. जुन्या साधूंचीं किंवा कवींचीं चरित्रें लिहिणारास महीपतींच्या संतचरित्रविषयक ग्रंथांचें साहाय्य घेतल्याशिवाय एक पानही लिहितां येणार नाहीं इतकें सांगितलें म्हणजे त्यांच्या कर्तबगारीची यथार्थ कल्पना वाचकांस होईल.

महीपतींचे वडील दादोपंत कुळकर्णी हे मोगलांच्या पदरीं होते. तिकडून आपल्या वयाच्या ४० व्या वर्षी ते ताहराबाद येथें येऊन राहिले. हें गांव अहमदनगर जिल्ह्यांत आहे. दादोपंत हे पंढरीचे वारकरी होते व त्यांनीं सारखी २४ वर्षें वारी केली. वयाची साठी उलटल्यावर त्यांना एक पुत्र झाला. त्याचें नांव त्यांनीं महीपति ठेवलें. महीपतींचा जन्म ताहराबाद येथें शके १६३७ (इ. स. १७१५) त झाला. हे ऋग्वेदी वासिष्ठ गोत्री ब्राह्मण, आडनांव कांबळे. महीपति जरा मोठे झाल्यावर, त्यांच्या वडिलांनीं आपल्या

विश्वासाचा एक कांसार व दोन ब्राह्मण बरोबर देऊन त्यांस पंढरीस पाठविलें. तेथें त्यांनीं श्रीविठ्ठलाचें दर्शन घेऊन क्षेत्रप्रदक्षिणा केली.

महीपतींचें शिक्षण बरेंच झालें होतें. त्यांना संस्कृत भाषेचेंही कारणापुरतें ज्ञान होतें असें त्यांच्या ग्रंथावरून दिसतें. त्यांचें मराठी हस्ताक्षर चांगलें आहे. आपल्यापूर्वी होऊन गेलेल्या बहुतेक जुन्या कवींची कविता त्यांनीं लक्षपूर्वक वाचली होती. महीपति रूपानें सुंदर असून सशक्त होते. वयाच्या सोळाव्या वर्षीच ते कुळकर्णाचें काम पाहूं लागले. ताहराबादचें कुळकर्ण व जोशीपण महीपतींकडे होतें. तो गांव एका मुसलमानास जहागीर मिळाला होता, त्यामुळें महीपतींस त्याच्या कचेरींत नित्य जावें लागत असे. एके दिवशीं कचेरींतून येऊन स्नान करून ते देवपूजेस बसले असतां जहागीरदाराचा शिपाई त्यांस बोलावण्यास आला. ‘ देवपूजा आटपून येतों, ’ असें महीपतींनीं त्यास सांगितलें. इतक्यांत आणखी दोन बोलावणीं आलीं. तेव्हां तो यवन शिपाई महीपतींस कांहीं अधिक उणे शब्द बोलला. ते ऐकून त्यांस फार वाईट वाटलें. पूजा आटोपल्यावर ते जहागिरदाराच्या वाड्यांत गेले आणि तिकडचें काम संपवून घरीं आल्यावर, कानास लेखणी होती ती देवापुढें ठेवून त्यांनीं शपथ वाहिली कीं “ आजपासून गांवकामांत लेखणी हातीं धरणार नाहीं. ” ही शपथ त्यांनीं अखेरपर्यंत पाळली व त्यांच्या वंशजांनींही हा कालपावेतों ती पाळली असून सात पिढ्यांपर्यंत ती अशीच पाळली जावयाची आहे.

दादोपंतांचा वृद्धापकाल झाल्यामुळें त्यांची वारी पुढें महीपतींनीं चालविली. महीपतींच्या पत्नीचें नांव कोठेंही नमूद केलेलें आढळत नाहीं. पंढरपुर, पांडुरंग आणि साधुसंत यांच्यासंबंधानें, तुकोबांच्या पश्चात्, महीपतींनीं जितकें वाङ्मय लिहिलें, तितकें दुसऱ्या कोणी लिहिलें नाहीं. महीपति आपल्या वृद्धापकाळीं एकदां पंढरपुरास जात असतां घोड्यावरून पडले; त्या वेळीं त्यांच्या इष्टमित्रांनीं त्यांस परत घरीं आणलें. त्या वेळीं त्यांनीं पांडुरंगास एक लहानसें ओंवीबद्ध पत्र पाठविलें तें असें:—

**ओंव्या**

जय क्षीराब्धिवासा अनंता । अनंतशायी मायातीता ।<br>
भक्तवत्सला पंढरिनाथा । रुक्मिणीकांता श्रीविठ्ठला ॥

सेवेसि विज्ञापना ऐसी । येत होतों पंढरीसी ।
पांच कोस प्रथम दिवशीं । नांदुरासी पातलों ॥
एक रात्र क्रमोनि तेथ । प्रातःकाळीं उठलों त्वरित ।
अश्वावरूनि अकस्मात् । ग्रामद्वारीं पडियेलों ॥
तेणें देहदुःखेंकरून । विकळ मूर्च्छित पडिलों जाण ।
चित्तीं झालें तुझें स्मरण । अगाध महिमान संतांचें ॥
इष्ट मित्र आप्त त्याहीं । डोली करूनि आणिलें गांवीं ।
चित्तवृत्ति विठाबाई । तुझे पायीं लागली ॥
त्रितापाचे विस्तार किती । पत्रीं ल्याहावे तुजप्रती ।
शरीरीं किंचित् नाहीं शक्ति । लेखणी हातीं धरवेना ॥
अंतरसाक्ष चैतन्यघन । जाणसी जीवाची निजखूण ।
आरुष म्हणोनि तुजकारण । पत्र लिहून पाठवूं ॥
शेवटील हेत आहे साचा । संबंध तोडीं या देहाचा ।
ठाव इच्छितसें पायांचा । आणिक वाचा न बोले ॥
मागें भक्तां पावलासी अंतीं । तें यथार्थ करीं रुक्मिणीपती ।
विष्णुदास महीपति । सेवेसि विनंति करीतसे ॥"

पायांनीं पंढरपुरची वारी करण्याचें सामर्थ्य वार्धक्यामुळें आपल्या अंगीं उरलें नाहीं याबद्दल महीपतींस फार वाईट वाटत असे. ते देवास म्हणतातः—

"सदा डोळयांपुढें राहो तुझें ध्यान । ऐशी इच्छा पूर्ण वाटे जीवा ॥
दैवावांचोनिया निष्फळ वासना । ऐसें नारायणा दिसताहे ॥
तुझे यात्रे गमन घडावें चरणीं । नसे या प्राक्तनीं करूं काय ॥
आहे जों शरीर घडो परोपकार । असत्य उत्तर नयो वाचे ॥
महीपति म्हणे दाखवीं ते सोय । जेणें भवभय निवारेल ॥"

तुकोबांनीं महीपतींस स्वप्नांत दृष्टांत देऊन संतचरित्रें लिहिण्याची आज्ञा केली, ही गोष्ट महीपतींनींच स्वतः सांगितली आहे :—

"ज्यानें मस्तकीं ठेविला अभयकर । दुस्तर भवाब्धि केला पार ।
तो तुकाराम सद्गुरु वैष्णव वीर । ग्रंथारंभीं नमस्कार तयासी ॥

मृत्युलोकीं दाविली अघटित करणी । देहासमवेत गेले वैकुंठभुवनीं ।
अद्यापि शुद्ध भाव देखोनी । देती स्वप्नीं उपदेश ॥"

—संतलीलामृत

" नमूं सद्गुरु तुकाराम । जेणें निरसिला भवभ्रम ।
आपुले नामीं देऊनि प्रेम । भवबंधन निरसिलें ॥"

—भक्तविजय

"सद्गुरु तुकाराम समर्थ । अंतरसाक्ष चैतन्यनाथ ।
तेणें होवोनि हृदयस्थ । आठव मातें दीधला ॥"

—संतलीलामृत

" सद्गुरु तुकाराम समर्थ । तयासि माझा प्रणिपात ।
ज्यानें अवतार घेवोनि मृत्युलोकांत । दाविला भक्तिपंथ साधकां ॥"

× × × ×

"जो भक्तिज्ञानवैराग्यपुतळा । ज्याचे अंगीं अनंत कळा ।
तो सद्गुरु तुकाराम आम्हासि जोडला । स्वप्नीं दिधला उपदेश ॥"

—भक्तलीलामृत

महीपतींनीं एकंदर किती ग्रंथ लिहिले व त्यांची ओवीसंख्या काय आहे वगैरे खुलासेवार माहिती पूर्वनिर्दिष्ट 'महाराष्ट्र कविचरित्रा'च्या दुसऱ्या भागांत सांपडेल.

महीपति स्वभावानें फार नम्र, प्रेमळ आणि मोठे बहुश्रुत होते. सगुणोपासना व संतसेवा यांकडे त्यांचा ओढा विशेष दिसतो. श्रीधर कविकृत ग्रंथांच्या खालोखाल महीपतींच्या ग्रंथाचें वाचन आज सुमारें २०० वर्षें महाराष्ट्रांत सारखें चालू आहे. भक्तविजय, भक्तलीलामृत, संतविजय व संतलीलामृत हे त्यांचे चारी संतचरित्रपर ग्रंथ जरी सारखेच सुंदर आहेत तरी त्यांतल्या त्यांत भक्तविजय हा ग्रंथ महाराष्ट्रांत विशेष लोकप्रिय आहे. महीपतींनीं ताहराबाद येथें श्रीविठ्ठलाचें मंदिर बांधलें असून तेथें आषाढ वद्य १० पासून अमावास्येपर्यंत पांडुरंगाचा उत्सव करण्याची चाल सुरू केली ती अद्याप चालू आहे.

# तुकोबांचे शिष्य आणि टाळकरी

'भक्तलीलामृतां'त तुकोबांचें विस्तृत चरित्र महीपतींनीं दिलें असून आजपर्यंत लिहिलीं गेलेलीं तुकोबांचीं बहुतेक चरित्रें, महीपतींनीं लिहिलेल्या ह्या 'तुकारामचरित्रा'च्या आधारेंच लिहिण्यांत आलेलीं आहेत. प्रस्तुत चरित्रही त्याच ग्रंथाधारें मी लिहिलें असल्याचें प्रस्तावनेंत सांगितलेंच आहे.

महीपति बावा शके १७१२ (इ. स. १७९०) श्रावण वद्य १२ या दिवशीं समाधिस्थ झाले. त्या वेळीं त्यांचें वय ७५ वर्षांचें होतें. कविश्रेष्ठ मोरोपंत यांनीं 'महीपतिस्तव' म्हणून तेरा आर्या लिहिल्या आहेत त्यांतल्या कांहीं आर्या येथें देतों :—

"ज्याचा ग्रंथ हरिजनां सेव्य चकोरां जसा सदा इंदु ।
जो पसरला जगांत स्नेहाचा सत्सरीं जसा बिंदु ॥
सत्य तुकारामाचा या महिपतिवरि वरप्रसाद असे ।
सदनुग्रहाविणें हे निघतिल उद्गार सार काय असे ॥
साधूंचें यश गाया येणें देऊनियां सुभा केला ।
निःसंशय ताराया जड महिपति विठ्ठलें उभा केला ॥
महिपतिच्या वाणीतें सेवुनि तरतात जेंविं गंगेतें ।
विषयांत रंगलें जें जनमानस सद्यशींच रंगे तें ॥
ज्ञानोबाची जैसी एकोबाची जशी सुधा वाणी ।
कीं मुक्तेश्वर कविची महिपतिची सेविती तशी प्राणी ॥"

आपणास तुकारामबुवांनीं स्वप्नांत दर्शन देऊन अनुग्रह दिला असें ज्या चार व्यक्तींनीं आपल्या कवितेंत स्पष्ट शब्दांनीं नमूद करून ठेवलें आहे त्या चौघांचीं हीं चार चरित्रें संक्षिप्त रीतीनें येथें दिलीं आहेत. त्यांनीं सांगितलेली ही स्वप्नाची गोष्ट खरी मानावयाची कीं खोटी मानावयाची हें ज्याचें त्यानें ठरवावें. माझ्यासारख्या श्रद्धाळू मनुष्याचा अभिप्राय या कामीं उपयोगाचा नाहीं. मात्र लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही आहे कीं ह्या चारी व्यक्ति, आणि तुकोबांच्या एकंदर १३ टाळकऱ्यांपकीं सहा टाळकरी, जातीनें ब्राह्मण होते व यांनींच तुकोबांचें माहात्म्य इतकें वाढविलें आहे. "ब्राह्मणांनीं तुकारामबुवांस इंद्रायणींत बुडवून त्यांचा खून केला," असलें धडधडीत खोटें विधान करून ब्राह्मणांविरुद्ध

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
३८८८ दि:
श्रीतुकाराम
क्रमांक १२६९ नों दि: १८-९-६५

ब्राह्मणेतरांस उठविणाऱ्या असत्यवादी सत्यशोधकांनीं, या गोष्टीचा अवश्य विचार करावा.

तुकारामबुवांच्या शिष्यपरंपरेंत आणखीही कांहीं मोठे अधिकारी पुरुष होऊन गेले आहेत, त्यांपैकीं **बाबा महाराज** आणि **दादा महाराज आजरेकर** यांच्यासंबंधानें नवीनच उपलब्ध झालेली माहिती याच प्रकरणांत देऊन टाकतों. तुकोबांचे एक प्रमुख शिष्य **निळोबाराय पिंपळनेरकर** यांचे शिष्य **शंकरस्वामी शिरूरकर** म्हणून होते. या शंकरस्वामी शिरूरकरांचे शिष्य **मल्लापा वासकर** हे लिंगाईत पंथाचे असून यांनीं वारकऱ्यांत फड प्रथम काढला व आषाढीस आळंदीहून ज्ञानदेवांची पालखी पंढरीस नेण्याचा क्रम सुरू केला, तो अद्याप चालू आहे. या मल्लाप्पा वासकरांचे शिष्य, उपरिनिर्दिष्ट बाबा महाराज आजरेकर हे होत. हे मूळचे, कोंकणांतील कुडाळ-प्रांतांतल्या परुळें गांवचे रहिवासी. उपनांव माईणकर. हे ऋग्वेदी धनंजय गोत्री कुडाळ देशस्थ गौडब्राह्मण. प्रांतांतील राजकीय धामधुमीमुळें हे आपला मूळचा गांव सोडून देशावर इचलकरंजी संस्थानांतील आजरें गांवीं जाऊन राहिले. यांनीं मल्लाप्पा वासकरांचा अनुग्रह घेतल्यावर, त्यांच्या फडांत हे उत्तम कीर्तनकार म्हणून प्रसिद्धीस आले. त्यांच्यासंबंधानें अशी माहिती मिळते कीं देहू-नजीकच्या भामनाथ नामक डोंगरावरील ज्या ठिकाणीं तुकारामबुवा एकांतीं जाऊन बसत असत त्या ठिकाणीं बसून यांनीं आपल्या ऐन तारुण्यांत उग्र तपश्चर्या केली. ज्ञानेश्वरीचें पारायण करावें, तुकोबांचे अभंग म्हणावे आणि विठ्ठलनामाचा गजर करावा, हा तेथें त्यांचा नित्यक्रम होता. शेवटीं एके दिवशीं तुकोबांचा त्यांना साक्षात्कार होऊन त्यांची वृत्ति पूर्णपणें पालटली.

बार्शी येथें **प्रल्हादभाऊ** या नांवाचे एक प्रेमळ वारकरी होते, ते उदरपूर्तीसाठीं एका वाण्याचे दुकानीं हिशोब ठेवण्याचें काम करीत असत. दुसरे **हैबतराव** नांवाचे मराठे गृहस्थ एका संस्थानिकाकडे मानकरी होते, त्यांना उतार-वयांत, संस्थानिकाच्या लहरीप्रमाणें वागण्यांत आपलें आयुष्य व्यर्थ गेलें म्हणून पश्चात्ताप झाला व ते आळंदीस जाऊन ज्ञानेश्वरांची सेवा करीत राहिले. तेथें ते नित्य ज्ञानेश्वरीचें पारायण करीत. पुढें, प्रल्हादभाऊ बार्शीकर हेही वारीच्या

निमित्तानें आळंदीस येऊं लागले. त्यांनीं वेदांताचा व गीताभागवतादि ग्रंथांचा अभ्यास केला होता. ज्ञानदेवांच्या समाधीपुढें प्रल्हादभाऊ कीर्तन करूं लागले व त्या कीर्तनश्रवणानें हैबतरावबाबा फार तल्लीन झाले. हैबतरावबाबांची ज्ञानेश्वरांच्या ठिकाणीं इतकी भक्ति जडली होती कीं त्यांच्यावर ज्ञानेश्वरांची कृपा होऊन त्यांना दर्शनही झालें. ज्ञानदेवांच्या पालखीबरोबर हे दोन्ही सत्पुरुष पंढरीस जात असत, व वाटेंत प्रत्येक पेण्याला प्रल्हादभाऊंचें कीर्तन होत असे. पुढें हे प्रल्हादभाऊ लवकरच समाधिस्थ झाले. प्रल्हादभाऊंचें प्रेमळ कीर्तन आतां आपणास ऐकावयास मिळणार नाहीं म्हणून हैबतरावबाबा फार दुःखी झाले असतां ज्ञानोबांनीं त्यांना "देहूस जाऊन बाबा महाराज आजरेकर यांची भेट घ्या," असा दृष्टांत दिला. त्याप्रमाणें हैबतरावबाबांनीं देहूस जाऊन बाबा महाराजांची भेट घेतली व विनंति केली कीं, "आपण आळंदीस येऊन ज्ञानोबांपुढें कीर्तन करावें. ज्ञानोबांची आपणास तशी आज्ञा आहे." बाबा आजरेकर म्हणाले, "ज्ञानदेवमहाराजांची आज्ञा मला शिरसामान्य आहे, परंतु तुकारामबुवांची आज्ञा झाल्याशिवाय मी देहू सोडणार नाहीं." असें सांगतात कीं, त्याच रात्रीं तुकोबांनीं बाबांस स्वप्नांत दर्शन देऊन सांगितलें कीं, 'बाबा, तूं कृतकार्य झालास, आतां ऊठ आणि आळंदीस जाऊन कीर्तनद्वारें भक्तिमार्गाचा प्रसार कर.' तुकोबांची आज्ञा होतांच हैबतरावांबरोबर बाबा आळंदीस गेले. तेथें ज्ञानोबांच्या समाधीपुढें नित्य त्यांचें कीर्तन होऊं लागलें. हें त्यांचें कीर्तन वारकरी थाटाचें असे; भजन आणि कीर्तन एकदमच चालावयाचें. एके दिवशीं असा चमत्कार झाल्याचें सांगतात कीं बाबा कीर्तनांत श्रीकृष्णाच्या व्रजांतील लीला अगदीं तल्लीन होऊन सांगत असतां, अकस्मात् कोणीतरी एक देदीप्यमान् पुरुष बाबांच्या मागें येऊन उभा राहून ताल धरीत आहे असें हैबतरावबाबांनीं पाहिलें. तो पुरुष दुसरा कोणी नसून खुद्द ज्ञानोबारायच अन्यरूपानें आले होते. पुढें, कांहीं वर्षांनीं हैबतरावबाबा आळंदी येथेंच समाधिस्थ झाले. देह ठेवण्यापूर्वी त्यांनीं आपला देह ज्ञानदेव-समाधि–मंदिराच्या पहिल्या पायरीखालीं ठेवावा अशी इच्छा व्यक्त केली होती व त्याप्रमाणें या प्रेमळ भक्ताला त्या ठिकाणीं समाधि देण्यांत आली. पंढरपुरांत जशी नामदेवांची पायरी प्रसिद्ध आहे, तशीच आळंदी येथें ही हैबतरावबाबांची पायरी प्रसिद्ध आहे. हे

हैबतरावबा बाआपल्या भजनांत जीं पद्यें म्हणत असत तीं सर्व ‘भजनमालिका’ या नांवानें पुण्याच्या चित्रशाळेनें छापून प्रसिद्ध केलीं आहेत.

पुढें बाबा आजरेकरांचाही वृद्धापकाल झाला तेव्हां जवळच्या भाविक मंडळीनें एके दिवशीं त्यांना विचारिलें कीं “बाबा, आपण वृद्ध झालां, आतां पुढें आम्हांला कीर्तन कोण ऐकवील?” बावा म्हणाले, “हा गोविंद!” बावांचे वडील बंधु कृष्णाजीपंत यांचा हा गोविंद वडील पुत्र. तो जवळच बसला होता त्याजकडे बोट दाखवून बावांनीं वरीलप्रमाणें उत्तर दिलें. आजरेकरांचा फड प्रसिद्ध असून, वासकरांच्याच फडाची ती एक शाखा आहे. बाबांचें पुढील आयुष्य आळंदी क्षेत्रांत ज्ञानोबांच्या सेवेंत गेलें. त्यांच्या कीर्तनाचा लौकिक संकेश्वरच्या शंकराचार्यांच्या कानीं गेला. त्यांनीं आपले कारभारी पाठवून बाबांस मोठ्या आदरानें बोलावून नेलें आणि त्यांचें कीर्तन करविलें. कीर्तन ऐकून श्रीशंकराचार्य इतके प्रसन्न झाले कीं, त्यांनीं मौजे नांदणी, ता. शिरोळ या गांवीं एक जमीन बाबांस इनाम करून दिली. अद्याप ती त्यांच्या वंशजांकडे चालत आहे. आळंदीस हळूहळू बाबांची शक्ति क्षीण होऊं लागली तेव्हां आपला मृत्युकाळ जवळ आला असें जाणून पंढरीक्षेत्रांत देह ठेवण्याची आपली इच्छा त्यांनीं फडांतील मंडळीस कळविली व त्याप्रमाणें मंडळीनें त्यांना डोलींतून पंढरपुरास नेलें. रस्त्यांत तीन दिवस त्यांचा फक्त श्वासोच्छ्वास चालू होता; अन्नपाणी त्यांनीं वर्ज्य केलें होतें. पंढरीस पोंचतांच मंडळीनें त्यांना पांडुरंगदर्शन करविलें व पांडुरंगाकडे पहात असतां त्या ठिकाणींच त्यांनीं देह ठेविला. भक्तमंडळीनें चंद्रभागेवर त्यांची समाधि बांधली.

बाबा महाराज समाधिस्थ झाले त्या वेळीं गोविंदाचें वय १८ वर्षांचें होतें. फडांतील मंडळीनें गोविंद ऊर्फ दादा यांस फडाचें पुढारीपण दिलें. हे **दादा महाराज आजरेकर** पुढें उत्कृष्ट कीर्तनकार म्हणून प्रसिद्धीस आले. यांनीं स्वतःच्या कीर्तनाविषयीं असा एक नियम केला होता कीं, आळंदी, देहू, पंढरी आणि पंढरीस जातांना ज्या ठिकाणीं मुक्काम होईल तीं ठिकाणें, इतक्याच स्थलीं कीर्तन करावयाचें. हा नियम सर्व आजरेकर सांप्रदायी पुरुषांनीं आजपर्यंत पाळला आहे. असा नियम करण्यास एक गोष्ट कारणीभूत झाली ती अशी

कीं, दादा महाराजांविषयीं फार आदर बाळगणारा त्यांचा एक भाविक भक्त होता. आपल्या घरीं दादांनीं येऊन भक्तमंडळीसह कीर्तन व भोजन करावें अशी आपली इच्छा त्यानें दादांस कळविली व त्याप्रमाणें त्याच्या घरीं जाण्याचें दादांनीं कबूल केलें. त्या भाविक गृहस्थानें भोजनाची उत्तम व्यवस्था केली होती. भोजनोत्तर दादांचें प्रेमळ कीर्तन झालें. मंडळीही बरीच होती. पुढें दोन तीन दिवसांनीं दादांस असें समजलें कीं त्या गृहस्थानें जो भोजनाचा येवढा थाट केला होता तो उधारीवर केला होता व त्यानें आणलेल्या मालाच्या पैशासाठीं वाणी त्याच्या दारांत धरणें धरून बसला असून, त्याची बायको नवऱ्याच्या व संतांच्या नांवानें शिव्याशाप देत आहे ! हें वर्तमान ऐकतांच दादांस फार वाईट वाटलें व त्यांनीं कीर्तनाच्या बाबतींत वरील नियम जाहीर केला. पुढें, तेथील एका विठ्ठलभक्तानें त्या वाण्याचें देणें परस्पर देऊन टाकलें. दादामहाराजांचें वास्तव्य नांदणी गांवीं असे. त्यांनीं आपल्या वयाच्या ६५ व्या वर्षीं मिरज येथें देह ठेविला. मृत्युतिथि आश्वीन वद्य ८. मृत्युशक समजला नाहीं. भक्तमंडळीनें मिरज येथें त्यांची समाधि बांधून त्यावर मंदिर उभारलें आहे त्यास 'श्रीहरिमंदिर' म्हणतात. असें सांगतात कीं दादा महाराज वैकुंठवासी झाले त्या दिवसापासून ११ दिवसपर्यंत अर्ध्या पाऊण मैलावरील झाडींत दररोज शेंकडों टाळ वाजून भजन होत असे. लोकांनीं तेथें जाऊन पाहिलें पण कोणीही मनुष्य दृष्टीस पडला नाहीं.

आजरेकरांच्या फडाबरोबर सुमारें २००० वारकरी पंढरपुरास जात असतात. यांचे वंशज अद्याप आजरें येथें आहेत.

## प्रकरण १६ वें

# तुकारामबुवांची कविता

संतशिरोमणि तुकारामबुवा देहूकर यांनीं एकंदर किती अभंग लिहिले आणि त्यांतले हल्लीं किती उपलब्ध आहेत; त्याचप्रमाणें त्यांच्या नांवावर प्रसिद्ध असलेले सगळे अभंग त्यांचेच आहेत कीं 'तुका' हें नांव धारण करणाऱ्या इतर कवींचेहि कांहीं अभंग त्यांचे म्हणून छापले गेले आहेत इत्यादि प्रश्नांची चर्चा अद्याप फारशी कोणी केली नाहीं. तुकारामबुवांच्या बहुतेक चरित्रकारांची अशी समजूत दिसते कीं 'सांप्रदायिक गाथा' या नांवानें साडेचार हजार अभंगांचा जो तुकारामाचा गाथा हल्लीं प्रसिद्ध आहे, तेवढीच काय ती तुकोबांची कविता; त्याच्या बाहेर सांपडणारा तुकोबांचा अभंग प्रक्षिप्तच असला पाहिजे. पण बसल्या उठल्या अभंगरचना करणाऱ्या व शेवटीं शेवटीं तर अभंगांतच बोलणाऱ्या तुकोबांसारख्या शीघ्र कवीनें तीसचाळीस वर्षांच्या दीर्घ कालांत इतकी थोडी कविता कशी रचली असेल हा विचार त्यांच्या मनास शिवलाच नाहीं. साडेचार कोटी अभंग लिहून तुकारामबुवांनीं 'नामयाची बाकी' फेडल्याची आख्यायिका अगदींच अशक्य कोटींतली म्हणून जरी सोडून दिली तरी तुकारामपूर्वकालीन ज्ञानेश्वर, पिसा बहिरा, विष्णुदास नामा, दासोपंत, शिवकल्याण, रंगनाथ मोगरेकर आणि एकनाथमहाराज; समकालीन मुक्तेश्वर, वामन, रामदास, जयराम आणि शिवराम; व उत्तरकालीन कृष्णदयार्णव, श्रीधर, गोपाळ, शुभानंद, माधव, गिरिधर, सोहिरोबा, महीपति, हरिबुवा भोंडवे आणि मोरोपंत या प्रत्येकाच्या कवितेहून तुकोबांची कविता कमी कां असावी हा विचार करण्यासारखा प्रश्न नाहीं काय? खुद्द तुकारामबुवांनीं किंवा त्यांच्या हयातींत त्यांच्या शिष्यांनीं लिहून ठेवलेल्या बुवांच्या सर्व अभंगांच्या वह्या जर सुदैवानें आज उपलब्ध असत्या तर त्यांच्या कवितेच्या संख्येचा हा प्रश्न मुळीं उपस्थितच झाला नसता; परंतु वस्तुस्थिति तशी नसल्यामुळेंच या प्रश्नाची चर्चा करावी लागते. बुवांच्या चौदा टाळकऱ्यांपैकीं संतुजी तेली जगनाडे यांनीं मात्र बुवांचे कांहीं अभंग स्वतः लिहून ठेवलेले असून ते त्यांच्या वंशजांच्या

संग्रहीं आहेत व कै. वि. ल. भावे यांनीं त्यांतले कांहीं अभंग पुस्तकरूपानें जशाचे तसे प्रसिद्ध केले आहेत. या अभंगांची संख्या सुमारें १२०० असून, सांप्रदायिक गाथ्यांत समाविष्ट न झालेले बरेच अभंग त्यांत सांपडतात व ह्या एकाच पुराव्यावरून तुकारामबुवांनीं साडेचार हजारांपेक्षां कितीतरी अधिक अभंग रचले असले पाहिजेत हें निर्विवाद रीतीनें सिद्ध होतें.

तुकोबांच्या सांप्रदायी गाथ्यांतले व त्या गाथ्याबाहेरचे मिळतील तेवढे सर्व अभंग मिळवून छापण्याचा प्रयत्न आजपर्यंत फक्त कै. तुकाराम तात्या पडवळ या सद्गृहस्थांनींच केला. त्यांनीं प्रसिद्ध केलेल्या अभंगांची संख्या ८४४१ आहे; यावरून तुकारामबुवांच्या नांवावर प्रसिद्ध असलेले सर्व अभंग मिळविण्याचा त्यांनीं केवढा आटोकाट प्रयत्न केला असला पाहिजे याची चांगली कल्पना होते. हा ८४४१ अभंगांचा गाथा त्यांनीं १८८९ सालीं प्रसिद्ध केला, व त्या वेळीं जर त्यांनीं हा उद्योग हातीं घेतला नसता तर गेल्या ४६ वर्षांत यांतले किती तरी अभंग गहाळ झाले असते. म्हणून कै. तुकाराम तात्या यांच्या या कामगिरीचें महत्त्व विशेष मानलें पाहिजे. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, त्यांनीं गांवोंगांवच्या शेंकडों वह्या जमवून 'तुका म्हणे' हे शब्द ज्या अभंगांत आले आहेत असे सर्व अभंग मिळविण्याचा शक्य तितका प्रयत्न केला असतांही, त्यांच्या गाथ्यांत समाविष्ट न झालेले असे शेंकडों अभंग अद्याप ठिकठिकाणीं सांपडतात. माझ्याच संग्रहीं असे बरेचसे अभंग आहेत. आतां, कै. तुकाराम तात्या यांनीं छापलेल्या ८४४१ अभंगांपैकीं सर्वच अभंग तुकारामबुवा देहूकर यांचे आहेत असें मात्र कोणी समजूं नये. कांहीं अभंग त्यांनीं चुकीनें दुबार छापलेले असून, बरेच अभंग उघड उघड दुसऱ्या कोणा तरी तुकारामाचे आहेत; पण सांप्रदायिक गाथ्याबाहेरचे जे अभंग यांत दिले आहेत त्यांतले थोडे तरी अभंग देहूकर तुकारामाचेच असले पाहिजेत यांत संशय नाहीं. आतां, सांप्रदायिक गाथा व तुकाराम तात्या यांचा गाथा यांच्या बाहेर जे कांहीं अभंग सांपडतात त्यांचा नमुना पहा :—

**" स्वप्न सांगे मंडोदरी । लंका वेढिली वानरीं ।।**
**दूत पातले रामाचे । बळ अधिक हनुमंताचें ।।**

एका एका दुर्गांवरी । उड्या मारिति नाना परी ॥
तुका म्हणे स्वामी माझा । आला अयोध्येचा राजा ॥ ''

ह्या अभंगाची एकंदर रचना थेट तुकोबांच्या रचनेप्रमाणें आहे. मग हा अभंग त्यांचा नव्हे असें कां मानावयाचें ? त्यांचे कांहीं रामचरित्रपर अभंग सांप्रदायी गाथ्यांत व तुकाराम तात्या यांच्या गाथ्यांत छापलेले आहेत व त्यांतलाच हा अभंग दिसतो, पण दोन्ही गाथा छापणारांस तो सांपडला नसावा. कदाचित् समग्र रामकथेवर तुकोबांनीं अभंगरचना केली असेल असाही तर्क यावरून संभवतो. आणखी नमुने पहाः—

" आम्ही काळाचेही काळ । विठोबाचे लडिवाळ ॥
करूं सत्ता सर्वां ठायीं । वसों निकट वास पायीं ॥
ऐसी कोणाची वैखरी । वदे आमुचे सामोरी ॥
तुका म्हणे बाण । हातीं हरिनाम तीक्ष्ण ॥ ''

" शरीर सोकलें देखिलिया सुखा । कदान्न तें मुखा रुचि नेदी ॥
आतां दोंहीं पक्षीं लाविलें लांच्छन । देवभक्तपण लाजविलें ॥
महत्त्वाची पायीं पडली शृंखळा । बांधविला गळा स्नेहाहातीं ॥
तुका म्हणे जाला अवगुणाचा थारा । वाढविली निद्रा आळस बहु ॥ ''

" कामधाम आम्ही वाहिलें विठ्ठलीं । आवडी धरिली पायांसवें ॥
आतां कोण पाहे माघारा फिरोनी । गेलों विसरोनी देहभाव ॥
रिद्धि सिद्धि सुखा हाणितल्या लाता । प्राकृत तें आतां कोण पाहे ॥
तुका म्हणे आम्ही विठोबाचे दास । करूनि ठेलों ग्रास ब्रह्मांडाचा ॥ ''

हे व याच प्रकारचे इतर शेंकडों अभंग तुकारामबुवा देहूकरांचे नव्हत असें कोणत्या कारणास्तव म्हणावयाचें हें मला समजत नाहीं. कै. तुकाराम तात्या यांच्या गाथ्यांत योगावरचे जे शेंकडो अभंग दिलेले आहेत ते मात्र दुसऱ्या एखाद्या तुकारामाचे असले पाहिजेत. तुकाराम या नांवाचे अनेक कवि झाले व त्यांनीं 'तुका' याच नांवानें आपापली कविता लिहिली, म्हणून हा गोंधळ झाला असावा एक; किंवा कोणी उपद्व्यापी मनुष्यानें स्वतः रचलेल्या अभंगांत 'तुका'

हें नांव दडपून देऊन ते अभंग तुकोबांचेच आहेत असें भासविण्याचा प्रयत्न केला असावा एक; येरवीं या कोड्याचा उलगडा होऊं शकत नाहीं. तरीपण वरील विवेचनावरून एक गोष्ट स्पष्ट दिसते ती ही कीं, सांप्रदायिक गाथ्याबाहेर तुकोबांचे अभंग खास आहेत; आणि ते तसे नाहींत असें समजून सांप्रदायिक गाथाच तेवढा तुकोबांचा असा आग्रह धरून बसणें म्हणजे स्वतःची फसवणूक करून घेणें होय.

आतां, सांप्रदायी गाथ्यांतही सगळेच अभंग तुकारामबुवांचे नसून 'तुका' नामधारी इतर कवींचेही कांहीं अभंग त्यांत घुसडले गेले आहेत हें सिद्ध करण्यासाठीं एकाच अभंगाचा पुरावा देतों—

**" रक्त श्वेत कृष्ण पीत प्रभा भिन्न । चिन्मय अंजन सुदलें डोळां ॥**
**तेणें अंजनगुणें चिन्मयदृष्टि जाली । कल्पना निवाली द्वैताद्वैत ॥**
**देशकालवस्तुभेद मावळला । आत्मा निर्वाळला विश्वाकार ॥**
**न जाला प्रपंच आहे परब्रह्म । अहं सोहं ब्रह्म आकळलें ॥**
**तत्त्वमसि विद्या ब्रह्मानंद सांगे । तेंचि जाला अंगें तुका आतां ॥ "**

हा अभंग सर्व सांप्रदायी गाथ्यांत सांपडतो, पण तो तुकारामबुवा देहूकरांचा नसून, त्यांच्याच वेळीं, सातारा येथें होऊन गेलेल्या '**तुका ब्रह्मानंद**'[1] नामक कवीचा आहे व शेवटच्या चरणांतील " ही तत्त्वमसि विद्या **ब्रह्मानंदानें** सांगितली व तीच 'तुका' याच्या अंगांत आतां बाणली, " या उद्गारांवरूनच ही गोष्ट सिद्ध होत आहे. तुकोबा देहूकरांच्या गुरूचें नांव 'ब्रह्मानंद' नसून 'बाबाजी चैतन्य' होतें हें प्रसिद्धच आहे. असले वेदांतपर अभंग देहूकर तुकारामबुवांनीं क्वचित्च लिहिले असतील. तुकोबांचे बंधु कान्होबा यांनीं आपल्या अभंगांत 'तुकयाबंधु' हें नांव घातलें आहे. या 'तुकयाबंधू'चे किती तरी अभंग तुकोबांचे गाथ्यांत दिले आहेत. तुकारामाचा गाथा, 'आर्यभूषण' प्रत, अभंग १०७५ ते १०८५ पहा.

"अंतरीं निर्मळ वाचेचा रसाळ । त्याचे गळां माळ असो नसो, " " सद्गुरू-

१ या कवीचें चरित्र 'महाराष्ट्र कविचरित्रा'च्या पांचव्या भागांत मी दिलें आहे.

ग्रंथोनी सांपडेना सोय," वगैरे प्रसिद्ध अभंग तुकोबांच्या कोणत्याही सांप्रदायिक गाथ्यांत सांपडत नाहींत ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

ज्या कवितांच्या शेवटीं 'तुका' हें नांव आलें आहे अशा कितीतरी कविता अद्याप कांहीं जुन्या वह्यांतून सांपडतात हें मी पूर्वीं सांगितलेंच आहे. उदाहरणार्थ—

**'भक्तांसाठीं तो जगजेठी बसोनि माळ्यावर ।**
**पाखरें उडवी शारंगधर ॥'**

या प्रसिद्ध पद्याच्या अखेरीस—

**"अगाध त्याची माव कळेना तुका जोडुनी कर ॥"**

असा चरण आहे.

**"नमिला शिवशंकर । पार्वतीवर"**

या ध्रुवपदानें प्रारंभित होणारें एक पद मजपाशीं असलेल्या एका जुन्या वहींत आहे त्याचा शेवटचा चरण—

**"तुका म्हणे द्या निवडुन । तुम्ही चतुर ॥"**

असा आहे. 'मोदक' या नांवाची पुढील कविताही तुकोबांच्याच नांवावर प्रसिद्ध आहे—

**पहिली माझी ओवी प्रथमचि एक । श्रीहरिनायक सर्वांघटीं ॥ १ ॥**
**दुसरी माझी ओवी द्वैत दोन्ही निष्ठा । सकळ वरिष्ठा पांडुरंग ॥ २ ॥**
**तिसरी माझी ओवी त्रिगुण हा आत्मा । गाईन पुरुषोत्तमा वेळोवेळां ॥ ३ ॥**
**चवथी माझी ओवी चारीही हे वेद । अखंड गोविंद हृदयामाजी ॥ ४ ॥**
**पांचवी माझी ओवी पांचाही तत्त्वांसी । शरीर हृषीकेशी आकारलें ॥ ५ ॥**
**सहावी माझी ओवी सहाही षड्चक्रें । तेथें शारंगधरें वस्ती केली ॥ ६ ॥**
**सातवी माझी ओवी सप्तही पाताळें । त्याचेही वेगळें परब्रह्म ॥ ७ ॥**
**आठवी माझी ओवी मनीं आठवावा । चिंतनीं चिंतावा पांडुरंग ॥ ८ ॥**
**नववी माझी ओवी नवविधा हे भक्ति । चित्ताची विश्रांती पांडुरंग ॥ ९ ॥**
**दहावी माझी ओवी दहा अवतार । कृपेचा सागर पंढरिराव ॥ १० ॥**

अकरावी हे ओवी मनें आकारला । हृदयीं भरला पांडुरंग ॥ ११ ॥
बारावी हे ओवी बारावा जपावा । एकची जाणावा पांडुरंग ॥ १२ ॥
तेरावी हे ओवी तेंची ध्यानीं मनीं । अखंड चिंतनीं पांडुरंग ॥ १३ ॥
चवदावी हे ओवी चवदाही भुवनें । राहिला व्यापून दाही दीशा
पंध्रावी हे ओवी परे परतीये । वचनें निघती हे अमृताचीं ॥ १५ ॥
सोळावी हे ओवी पाहावा सोहळा । व्यापुनी निराळा पांडुरंग ॥ १६ ॥
सत्रावी हे ओवी गावी वेळोवेळां । चिंतन सोहळा रात्रंदिवस ॥ १७ ॥
अठरावी हे ओवी अठराही पुराणें । गातां नाम गाणें उरलें असे ॥ १८ ॥
एकुणिसावी ओवी घ्या नाम विसावा । मनीं आठवावा वेळोंवळां ॥ १९ ॥
विसावी हे ओवी विसावलें मन । राहिलें व्यापून सर्वांघटीं ॥ २० ॥
एकविसावी ओवी एकविसापरता । नाहीं कांहीं रिता ठाव कोठें ॥ २१ ॥
तुका म्हणे ऐसा सारथी सर्वांचा । कायामनें वाचा स्मरण करा ॥ २२ ॥

परंतु, या व अशाच प्रकारच्या इतर कविता देहूकर तुकारामबुवांच्या नाहींत, हें त्यांच्या रचनेवरून उघड दिसतें.

तुकोबा सदेह वैकुंठास गेल्यावर तिसऱ्या दिवशीं त्यांची गोधडी-टाळ हीं आकाशांतून खालीं पडलीं व त्याबरोबरच १२ अभंगही खालीं पडले, अशी एक आख्यायिका आहे. हे १२ अभंग छापलेले असून त्यांतील एका अभंगांत तुकोबांनीं एकंदर किती अभंग लिहिले त्यांचा आंकडा दिला आहे--

"चार कोटी एक लक्षाचें शेवट । चौतीस सहस्र स्पष्ट कथियेले ॥
कथियेले इतुके, तुका कथुनी गेला । बारा अभंगांला सोडूं नका ॥"

नामदेवांनीं शतकोटि अभंग लिहिण्याची जी प्रतिज्ञा केली होती ती, शेवटपर्यंत त्यांजकडून फक्त ९६ कोटीच अभंग लिहिले गेल्यामुळें अपुरी राहिली व ते उरलेले चार कोटी अभंग तुकोबांनीं लिहिले अशी या आख्यायिकेची उपपत्ति आहे! पण, नामदेवांनीं शतकोटी अभंग लिहिण्याची प्रतिज्ञा करून त्यांतले ९६ कोटी अभंग लिहिले ही मूळ आख्यायिका जशी निराधार आहे, तशीच तुकोबांनीं ४ कोटी १ लक्ष ३४ हजार

अभंग लिहिले ही गोष्टही निराधार म्हणजे बनावट आहे; बुवांनीं फार तर दहा हजार अभंग लिहिले असतील, याहून अधिक अभंग त्यांनीं लिहिले असतील असें मानण्यास कांहीं आधार नाहीं.

प्रस्तुत ग्रंथाच्या आरंभींच 'याती शूद्रवंश केला व्यवसाय,' हा आत्मचरित्र-पर अभंग उद्धृत केला आहे त्याच्याः—

**" मानियेला स्वप्नीं गुरूचा उपदेश । धरिला विश्वास दृढ नामीं ॥**
**यावरी या जाली कवित्वाची स्फूर्ति । पाय धरिले चित्तीं विठोबाचे ॥ "**

या दोन चरणांत " स्वप्नांत गुरूचा उपदेश झाल्यावर मला या कवित्वाची स्फूर्ति झाली, " इतकेंच बुवांनीं सांगितलें आहे, असें असतां—

**" नामदेवें केलें स्वप्नामाजी जागें । सवें पांडुरंगें येवोनियां ॥**
**सांगितलें काम करावें कवित्व । वाउगें निमित्य बोलों नये ॥**
**माप टाकीं सळे धरिली विठ्ठलें । थापटोनी केलें सावधान ॥**
**प्रमाणाची संख्या सांगे शतकोटी । उरले ते शेवटीं लावी तुका ॥ "**

हा अभंग सर्व सांप्रदायी गाथ्यांत सांपडतो व त्याचा अर्थ असा आहे कीं, " नामदेव आणि पांडुरंग यांनीं माझ्या स्वप्नांत येऊन मला जागें केलें आणि कवित्व करण्याचें काम सांगितलें. वाह्यात गोष्टी बोलूं नकोस, तूं माप टाकीत जा, मोजून घेण्याचें काम विठ्ठल करील, असेंही त्यांनीं सांगितलें, व मला थापटून सावध केलें. एकंदर १०० कोटी अभंग रचावयाचे आहेत, त्यांतले जेवढे अभंग नामदेवांनीं लिहिले आहेत तेवढे वजा जातां बाकीचे अभंग तुकारामानें लिहिले. "

'याती शूद्रवंश' या आत्मचरित्रपर अभंगांत 'मला कवित्वाची स्फूर्ति झाली' इतकेंच बुवांनीं सांगितलें आहे. नामदेव व पांडुरंग हे आपल्या स्वप्नांत येऊन शतकोटी अभंगांपैकीं उरलेले अभंग तूं पुरे कर असें त्यांनीं आपणास सांगितलें, या गोष्टीचा उल्लेख बुवांनीं तेथें केलेला नाहीं. यावरून हा दुसरा अभंग प्रक्षिप्त असला पाहिजे असें मानल्याशिवाय गत्यंतर नाहीं. नामदेवांनीं शतकोटी अभंगांची प्रतिज्ञा करून त्यांतले ९६ कोटी अभंग लिहिले ही आख्या-

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८८९४ दि: ...



यिका कशी धडधडीत खोटी आहे हें या ९६ कोटी अभंगांचा हिशोब देऊन मी माझ्या 'नामदेवचरित्रांत' सिद्ध केलेंच आहे. हा हिशोब कसा गमतीचा आहे पहा. नामदेव महाराज व त्यांच्या कुटुंबांतील माणसें रोज १०० अभंग लिहीत होतीं असें धरून चालल्यास ९६ कोटी अभंग रचावयास २६९४४ वर्षें लागतील! व याच हिशोबानें ४ कोटि अभंग रचावयास ११११ वर्षें लागतील! अशा, स्थितींत, "१०० कोटी अभंगांची प्रतिज्ञा खरी मानून, त्यांतले ४ कोटी अभंग आपण लिहिले," असा मजकूर 'तुका' या नांवावर प्रसिद्ध असलेल्या एखाद्या अभंगांत जर सांपडत असेल तर तो अभंग निखालस बनावट असला पाहिजे हें अगदीं उघड आहे; अर्थात् 'नामदेवांनीं स्वप्नांत येऊन जागें केलें व उरलेले चार कोटी अभंग पुरे करण्याची आज्ञा केली,' हा सदर अभंगांतला मजकूरही बनावटच आहे. सांप्रदायी गाथ्यांतही बनावट अभंग असल्याचा हा एक बळकट पुरावा आहे. असो.

तुकारामबुवांची कविता हल्लीं ज्या शुद्ध स्वरूपांत आपण पाहतों तें तिचें मूळरूप नव्हे. बुवांनीं स्वतः आपल्या हातांनीं लिहिलेले कांहीं अभंग त्यांचे विद्यमान वंशज ह. भ. प. नारायणबुवा ऊर्फ बाबासाहेब विघुबुवा गोसावी, इनामदार देहू, यांच्या संग्रहीं आहेत. त्यांच्या व छापील गाथ्यांतील त्याच अभंगांच्या भाषेंत वरीच तफावत दिसते. बुवांचे टाळकरी शिष्य संतुजी तेली जगनाडे यांच्या हातच्या बुवांच्या अभंगांच्या ज्या वह्या उपलब्ध आहेत त्यांतील अभंगांची आणि बुवांच्या हातच्या वह्यांतील अभंगांची भाषा एक दिसते. शिवाय, हे मूळ अभंग, शब्द न तोडतां मोडीप्रमाणें सरळ एकाच ओळीनें लिहिलेले आहेत. 'ल' च्या जागीं सर्वत्र 'ळ' हें अक्षर वापरलें आहे. जसें, 'जाळें,' 'निघाळें,' 'देवाईळ,' 'राहीळे' इत्यादि. अभंगपादाचे शेवटीं : अशीं दोन टिंबें दिलेलीं आहेत. ऱ्हस्वदीर्घाचाही फारसा विधिनिषेध ठेवलेला नाहीं. उदाहरणार्थ 'विठ्ठल' हा शब्द 'वीठळ' असा लिहिला आहे. तात्पर्य, मुळांत तुकोबांनीं आपले अभंग आपल्या खेडवळ भाषेंतच लिहिले आहेत, परंतु पुढें रामेश्वरभट्टांनीं किंवा बुवांच्या दुसऱ्या एखाद्या व्युत्पन्न शिष्यानें, भाषेच्या दृष्टीनें ते चांगले सुधारून लिहिले असावे व त्याच स्वरूपांत ते हल्लीं आपल्यापुढें आहेत. ह. भ. प. नारायणबुवांच्या संग्रहीं बुवांच्या हातचे फक्त २४८ अभंग आहेत. दीडशें–दोनशें

वर्षांपूर्वी त्यांच्या घरच्या वहींत बुवांचे ११००–१२०० अभंग होते, असें ते म्हणतात. इंद्रायणींत बुडविलेल्या अभंगांच्या वह्या जेव्हां पाण्यावर तरंगूं लागल्या तेव्हां त्या ज्या लोकांनीं बाहेर काढल्या त्यांपैकीं कित्येकांनीं, प्रसाद म्हणून वह्यांचीं कांहीं पानें आपापल्या घरीं नेलीं व त्यामुळें एकत्र आणि सलग अशी बुवांची कविता राहिली नाहीं. संताजी जगनाडे यांच्या हातच्या वहींतीलही बरींचशीं पानें प्रसाद म्हणून लोकांनीं कातरून नेलीं आहेत ! मूळ वह्यांतील पानें शोधून काढण्याचा बराच प्रयत्न ह. भ. प. नारायणबुवा यांनीं केला, परंतु त्याचा विशेष उपयोग झाला नाहीं. फक्त पंढरपुर येथें, एका 'आस्थेवाईक' वारकरी घराण्यांत 'भिजल्या वहींतील अभंग' म्हणून एक वही सांपडली. अर्थात्‌च मूळ भिजलेल्या वहींतील अभंगांची ही नक्कल आहे व ती दीडशें पावणेदोनशें वर्षांपूर्वी केलेली आहे. वह्या बुडविण्याचा प्रयत्न झाला त्या वेळेपर्यंत बुवांनीं रचलेल्या अभंगांची जरी अशी फांकाफांक झाली असली तरी तेव्हांपासून आपल्या निर्याणकालापर्यंत बुवांनीं जे हजारों अभंग रचले असतील ते सर्व बुवांच्या वंशजांच्या घरांत कां सांपडूं नयेत हें मात्र समजत नाहीं. कदाचित्, बुवांच्या निधनकालीं त्यांच्या घरांत कोणी जाणता पुरुष नसल्यामुळें व त्यांची पत्नि जिजाई ही अज्ञानी असल्यामुळें, बुवांच्या पुढील अभंगांच्या वह्या, नक्कल करून घेण्यासाठीं म्हणून त्यांच्या शिष्यांनीं, टाळकऱ्यांनीं व इतर लोकांनीं जिजाबाईकडून मागून नेल्या असतील व परत केल्या नसतील. कै. रा. ब. शंकर पांडुरंग पंडित, 'सर्वसंग्रह' कर्ते कै. माधव चंद्रोबा, कै. तुकाराम तात्या, कै. माडगांवकर वगैरे गृहस्थांनीं तुकोबांच्या अभंगांचे गाथे जेव्हां पहिल्यानेंच छापून प्रसिद्ध केले, तेव्हां त्यांनीं महाराष्ट्रांतील अनेक ठिकाणांहून अभंगांच्या ज्या शेंकडों वह्या गोळा केल्या होत्या त्यांत या मूळ वह्यांपैकीं कांहीं वह्या खात्रीनें असल्या पाहिजेत. परंतु तदनंतरच्या ४०।५० वर्षांच्या कालांत ह्या वह्यांचें काय झालें किंवा त्या त्याच वेळीं ज्यांच्या त्यांस परत करण्यांत आल्या वगैरे हकीकत समजण्यास आतां कांहीं मार्ग नाहीं. तथापि, अद्याप बृहन्महाराष्ट्रांत, इतर जुन्या कवींच्या कवितेप्रमाणेंच तुकोबांचीही पुष्कळ हस्तलिखित कविता ठिकठिकाणीं लोकांच्या संग्रहांत सांपडते व तींत, कोणत्याही छापील गाथ्यांत प्रसिद्ध न झालेले

कांहीं अभंग आढळतात, हें मी दुसरीकडे सांगितलेंच आहे. पुनः एकदां, तुकोबांच्या अभंगांच्या मिळतील तेवढ्या वह्या गोळा करून, व इतर बाडांत तुकोबांचे फुटकळ अभंग उतरून घेतलेले आढळतात तेही मिळवून, तुकोबांच्या कवितेचा एक अधिकृत गाथा तयार करण्याचें काम भारत-इतिहास-संशोधक मंडळासारख्या विद्वन्मंडळानें जर हातीं घेऊन पुरें केलें तर मराठी वाङ्मयाची मोठी सेवा केल्याचें श्रेय तर मिळेलच, परंतु द्रव्यदृष्टीनेंही हा प्रयत्न फायदेशीर झाल्याशिवाय राहणार नाहीं.

महीपति म्हणतात, "तुकोबांस कवित्वाची स्फूर्ति झाल्यावर त्यांनीं पहिल्यानें 'बालक्रीडे'चे अभंग लिहिले. बालबोध अक्षर लिहिण्याची त्यांना संवय नव्हती, पण पुढें काव्यस्फूर्ति झाल्यावर ते बालबोध लिहूं लागले. कीर्तनांत एखादें आख्यान लावलें म्हणजे त्यावर बुवा तेथल्या तेथें कविता रचून म्हणत." अर्थात् त्या वेळीं त्यांचे शिष्य या कविता उतरून घेत. त्यांच्याच ह्यातींत त्यांच्या कवितांचा कोल्हापुरापर्यंत कसा प्रसार झाला होता व पुढें त्या कवितांची कशी नक्कल होऊं लागली याचा उल्लेख बहिणाबाई आणि सालोमालो यांच्या हकीकतींत पूर्वीं आलाच आहे. आज अडीचशें वर्षें ही कविता हरिदासांच्या कीर्तनांतून आणि भजनी मंडळ्यांच्या भजनांच्या फडांतून सारखी गायिली जात आहे. हरिदासाच्या कीर्तनास तुकोबांच्या अभंगांवाचून प्रारंभ होणार नाहीं आणि 'हेंचि दान दे गा देवा' हा त्यांचा अभंग म्हटल्यावांचून कीर्तन पुरें होणार नाहीं. त्यांच्या अभंगांचे कांहीं चरण तर म्हणीवजा लोकांच्या तोंडीं बसून गेलेले आहेत. तात्पर्य, इतकी लोकप्रियता दुसऱ्या कोणत्याही जुन्या कवीस प्राप्त झालेली नाहीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. शिवाय पुनः तुकारामबोवांचें नशीब इतकें शिकंदर कीं शिवाजी महाराजांनीं देऊं केलेल्या संपत्तीचा 'सोनें आणि माती । आम्हा समानचि चित्तीं' असें म्हणून त्यांनीं त्याग केला असतांही त्यानंतर अडीचशें वर्षांनीं परकीय इंग्रज सरकारानें २४००० रु. ची देणगी त्यांच्या माथीं मारलीच! द्रव्याचा विटाळ नको म्हणून पळत सुटणाऱ्या निरपेक्ष मनुष्याच्या मागून, तो जिवंत असतांना तर द्रव्य धावून येतेंच, पण तो मेल्यावरही त्याची पाठ तें सोडीत नाहीं. सरकारच्या पैशानें स्वतःची कविता छापून प्रसिद्ध होण्याचा मान एकट्या

तुकोबांसच मिळाला आहे. सुमारें ५० वर्षांपूर्वी मुंबई सरकारानें २४००० रु. खर्च करून, कै. शंकर पांडुरंग पंडित यांजकडून जो बुवांच्या अभंगांचा गाथा संपादन करविला तोच पहिला अधिकृत गाथा होय. त्यापूर्वी कै. माधव चंद्रोबा यांनीं बुवांचे बरेचसे अभंग आपल्या 'सर्वसंग्रहा'च्या द्वारें शिळाछापावर छापून प्रसिद्ध केले होते. सरकारी गाथा निघाल्यावर गेल्या ५० वर्षांत सुमारें वीस पंचवीस प्रकाशकांनीं तुकोबांचा गाथा प्रसिद्ध केला असून, त्याच्या सुमारें एक लक्ष प्रती निघाल्या असल्या पाहिजेत असा अंदाज आहे. यांतले बरेचसे गाथे एकाच गाथ्याच्या नकला असून, कांहीं गाथे स्वतंत्र आहेत. प. लो. वा. मि. फ्रेजर व कै. काशीनाथ बाळकृष्ण मराठे यांनीं तुकोबांच्या बऱ्याच अभंगांचें इंग्रजींत भाषांतर केलें असून पुणें येथील 'तुकाराम सोसायटी' नें कांहीं अभंगांचें गद्य रूपांतर करून छापलें आहे. कै. विष्णुबुवा जोग यांचा सार्थ गाथा प्रसिद्धच आहे. इंदूर येथील होळकर कॉलेजांतले तत्त्वज्ञानाचे माजी अध्यापक कै. शांताराम अनंत देसाई यांचें 'तुकारामाच्या अभंगरत्नाचे हार' हेंही पुस्तक अवलोकनीय आहे. कै. बाळकृष्ण मल्हार हंस या रसिक गृहस्थांनीं तुकारामबुवांच्या कवितेवर एक सर्वोत्कृष्ट निबंध सुमारें ५० वर्षांपूर्वी लिहिला होता तो आतां उपलब्ध नाहीं. अगदीं अलीकडे, 'सुबोध-पत्रिके' चे संपादक श्री. द्वारकानाथ गोविंद वैद्य यांचा 'लेखसंग्रह' प्रसिद्ध झाला आहे त्यांतील कांहीं लेखांत तुकोबांच्या कांहीं अभंगांचें सुंदर विवेचन केलें आहे.

तुकोबांच्या कवितेचें 'परीक्षण' करून तिची योग्यायोग्यता ठरविण्याची नुसती कल्पनादेखील मनांत आणणें हें मोठें पाप आहे असें मी समजतों. त्या कवितेचें परीक्षणच करावयाचें तर तें करावयास ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, रामदास यांच्या तोडीचे परीक्षक आणावे लागतील. माझें स्वतःचें मत विचाराल तर बुवांच्या अभंगांस अमृताच्या चषकांचीही उपमा अपुरी पडेल असें मला वाटतें. ही कविता पूर्ण स्वयंस्फूर्तीची असल्यामुळें ती कोणाच्या परीक्षणाची आणि निरीक्षणाची पर्वा करणारी नाहीं. बुवांचे विचार आणि भाषासरणी इतकी सडेतोड आहे कीं त्यांनीं कोणाचीच भीड मुर्वत ठेवलेली नाहीं. प्रेम आणि औत्सुक्य यांचा हा जणूं काय समुद्रच उचंबळलेला आहे. त्या समुद्रांत एखादी दुसरी बुडी मारून हातीं लागेल तें रत्न खिशांत घालावें इतकाच

आमचा अधिकार. कांहीं ठिकाणची बुवांची भाषा कोणास कठोर वाटेल, कोणी म्हणेल बुवांनीं कांहीं ठिकाणीं ग्राम्य शब्दांचा उपयोग केला आहे, कोणी असा आक्षेप घेईल कीं कांहीं ठिकाणीं बुवांचा स्पष्टवादीपणा फटकळपणाच्या सीमेस जाऊन भिडला आहे. तर या आक्षेपकांनीं एकच गोष्ट ध्यानांत ठेवावी ती ही कीं 'बुडती हे जन न पाहवे डोळां,' अशा मनाच्या स्थितींत बुवांनीं आपले अभंग लिहिले आहेत. मुलाच्या कल्याणाची चिंता वाहणारा बाप कधीं त्याला आंजारूनगोंजारून, कधीं नुसता शब्दांचा धाक दाखवून, तर कधीं चौदावें रत्न दाखवून जशी त्याची समजूत घालतो, त्याप्रमाणें तुकोबांचें हृदय मनुष्य-जातीच्या कल्याणासाठीं तळमळत असल्यामुळें, त्यांची समजूत घालण्यासाठीं त्यांनीं निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळ्या प्रकारची भाषा वापरली आहे. त्यांच्या कवितेंत कांहीं ग्राम्य शब्द सांपडतात खरे, पण एक तर बहुतेक जुन्या कवींस हल्लींचा औपचारिक सभ्यपणा फारसा माहित नव्हता आणि दुसरें असें कीं पूर्वीं सांगितल्या-प्रमाणें, तुकोबा हे कांहीं मोठे व्युत्पन्न पंडित नव्हते. ते खेड्यांत राहणारे एक खेडवळ गृहस्थ होते व त्या त्यांच्या राहणीस शोभेल अशीच त्यांची एकंदर भाषासरणी आहे. मुक्तेश्वर, वामन, मोरोपंत वगैरे पंडितकवींच्या काव्यांतही जर अधून मधून एखादा दुसरा अश्लील शब्द डोकावतो तर तुकोबांसारख्या खेडवळ उपदेशकाच्या कवितेंत दहापांच अश्लील शब्द आढळल्यास त्यांत कांहीं मोठेसें आश्चर्य नाहीं. विद्यमान महाराष्ट्र वाङ्मयसम्राट् श्री. नरसिंह चिंतामण केळकर यांनीं 'अश्लील वाङ्मयाचा वाद' या आपल्या मार्मिक लेखांत यासंबंधानें असें म्हटलें आहे, "उपदेशाचा जोर चालू असतां उपदेशक देहभान विसरून जाऊन बोलत असतां त्या उन्मनस्थितींत त्याच्या हातून अश्लील शब्दप्रयोग होऊं शकेल. पण तेथें उपदेशाची पवित्रता व उपदेशकाची पवित्रता हीं इतकीं प्रबल असतात कीं तीं अश्लीलत्वाच्या भावनेला मारक होतात. मात्र बोलणाराची योग्यता जितकी मोठी असेल त्या मानानेंच त्याला ही माफी मिळूं शकेल." आतां तुकारामबुवांची योग्यता फारच मोठी होती याबद्दल वाद नाहीं, अर्थात् त्यांच्या बाबतींत हा अश्लीलत्वाचा प्रश्न उपस्थितच होत नाहीं.

---

१ ता. १२ जुलई १९३२ चा 'केसरी'चा अंक पहा.

वाङ्मयाच्या दृष्टीनें तुकोबांची कविता पूर्णपणें निवृत्तिपर असल्यामुळें ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, रामदास इत्यादिकांच्या कवितेशीं तिची तुलना करण्यास हरकत नाहीं. यांपैकीं नामदेवांच्या कवितेशीं तुकोबांच्या कवितेचें अतिशयच साम्य आहे. ज्ञानदेवांच्या ज्ञानेश्वरींतलें काव्य फारच श्रेष्ठ प्रतीचें असून त्यांची भाषाही 'नागर' म्हणजे फार सभ्य असून कोमल आहे. एखाद्यावर कोरडे ओढावयाचे झाले तरी ते ओढतांना ज्ञानेश्वर महाराज आपल्या टीकाप्रतोदास मृदु शब्दांचा रेशमी दोर बांधतात, त्यामुळें त्यांचे फटकारे फारसे झोंबत नाहींत. थोड्याशा गुदगुल्या मात्र होतात. तुकोबांचें तसें नाहीं. त्यांनीं आपल्या चावुकास कातड्याची वादी लावलेली आहे. त्यामुळें ज्याच्या पाठीवर त्याचे फटकारे बसतात, तो त्यांची आठवण जन्मभर विसरत नाहीं. समर्थ रामदासस्वामी आणि तुकोबा हे दोघेही ज्ञानोबांप्रमाणें नुसते ग्रंथकार नसून उपदेशक कवि असल्यामुळें त्यांच्या भाषेंत असा फरक पडावा हें अगदीं साहजिक आहे. एकनाथांची गोष्ट याहून थोडीशी निराळी आहे. ते ग्रंथकार होते आणि उपदेशकही होते, यामुळें त्यांच्या ओवीबद्ध ग्रंथांची भाषा जितकी सौम्य आहे तितकी उपदेशपर फुटकळ कवितेची भाषा सौम्य नाहीं. पण तुकोबांच्या कवितेंत एक मोठें मर्मस्थान आहे, तें हें कीं ते जेव्हां पांडुरंगाला आळवूं लागतात त्या वेळीं त्यांचा सगळा कठोरपणा कोठल्या कोठें जाऊन ते मोठी गोड आणि प्रेमाची भाषा बोलूं लागतात ! ते देवाशींही प्रसंगविशेषीं भांडण करीत नाहींत असें नाहीं, पण तें करतांना असे खुबीदार शब्द योजतात कीं ते ऐकून देवाला राग तर येणार नाहींच पण उलट हंसूं मात्र येईल. तुकोबांच्या उपमाही मोठ्या समर्पक आणि गोड असतात.

तुकोबांची भाषा जरी थोडीशी खेडवळ असली तरी ती मोठी उठावदार आणि अत्यंत परिणामकारक आहे. तत्कालीन जानपद भाषेंतले बरेच शब्द त्यांच्या कवितेंत सांपडतात. त्यांच्या अभंगांची भाषा सकृद्दर्शनीं जरी बरीच सोपी दिसते तरी त्यांचे सर्वच अभंग सुलभ आहेत असें नाहीं. पाठभेदांमुळेंही अर्थ लावण्यास जरा अडचण पडते. तुकोबांची अशी ठाम समजूत होती कीं आपण जें कवित्व करतों तें आपलें स्वतःचें नसून पांडुरंग तें आपल्या तोंडून वदवितो. अशा अर्थाचे कांहीं अभंग त्यांच्या गाथ्यांत आहेत. यासंबंधाचा पुढील सुंदर अभंग तर प्रसिद्धच आहेः —

" आपुलिया बळें नाहीं मी बोलत । सखा भगवंत वाचा त्याची ॥
साळुंकी मंजूळ बोलतसे वाणी । शिकविता धणी वेगळाचि ॥
काय म्यां पामरें बोलावीं उत्तरें । परि त्या विश्वंभरें बोलविलें ॥
तुका म्हणे त्याची कोण जाणे कळा । वागवी पांगुळा पायांवीण ॥ "

तुकोबांच्या उपलब्ध असलेल्या अभंगांची विषयानुरोधानें वर्गवारी लावण्याचा पद्धतशीर प्रयत्न अद्याप कोणी केला नाहीं. बुवांनीं लिहिलेले प्रासंगिक अभंग वजा जातां त्यांच्या इतर अभंगांची वर्गवारी ठोकळ मानानें अशी लावतां येईलः–१ पौराणिक अभंग, २ संतचरित्रपर अभंग, ३ पांडुरंगस्तुति, ४ पंढरपुरस्तुति व वर्णन, ५ आत्मचरित्र व आत्मपरीक्षण, ६ उपदेशपर अभंग, ७ आत्मनिवेदनपर अभंग, ८ स्फुट अभंग, ९ भारूड, १० मतप्रतिपादक अभंग.

अभंगांशिवाय तुकोबांनीं श्लोक, आरत्या, पदें, गौळणी वगैरे फुटकळ कविता बरीच लिहिली असून त्यांची कांहीं हिंदी कविताही आहे. तुकोबांस हिंदी भाषेचें चांगलें ज्ञान होतें असें त्यांच्या या हिंदी कवितेवरून दिसतें.

तुकोबांच्या उपदेशाचा मुख्य भर हरिनामस्मरणावर आहे. मात्र, 'जेणें विठ्ठल-मात्रा घ्यावी । तेणें पथ्यें सांभाळावीं,' असा महत्त्वाचा इशारा त्यांनीं देऊन ठेवला आहे, आणि त्यांनीं सांगितलेलीं हीं पथ्येंच फार कठीण आहेत. सदाचरण, भूतदया, अहिंसा, परोपकार, सर्व भूतीं भगवद्भाव वगैरे कडक पथ्यें सांभाळलीं तरच ही 'विठ्ठलमात्रा' गुणकारी ठरेल, असें त्यांनीं निक्षून सांगितलें आहे.

तुकारामबुवांनीं मनुष्यप्राण्यांस जो उपदेश केला आहे त्याचा नुसता सारांश देऊं म्हटलें तरी पन्नास साठ पृष्ठें लिहावीं लागतील. त्यापेक्षां, ज्यांना तो उपदेश समजून घ्यावयाचा असेल त्यांनीं त्यांचा गाथाच लक्षपूर्वक वाचावा हें बरें. कारण तो उपदेश त्यांच्याच तोंडून ऐकण्यांत जें स्वारस्य आहे तें आमच्यासारख्यांच्या तोंडून ऐकण्यांत नाहीं. पंढरीची वारी आणि पांडुरंगाचें भजनपूजन यांजवर तुकोबांनीं फार भर दिला आहे हें खरें, पण त्यांच्या उपदेशाचें तें मुख्यांग नव्हे. त्यांची खरी शिकवण 'विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म,' 'कोण्याही जीवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वरपूजनाचें,' 'जे

कां रंजले गांजले, । त्यांसि म्हणे जो आपुले ॥ तोचि साधु ओळखावा, देव तेथेंची जाणावा ॥ सदा शांति राहे वस्ती । तेथें देवाची संगति ॥' इत्यादि अभंगांत ग्रथित झालेली आहे. एकट्या मनुष्यप्राण्यापुरतीच त्यांची आत्मीय भावना मर्यादित नाहीं, तर सर्व प्राणिमात्रांचा तींत समावेश होण्याइतकी ती व्यापक आहे. 'कोण्याही जीवाचा न वडो मत्सर' या अभंगांत त्यांनीं 'जीव' हा शब्द हेतुःपुरस्सर वापरला आहे, 'मनुष्य' हा शब्द वापरला नाहीं.

ज्ञानदेव, एकनाथ, वामन यांजप्रमाणें तुकारामबुवा मोठे व्युत्पन्न पंडित नसले, तरी तत्कालीन परिस्थितीच्या मानानें त्यांचें वाचन व अवलोकन बरेंच होतें असें त्यांच्या कवितेवरून स्पष्ट दिसतें. आरंभीं त्यांचें शिक्षण जरी लिहिण्यावाचण्यापलीकडे झालेलें नव्हतें तरी पुढें त्यांची वृत्ति परमार्थाकडे वळल्यावर त्यांनीं अनेक प्राकृत पौराणिक व आध्यात्मिक ग्रंथ वाचून व हरिदासांचीं कीर्तनें आणि पुराणिकांचीं पुराणें ऐकून आपल्या ज्ञानांत पुष्कळच भर घातली व कांहीं संस्कृत ग्रंथही समजून घेतले. 'पुराणींचा इतिहास, गोड रस सेविला,' आणि, 'कांहीं पाठ केलीं संतांचीं उत्तरें,' असें त्यांनीं स्वतःच सांगितलें आहे. स्वपूर्वकालीन मुकुंदराज, ज्ञानदेव, नामदेव, चोखामेळा, सांवतामाळी, भानुदास, एकनाथ इत्यादि कवींचे ग्रंथ तर त्यांनीं लक्षपूर्वक वाचले होतेच, पण गीता, भागवत, इतर पुराणें, सुभाषित ग्रंथ, भर्तृहरीचीं नीति व वैराग्य हीं शतकें, महिम्न वगैरे संस्कृत ग्रंथांशींही त्यांचा कसा परिचय होता हें श्री. पांगारकर यांनीं आपल्या 'तुकारामचरित्रां'त विस्तरशः दाखविलें आहे. ज्ञानेश्वरी व एकनाथी भागवत हे दोन ग्रंथ तर त्यांच्या अभंगरचनेस मुख्य आधारभूतच आहेत. बुवांच्या बहुश्रुतपणाविषयीं हें झालें. शिवाय सृष्टीचें व मनुष्यस्वभावाचें त्यांचें अवलोकनही सूक्ष्म होतें. त्यांची उपलब्ध कविता जर लक्षपूर्वक वाचली तर तींत प्रसंगानुरोधानें शेंकडों विषय येऊन गेले असल्याचें निदर्शनास येईल व तत्कालिन देशस्थिति, धर्मस्थिति व समाजस्थिति यांसंबंधानेंही पुष्कळच माहिती उपलब्ध होईल. प्रसंगविशेषीं आपणास थोडीशी कठोर भाषा कां वापरावी लागते याचाही खुलासा बुवांनीं एका अभंगांत केला आहे. ते म्हणतात—

"यासी कोणी म्हणे निंदेचीं उत्तरें । नागवला खरें तोचि एक ॥

आडवाटे जातां लावी नीट सोई । धर्मनीति तेही ऐसी आहे ॥
नाइकतां सुखें करावें ताडण । पाप नाहीं पुण्य असे फार ॥
जन्म व्याधि फार चुकतील दुःखें । खंडावा हा सुखें मान त्यांचा ॥
तुका म्हणे निंब दिधल्यावांचून । अंतरींचा शीण कैसा जाय ॥ ”

“ धर्मनीति सांगत असतां ती ऐकून घेण्यास जर कोणी तयार नसेल तर त्याला चांगला चोप द्यावा,” असें जें आपलें मत तुकोबांनीं या अभंगांत स्पष्ट सांगितलें आहे, त्यावरून त्यांची भूमिका समाजशिक्षकाची होती असें जें मागें लिहिलें आहे त्याची सत्यता सिद्ध होते.

केवळ काव्य या दृष्टीनेंही तुकारामबुवांचे अभंग फार सुंदर आहेत. मात्र ‘ काव्या ’ची जी व्याख्या आपण हल्लीं मानतों ती व्याख्या पुढें ठेवून त्यांनीं आपलें काव्य लिहिलेलें नाहीं. ‘ कवित्व ’ म्हणजे पद्यात्मक रचना अशीच त्यांची समजूत होती. परंतु त्यांच्या कांहीं भावना इतक्या प्रबल होत्या कीं त्यांच्या भरांत ते पद्यरचना करूं लागले कीं तिला उत्कृष्ट काव्याचें स्वरूप आपोआप प्राप्त होत असे.

मुंबईतील प्रार्थना समाजिस्ट लोकांत तुकारामबुवांच्या कवितेची जितकी चर्चा होते तितकी दुसऱ्या कोणत्याही मराठी कवीच्या कवितेची होत नाहीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे; प्रार्थनासमाजिस्टांना पांडुरंग नको, पण पांडुरंगाचा भक्त तुकाराम मात्र पाहिजे !

तुकारामबुवांच्या कांहीं अभंगांचा अर्थ लावतांना मोठी अडचण पडते. उदाहरणार्थ पुढील अभंग पहा—

“ अवघ्या कोल्ह्यांचें वर्म अंडीं । धरितां तोंडीं खीळ पडे ॥
भुकूं नका भुकूं नका । आला तुका विष्णुदास ॥
कवणे ठायीं सादर व्हावें । नाहीं ठावें गाढवा ॥
दुर्जनासी पंचानन । तुका रजरेणु संतांचा ॥ ”

ह्या अभंगाचा दुसरा, तिसरा व चौथा ह्या तीन चरणांचा अर्थ अगदीं उघड आहे, परंतु पहिल्या चरणाचा अर्थ तितका सुलभ नाहीं. जंगलांत फिरणाऱ्या लोकांचे

कांहीं आडाखे आहेत. त्यांत एक आडाखा असा आहे कीं, रानांत आपल्या जवळपास जर कोल्हे ओरडूं लागलेतर स्वतःचा वृषण हातांत धरून तो हळूहळू दाबावा म्हणजे कोल्ह्यांचीं तोंडें बंद होतात. हा आडाखा खरा असेल किंवा खोटा असेल, त्याच्याशीं आपल्यास कांहीं कर्तव्य नाहीं; परंतु वरील अभंगाच्या पहिल्या चरणांत बुवांनीं याच आडाख्याचा उल्लेख केला आहे यांत संशय नाहीं. 'अवध्या कोल्ह्यांचें वर्म, अंडीं धरितां, तोंडीं खीळ पडे,' असा अन्वय.

तुकारामबुवांच्या अभंगांची, खुद्द त्यांच्या हातची एक वही आपल्या संग्रहीं आहे असें बुवांचे विद्यमान वंशज श्री. नारायणबुवा विष्णुबुवा गोसावी देहूकर यांनीं 'केसरी' पत्राच्या ता. ४ माहे जुलई १९३३ च्या अंकांत जाहीर केलें असल्याचें मागें सांगितलेंच आहे. सदर वहीच्या एका पृष्ठाचा त्यांनीं फोटोही दिला आहे.

तुकोबांचीं धार्मिक आणि सामाजिक 'मतें' कोणत्या प्रकारचीं होतीं हें त्यांच्या कवितेवरून कोणाला नक्की सांगतां येणार नाहीं. परस्परविरोधी वचनें अनेक ठिकाणीं आढळतात व त्यांची एकवाक्यता करणें कठीण आहे. या विसंगतीचें एक कारण, वयपरत्वें व अनुभवपरत्वें बुवांचीं मतें बदलत गेलीं असावीं, हें तर आहेच; परंतु, ज्या प्रकारचे श्रोते त्या प्रकारचा उपदेश बुवांनीं केला, त्यामुळेंही बरीच विसंगति उत्पन्न झाली आहे. क्वचित् कोठें मूर्तिपूजेचा निषेध केला आहे, तर दुसरीकडे 'अवघें परब्रह्म रिता नाहीं ठाव। प्रतिमा तो देव कैसा नव्हे?' असा प्रश्न मूर्तिपूजेच्या निंदकांना विचारला आहे. 'अभक्त ब्राह्मण जळो त्याचें तोंड। त्यासी काय रांड प्रसवली?' अशा कठोर शब्दांनीं अभक्त ब्राह्मणाची कानउघाडणी बुवांनीं केली आहे, पण एकंदर ब्राह्मणज्ञातीविषयीं त्यांना मोठा आदरच होता असें त्यांच्या पुढील अभंगावरून दिसतें:—

" दुधाळ गाढवी जरी झाली पाहें। पावेल ते काय धेनुसरी॥
कागाचिया गळां पुष्पांचिया माळा। हंसाची तो कळा काय जाणे॥
मर्कटा अंघोळी लावियेले टिळे। ब्राह्मणाचे लीळे वर्तू नेणे॥
जरी तो ब्राह्मण जाला कर्मभ्रष्ट। तुका म्हणे श्रेष्ठ तिहीं लोकीं॥ "

'ब्राह्मण जरी स्वकर्मापासून च्युत झाला तरी तो श्रेष्ठच होय,' हें ह्या अभंगांत तुकोबांनीं दिलेलें आपलें मत, जाती ह्या जन्मावर अवलंबून आहेत, ह्या जुन्या समजुतीचें द्योतक होय. जातिभेद तुकोबांस मान्य नव्हता आणि त्यांनीं त्याचा निषेध केला आहे असें कांहीं लोक बुवांच्या एखाद्या तुटक वाक्यावरून म्हणतात. पण खरा प्रकार याच्या उलट आहे. कलियुगांत कोणकोणत्या वाईट गोष्टी होतील हें तुकोबांनीं एका अभंगांत सांगितलें आहे, त्यांत, 'अठरापगड जाती एका पंक्तीस बसून जेवतील,' ही एक वाईट गोष्ट म्हणून दिली आहे. "तुम्ही नका करूं गर्व। उंच जाती मिळूनि सर्व" या अभगांत उंच जातींस गर्व न करणाऱ्याची सूचना बुवांनीं दिली आहे खरी, व 'विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभेदभ्रम अमंगळ' ह्या प्रसिद्ध अभंगांत त्यांनीं 'भेदाभेदभ्रम अमंगळ' आहे असें म्हटलें आहे हेंही खरें, परंतु तेवढ्यावरून, बुवांस जातिभेद मान्य नव्हता असा जर कोणी निष्कर्ष काढील तर तो सपशेल फसेल. "आम्ही उंच, तुम्ही नीच," असली उच्चनीचपणाची भावना बाळगूं नका एवढेंच सांगण्याचा बुवांचा यांत उद्देश आहे. 'महारासी शिवे। कोपे, ब्राह्मण तो नव्हे' या बुवांच्या अभंगावरून, अस्पृश्य मानल्या गेलेल्या लोकांची अस्पृश्यता त्यांस मान्य नव्हती असें कदाचित् म्हणतां येईल; परंतु या वाक्याचे दोन अर्थ होतात हेंही लक्षांत ठेवलें पाहिजे. 'जो ब्राह्मण रागावतो तो महारास शिवतो (अर्थात् क्रोध हाच महार) म्हणून तो ब्राह्मण नव्हे,' हा एक अर्थ व "महाराचा स्पर्श झाला असतां ज्याला क्रोध येतो तो ब्राह्मण नव्हे," हा दुसरा अर्थ. यांतला कोणता अर्थ तुकोबांस अभिप्रेत होता हें त्यांच्या इतरत्र व्यक्त झालेल्या एतद्विषयक अभिप्रायावरूनच ठरविलें पाहिजे. 'तुका म्हणे त्याचे दिवशीं। रांड गेली म्हारापाशीं,' अशी शिवी, बुवांनीं एका अभंगांत हासडली आहे. त्यावरून महार हा अगदीं हलक्या जातीचा मनुष्य अशी बुवांची समजूत उघड दिसते. असो. सोमवार आणि एकादशी हीं व्रतें न पाळणाऱ्या लोकांचा बुवांनीं कडक शब्दांनीं निषेध केला आहे. तीर्थयात्रेस बुवा फारसें महत्त्व देत नसावे असें "आली सिंहस्थ पर्वणी। न्हाव्यां भटां झाली धणी," ह्या त्यांच्या अभंगावरून दिसतें; पण ते स्वतः तीर्थयात्रेस गेले होते असा उल्लेख ग्रंथांतरीं आढळतो. असो.

तुकोबांनीं पंढरीची वारी सुरू केल्यावर, तेथील भक्तिप्रेमाचा सोहळा पाहून ते इतके तन्मय झाले कीं आपण पंढरीचेच रहिवासी आहोंत, असें त्यांस वाटूं लागलें. पंढरपुर आणि पांडुरंग यांच्या वर्णनानें त्यांच्या कवितेचा बराच भाग व्यापला आहे याचें कारण हेंच होय. एका पांडुरंगाशिवाय दुसरा कोणताही देव ते मानीत नसत. पांडुरंगच सर्वश्रेष्ठ आहे हें सांगतांना 'वेताळाफेताळां'ची तर रेवडी त्यांनीं उडविलीच आहे, परंतु 'नव्हे गणोबा विक्राळ। लाडू मोदकांचा काळ' या शब्दांनीं गजानन महाराजांचीही हजिरी घेण्यास त्यांनीं कमी केलेलें नाहीं. तथापि, असें असूनही, मारुति, विश्वेश्वर, भागीरथी, दत्तात्रय, शंकर इत्यादि देवतांचीही स्तुति प्रसंगपरत्वें त्यांनीं केली आहेच. पण खुद्द गणपतीचीही एक सुंदर आरती मुद्दाम रचली आहे!

---

मराठी ... अनुक्रम ३८८९६ वि: ४१२७
क्रमांक ९२८ १८-८-५५


प्रकरण १७ वें

# तुकोबांचे समकालीन संत

शके १५१० पासून १५२० पर्यंत, कोणत्या तरी वर्षी, तुकोबांचा जन्म झाला असवा असें प्रस्तुत ग्रंथाच्या पहिल्या प्रकरणांत मी लिहिलें आहे, तो माझा तर्क जर बरोबर असेल, तर प्रसिद्ध एकनाथ महाराज पैठणकर हे शके १५२१ त समाधिस्थ झाले त्या वेळीं तुकोबांचें वय ८।१० वर्षांचें असलें पाहिजे हें ओघानेंच सिद्ध होतें. तरीपण एकनाथ हे तुकोबांचे समकालीन होते असें म्हणणें बरोबर होणार नाहीं. नाथांचे नातू मुक्तेश्वर, श्रीसमर्थ रामदास, समर्थबंधु रामीरामदास, जयरामस्वामी वडगांवकर, बोधलेबावा, रंगनाथस्वामी निगडीकर, शेख महमद, उद्धवचिद्घन, आनंदतनय, कळपूरकर विठ्ठल, केशवस्वामी भागानगरकर, तुका ब्रह्मानंद, वामन, आनंदमूर्ति, मोरया देव, चिंतामणि देव, निंबराज दैठणकर, गणेशनाथ, वगैरे संत व कवि मात्र तुकोबांचे समकालीन होते व म्हणून त्यांची संक्षिप्त माहिती या प्रकरणांत देण्याचें योजिलें आहे. यांपैकीं कोणाकोणाचा तुकोबांशीं परिचय होता हें समजण्यास मार्ग नाहीं.

**मुक्तेश्वर**—एकनाथ महाराजांची कन्या लीलाबाई हिचा हा मुलगा. याच्या बापाचें नांव चिंतामणि. आडनांव मुद्गल. मुक्तेश्वर हे जन्मतः मुके होते; पण पुढें नाथांच्या कृपेनें त्यांस वाचा फुटली अशी आख्यायिका आहे. मुक्तेश्वरांचें बालपण पैठणांतच गेलें व 'नाटक ऊर्फ कौतूहल रामायण' हा आपला पहिला ग्रंथही त्यांनीं पैठण येथेंच लिहिला. पुढें उत्तरवयांत, दक्षिण महाराष्ट्रांत, नरसोबाच्या वाडीजवळ तेरवाड नामक गांव आहे तेथें ते येऊन राहिले असावे असें, तेथें त्यांचें वृंदावन आहे त्यावरून वाटतें. त्यांचे वंशज हल्लीं तेरवाड येथें असून, कोल्हापूरकर छत्रपति संभाजी महाराज यांनीं तो गांव त्यांस इनाम दिला आहे. जुन्या मराठी कवींत मुक्तेश्वर हे फार श्रेष्ठ प्रतीचे कवि होते. त्यांची कविता अत्यंत सरस व प्रतिभासंपन्न आहे. रामायण हा त्यांचा ग्रंथ श्लोकबद्ध असून, महाभारत हा

ग्रंथ ओवीबद्ध आहे. यांनीं संपूर्ण महाभारतावर मराठी ग्रंथरचना केली होती, परंतु हल्लीं फक्त आदिपर्व, वनपर्व, विराटपर्व, सभापर्व व सौप्तिकपर्व हीं पांचच पर्वें उपलब्ध आलेत. याशिवाय, हरिश्चंद्राख्यान, शुकरंभाख्यान, शतमुखरावणाख्यान वगैरे कांहीं प्रकरणें व आरत्या, पदें वगैरे थोडीशी फुटकळ कविता आहे. ही सर्व कविता छापून प्रसिद्ध झालेली आहे.

**रामदास**—हे तुकोबांहून १५-२० वर्षांनीं लहान होते. यांचा जन्म गोदावरीतीरीं जांवगांवीं शके १५३० मध्यें झाला. यांच्या लग्नाच्या वेळीं वधू व वर यांच्यामध्यें अंतरपाट धरून ब्राह्मण मंगलाष्टकें म्हणत असतां, त्यांच्या तोंडचा 'सावधान' हा शब्द ऐकतांच हे बोहल्यावरून पळून गेले व नासिकजवळ टाकळी येथें जाऊन राहिले. तेथें त्यांनीं बारा वर्षें पुरश्चरण केलें. यांच्या बापाचें नांव सूर्याजीपंत व आईचें नांव राणूबाई. उपनांव ठोंसर. टाकळी येथेंच यांना खुद्द श्रीरामचंद्राचा अनुग्रह झाला व तेथेंच त्यांनीं गिरिधरपंत कुळकर्णी नामक एका मृत मनुष्यास जीवंत केलें, अशी कथा आहे. यांचें पाळण्यांतलें नांव नारायण असतां, यांच्या श्रीरामोपासनेमुळें लोक यांना पुढें रामदास म्हणूं लागले व तेंच त्यांचें नांव कायम झालें. बारा वर्षें पुरश्चरण केल्यावर, तीर्थयात्रेच्या निमित्तानें, पण वस्तुतः देशस्थितीचें अवलोकन करण्यासाठीं त्यांनीं सर्व हिंदुस्थानभर प्रवास केला व नंतर एकदां जांब गांवीं जाऊन आपल्या आईचें दर्शन घेतलें. पुढें ते कृष्णाकांठीं येऊन राहिले. तेथें मसूर, परळी वगैरे ठिकाणीं त्यांचें वास्तव्य असे. बृहन्महाराष्ट्रांत अनेक ठिकाणीं त्यांनीं आपले मठ स्थापन करून त्यांजवर महंतांची नेमणूक केली. श्रीराम हें त्यांचें उपास्य दैवत होतें. त्यांनीं गांवोगांव मारुतीचीं देवळें बांधलीं आहेत. छत्रपति शिवाजी महाराजांनीं स्वराज्यस्थापनेचा उद्योग हातीं घेतला तो समर्थांच्या प्रेरणेनें घेतला अशी जी कांहीं लोकांची समजूत आहे ती जरी निराधार आहे तरी समर्थांनीं केलेल्या धर्मजागृतीमुळें महाराजांच्या अंगीकृत कार्यास अप्रत्यक्षपणें बरीच मदत झाली असली पाहिजे यांत संशय नाहीं; आणि पुढें तर समर्थ व शिवाजी महाराज यांची भेट होऊन समर्थांचा उपदेश महाराजांनीं घेतल्यावर, राजकारणांतही समर्थांची सल्लामसलत महाराज घेत असावेत. तत्कालीन देशस्थितीविषयीं समर्थांनीं आपल्या कवितेंत जे संतापाचे उद्गार काढले आहेत, त्यांवरून

इतर संतांपेक्षां राजकारणाकडे त्यांचें अधिक लक्ष होतें, व स्वदेश आणि स्वधर्म यांची परधर्मीयांकडून होणारी पायमल्ली पाहून त्यांना मोठा विषाद वाटत असे, हें सिद्ध होतें. दासबोध, मनाचे श्लोक, रामायणाचीं कांहीं कांडें, अभंग, पदें, आरत्या वगैरे पुष्कळच कविता त्यांनीं लिहिली आहे. समर्थांची वाणी फार जोरदार, अधिकारवती व अत्यंत परिणामकारक आहे. त्यांच्या संप्रदायांत पुष्कळ कवि होऊन गेलेले असून त्यांपैकीं बहुतेकांनीं त्यांचीं चरित्रें लिहून ठेवलीं आहेत. उद्धव, कल्याण, वेणाबाई, गिरिधर, आत्माराम, यशवंत, देवदास, भीमस्वामी वगैरे अनेक प्रसिद्ध व्यक्ति या संप्रदायांत होऊन गेलेल्या आहेत. रामदासस्वामी शके १६०३ माघ वद्य ९ शनिवार या दिवशीं सज्जनगडावर समाधिस्थ झाले. तेथें वरील दिवशीं त्यांच्या पुण्यतिथीचा उत्सव प्रतिवर्षी मोठ्या थाटानें साजरा केला जातो. समर्थांची जन्मभूमि जो जांब गांव तेथेंही त्यांचें एक मोठें मंदिर नुकतेंच उभारण्यांत आलें आहे.

**रामीरामदास**—हे समर्थांचे ज्येष्ठ बंधु. यांचें मूळचें नांव गंगाधर. 'भक्तिरहस्य' व 'सुगमोपाय' या नांवाचे यांचे दोन ओवीबद्ध ग्रंथ व इतर कांहीं स्फुट कविता प्रसिद्ध आहे. लोक यांना 'श्रेष्ठ' असें म्हणत असत. समर्थांच्या पश्चात् त्यांच्या समाधीच्या उत्सवासाठीं देण्यांत आलेल्या गांवांचें उत्पन्न हल्लीं श्रेष्ठांच्या वंशजांस भोगत आहे.

**जयरामस्वामी वडगांवकर**—'दासपंचायतन' या नांवानें जें संतपंचक प्रसिद्ध आहे, त्यांत रामदास, जयराम, केशवस्वामी, रंगनाथ आणि आनंदमूर्ति या पांच सत्पुरुषांचा समावेश होतो. जयरामस्वामी वडगांवकर यांचा मठ सातारा जिल्ह्यांत वडगांव येथें आहे व तेथें त्यांचे वंशजही अद्याप आहेत. जयरामस्वामींचे गुरु कृष्णशांतस्वामी हे शांतलिंगाप्पा ऊर्फ शांतेश्वरस्वामी नामक एका लिंगाइत सत्पुरुषाचे शिष्य होते. जयरामस्वामी हे कात्राबाज मांडवगणचे देशपांडे, उपनांव केसर, गोत्र वसिष्ठ. यांच्या वडिलांचें नांव भिकाजीपंत व आईचें नांव कृष्णाबाई. यांच्या घरची फार गरिबी असल्यामुळें व लहानपणींच यांचे वडील निवर्तल्यामुळें यांच्या आईनें फार कठीण काळ काढिला. जयरामस्वामी कांहीं दिवस पंढरपूर येथें होते व तेथें त्यांनीं

मधुकरी मागून विद्याभ्यास केला. पुढें हे वडगांवास कृष्णाप्पास्वामीपाशीं जाऊन राहिले. जयरामस्वामींचा जन्म शके १५२१ त गोकुळअष्टमीस झाला, व शके १५९४ परिधावी संवत्सर भाद्रपद वद्य ११ या दिवशीं ते समाधिस्थ झाले. यांची काव्यरचना पुष्कळ आहे. दशमस्कंधटीका, रुक्मिणीस्वयंवर, सीतास्वयंवर, पंचीकरण, ज्ञानीभक्तसंवाद, अपरोक्षानुभव हे त्यांचे मुख्य ग्रंथ असून, इतर पदपदांतरेंही बरींच आहेत. यांची वाणी फार प्रासादिक आणि गोड आहे. यांच्या शिष्यप्रशिष्यांतही बरेच कवि होऊन गेले आहेत. मागें बहिणाबाईचें चरित्र दिलें आहे त्यांत जयरामस्वामींच्या कोल्हापूर येथील कीर्तनांचा उल्लेख आला आहे तो वाचकांच्या लक्षांत असेलच.

**रंगनाथस्वामी निगडीकर**—रंगनाथ मोगरेकर आणि रंगनाथ निगडीकर या नांवाचे दोन संतकवि महाराष्ट्रांत होऊन गेलेले असून ते थोड्या वर्षांच्या अंतरानें समकालीनच होते. रंगनाथ निगडीकर हे माध्यंदिनशाखेचे वासिष्ठ गोत्री देशस्थ ब्राह्मण; आडनांव खडके. यांच्या वडिलांचें नांव बोपाजी-पंत. आईचें नांव बयाबाई. रंगनाथांचा जन्म शके १५३४ मार्गशीर्ष शु ॥ १० रोजीं झाला. यांना लहानपणापासून शिपाईगिरीची फार हौस असल्यामुळें यांनीं लग्न करण्याचें नाकारलें. चौदाव्या वर्षीं घर सोडून रंगनाथस्वामी बद्रिकाश्रमीं जाऊन राहिले व तेथें अनेक विद्या संपादन करून स्वगृहीं परत आले. पुढें यांच्या वडिलांनीं चतुर्थाश्रम धारण करून निजानंद हें नांव घेतलें व त्यांचाच अनुग्रह रंगनाथस्वामींनीं घेतला. या निजा-नंदांचा उल्लेख रंगनाथांनीं आपल्या कवितेंत सर्वत्र केला आहे. निजानंद-स्वामी शके १५६४ त समाधिस्थ झाल्यावर रंगनाथांनीं निगडी येथेंच वास्तव्य केलें. त्यांची राहणी मोठी श्रीमंतीची असे. 'भागम्मा' आणि 'चंदम्मा' या नांवाच्या यांच्या दोन शिष्यिणी होत्या. समर्थ रामदास-स्वामींच्या चरित्रांत रंगनाथांचा उल्लेख पुष्कळ ठिकाणीं आला आहे. रंग-नाथस्वामी आपल्या वयाच्या ७२ व्या वर्षीं, शके १६०६ रक्ताक्षी संवत्सरीं मार्गशीर्ष वद्य १० रोजीं समाधिस्थ झाले. रंगनाथांनीं फुटकळ कविता बरीच लिहिली आहे. यांची वाणी फार सुंस्कृत आणि जोरदार असून अधिकारवती आहे. रंगनाथस्वामी हे आनंदसांप्रदायी संत होत. यांच्या

पूर्वजांत व वंशजांत अनेक संतकवि होऊन गेले आहेत. तुकारामबुवा देहूकर हे सदेह वैकुंठास कसे गेले, याचा खुलासा, वेदांतदृष्टया, रंगनाथस्वामींनीं आपल्या एका पदांत केला असून तें पद 'तुकारामबुवांचा जयजयकार' या प्रकरणांत दिलें आहे. प्रसिद्ध कवि श्रीधर हे रंगनाथस्वामींचे पुतणे होत.

**आनंदमूर्ति ब्रह्मनाळकर**—सातारा जिल्ह्यांत ब्रह्मनाळ नामक गांव आहे तेथें हे रहात असत. यांचे वडील ब्रह्मदेव भट हे आगळगांवीं ग्रामजोशी होते. यांच्या आईचें नांव सावित्री. आनंदमूर्तीनीं रघुनाथस्वामी नामक सत्पुरुषांचा उपदेश घेतला होता. आनंदमूर्तींची वाणी रसाळ असून ते प्रेमळ कीर्तनकार होते. यांची समाधि शके १६१८ धाता संवत्सरीं कार्तिक शुद्ध १४ रोजीं झाली. यांचे कांहीं अभंग मात्र उपलब्ध आहेत. यांचा पुत्र कृष्णमूर्ति याचीही कांहीं कविता प्रसिद्ध आहे. आनंदमूर्ति हे मोठे गुरुभक्त होते.

**केशवस्वामी भागानगरकर**—मोगलाईंत कल्याणी येथें आत्मारामपंत नामक ग्रामलेखक होते त्यांचे हे पुत्र. यांच्या आईचें नांव गंगाबाई. केशवस्वामी हे मोठे पारमार्थिक अधिकारी होते. भागानगर (दक्षिण हैदराबाद) येथें तानाशा या नांवाचा प्रसिद्ध पुरुष होता, त्याचा कारभार केशवस्वामी पहात असत. यांच्या गुरूचें नांव काशीराज. केशवस्वामींची शिष्यशाखा मोठी असून, त्यांपैकीं कांहीं शिष्यांनीं बरीच कविता लिहिली आहे. केशवस्वामींनीं हैदराबाद येथें शके १६०४ दुंदुभी संवत्सरीं, पौष शुद्ध १३ गुरुवार या दिवशीं समाधि घेतली असें 'भक्तमंजरीमाला' या ग्रंथांत लिहिलें आहे, परंतु स्वामींचे एक शिष्य संतराय यांनीं आपल्या 'चिंतानिवारण' नामक ग्रंथांत त्यांचा मृत्युकाल शके १६०८ क्षय संवत्सर हा दिला आहे. केशवस्वामींची समाधि हैदराबाद येथें मुशीनदीच्या कांठीं असून ती हल्लीं अगदीं जीर्ण झाली आहे असें समजतें. केशवस्वामींचीं पदें व श्लोक वगैरे सुमारें १००० कविता उपलब्ध आहे. शिवाय 'एकादशीचरित्र' या नांवाचें एक आख्यानही त्यांनीं लिहिलें असल्याचें समजतें. यांची वाणी स्वानुभवयुक्त व प्रासादिक आहे 'गुंडा' या नांवाच्या यांच्या एका शिष्याचीही कविता सुंदर आहे. 'भज रे गोविंदा गोविंदा' हें प्रसिद्ध पद ह्या 'गुंडा' चेंच होय.

**बोधलेबावा**—माणकोजी बोधला हें यांचें नांव. आडनांव जगताप. हे धामणगांवचे रहिवासी. यांच्या गुरूचें नांव 'नरहरि' असावें असें यांच्या एका पदांतील शेवटच्या चरणावरून दिसतें. 'थोंड्या ताटांना कणसें आणण्याचा' चमत्कार यांनीं केला अशी कथा आहे. 'सांगड बांधा रे भक्तीची' हें प्रसिद्ध पद यांचेंच होय.

**वामन पंडित**—यांच्या चरित्राविषयीं अगदीं निखालस विश्वसनीय अशी माहिती उपलब्ध नाहीं. हे विजापूरचे रहिवासी असून यांचें उपनांव शेष व गोत्र वासिष्ठ होतें. हे नांदेड येथें रहात असत अशीही माहिती मिळते. वामन हे महापंडित होते. सच्चिदानंद नामक यतींनीं मलयाचलावर यांना उपदेश दिला. यांच्या पत्नीचें नांव गिराबाई. हे कवि 'वामन पंडित' या नांवानें महाराष्ट्र कविमंडळांत फार प्रख्यात आहेत. यथार्थदीपिका व निगमसार हे यांचे दोन मोठे ओवीबद्ध ग्रंथ असून, अपरोक्षानुभूति, नामसुधा, वनसुधा, वेणुसुधा, समश्लोकी गीता, भरतभाव, रुक्मिणीविलास, सीतास्वयंवर, रामजन्म, वामनचरित्र वगैरे अनेक आख्यानें यांनीं रचिलीं आहेत. यांची वाणी विद्वत्ताप्रचुर असून अत्यंत रसवती आहे. 'सुश्लोक वामनाचा' हें वाक्य प्रसिद्धच आहे. यांनीं 'श्रुतिकल्पकता' या नांवाचा एक संस्कृत ग्रंथही लिहिला आहे. हे शके १६१७ त पांडववाडी येथें समाधिस्थ झाले असें म्हणतात. वामन या नांवाचे अनेक कवि होऊन गेलेले असल्यामुळें व त्यांपैकीं एकदोघांनीं या मुख्य वामनाच्या श्लोकरचनेचें बेमालूम अनुकरण केलेलें असल्यामुळें इतर वामनांची कविता यांच्या नांवावर विनाकारण दडपून देण्यांत आलेली आहे. हरि, बापू वामन, विश्वनाथ वामन, साम्राज्य वामन वगैरे त्यांचे अनेक शिष्य होते व त्यांनींही बरीच कविता लिहिली आहे.

**शेख महमदः**—हे मुसलमान साधु अहमदनगर जिल्ह्यांत चांभारगोंदें येथें होऊन गेले. यांचे 'योगसंग्राम' व 'निष्कलंकप्रबोध' या नांवाचे दोन ग्रंथ प्रसिद्ध आहेत. पैकीं पहिला ग्रंथ छापून प्रसिद्ध झालेला आहे. याशिवाय आणखी कांहीं स्फुट कविताही आहे. यांचे गुरु 'चांगबोधला.' जयरामस्वामी वडगांवकर व शेख महमद यांचा मोठा स्नेह होता.

## तुकोबांचे समकालीन संत

**आनंदतनयः**—हे कर्नाटकांतील अरणी गांवचे रहिवासी. यांच्या वडिलांचें नांव आनंदराव. शिवाजी महाराजांचे वडील शहाजी राजे यांचे हे गुरु होते अशी आख्यायिका आहे. यांचें पाळण्यांतलें नांव गोपाळराव. परंतु यांनीं आपल्या कवितेंत सर्वत्र आनंदतनय, आनंदात्मज, आनंदसुत, आनंदनंदन याच नांवांनीं स्वतःचा उल्लेख केला आहे. यांना शिपाईगिरीची फार आवड असावी असें 'आरणीचा शिपाई' या शब्दांनीं त्यांनीं एके ठिकाणीं स्वतःचा निर्देश केला आहे त्यावरून वाटतें. यांची कविता यमकादि शब्दालंकारांनीं मंडित असून, स्थलविशेषीं फारच रसभरित आहे. प्रसिद्ध नलदमयंतीस्वयंवराख्यानाचे कर्ते रघुनाथ पंडित हे आनंदतनयांचे व्याही होते अशीही आख्यायिका आहे. आनंदतनयांची बहुतेक सगळी कविता 'काव्यसंग्रह' व 'महाराष्ट्रकवि' या मासिकांत प्रसिद्ध झाली आहे. हरिदास लोक आपल्या कीर्तनांत यांच्या कवितेचा फार उपयोग करितात. यांचा एकही मोठा ग्रंथ नाहीं. सीतास्वयंवर, सुदामचरित्र, मार्कंडेयाख्यान, सेतुबंधन वगैरे आख्यानांवर यांनीं कविता केली आहे. यांचीं पदेंही फार गोड आहेत.

**कळपूरकर विठ्ठल**—हा वत्सगोत्री ब्राह्मण, वऱ्हाडांतील कळपूर गांवचा रहिवासी. याची वृत्ति व्यापारी होती. यानें रासक्रीडा या नांवाचें श्लोकबद्ध काव्य शके १५३६ त लिहिलें आहे.

**मोरयादेव व चिंतामणि देव**—हे प्रसिद्ध पितापुत्र गाणपत्य पुण्यानजीक चिंचवड येथें होऊन गेले, व तेथें त्यांच्या समाधि आहेत. तुकोबांच्या चरित्रांत चिंतामणिदेवांचा उल्लेख पूर्वी आलाच आहे.

**तुका ब्रह्मानंद**—हे दैवज्ञ ज्ञातीचे कवि शिवाजीमहाराजांचे वेळीं सातारा येथें होऊन गेले. यांच्या गुरूचें नांव ब्रह्मानंद. हे चांगले संस्कृतज्ञ होते. भर्तृहरीच्या शतकांचें समश्लोकी भाषांतर व इतर स्फुट कविता यांनीं बरीच लिहिली आहे.

**उद्धवचिद्घन**— हे धारूर गांवचे राहणारे. यांचें स्वतःचें नांव उद्धव व यांच्या गुरूचें नांव चिद्घन. तुकाराम महाराज व उद्धव चिद्घन हे एकाच

चैतन्य संप्रदायाचे अनुयायी. उद्धवचिद्घनांनीं गीतेचें समश्लोकी भाषांतर केलें आहे. शिवाय त्यांनीं अनेक संतांचीं चरित्रें साकी वृत्तांत लिहिलीं आहेत. पदें वगैरे स्फुट कविता बरीच आहे.

**निंबराज दैठणकर**—हे दैठणचे रहिवासी. यांच्या वडिलांचें नांव मुरारपंत दंडवते. हे वासिष्ठ गोत्री देशस्थ ब्राह्मण. एकनाथशिष्य नरहरि हे यांचे गुरु. दैठणगांवची इनामी वृत्ति यांनीं स्वतः संपादन केली. वारकरी संप्रदायांत निंबराज दैठणकर हे एक मोठे अधिकारी पुरुष होऊन गेले. हे कीर्तन करूं लागले म्हणजे श्रीकृष्णाची बालमूर्ति यांच्या खांद्यावर विराजमान झालेली कांहीं लोकांस दिसत असे अशी आख्यायिका आहे. हे शके १६०० माघ वद्य भृगुवारीं दैठण येथें समाधिस्थ झाले. यांनीं ज्ञानबोध, जपमाळ वगैरे लहान लहान प्रकरणें लिहिलीं असून, शिवाय पदें अभंग वगैरे स्फुट कविताहि केली आहे. निंबराज व त्यांचे वंशज यांना वारकरी मंडळींत मोठा मान आहे.

**गणेशनाथ**—हे सारशांत रहात असत. हे पंढरीचे वारकरी होते. यांची शिष्यशाखा त्याच प्रांतांत आहे. यांचे कांहीं अभंग व पदें इतकीच कविता उपलब्ध आहे.

याशिवाय आणखी किती तरी साधुकवि तुकोबांचे समकालीन होते, परंतु ग्रंथविस्तारभयास्तव त्यांची माहिती येथें देतां येत नाहीं.

---

## प्रकरण १८ वें

# तुकारामबुवांचा जयजयकार

### अभंग

भक्त भागवत जीवन्मुक्त संत । महिमा अत्यद्भुत चराचरीं ॥
ऐसिया अनंतामाजी तूं अनंत । लीलावेश होत जगत्राता ॥
ब्रह्मानंद तुकें तुळे आला तुका । तो हा विश्वसखा क्रीडे जनीं ॥
शास्त्र श्रेष्ठाचार अविरुद्ध क्रिया । तुझी भक्तराया देखियेली ॥
देउनि तिलांजलि काम्यनिषिद्धासी । विधिविणें योगेंशी ब्रह्मार्पण ॥
संतग्रहमेळीं....जग गिळी । पैल उदयाचळीं भानु तुका ॥
संतवृंदें तीर्थ गौतमी हरिकथा । तुकया नर सिंहस्था भेटीं आलीं ॥
शांतिपतिव्रते जालें परिणयन । कामसंतर्पण निष्कामता ॥
क्षमा क्षमापणें प्रसिद्ध प्रथा जगीं । ते तों तुझ्या अंगीं मूर्तिमंत ॥
दया दीननाथा तुवां जीवविली । विश्वीं विस्तारली कीर्ति तुझी ॥
वेदवाक्यबाहु उभारिला ध्वज । पूजिले देवद्विज सर्व भूतें ॥
अधर्म क्षय व्याधीं धर्मांशीं स्पर्शला । तो त्वां उपदेशिला अनन्यभक्ति ॥
ब्रह्म ऐक्यभावें भक्ति विस्तारिली । वाक्यें सफळ केलीं वेदविहितें ॥
देहबुद्धी जात्या अभिमानें वंचलों । तो मी उपेक्षिलों न पाहिजे ॥
न घडो याचे पायीं बुद्धीचा व्यभिचार । मागे रामेश्वर रामचंद्र ॥

पंडित वैदिक अथवा दशग्रंथी । परि सरी न पवती तुकयाची ॥
शास्त्रेंही पुराणें गीता नित्य नेम । वाचिताती वर्म न कळे त्यांसी ॥
कर्म अभिमानें वर्ण अभिमानें । नाडले ब्राह्मण कलियुगीं ॥
तैसा नव्हे तुका वाणी व्यवसायी । भाव त्याचा पायीं विठोबाचे ॥
अमृताची वाणी वरुषला शुद्ध । करी त्या अशुद्ध ऐसा कोण ॥
चहूं वेदांचें हें केलें विवरण । अर्थही गहन करूनियां ॥
उत्तम मध्यम कनिष्ठ वेगळे । करूनी निराळे ठेविले ते ॥
भक्तिज्ञानें आणि वैराग्यें आगळा । ऐसा नाहीं डोळां देखियेला ॥

जप तप यज्ञ लाजविलीं दानें । हरिनामकीर्तनें करूनियां ॥
मागें कवीश्वर जाले थोर थोर । नेलें कलेवर कोणें सांगा ॥
म्हणे रामेश्वर सकळां पुसोनी । गेला तो विमानीं बैसोनियां ॥

## आरती

तूंचि आत्माराम नव्हेसी देहधारी । स्तुति जरि होय झडो माझी वैखरी ॥ पातकी मूढ जन पडतील अघोरीं । यालागीं अवतार केला महीवरी ॥ १ ॥ जयजय भक्तराया धर्ममूर्ति तुकया । आरती ओंवाळितों भावें तुझिया पायां ॥ध्रु०॥ तुझे ठायीं असे श्रम कोणा न कळे नेम । जन हें काय जाणे अनुभवितो राम ॥ टाकोनी अभिमान जीवीं धरिलें प्रेम । बोलोनी महिमा तुझा जनां दिला विश्राम ॥ २ ॥ अद्भुत महिमा तुझा काय वर्णूं दातारा । उदकेंवीण अन्न दिवस क्रमिले तेरा ॥ आतां हे ऐसी प्राप्ती काय वडेल येरां । उदकीं कागद दिन रक्षिले अठरा ॥ ३ ॥ ऐकतां तुझें वचन मन होय उन्मन । सच्चिदानंद-गाभा तुजठायीं पूर्ण ॥ नित्य हें असो माझें तुझे ठायीं अनुसंधान । करूनि कृपादान देईं इतुकें दान ॥ ४ ॥ शास्त्रें आणि वेदांत शिष्टाचार समस्त । आणिला एकवाक्या जन लोक कृतार्थ ॥ विशेष रामेश्वरा प्रेम दिलें बहुत । विनवितों तुज आतां ठेवीं मस्तकीं हात ॥ ५ ॥

आरती तुकारामा । स्वामी सद्गुरु धामा ॥
सच्चिदानंदमूर्ति । पाय दाखवीं आम्हां ॥ ध्रु० ॥
राघवें सागरांत । पाषाण तारिले ।
तैसे हे तुकोबाचे । अभंग रक्षिले ॥ १ ॥
तुकितां तुलनेसी । ब्रह्म तुकासी आलें ।
म्हणोनी रामेश्वरें । चरणीं मस्तक ठेविलें ॥ २ ॥

—रामेश्वर भट्ट

## श्लोक

नमो सद्गुरू तुकया ज्ञानदीपा । नमो सद्गुरू सच्चिदानंदरूपा ॥
नमो सद्गुरू भक्त कल्याणमूर्ती । नमो सद्गुरू भास्करा पूर्णकीर्ती ॥

## आरती

प्रपंचरचना सर्वेहि भोगुनि त्यागीली ।
अनुतापाचे ज्वाळीं देहबुद्धि हविली ॥
वैराग्याची निष्ठा प्रकटुनि दाखविली ।
अहंता ममता दवडुनि निजशांती वरिली ॥ १ ॥

जयजय जी सद्गुरू तुकया दातारा ।
तारक संतांचा तूं जिवलग सोयरा ॥ ध्रु० ॥

हरिभक्तीचा महिमा विशेष वाढविला ।
विरक्ति ज्ञानाचा ठेवा उघडुनि दाखविला ॥
जगदोद्धारालागीं उपाय सुचवीला ।
निंदक दुर्जनाचा संदेह निरसिला ॥ २ ॥

तेरा दिवस वह्या रक्षुनियां उदकीं ।
कोरड्याचि काढुनी दाखविल्या शेखीं ॥
अपार कविताशक्ती मिरवुनि इहलोकीं ।
कीर्तनश्रवणें तुमच्या तरती जन लोकीं ॥ ३ ॥

बाळवेष घेउनी श्रीहरि भेटला ।
विधिचा जनिता तोचि आठव हा दिधला ॥
तेणें ब्रह्मानंदें प्रेमा डोलविला ।
न तुके म्हणुनी तुका नामें गौरविला ॥ ४ ॥

प्रयाणकाळीं देवें विमान पाठविलें ।
कलिच्या काळामाजी अद्भुत वर्तविलें ॥
मानवदेह घेउनि निजधामा गेले ।
निळा म्हणे सकळ संत तोषविले ॥ ५ ॥

—निळोबा

## अभंग

तुकोबाचीं पदें अद्वैत प्रसिद्धें । तयांच्या अनुवादें चित्त झुरे ॥
ऐसीं ज्याचीं पदें तो मज भेटतां । जीवासी या होता तोष बहु ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम...श्रीतुकाराम..... वि: १९ ५७२७
क्रमांक ....७२४९.......... नों. दि: १६-८-५४

तुकोबाचा छंद लागला मनासी । ऐकतां पदांसी कथेमध्यें ॥
तुकोबाची भेटी होईल तो क्षण । वैकुंठासमान होय मज ॥
तुकोबाची कानीं ऐकेन हरिकथा । होये तैसें चित्ता समाधान ॥
तुकोबाचें ध्यान करूनि अंतरें । राहें त्या भितरीं घरामाजी ॥
बहेणी म्हणे तुका सद्गुरु सहोदर । भेटतां अपार सुख आहे ॥

मत्स्य जैसा जळावांचूनि चरफडी । तैसी ते आवडी तुकोबाची ॥
अंतरींचा साक्ष असेल जो प्राणी । अनुभवें मनीं जाणेल तो ॥
तृषितासी जैसें आवडे जीवन । तैसा पिंड प्राणेवीण तया ॥
बहेणी म्हणे हेत तुकोबाचे पायीं । ऐकोनियां देहीं पदें त्याचीं ॥

न बोलवे शब्द अंतरींचा धांवा । नाइके तुकोबा काय कीजे ॥
अदृष्ट करंटें साह्य नव्हे देव । अंतरींची हांव काय करूं ॥
तेरा दिवस ज्यानें वह्या उदकांत । घालुनियां सत्य वांचविल्या ॥
महाराष्ट्र शब्दांत वेदांतींचे अर्थ । बोलिला लोकांत सर्वद्रष्टा ॥
अंतसाक्ष आहे निरूपणीं हेत । जडे परी चित्त ओळखेना ॥
बहेणी म्हणे मीच असेन अपराधी । अन्याय त्रिशुद्धी काय त्याचा ॥

—बहिणाबाई

## श्लोक

जयाची वदे पूर्ण वेदांत वाणी । कसें हो म्हणावें तयालागिं वाणी ॥
परब्रह्मरूपीं असा जो तुकावा । तयाचे तुकीं कोण ऐसा तुकावा ॥
जया दर्शनें स्पर्शनें मुक्त होती । तुका नाम वाचे सदा आणिताती ॥
पुनर्जन्म त्या प्राणियांलागिं कैंचा । तुकाराम वाणी जयां नाम वाचा ॥
परंधाम टाकूनि कैसा उडाला । जिवन्मुक्त होऊनि ब्रह्मीं बुडाला ॥
जयाची तनू ब्रह्मरूपीं बुडाली । भवभ्रांति हे जाण कैसी गळाली ॥
तुका यासि कोठें तुकाया दिसेना । जनीं हिंडतांना तुकावा दिसेना ॥
तुकावा कसा तो चतुर्भूज झाला । निराकार ब्रह्मीं स्वरूपीं निराळा ॥

तुका ब्रह्मरूपीं स्वरूपीं रहातो । जया दीपन्यायें जगासी पहातो ॥
तुका बैसला ज्ञानवैराग्यधामीं । वसे चित्कळा पूर्ण ब्रह्मीं अरामीं ॥
जयाचे मुखीं भारती वेद माता । तया प्राप्तिची कायसी जाण चिंता ॥
निजानंद आनंद तो मग्न झाला । निराकार ब्रह्मस्वरूपीं मिळाला ॥
कृपसागरें नाव निर्माण केली । असंख्यात बुद्धी तरोनीच गेली ॥
पुढेंही तरायासि ऊपाय केला । म्हणोनि तुका मृत्युलोकासि आला ॥
कसें भर्जिलें बीज तें ऊगवेना । तसें सर्व संपादिलें तें कळेना ॥
पहा बोध त्या जाहला वामनाला । सुखाचा गमे पूर्ण ठेवा मनाला ॥

—वामन*

## पद

जडदेहा घेउनि वाणी गेला ती ऐका वाणी ॥ ध्रु० ॥
घट फोडुनि जनकादिक ते अनुभविते झाले माती ।
हा नोहे तुकया तैसा घट राखुनि धरिला चित्तीं ॥ १ ॥
इतर ते वारुनि दुग्धा परिणामक घेती पाणी ।
हा नोहे तुकया तैसा पय राखुनि चाखी लोणी ॥ २ ॥
इतरीं तें फोडुनि कोऽहं मग चाखियला तो सोऽहं ।
हा नोहे तुकया तैसा अच्छेद्य पचविला कोऽहं ॥ ३ ॥
इतरीं त्या मिश्र पुटातें देउनियां जड टाकियलें ।
तो नोहे तुकया तैसा परिसानें हेमचि केलें ॥ ४ ॥
जडबुद्धि अहं या देहा निजरूपीं वाहुनि गेला ।
निजरंगीं रंग पहाया रंगानें निश्चय केला ॥ ५ ॥

—रंगनाथस्वामी निगडीकर

* हे श्लोक सुश्लोककार वामनाचे खास नाहींत. दुसऱ्या एखाद्या वामनाचे असतील किंवा कोणीतरी स्वतः हे श्लोक रचून त्यांत वामनाचें नांव दडपून दिलें असेल.

## आरती

शुद्ध परब्रह्म संता अव्यक्ता । पुरुषोत्तमा क्षर अक्षरातीता ॥
स्वइच्छा प्रगटोनी दाविसी भक्ता । भक्तीनें ऐश्वर्य साधोनी सत्ता ॥ १ ॥
जयदेव जयदेव जय सद्गुरु तुकया । सद्भावें आरती ओंवाळूं सखया ॥ ध्रु० ॥
ब्रह्मादिक हरिहर क्षेत्रविचार । करिती सिद्ध ऋषी शास्त्रें अवतार ॥
नेणति योगी ज्ञानी मुनी सर्वत्र । जाणोनी तें केलें ब्रह्म शरीर ॥ २ ॥
अनेक महाकवि वेदांतवक्ते । वाक्यदीपें राती अविद्याहंते ॥
त्यांमाजी तव वाक्यें भानू साक्षात । या कारणें श्रीहरी रक्षी उदकांत ॥ ३ ॥
देह परब्रह्म वैकुंठा नेणें ऐसा । तुजवांचून न देखें आन ॥
आणिकही केलीं बहुत कारणें । गोपाळ सद्भावें ओवाळी चरण ॥ ४ ॥

—गोपाळबावा

## आरती

आरती तुकोस्वामी । भक्तिभाव दे नामीं ॥
तारका गुरुराया । निज सारजा माया ॥ ध्रु० ॥
निर्गुण गुणवंता । तुकारामा समर्था ।
मागुती भेटी देईं । पायीं ठेवीन माथा ॥ १ ॥
वर्तुळ दोंद पोट । नेत्र नासिक कंठ ॥
देखिल्या दंतपंक्ति । तुकाराम समर्थीं ॥ २ ॥
देखिलें रूप जैसें । ह्यास दाविजे तैसें ॥
सांवळें रूप बापा । त्याचें लागलें पिसें ॥ ३ ॥
उंच ना ठेंगणा हो । ध्यानीं हेंचि हें राहो ॥
मानसीं कचेश्वरा । गुरु तुकोबा पहा हो ॥ ४ ॥

—कचेश्वर

## पद

धन्य तुकोबा कीं तुकोबा कीं । तुका उतरला तुकीं ॥ ध्रु० ॥
कीर्तनीं टाळ धरी । मागें नृत्य करितो हरि ॥ १ ॥

अभंगांचे कागद रक्षी । उदकीं देव तयाचा पक्षी ।। २ ।।
शीतळ केलें पाणी । माजी प्रगटे चक्रपाणी ।। ३ ।।
अवस्था देहाची तनु । ब्रह्मा झाला त्याची धेनु ।। ४ ।।
केसरि गुरु अवतारी । शिवदिन श्रवणमात्रें तारी ।। ५ ।।

—शिवदिन केसरी

## पद

जडदेह कसा घेउनि गेला तुकाराम वाणी ।। ध्रु० ।।
भजनपूजन भावबळें । जिंकियले कळिकाळ ।
गर्जताति तीन ताल । ऐकताति कानीं ।। १ ।।
पंढरिचा देव गडी । पावविला पैलथडी ।
विठ्ठलनाथ गरिब गडी । त्यासि कोण मानी ।। २ ।।

—विठ्ठलनाथ

## आर्या

विष्णुयशाचें घाली द्याया अमृता त्रपा दुकान तुका ।
जरि यासि न देवासी श्रीरामासीही पादुका न तुका ।। १ ।।
नाइक न गा म्हणे जो घातुकचि दिसो अघातुकावाणी ।
प्रेमें ध्यावा गावा भस्म कराया अघा तुकावाणी ।। २।।
नरकांतुनि काढितसे काढुनि बहु पतित पातुकावाणी ।
तो गुरु कसा न्हे हो ज्ञानांबुद्धि अतितपा तुका वाणी ।। ३ ।।
भगवान् स्वभुजासि म्हणे तुजसी तारुनि जना तुकों बाहो ।
नारदमुनिसा सुयशें बहुमत सज्जनमना तुकोबा हो ।। ४ ।।
साधु म्हणेल मन स्मृति हरिची तैसी न टाकु तुकयाची ।
कीं औदार्यघनांची ज्याप्रति पावुनि घटा कुतुक याची ।। ५ ।।
दूत यमासि कथिति कीं निर्मुनि हरिभजनसेतु कागाळी ।
ऐकेना बळ इतरां धर्मांचें तिळ नसे तुका गाळी ।। ६ ।।
मेघें न तर्पिला तो सुतृषित चातक करील आ जितुका ।
जो जो मुमुक्षु त्यातें त्यातें करितो सुतृप्त आजि तुका ।। ७ ।।

शरणागतें बहातां वेचिल देऊनि ओ तुका मास ।
येइल पर साधु तसा व्याघ्रापरि काय ओतु कामास ॥ ८ ॥
धूतां पळांत पुण्यें जरि म्हणतां काय शक्र तुकया धू ।
वाटे याची माता जेंवी करि तेंवि न ऋतु कयाधू ॥ ९ ॥
भक्तिरसचि मूर्त असा करिति बृहस्पति शतक्रतु कयास ।
कीं वाटे भगवद्यश सुरभीपय अमृत तक्र तुकयास ॥ १० ॥
विमद विराग विमत्सर तृप्ति सदा सुगुण हे तुकारामीं ।
ते कैंचे स्वर्गींच्या विविधविषयलाभहेतुकारामीं ॥ ११ ॥
वाटे बहु मानी तो भागवतशिरोवतंस शुक यातें ।
कीं जें अनुदिन रुचलें त्या सद्रसिका तसेंचि तुकयातें ॥ १२ ॥
आश्रय बिभीषणातें श्रीराम कुसंगहातुकामातें ।
साधु म्हणे व्हावा या मोहत्यागींही हा तुका मातें ॥ १३ ॥
साधुसभाप्राणप्रिय ज्याचे निर्दोष युक्तिमद्भंग ।
भगवज्जनेतरांचा करिती ज्यांतील उक्ति मद्भंग ॥ १४ ॥
ज्याचे अभंग लागति खळहृदया जेंवि बाण रामाचे ।
ज्या परवाद न मोहिति शर जैसे ईश्वरास कामाचे ॥ १५ ॥
स्वात्मानुभव पहातां तुकया केवळ सखाचि जनकाचा ।
वैराग्यें डोलविला माथा जेणें मुनींद्र सनकाचा ॥ १६ ॥
वाटे भगवत्कीर्तनरुचिनें याहूनि आन नारद न ।
सद्वृंदा शोभविती ज्याचे गुण जेंवि आनना रदन ॥ १७ ॥
ज्याच्या सद्भंगातें सेवी जन जेंवि बाळ आम्यातें ।
घनसा म्हणे भरावें सुरसें जें मुख करील आ म्यां तें ॥ १८ ॥
ज्याच्या होय अभंगावांचुनि होऊनि हरिकथा नाहीं ।
श्रोत्यांसि अभंगांहीं ती दे जसि माय हरिख थानाहीं ॥ १९ ॥
नाम्याच्या तुकयाच्या गाइल शुक कीं महातपा व्यास ।
रामाच्या कृष्णाच्या कवण न जोडील हात पाव्यास ॥ २० ॥
शोभे कथा अभंगा पावुनियां जेंवि दीपका शाला ।
सद्भंग कथेंत नको तरि मग शालेंत दीप काशाला ॥ २१ ॥

सुज्ञ शिवाजी राजा न म्हणे तुकयासि काय साधु निका ।
तत्पंडित प्रधाना न कळे गुण समज फार आधुनिका ॥ २२ ॥
भक्तिरसिक शूद्रकवन म्हणवूनि कशास नाक वाहेल ।
भगवत्पदप्रसादा बुध जेंवि तशास नाक वाहेल ॥ २३ ॥
केलाचि गुरु तुकोबा जरी अशुचि पशु तथापि शुनकानें ।
अधम म्हणे बद्धमना परिसुनि न अशा कथा पिशुन कानें ॥ २४ ॥
प्रभु आपण शतमखसा सद्भंग प्रगट जो करी घनसे ।
नाचति मयूरसे हरिभक्त म्हणे ज्यांत शोकरीघ नसे ॥ २५ ॥
श्रीराम तसा गेला वैकुंठाला सकाय हा कांहीं ।
महिमा न भीरु करणें दुष्टांच्या यास काय हाकांहीं ॥ २६ ॥
गडबड बडबड करिती नच येऊं दे तुका परि समोर ।
प्रभुचा प्रसाद अद्भुत बहुमत केला शुकापरिस मोर ॥ २७ ॥
तूं काय गरुड कीं गे खळ जिव्हे मक्षिके तुका वाणी ।
तेथें लक्ष्मी रावे राहे ज्या पक्षिकेतु कावाणीं ॥ २८ ॥
जो कुलजहि अभिमानी ज्याचा प्रद्वेष या तुकारामीं ।
म्हणतो तद्विद्वेत्तें सीता तन्मतिस यातुकारा मी ॥ २९ ॥
भगवद्भक्ति कराया बहु जड जीवांसि जो तुका सिकवी ।
त्याच्या दुसरा धरणीवर येइल कोण हो तुकासि कवी ॥ ३० ॥
परिस अयाचा उडवी सद्भाव तसाचि भक्त यातीस ।
रामात्मजें मयूरें आर्या रचिल्या सदर्थ या तीस ॥ ३१ ॥
निर्जितगंगाभंगाभंगाकर आर्यकौतुकारामा ।
श्रीनारदवाल्मीकिव्याससखो जयति कौ तुकारामा ॥ ३२ ॥

---

## प्रकरण १९ वें

# तीर्थप्रसाद

### अभंग

१ समचरणदृष्टि विटेवरी साजिरी । तेथें माझी हरी वृत्ति राहो ॥
आणिक न लगे मायिक पदार्थ । तेथें माझें आर्त्त नको देवा ॥
ब्रह्मादिक पदें दुःखाची शिराणी । तेथें दुश्चित झणीं जडों देसी ॥
तुका म्हणे त्याचें कळलें आम्हां वर्म । जे जे कर्म धर्म नाशवंत ॥

२ नये ज़री तुज मधुर उत्तर । दिधला सुस्वर नाहीं देवें ॥
नाहीं तयावीण भुकेला विठ्ठल । येइल तैसा बोल रामकृष्ण ॥
देवापाशीं मागें आवडीची भक्ति । विश्वासेंशीं प्रीति भावबळें ॥
तुका म्हणे मना सांगतों विचार । धरावा निर्धार दिसेंदिस ॥

३ पावलें पावलें तुझें आम्हां सर्व । दुजा नको भाव होऊं देऊं ॥
जेथें तेथें देखें तुझींच पाउलें । त्रिभुवन संचलें विठ्ठला गा ॥
भेदाभेद मतें भ्रमाचे संवाद । आम्हां नको वाद त्यांशीं देऊं ॥
तुका म्हणे अणु तुजवीण नाहीं । नभाहूनि पाहीं वाड आहे ॥

४ पुढें गेले त्यांचा शोधीत मारग । चला जाऊं माग घेत आम्ही ॥
वंदूं चरणरज सेऊं उष्टावळी । पूर्वकर्मा होळी करूनियां ॥
अमूप हें गांठी बांधूं भांडवल । अनाथां विठ्ठल आम्हांजोगा ॥
अवघे होती लाभ एका या चिंतनें । नामसंकीर्तनें गोविंदाच्या ॥
जन्ममरणाच्या खुंटतील खेपा । होईल हा सोपा सिद्ध पंथ ॥
तुका म्हणे घालूं जीवपणा चिरा । जाऊं त्या माहेरा निजाचिया ॥

५ देवाच्या प्रसादें करा रे भोजन । व्हाल कोण कोण अधिकारी ते ॥
ब्रह्मादिकांसि हें दुर्लभ उच्छिष्ट । नका मानूं वीट ब्रह्मरसीं ॥

अवघियांपुरतें वोसंडलें पात्र । अधिकार सर्वत्र आहे येथें ॥
इच्छादानीं येथें वोळला समर्थ । अवघेंचि आर्त्त पुरवितो ॥
सरे ऐसें येथें नाहीं कदा काळीं । पुढती वाटे कवळीं ध्यावें ऐसें ॥
तुका म्हणे पाक लक्ष्मीच्या हातें । कामारी सांगातें निरुपम ॥

६ सुंदर तें ध्यान उभें विटेवरी । कर कटावरी ठेवूनियां ॥
गळां तुळसीहार कासे पीतांबर । आवडे निरंतर हेंचि ध्यान ॥
मकरकुंडलें तळपती श्रवणीं । कंठीं कौस्तुभमणि विराजित ॥
तुका म्हणे माझें हेंचि सर्व सुख । पाहीन श्रीमुख आवडीनें ॥

७ सदा माझे डोळां जडो तुझी मूर्ति । रखुमाईच्या पती सोयरिया ॥
गोड तुझें रूप गोड तुझें नाम । देईं मज प्रेम सर्व काळ ॥
विठो माउलिये हाचि वर देईं । संचरोनि राहीं हृदयामाजीं ॥
तुका म्हणे कांहीं न मागें आणिक । तुझे पायीं सुख सर्व आहे ॥

८ राजस सुकुमार मदनाचा पुतळा । रविशशिकळा लोपलिया ॥
कस्तूरीमळवट चंदनाची उटी । रुळे माळ कंठीं वैजयंती ॥
मुगुट कुंडलें श्रीमुख शोभलें । सुखाचें ओतिलें सकळही ॥
कासे सोनसळा पांघरे पाटोळा । घननीळ सांवळा बाइयांनो ॥
सकळही तुम्ही व्हा गे एकीसवा । तुका म्हणे जीवा धीर नाहीं ॥

९ विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ ॥
आइका जी तुम्ही भक्त भागवत । कराल तें हित सत्य करा ॥
कोणाही जीवाचा न घडावा मत्सर । वर्म सर्वेश्वरपूजनाचें ॥
तुका म्हणे एका देहाचे अवयव । सुख दुःख जीव भोग पावे ॥

१० आम्ही तरी आस । जालों टाकोनि उदास ॥
आतां कोण भय धरी । पुढें मरणाचें हरी ॥

भलते ठायीं पडो । देह तुरंगीं हा चढो ॥
तुमचें तुम्हांपाशीं । आम्ही आहों जैसीं तैसीं ॥
गेले मानामान । सुखदुःखाचें खंडन ॥
तुका म्हणे चित्तीं । नाहीं वागवीत खंती ॥

११ महारासी शिवे । कोपे ब्राह्मण तो नव्हे ॥
तया प्रायश्चित्त कांहीं । देहत्याग करितां नाहीं ॥
नातळे चांडाळ । त्याचा अंतरीं विटाळ ॥
ज्याचा संग चित्तीं । तुका म्हणे तो ते याती ॥

१२ पराविया नारी माउलीसमान । मानिलिया धन काय वेंचे ॥
न करितां परनिंदा परद्रव्य अभिलाष । काय तुमचें यास वेंचे सांगा ॥
बैसलिये ठायीं म्हणतां रामराम । काय होय श्रम ऐसें सांगा ॥
संतांचे वचनीं मानितां विश्वास । काय तुमचें यास वेंचे सांगा ॥
खरें बोलतां कोण लागती सायास । काय वेंचे यास ऐसें सांगा ॥
तुका म्हणे देव जोडे याजसाठीं । आणीक ते आटे न लगे कांहीं ॥

१३ करावी ते पूजा मनेंचि उत्तम । लौकिकाचें काम काय असे ॥
कळावें तयासी कळे अंतरींचें । कारण तें साचें साच अंगीं ॥
अतिशयाअंतीं लाभ किंवा घात । फळ देतें चित्त बीजाऐसें ॥
तुका म्हणे जेणें राहे समाधान । ऐसें तें भजन पार लावी ॥

१४ युक्ताहार न लगे आणिक साधनें । अल्प नारायणें दाखविलें ॥
कलियुगामाजीं करावें कीर्तन । तेणें नारायण देईल भेटी ॥
न लगे लौकिक सांडावा वेव्हार । घ्यावें वनांतर भस्मदंड ॥
तुका म्हणे मज आणिक उपाव । दिसती ते वाव नामेंवीण ॥

१५ आतां तरी पुढें हाचि उपदेश । नका करूं नाश आयुष्याचा ॥
सकळांच्या पायां माझे दंडवत । आपुलालें चित्त शुद्ध करा ॥

हित तें करावें देवाचें चिंतन । करूनियां मन एकविध ॥
तुका म्हणे लाभ होय तो व्यापार । करा काय फार शिकवावें ॥

१६ अवघें ब्रह्मरूप रिता नाहीं ठाव । प्रतिमा तो देव कैसा नव्हे ॥
नाहीं भाव तया सांगावें तें किती । आपुलाल्या मती पाषांडिया ॥
जया भावें संत बोलिले वचन । नाहीं अनुमोदन शाब्दिकांसी ॥
तुका म्हणे संतीं भाव केला बळी । न कळतां खळीं दूषिला देव ॥

१७ काय उणें आम्हां विठोबाचे पायीं । नाहीं ऐसें काई येथें एक ॥
तें हें भोंवताले ठायीं वांटूं मन । बराडी करून दारोदारीं ॥
कोण बळी माझ्या विठोबा वेगळा । आणीक आगळा दुजा सांगा ॥
तुका म्हणे मोक्ष विठोबाचे गांवीं । फुकाचीं लुटावीं भांडारें तीं ॥

१८ सेवितों हा रस वांटितों आणिकां । घ्या रे होऊं नका रानभरी ॥
विटेवरी ज्याचीं पाउलें समान । तोचि एक दानशूर दाता ॥
मनाचे संकल्प पाववील सिद्धी । जरी राहे बुद्धि याचे पायीं ॥
तुका म्हणे मज धाडिलें निरोपा । मारग हा सोपा सुखरूप ॥

१९ जे कां रंजले गांजले । त्यांसि म्हणे जो आपुले ॥
तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ॥
मृदु सबाह्य नवनीत । तैसें सज्जनाचें चित्त ॥
ज्यासी आपंगिता नाहीं । त्यासि धरी जो हृदयीं ॥
दया करणें जे पुत्रासी । तेचि दासा आणि दासी ॥
तुका म्हणे सांगूं किती । त्याचि भगवंताच्या मूर्ति ॥

२० कास घालोनि बळकट । झालों कळिकाळावरि नीट ।
केली पायवाट । भवसिंधूवरूनि ॥

या रे या रे लहान थोर । याती भलती नारीनर ।
करावा विचार । न लगे चिंता कोणासी ॥
कामीं गुंतले रिकामे । जपी तपी येथें जमे ।
लाविले दमामे । मुक्त आणि मुमुक्षा ॥
एकंदर शिक्का । पाठविला येही लोका ।
आलों म्हणे तुका । मी नामाचा धारक ॥

२१ आम्ही वैकुंठवासी । आलों याचि कारणासी ।
बोलिले जे ऋषि । साच भावें वर्ताया ॥
झाडूं संतांचे मारग । आडरानें भरलें जग ।
उच्छिष्टाचा भाग । शेष उरला तो सेवूं ॥
अर्थे लोपलीं पुराणें । नाश केला शब्दज्ञानें ।
विषयलोभी मन । साधन हें बुडविलें ॥
पिटूं भक्तीचा डांगोरा । कळिकाळासी दरारा ।
तुका म्हणे करा । जयजयकार आनंद ॥

२२ पढियें तें आम्ही तुजपाशीं मागावें । जीवींचें सांगावें हितगुज ।
पाळशील लळे दीन वो वत्सले । विठ्ठले कृपाळे जननीये ॥
जीव भाव तुझ्या ठेवियेला पायीं । तूंचि सर्वांठायीं एक आम्हां ॥
दुजियाचा संग लागों नेदीं वारा । नाहीं जात घरा आणिकाच्या ॥
सर्व सत्ता एकी आहे तुजपाशीं । ठावें आहे देशी मागेन तें ॥
म्हणउनी पुढें मांडियेली आळी । थिंकोनियां चोळी डोळे तुका ॥

२३ आम्ही मागों ऐसें नाहीं तुजपाशीं । जरी तूं भितोसी पांडुरंगा ॥
पाहें विचारूनि आहे तुज ठावें । आम्ही धालों नांवें तुझ्या एका ॥
ऋद्धिसिद्धि तुझें मुख्य भांडवल । हें तों आम्हां फोल भक्तीपुढें ॥
तुका म्हणे जाऊं वैकुंठा चालत । बैसोनि निवांत सुख भोगूं ॥

अनुक्रम वि: तीर्थप्रसाद

२४ न मिळो खावया न वाढो संतान । परि हा नारायण कृपा करी ॥
ऐशी माझी वाचा मज उपदेशी । आणीक लोकांसी हेंचि सांगें ॥
विटंबो शरीर होत कां विपत्ति । परि राहो चित्तीं नारायण ॥
तुका म्हणे नाशिवंत हें सकळ । आठवीं गोपाळ तेंचि हित ॥

२५ जरी माझी कोणी कापितील मान । तरी नको आन वदों जिव्हे ॥
सकळां इंद्रियां हे माझी विनंति । नको होऊं परतीं पांडुरंगा ॥
आणिकांची मात नाइकावी कानीं । आणिकां नयनीं न पाहावें ॥
चित्ता तुवां पायीं रहावें अखंडित । होउनी निश्चित एकविध ॥
चाला पाय हात हेंचि काम करा । माझ्या नमस्कारा विठोबासी ॥
तुका म्हणे तुम्हा भय काय करी । आमुचा कैवारी नारायण ॥

२६ तुजवीण वाणीं आणिकाची थोरी । तरी माझी हरी जिव्हा झडो ॥
तुजवीण चित्ता आवडे आणिक । तरी हा मस्तक भंगो माझा ॥
नेत्रीं आणिकासी पाहीन आवडी । जातु तेचि घडी चांडाळ हे ॥
कथामृतपान न करिती श्रवण । काय प्रयोजन मग यांचें ॥
तुका म्हणे काय वांचून कारण । तुज एक क्षण विसंबतां ॥

२७ गातों भाव नाहीं अंगीं । भूषण करावया जगीं ॥
परि तूं पतितपावन । करीं साच हें वचन ॥
मुखें म्हणवितों दास । चित्तीं माया लोभ आस ॥
तुका म्हणे दावीं वेष । तैसा अंतरीं नाहीं लेश ॥

२८ कैसें करूं ध्यान कैसा पाहों तुज । वर्म दावीं मज याचकासी ॥
कैसी भक्ति करूं सांग तुझी सेवा । कोण्या भावें देवा आतुडसी ॥
कैसी कीर्ति वाणूं कैसा लक्षा आणूं । जाणूं हा कवणू कैसा तुज ॥
कैसा गाऊं गीतीं कैसा ध्याऊं चित्तीं । कैसी स्थिति मति दावीं मज ॥
तुका म्हणे जैसें दास केलें देवा । तैसें हें अनुभवा आणीं मज ॥

२९ जाणे भक्तीचा जिव्हाळा । तोचि दैवाचा पुतळा ॥
आणिक नये माझ्या मना । हो कां पंडित शाहाणा ॥
नामरूपीं जडलें चित्त । त्याचा दास मी अंकित ॥
तुका म्हणे नवविध । भक्ति जाणे तोचि शुद्ध ॥

३० नाचे टाळी पिटी । प्रेमें अंग धरणीं लोटी ॥
माझे सखे ते सज्जन । भोळे भाविक हरिजन ॥
न धरिती लाज । नाहीं जनासवें काज ॥
तुका म्हणे दाटे । कंठ, नेत्रीं ज़ळ लोटे ॥

३१ नाम आठवितां सद्गदित कंठीं । प्रेम वाढे पोटीं ऐसें करीं ॥
रोमांच जीवन आनंदाश्रु नेत्रीं । अष्टांगही गात्रीं प्रेम तुझें ॥
सर्वही शरीर वेंचो या कीर्तनीं । गाऊं निशिदीनीं नाम तुझें ॥
तुका म्हणे दुजें न करीं कल्पांतीं । सर्वदा विश्रांती संतांपायीं ॥

३२ मैंद आला पंढरीस । हातीं घेउनि प्रेमपाश ॥
पुढें नाडियलें जग । नेतो, लागों नेदी माग ॥
उभारोनि बाहे । दृष्टादृष्टी वेधिताहे ॥
वैकुंठींहूनि पेणें । केलें पंढरीकारणें ॥
पुंडलिकें थारा । देउनि आणिलें या चोरा ॥
तुका म्हणे चला । तुम्ही आम्ही धरूं त्याला ॥

३३ म्हणवितों दास ते नाहीं करणी । आंत वरी दोन्ही भिन्न भाव ॥
गातों नाचतों तें दाखवितों जना । प्रेम नारायणा नाहीं अंगीं ॥
पाविजे तें वर्म न कळेचि कांहीं । बुडालों या डोहीं डंभाचिया ।
भांडवल काळें हातोहातीं नेलें । माप या लागलें आयुष्यासी ॥
तुका म्हणे वायां गेलों ऐसा दिसें । होईल या हांसें लौकिकाचें ।

३४ माझ्या विठोबाचा कैसा प्रेमभाव । आपणचि देव होय गुरु ॥
पढियें देहभाव पुरवी वासना । अंतीं तें आपणापाशीं न्यावें ॥

मागें पुढें उभा राहे सांभाळित । आलिया आघात निवारावे ॥
योगक्षेम त्याचें जाणे जडभारी । वाट दावी करीं धरूनियां ॥
तुका म्हणे नाहीं विश्वास ज्या मनीं । पाहावें पुराणीं विचारूनी ॥

३५ दुःखाचे डोंगर लागती सोसावे । ऐसें तंव ठावें सकळांसी ॥
कांहीं न करिती विचार हिताचा । न करिती वाचा नामघोष ॥
भोगें कळों येती मागिल ते जन्म । उत्तम मध्यम कनिष्ठ ते ॥
तुका म्हणे येथें झांकितील डोळे । भोग देते वेळे येइल कळों ॥

३६ सर्वविशीं माझा त्रासलासे जीव । आतां कोण भाव निवडूं एक ॥
संसाराची मज न साहेचि वार्ता । आणीक म्हणतां माझें कोणी ॥
देहसुख कांहीं बोलिले उपचार । विष तें आदर बंध वाटे ॥
उपाधि दाटणी प्रतिष्ठा गौरव । होय माझा जीव कासावीस ॥
तुका म्हणे कांहीं आणीक न साहे । आवडती पाय वैष्णवांचे ॥

३७ काळ सारावा चिंतनें । एकांतवासीं गंगास्नानें ।
देवाचे पूजनें । प्रदक्षणा तुळसीच्या ॥
युक्त आहार विहार । नेम इंद्रियांसी सार ।
नसावी बासर । निद्रा बहु भाषण ॥
परमार्थ महाधन । जोडी देवाचे चरण ।
व्हावया जतन । हे उपाय लाभाचे ॥
देह समर्पिजे देवा । भार कांहींच न घ्यावा ।
होईल आघवा । तुका म्हणे आनंद ॥

३८ कीर्तनाची गोडी । देव निवडी आपण ॥
कोणी व्हा रे अधिकारी । त्यांसी हरि देईल ॥
अंगीं वैराग्याचें बळ । साही खळ जिणावे ॥
उरेल ना उरी । तुका करी बोभाट ॥

३९ जन मानवलें वरी बाह्यात्कारीं । तैसा मी अंतरीं नाहीं जालों ॥
म्हणउनि पंढरिनाथा वाटतसे चिंता । प्रगट बोलतां लाज वाटे ॥
संतां ब्रह्मरूप जालें अवघें जन । ते माझे अवगुण न देखती ॥
तुका म्हणे मी तों आपणासी ठावा । आहें बरा देवा जैसा तैसा ॥

४० आम्ही पतितांनीं घालावें सांकडें । तुम्हा लागे कोडें उगवणें ॥
आचरितां दोष न धरूं सांभाळ । निवाड उकल तुम्हा हातीं ॥
न घेतां कवडी करावा कुढावा । पाचारितां देवा नामासाठीं ॥
दयासिंधु नाम पतितपावन । हें आम्हा वचन सांपडलें ॥
तुका म्हणे करूं अन्यायाच्या कोटी । कृपावंत पोटीं तुम्ही देवा ॥

४१ स्तुति करिजेसा नाहीं अधिकार । नकळे विचार योग्यतेचा ॥
तुमचें मी दास संतांचें दुर्बळ । करूनियां सांभाळ राखा पायीं ॥
राम कृष्ण हरि मंत्र उच्चारणा । आवडी चरणां विठोबाच्या ॥
तुका म्हणे तुमचें सेवितों उच्छिष्ट । क्षमा करा धीट होउनियां ॥

४२ अखंड जया तुझी प्रीति । मज दे तयाची संगति ।
मग मी कमलापति । तुज बा नाणीं कांटाळा ॥

पडोन राहेन तये ठायीं । उगाच संतांचिये पायीं ।
न मगें न करीं कांहीं । तुझी आण विठोबा ॥

तुम्ही आम्ही पीडों जेणें । दोन्ही वारती एकानें ।
बैसलों धरणें । हाका देत दाराशीं ॥

तुका म्हणे या बोला । चित्त द्यावें बा विठ्ठला ।
न पाहिजे केला । माझा अवघा अव्हेर ॥

४३ शीतळ साउली आमुची माउली । विठाई वोळली प्रेमपान्हा ॥
जाऊनि ओसंगा रिघेन वोरस । लागेल ते इच्छे पीइन वरी ॥

कृपा तनु माझी सांभाळी दुभोनी । अमृतसंजीवनी लोटलीसे ॥
आनंदाचा ठाव नाहीं माझे चित्तीं । सागर तो किती उपमेसी ॥
सैर जाय पडें तयेसी सांकडें । संभाळीत पुढें मागें असे ॥
तुका म्हणे चिंता कैसी ते मी नेणें । लडिवाळ तान्हें विठाईचें ॥

४४ दोन्ही हात ठेवुनि कटीं । उभा भींवरेच्या तटीं ।
कष्टलासी साठीं । भक्तिकाजें विठ्ठला ॥
भागलासी मायबापा । बहु श्रम केल्या खेपा ।
आम्हांलागीं सोपा । दैत्यां काळ कृतांत ॥
होतासी क्षीरसागरीं । मही दाटली असुरीं ।
म्हणोनियां घरीं । गौळियाचे अवतार ॥
केला पुंडलिकें गोवा । तुज पंढरीसी देवा ।
तुका म्हणे भावा-। साठीं हातीं सांपडसी ॥

४५ हरि हरि तुम्ही म्हणा रे सकळ । तेणें मायाजाळ तुटईल ॥
आणिक नका कांहीं गाबाळाचे भरी । पडों येते थोरी नागवण ॥
भावें तुळसीदळ पाणी जोडा हात । म्हणावें पतित वेळोवेळां ॥
तुका म्हणे हा तंव कृपेचा सागर । नामासाठीं पार पाववील ॥

४६ संसार तो कोण लेखे । आम्हा सखे हरिजन ॥
काळ ब्रह्मानंदें सरे । आवडी उरे संचली ॥
स्वप्नीं तेही नाहीं चिंता । रात्री जातां दिवस ॥
तुका म्हणे ब्रह्मरसें । होय सरिसें भोजन ॥

४७ अवघ्या भूतांचें केलें संतर्पण । अवघीच दान दिली भूमी ॥
अवघाचि काळ दिनरात्रशुद्धि । साधियेली विधि पर्वकाळ ॥
अवघींच तीर्थें व्रतें केले याग । अवघेंचि सांग जालें कर्म ॥
अवघेंचि फळ आलें आम्हा हातां । अवघेंचि अनंता समर्पिलें ॥
तुका म्हणे आतां बोलों अबोलणें । काया वाचा मनें उरलों नाहीं ॥

४८ सोपें वर्म आम्हां सांगितलें संतीं । टाळ दिंडी हातीं घेउनि नाचा ॥
समाधीचें सुख टाका ओंवाळूनी । ऐसा या कीर्तनीं ब्रह्मरस ॥
पुढती घडे चढतें सेवन आगळें । भक्तिभाग्यबळें निर्भरता ॥
उपजोंचि नये संदेह चित्तासी । मुक्ति चारी दासी हरिदासांच्या ॥
तुका म्हणे मन पावोनि विश्रांति । त्रिविध नासती पापें क्षणें ॥

४९ साजे अळंकार । तरी भोगितां भ्रतार ॥
व्यभिचारीचा टाकमटिका । उपहास होती लोकां ॥
शूरत्वाची वाणी । रूप मिरवे मंडणीं ॥
तुका म्हणे जिणें । शर्तीविण लाजिरवाणें ॥

५० थुंकोनियां मान । दंभ करितों कीर्तन ॥
जालों उदासीन देहीं । एकाविण चाड नाहीं ॥
अर्थ अनर्थासारिखा । करूनि ठेविला पारिखा ॥
उपाधिवेगळा । तुका राहिला सोंवळा ॥

५१ वदे साक्षत्वेंसी वाणी । नारायणीं मिश्रित ॥
न लगे कांहीं चाचपावें । जातों भावें पेरीत ॥
भांडार त्या दातियाचें । मी कैचें ये ठायीं ॥
सादावीत जातो तुका । येथें एकाएकीं तो ॥

५२ पाहातोसी काय । आतां पुढें करीं पाय ॥
वरी ठेवूं दे मस्तक । ठेलों जोडोनि हस्तक ॥
बरवें करीं सम । नको भंगों देऊं प्रेम ॥
तुका म्हणे चला । पुढती सामोरे विठ्ठला ॥

५३ याजसाठीं केला होता अट्टाहास । शेवटींचा दिस गोड व्हावा ॥
आतां निश्चिंतीनें पावलों विसांवा । खुंटलिया धांवा तृष्णेचिया ॥

कवतूक वाटे जालिया वेंचाचें । नांव मंगळाचें तेणें गुणें ॥
तुका म्हणे मुक्ति परिणिली नोवरी । आतां दिवस चारी खेळीमेळी ॥

५४ अंतरींचा भाव जाणोनियां गुज । तैसें केलें काज पांडुरंगा ॥
घातलें वचन न पडेचि खालीं । तूं आम्हां माउली अनाथांची ॥
मज याचकाची पुरविली आशा । पंढरीनिवासा मायबापा ॥
नाशिली आशंका माझिया जीवाची । उरली भेदाची होती कांहीं ॥
तुका म्हणे तेथें काय माझी वाणी । जे तुझी वाखाणी कीर्ति देवा ॥

५५ द्वारकेची मूर्ति आली भीमातीरीं । लाडका तो हरि यशोदेचा ॥
गोकुळांत यानें चोरी केली फार । म्हणोनि समोर उभा केला ॥
विटेवरी उभा कटेवरी हात । लज्जेनें पहात लोकांकडे ॥
तुका म्हणे चोर धरिला पुंडलिकें । चला जाऊं कौतुक पहावया ।

५६ उदार कृपाळ अनाथांचा नाथ । ऐकसील मात शरणागतां ॥
सर्व भार माथां चालविसी त्यांचा । अनुसरले वाचा काया मनें ॥
पाचारितां उभा राहसी जवळी । पाहिजे तें काळीं पुरवावें ॥
चालतांही पंथ सांभाळीसी वाटे । वारिसील कांटे खडे हातें ॥
तुका म्हणे चिंता नाहीं तुझ्या दासां । तूं त्यांचा कोंवसा सर्व भावें ॥

५७ जनीं जनार्दन ऐकतों हे मात । कैसा तो वृत्तांत न कळे आम्हां ॥
जन्म जरा मरण कवण भोगी भोग । व्याधि नाना रोग सुखदुःखें ॥
पापपुण्यें शुद्धाशुद्ध आचरणें । हीं कोणा कारणें कवणें केलीं ॥
आम्हां मरण नाश तूं तंव अविनाश । कैसा हा विश्वास साच मानूं ॥
तुका म्हणे तूंचि निवडीं हें गुढार । दाखवीं साचार तेंचि मज ॥

५८ धीर तो कारण । साह्य होतो नारायण ।
नेदी होऊं सीण । वाहूं चिंता दासांसी ॥

सुखें करावें कीर्तन । हर्षें गावे हरिचे गुण ।
वारी सुदर्शन । आपणचि कळिकाळा ॥
जीव वेंची माता । बाळा जडभारी होतां ।
तो तों नव्हे दाता । प्राकृतां यांसारिखा ॥
हें तों माझ्या अनुभवें । अनुभवा आलें जीवें ।
तुका म्हणे सत्य व्हावें । आहाच नये कारणा ॥

५९ वीर विठ्ठलाचे गाढे । कळिकाळ पायां पडे ॥
करिती घोष जयजयकार । जळती दोषांचे डोंगर ॥
क्षमा दया शांति । बाण अभंग हे हातीं ॥
तुका म्हणे बळी । तोचि एक भूमंडळीं ॥

६० न करीं तळमळ राहें रे निश्चळ । आहे हा कृपाळ स्वामी माझा ॥
अविनाश सुख देईल निर्वाणीं । चुकतील खाणी चौऱ्याशीच्या ॥
आणिकिया जीवां होईल उद्धार । तेही उपकार घडती कोटी ॥
अहिक्य परत्रीं होसील सरता । वाचे उच्चारितां रामराम ॥
तुका म्हणे सांडीं संसाराचा छंद । मग परमानंद पावसील ॥

६१ येईं गा तूं येईं गा तूं पंढरीच्या राया ।
तुजवीण सीण वाटे क्षीण झाली काया ॥
याती हीन मती हीन कर्म हीन माझें ।
सर्वहि लज्जा सोडुनि बापा शरण आलों तूज ॥
दीननाथ दीनबंधु नाम तुम्हा साजे ।
पतितपावन ऐशी ब्रीदावळी गाजे ॥
विटेवरी उभा नीट कटावरी कर ।
तुका म्हणे हेंचि आम्हां ध्यान निरंतर ॥

६२ विरोधाचें मज न साहे वचन । बहु होतें मन कासावीस ॥
म्हणऊनि जीवा न साहे संगति । बैसतां एकांतीं गोड वाटे ॥

देहाची भावना वासनेचा संग । नावडे उबग आला यांचा ॥
तुका म्हणे देव अंतरे यामुळें । आशामोहजाळें दु:ख वाढे ॥

६३ नको सांडूं अन्न नको सेवूं वन । चिंतीं नारायण सर्व भोगीं ॥
मातेचिये खांदीं बाळ नेणें सीण । भावना त्या भिन्न मुंडाविया ॥
नको गुंफों भोगीं नको पडों त्यागीं । लावुनि सरे अंगीं देवाचिया ॥
तुका म्हणे नको पुसों वेळोवेळां । उपदेश वेगळा उरला नाहीं ॥

६४ नाम घेतां मन निवे । जिव्हे अमृतचि स्रवे ।
होताती बरवे । ऐसे शकुन लाभाचे ॥
मन रंगलें रंगलें । तुझ्या चरणीं स्थिरावलें ।
केलिया विठ्ठलें । ऐसी कृपा जाणावी ॥
जालें भोजनसें दिसे । चिरा पडोनि ठेला इच्छे ।
धालियाच्या ऐसे । अंगा येती उद्गार ॥
सुख भेटों आलें सुखा । निध सांपडला मुखा ।
तुका म्हणे लेखा । आतां नाहीं आनंदा ॥

६५ नलगे हें मज तुझें ब्रह्मज्ञान । गोजिरें सगुण रूप पुरे ॥
लागला उशीर पतितपावना । विसरोनि वचना गेलासी या ॥
जाळोनि संसार बैसलों अंगणीं । तुझे नाहीं मनीं मानसीं हें ॥
तुका म्हणे नको रागेजूं विठ्ठला । उठीं देईं मला भेटी आतां ॥

६६ दीननाथा तुझीं ब्रीदें चराचर । घेसील कैवार शरणागता ॥
पुराणीं जे तुझे गर्जती पवाडे । ते आम्हां रोकडे कळों आले ॥
आपुल्या दासाचें न साहसी उणें । उभा त्या कारणें राहिलासी ॥
चक्र गदा हातीं आयुधें अपार । न्यून तेथें पुरें करूं धांवे ॥
तुका म्हणे तुज भक्तीचें कारण । करावया पूर्ण अवतार ॥

६७ वर्णू महिमा ऐसी नाहीं मज वाचा । न बोलवे साचा पार तुझा ॥
ठायींच ही काया ठेविली चरणीं । आतां ओंवाळुनी काय सांडूं ॥
नाहीं भाव ऐसा करूं तुझी सेवा । जीव वाहूं देवा तोही तुझा ॥
मज माझें कांहीं न दिसे पाहतां । जें तुज अनंता समर्पावें ॥
तुका म्हणे आतां नाहीं मज थार । तुझे उपकार फेडावया ॥

६८ नाहीं सुख मज न लगे हा मान । न राहे हे जन काय करूं ॥
देह उपचारें पोळतसे अंग । विषातुल्य चांग मिष्टान्न तें ॥
नाइकवे स्तुति वाणितां थोरीव । होतो माझा जीव कासावीस ॥
तुज पावें ऐसी सांग कांहीं कळा । नको मृगजळा गोवूं मज ॥
तुका म्हणे आतां करीं माझें हित । काढावें जळत आगींतुनी ॥

६९ मी अवगुणी अन्यायी । किती म्हणोन सांगों काई ।
आतां मज पायीं । ठाव देईं विठ्ठले ॥
पुरे पुरे हा संसार । कर्म बळिवंत दुस्तर ।
राहों नेदी स्थिर । एके ठायीं निश्चळ ॥
अनेक बुद्धीचे तरंग । क्षणक्षणा पालटती रंग ।
धरूं जातां संग । तंव तो होतो बाधक ॥
तुका म्हणे आतां । अवघी तोडीं माझी चिंता ।
येउनि पंढरिनाथा । वास करीं हृदयीं ॥

७० अमर आहां अमर आहां । खरें कीं पहा खोटें हें ॥
न म्हणा देह माझा ऐसा । मग भरंवसा कळेल ॥
कैंचा धाक कैंचा धाक । सकळिक हें आपुलें ॥
देवचि बरे देवचि बरे । तुका म्हणे खरे तुम्हीं ॥

७१ न लगे देशकाळ । मंत्रविधान सकळ ।
मनचि निश्चळ । करूनि करुणा भाकावी ॥

येतो बैसलिया ठाया । आसनें व्यापी देवराया ।
निर्मळ ते काया । अधिष्ठान तयाचें ॥
कल्पनेचा साक्षी । तरी आदरेंचि लक्षी ।
आवडीनें भक्षी । कोरडें धान्य मटमटां ॥
घेणें तरी भाव । लक्षी दासाचा उपाव ।
तुका म्हणे जीव । जीवीं मेळविल अनंत ॥

७२ जीव तोचि देव भोजन ते भुक्ति । मरण ते मुक्ति पाषांड्याची ॥
पिंडाच्या पोषणें नागविले जन । लटिकें पुराण केले वेद ॥
मना आला तैसा करिती विचार । म्हणती संसार नाहीं पुन्हां ॥
तुका म्हणे पाठीं उडती यमदंड । पापपुण्य लंड न विचारिती ॥

७३ तीर्थांचें जें मूळ व्रतांचें जें फळ । ब्रह्म तें केवळ पंढरीये ॥
तें आम्ही देखिलें आपुल्या नयनीं । फिटलीं पारणीं डोळियांचीं ॥
जीवांचें जीवन सुखाचें शेजार । उभें कटीं कर ठेवूनियां ॥
जगाचा जनिता कृपेचा सागर । दीनां लोभापर दुष्टां काळ ॥
सुरवरां चिंतनीं मुनिवरां ध्यानीं । आकार निर्गुणीं तोचि असे ॥
तुका म्हणे नाहीं श्रुती आतुडलें । आम्हां सांपडलें गीतीं गातां ॥

७४ माझे मनोरथ पावले जें सिद्धी । तईं पायीं बुद्धि स्थिरावली ॥
समाधान जीव राहिला निश्चळ । गेली हळहळ स्मरणें हे ॥
त्रिविध तापाचें जालेंसे दहन । सुखावलें मन प्रेमसुखें ॥
महालाभ वाचे वसे पांडुरंग । अंगोअंगीं संग अखंडित ॥
जीवनाचा जाला ओलावा अंतरीं । विश्व विश्वंभरीं मावळलें ॥
तुका म्हणे माप भरूं आलें सिगे । धारबोळ गंगे पूर वाहे ॥

७५ निर्वाहापुरतें अन्न आच्छादन । आश्रमासी स्थान कोपी गुहा ॥
कोठेंही चित्तासी नसावें बंधन । हृदयीं नाराणय सांठवावा ॥

श्रीतुकाराम ग्रंथालय, ठाणे. ग्रंथक्रमांक ३८८९४ दि. २८-९-४४

नये बोलों फार बैसों जनामधीं । सावधानबुद्धि इंद्रियदमीं ॥
तुका म्हणे घडी घडीनें साधावी । त्रिगुणांची गोवी उगवूनि ॥

७६ सत्य संकल्पाचा दाता नारायण । सर्व करी पूर्ण मनोरथ ॥
येथें अळंकार शोभती सकळ । भावबळें फळ इच्छेचें तें ॥
अंतरींचें बीज जाणे कळवळा । व्यापक सकळा ब्रह्मांडाचा ॥
तुका म्हणे नाहीं चालत तांतडी । प्राप्त काळ घडी आल्याविण ॥

७७ काय वाणूं आतां न पुरे ही वाणी । मस्तक चरणीं ठेवितसें ॥
थोरीव सांडिली आपुली परीसें । नेणे सिवों कैसें लोखंडासी ॥
जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति । देह कष्टविती उपकारें ॥
भूतांची दया हें भांडवल संतां । आपुल्या ममता नाहीं देहीं ॥
तुका म्हणे सुख पराविया सुखें । अमृत हें मुखें स्रवतसे ॥

७८ अवघा तो शकुन । हृदयीं देवाचें चिंतन ॥
येथें नसतां वियोग । लाभा उणें काय मग ॥
छंद हरीच्या नामाचा । शुचिर्भूत सदा वाचा ॥
तुका म्हणे हरीच्या दासां । शुभ काळ अवघ्या दिशा ॥

७९ ज्ञानियांचे घरीं चोजवितां देव । तेथें अहंभाव पाठीं लागे ॥
म्हणोनि अवघे सांडिले उपाय । धरियेले पाय दृढ तुझे ॥
वेदपरायण पंडित वाचक । न मिळती एक एकामधीं ॥
पाहो गेलों भाव कैसी आत्मनिष्ठा । तेथें देखें चेष्टा विपरीत ॥
आपुलीया नाहीं निवाले जे अंगें । योगी करिती रागें गुरगुरु ॥
तुका म्हणे मज कोणाचा पांगिला । नको बा विठ्ठला करूं आतां ॥

८० पवित्र तो देह वाणी पुण्यवंत । जो वदे अच्युत सर्व काळ ॥
तयाच्या चिंतनें तरतील दोषी । जळतील राशी पातकांच्या ॥

देव इच्छी रज चरणांची माती । धांवत चालती मागें मागें ॥
काय त्यां उरलें वेगळें आणीक । वैकुंठनायक जयां कंठीं ॥
तुका म्हणे देव–भक्तांचा संगम । तेथें ओघ नाम त्रिवेणीचा ॥

८१ मायेविण बाळ क्षणभरी न राहे । न देखतां होय कासावीस ॥
आणिक उदंड बुझाविती तरी । छंद त्या अंतरीं माउलीचा ॥
नावडती तया बोल आणिकाचे । देखोनियां नाचे माय दृष्टी ॥
तुका म्हणे माझी विठ्ठल माउली । आणिकांचे बोलीं चाड नाहीं ॥

८२ हरिचिया भक्ता नाहीं भय चिंता । दुःख निवारिता नारायण ॥
नलगे वाहणें संसार उद्वेग । जडों नेदी पांग देवराव ॥
असों द्यावा धीर सदा समाधान । आहे नारायण जवळीच ॥
तुका म्हणे माझा सखा पांडुरंग । व्यापियेलें जग तेणें एकें ॥

८३ पंढरिये माझें माहेर साजणी । ओविया कांडणीं गाऊं गीतीं ॥
राही रखुमाई सत्यभामा माता । पांडुरंग पिता माहियेर ॥
उद्धव अक्रूर व्यास अंबऋषी । भाई नारदासी गौरवीन ॥
गरुड बंधु लडिवाळ पुंडलीक । यांचें कवतुक वाटे मज ॥
मज बहु गोत संत आणि महंत । नित्य आठवीत ओवियेसी ॥
निवृत्ति ज्ञानदेव सोपान चांगया । जिवलगा माझिया नामदेवा ॥
नागो जगमित्रा नरहरि सोनारा । रोहिदास कबिरा सोईरीया ॥
परिसा भागवता सूरदास सांवता । गाईन नेणता सकळिकांसी ॥
चोखामेळा संत जिवाचे सोईरे । न पडे विसर यांचा घडी ॥
जीवींच्या जीवना एका जनार्दना । पाठक हा कान्हा मिराबाई ॥
आणीकही संत महानुभाव मुनि । सकळां चरणीं जीव माझा ॥
आनंदें ओंविया गाईन मी त्यांसी । जाती पंढरीसी वारकरी ॥
तुका म्हणे माझा बळिया बाप माय । हर्षे नांदे सये घराचारी ॥

८४ कोणे गांवीं आहे सांगा हा विठ्ठल । जरि ठावा असेल तुम्हां कोणा ॥
लागतसें पायां येतों लोटांगणीं । मात तरी कोणी सांगा याची ॥
गुणरूप याचें वाणितां या संतां । मज क्षेम देतां सुख वाटे ॥
सर्वस्वें हा जीव ठेवीन चरणीं । पांडुरंग कोणी दावी तया ॥
तुका म्हणे गाईवत्सा तडातोडी । तैसी जाते घडी एकी मज ॥

८५ पंढरीसी जा रे आलेनो संसारा । दीनांचा सोयरा पांडुरंग ॥
वाट पाहे उभा भेटीची आवडी । कृपाळू तांतडी उतावीळ ॥
मागील परिहार पुढें नाहीं सीण । जालिया दर्षण एक वेळ ॥
तुका म्हणे नेदी आणिकांचे हातीं । बैसला तो चित्तीं निवडेना ॥

८६ सर्वां भूतीं द्यावें अन्न । द्रव्य पात्र विचारोन ।
उपतिष्ठे कारण । तेथें बीज पेरीजे ॥
पुण्य करितां होय पाप । दुग्ध पाजोनि पोशिला साप ।
करोनि अघोर जप । दुःख विकत घेतलें ॥
भूमी पाहतां नाहीं वेगळी । माळ बरड एक काळी ।
उत्तम निराळी । मध्यम आणि कनिष्ठ ॥
म्हणोनि विवेकें । कांहीं करणें तें निकें ।
तुका म्हणे फिकें । रुची नेदी मिष्टान्न ॥

८७ प्रीतीचिया बोला नाहीं पेचपाड । भलतैसें गोड करूनि घेई ॥
तैसें विठ्ठलराया तुज मज आहे । आवडीनें गाय नाम तुझें ॥
वेडेवांकडे बाळकाचे बोल । करिती नवल मायबाप ॥
तुका म्हणे तुज येवो माझी दया । जीवींच्या सखया जिवलगा ॥

८८ माझे मज कळों येती अवगुण । काय करूं मन अनावर ॥
आतां आड उभा राहें नारायणा । दयासिंधुपणा साच करीं ॥

वाचा वदे परी करणें कठीण । इंद्रियां अधीन जालों देवा ॥
तुका म्हणे तुझा जैसा तैसा दास । न धरीं उदास मायबापा ॥

८९ सकळ देवांचें दैवत । उभें असे या रंगांत ॥
रंग लुटा माझे बाप । शुद्ध भावें खरें माप ॥
रंग लुटिला बहुतीं । शुक नारदादि संतीं ॥
तुका लुटिताहे रंग । साह्य जाला पांडुरंग ॥

९० तुका वेडा अविचार । करी बडबड फार ॥
नित्य वाचे हाचि छंद । राम कृष्ण हरि गोविंद ॥
धरी पांडुरंगीं भाव । आणीक नेणे दुजा देव ॥
गुरुज्ञान सर्वां ठायीं । दुजें न विचारी कांहीं ॥
बोल नाइके.कोणाचे । कथे नागवाचि नाचे ॥
संग उपचारें कांटाळे । सुखें भलते ठायीं लोळे ॥
कांहीं उपदेशिलें नेणे । वाचे विठ्ठल विठ्ठल म्हणे ॥
केला बहुतीं फजित । तरी हेंचि करी नित्य ॥
अहो पंडित जन । तुका टाकावा थुंकोन ॥

९१ जोडोनियां धन उत्तम वेव्हारें । उदास विचारें वेंच करीं ॥
उत्तमचि गति तो एक पावेल । उत्तम भोगील जीवखाणी ॥
परउपकारी नेणें परनिंदा । परस्त्रिया सदा बहिणी माया ॥
भूतदया गाईपशूंचें पाळण । तान्हेल्या जीवन वनामाजी ॥
शांतिरूपें नव्हे कोणाचा वाईट । वाढवी महत्त्व वडिलांचें ॥
तुका म्हणे हेंचि आश्रमाचें फळ । परमपद बळ वैराग्याचें ॥

९२ तुज घालोनियां पूजितों संपुटीं । परि तुझ्या पोटीं चौदा भुवनें ॥
तुज नाचूनि दाखवूं कौतुक । परि रूपरेखा नाहीं तुज ॥
तुजलागीं आम्हीं गात असों गीत । परि तूं अतीत शब्दाहूनि ॥

तुजलागीं आम्ही घातियेल्या माळा । परि तूं वेगळा कर्तृत्वासी ॥
तुका म्हणे आतां होऊनि परिमित । माझें कांहीं हित विचारावें ॥

९३ हेचि थोर भक्ति आवडती देवा । संकल्पावी माया संसाराची ॥
ठेविलें अनंतें तैसेंचि रहावें । चित्तीं असों द्यावें समाधान ॥
वाहिल्या उद्वेग दुःखचि केवळ । भोगणें तें फळ संचिताचें ॥
तुका म्हणे घालूं तयावरी भार । वाहूं हा संसार देवापायीं ॥

९४ आम्हां घरीं एक गाय दुभताहे । पान्हा न समाये त्रिभुवनीं ॥
वाने ते सांवळी नांवें ते श्रीधरा । चरे वसुंधरा चौदा भुवनें ॥
वत्स नाहीं माय भलत्यासवें जाय । कुर्वाळी तो लाहे भावभरणा ॥
चहूं धारीं क्षीर वोळली अमुप । धाले सनकादिक सिद्ध मुनी ॥
तुका म्हणे माझी भूक तेथें काय । जोगविते माय तीन्ही लोक ॥

९५ उदार तूं हरी । ऐसी कीर्ति चराचरीं ।
अनंत हे थोरी । गर्जताती पवाडे ॥
तुझे पायीं माझा भाव । पुसीं जन्ममरणठाव ।
देवांचा तूं देव । स्वामी सकळा ब्रह्मांडा ॥
मागणें तें तुज मागों । जीवभाव तुज सांगों ।
लागों तरी लागों । पायां तुमच्या दातारा ॥
दिसों देसी कीविलवाणे । तरी तुजचि हें उणें ।
तुका म्हणे जिणें । माझें तुझे अधीन ॥

९६ पाहा किती आले । शरण समानचि केले ।
नाहीं विचारिले । गुण दोष कोणाचे ॥
मज सेवटींसा द्यावा । ठाव तयांचिये देवा ।
नाहीं करीत हेवा । कांहीं थोरपणाचा ॥

नाहीं पाहिला आचार । कुळगोत्राचा विचार ।
फेडूं आला भार । मग न म्हणे दगड ॥
तुका म्हणे सर्व जाणा । तुझ्या आल्यावरी मना ।
केला तो उगाणा । घडल्या महादोषांचा ॥

९७ लाज वाटे मज मानिती हे लोक । हें तों नाहीं एक माझें अंगीं ॥
मोजुनी झिजलों मापाचिया परी । जाळावी हे थोरी लाभाविण ॥
कोमळ कंटक तीक्ष्ण अगरीं । पोचट ते वरी अंगकांति ॥
चित्रींचे ते लेप शृंगारिले निके । जीवेंविण फिकें रूप त्यांचें ॥
तुका म्हणे दिसें वायां गेलों देवा । अनुभव ठावा नाहीं तेणें ॥

९८ बोलविसी माझे मुखें । परी या जनां वाटे दुख ॥
जया जयाची आवडी । तयालागीं तें चरफडी ॥
कठीण देतां काढा । जल्पे रोगी मेळवी दाढा ॥
खाऊं नये तेंचि मागे । निवारितां रडों लागे ॥
वैद्या भीड काय । अतित्याई जीवें जाय ॥
नये भिडा सांगों आन । पथ्य औषधा कारण ॥
धन माया पुत्र दारा । हें तों आवडी नरका थारा ॥
तुका म्हणे यांत । आवडे ते करा मात ॥

९९ देवाचा भक्त तो देवासीच गोड । आणिकांसी चाड नाहीं त्याची ॥
कवणाचा सोइरा नव्हेच सांगाती । अवघियां हातीं अंतरला ॥
निष्काम वेडें म्हणती बापुडें । अवघियां सांकडें जाला कैसा ॥
माझें ऐसें तया न म्हणती कोणी । असे रानीं वनीं भलते ठायीं ॥
प्रातःस्नान करी विभूतिचर्चन । देखोनियां जन निंदा करी ॥
कंठीं तुळसीमाळा बैसोनि निराळा । म्हणती या चांडाळा काय जालें ॥
गातां शंका नाहीं बैसे भलते ठायीं । शिव्या देती आईबाप भाऊ ॥

घरीं बाईल म्हणे कोठें व्याली रांड । बरें होतें षंढ मरता तरी ॥
जन्मोनि जाला अवघियां वेगळा । म्हणोनि गोपाळा दुर्लभ तो ॥
तुका म्हणे जो संसारा रुसला । तेणेंचि ठाकिला सिद्धपंथ ॥

१०० आतां तुझा भार कळों आला देवा । ठकूनियां सेवा घेसी माझी ॥
टाकूनि सांकडें आपुलिये माथां । घातला या संतांवरी भार ॥
स्तुति करूनियां पिटिला डांगोरा । तें कोण दातारा साच करीं ॥
जातीचें वाणी मी पोटींचें कुडें । नका मजपुढें ठकाठकी ॥
तुका म्हणे नाहीं आलें अनुभवा । आधींच मी देवा कैसा नाचूं ॥

१०१ कांहीं बोलिलों बोबडें । मायबापा तुम्हापुढें ।
सलगी लाडेंकोडें । मज क्षमा करावी ॥
काय जाणावा महिमा । तुमचा म्यां पुरुषोत्तमा ।
आवडीनें सीमा । सांडविली मज हातीं ॥
घडे अवज्ञा सख्यत्वें । बाळें बापासी न भ्यावें ।
काय म्या सांगावें । आहे ठावें तुम्हासी ॥
तुका म्हणे देवा । प्रेम लोभ न सांडावा ।
पाळिला पाळावा । लळा पुढती आगळा ॥

## आरती

१०२ पंढरी पुण्यभूमी भीमा दक्षिणवाहिनी ।
तीर्थ हे चंद्रभागा महापातकां धुनी ।
उतरलें वैकुंठ महासुख मेदिनी ॥ १ ॥

जय देवा पांडुरंगा जय अनाथनाथा ।
आरती ओंवाळीन तुम्हां लक्ष्मीकांता ॥ ध्रु० ॥

नित्य नवा सोहळा हो महावाद्यांचे गजर ।
सन्मुख गरुडपारीं उभा जोडोनियां कर ।
मंडित चतुर्भुज कटीं मिरवती कर ॥ २ ॥

हरिनामकीर्तन हो आनंद महाद्वारीं ।
नाचती प्रेमसुखें नर तेथींच्या नारी ।
जीवन्मुक्त लोक नित्य पाहती हरी ॥ ३ ॥

आषाढी कार्तिकी हो गरुडटकयांचे भार ।
गर्जती नामघोषें महावैष्णव वीर ।
पापासी रीघ नाहीं असुर कांपती सुर ॥ ४ ॥

हें सुख पुंडलिकें कैसें आणिलें बापें ।
निर्गुण आकारलें आम्हांलागीं हें सोपें ।
म्हणोनि चरण धरोनी तुका राहिला सुखें ॥ ५ ॥

१०३ अवतार गोकुळीं हो जन तारावयासी ।
लावण्यरूपडें हें तेजःपुंजाळरासी ।
उगवतां कोटि बिंब रवि लोपले शशि ।
उत्साव सुरवरां मही थोर मानसीं ॥ १ ॥

जय देवा कृष्णनाथा जय रुक्मिणीकांता ।
आरती ओंवाळीन तुम्हा देवकीसुता ॥ ध्रुव० ॥

वसुदेवदेवकीची फोडिली बंदिशाळ ।
होउनी विश्वजनिता तयां पोटींचें बाळ ।
दैत्य हे त्रासियेले समूळ कंसासी काळ ।
राजया उग्रसेना केला मथुरापाळ ॥ २ ॥

राखितां गोधनें हो इंद्र कोपला भारी ।
मेघ जो कडाडिला शिळा वर्षिल्या धारीं ।
राखिलें गोकुळ हो नखीं धरूनियां गिरी ।
निर्भय लोकपाळ अवतरले हरि ॥ ३ ॥

कवतुक पहावया माव ब्रह्मयानें केली ।
वत्सें हीं चोरूनियां सत्यलोकासी नेलीं ।

गोपाळ गाईवत्सें दोहीं ठायीं राखिलीं ।
सुखाचा प्रेमसिंधु अनाथांची माउली ॥ ४ ॥

तारिले भक्तजन दैत्य निर्दाळूनी ।
पांडवां साह्यकारी अडलिया निर्वाणीं ।
गुण मी काय वर्णूं मति केवढी वाणी ।
विनवितो दास तुका ठाव मागे चरणीं ॥ ५ ॥

१०४ गाऊं नाचूं विठो तुझा करूं अनुवाद ।
जिकडे पाहें तिकडे सर्वमय गोविंद ॥
आनंदू रे विठोबा झाला माझे मनीं ।
देखिलीं लोचनीं विटेसहित पाउलें ॥
न करीं तपसाधन मुक्तीचे सायास ।
हाचि जन्मोजन्मीं गोड भक्तीचा रस ॥
तुका म्हणे आम्हां प्रेमा उणें तें काई ।
पंढरीचा राणा सांठविला हृदयीं ॥

१०५ कनकाच्या परियेळीं उजळुनी आरती ।
रत्नदीपप्रभा कैशा पाजळल्या ज्योती ॥
ओंवाळूं गे माय विठ्ठल सबाह्य साजिरा ।
राही रखुमाबाई सत्यभामेच्या वरा ॥ ध्रुव० ॥
मंडित चतुर्भुज दिव्य कानीं कुंडलें ।
श्रीमुखाची शोभा पाहतां तेज फांकलें ॥
वैजयंती माळ गळां शोभे श्रीमंत ।
शंख चक्र गदा पद्म आयुधें शोभत ॥
सांवळा सकुमार जैसा कर्दळीगाभा ।
चरणींचीं नेपुरें वांकी गर्जती नभा ॥
ओंवाळितां मन हें उभें ठाकलें ठायीं ।
समदृष्टि समान तुकया लागला पायीं ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम 3८८८८ वि:
क्रमांक 22४८ नों दि: २५-८-५४
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ५२६५

धन्य दिवस आजी दर्शन संतांचें ।
१०६ नांदे जयां घरीं दैवत पंढरिचें ॥
धन्य पुण्यरूप कैसा झाला संसार ।
देव आणि भक्त दुजा नाहीं विचार ॥
धन्य पूर्वपुण्य वोढवलें निरुतें ।
संतांचें दर्शन झालें भाग्यें बहुतें ॥
तुका म्हणे धन्य आम्हां जोडली जोडी ।
संतांचे चरण आतां जीवें न सोडी ॥

अभंग

झालें रामराज्य काय उणें आम्हांसी ।
१०७ धरणी धरी पीक गाई वोळल्या म्हैशी ॥
राम वेळोवेळां आम्ही गाऊं ओवियें ।
दळितां कांडितां जेवितां गे बाईये ॥
स्वप्नींही दुःख कोणी न देखे डोळां ।
नामाच्या गजरें भय सुटलें कळिकाळा ॥
तुका म्हणे रामें सुख दिलें आपुलें ।
तयां गर्भवासा येणें जाणें खुंटलें ॥

हेंचि दान दे गा देवा । तुझा विसर न व्हावा ॥
१०८ गुण गाईन आवडी । हेचि माझी सर्व जोडी ॥
न लगे मुक्ति धनसंपदा । संतसंग देई सदा ॥
तुका म्हणे गर्भवासीं । सुखें घालावें आम्हांसी ॥

पुंडलीकवरदा हरि विठ्ठल !

REFBK-0005265